शब्दकौमुदी

सम-शब्द-कल्पना-भांडार

य. ब. पटवर्धन

शब्द कौमुदी

सम-शब्द-कल्पना-भांडार

लेखक

यशवन्त बळवन्त पटवर्धन

मूल्य : रु. ७·५०

★

नीलकंठ प्रकाशन : पुणें

प्र का श क :

प्रकाश दामोदर रानडे
नीलकंठ प्रकाशन,
१६४३ (न.) सदाशिव पेठ,
पुणें.

♣

प्रथमावृत्ति :
२६ जानेवारी १९६५

♣

♣

मु द्र क :

रा. ना. सरनाईक
सुलभ मुद्रणालय,
२९१ शनिवार पेठ,
पुणें २.

प्रास्ताविक

साखरेची गोडी अजमावयाचा सोपा मार्ग म्हणजे ती खाऊन पाहणें; याचें दुसरें प्रत्यंतर नको ! तद्वत् शब्दकौमुदी ऊर्फ सम-शब्द-कल्पना-भांडार या प्रस्तुत कोशाचा लेखनासाठीं होणारा उपयोग तो केल्यानेंच कळून येणार आहे. स्वयंपाकाचें साहित्य जवळच कोठींत भरून ठेवायचें आणि गरजेनुसार जिन्नस बाहेर काढून ते शिजवावयाचे. या तऱ्हेची सोय सर्व तऱ्हेच्या लेखनासाठीं उपलब्ध करून देणें हें या शब्दभांडाराचें सामान्य स्वरूप आहे. हें कसें तें सोबतच्या उदाहरणानें स्पष्ट होईल.

समजा, आपल्याला म्हणावयाचें आहे, " पंडित नेहरू हे एक थोर नेते होऊन गेले. " आतां यासाठीं या कोशांतील 'थोर' [पान ८७] 'पुढारी' [पान १३४] हे शब्द काढून त्यांच्या मदतीनें हा आशय पुढीलप्रमाणें विस्तारानें मांडतां येईल :

> *पंडित नेहरू हे एक लोकोत्तर पुढारी होते. त्यांच्यासारखा लोकमान्य नेता दुसरा सांपडणें कठीण. ते राष्ट्राची एक अमोघ शक्ति होते. राष्ट्राला ललामभूत अशा थोडया असामान्य व्यक्तींमध्यें त्यांची गणना होते. त्यांचा मोठेपणा वादातीत आहे. ते भारताचा अमोल शिरताज होते. त्यांच्यासारख्या मार्गदर्शक, राष्ट्राची धुरा वाहणाऱ्या आणि राजकारणाचीं सूत्रें कुशलतेनें हालविणाऱ्या लोकधुरीणाच्या देहावसानानें भारताचेंच नव्हे जगाचेंहि मोठें नुकसान झालें आहे.*

चांगलीं चांगलीं शब्दनाणीं जमा करून तीं कुशलतेनें वापरणें म्हणजेच लेखन-व्यवसाय. शब्दांचा संग्रह शब्दकोशांत केलेला असतो. त्यांतूनच सम-शब्द-कोश [*Dictionary of Synonyms*] करतां येतो. या धर्तीवर साधारण सम पण विषयास जमणारे अशा शब्दांचाहि संग्रह केला जातो; त्याला पर्यायी शब्दकोश [*Thesaurus*] अशी संज्ञा देतात. मराठींत यास आम्ही शब्द-कौमुदी हा शब्द वापरीत आहोंत.

मराठींत ही रचना करतांना केवळ सदृश शब्दांवर न थांबतां संलग्न व जुळणाऱ्या अशा कल्पना व वाक्प्रचार शब्दाबरोबरच घेतले आहेत. यामुळें विचार नाना तऱ्हांनीं व्यक्त करावयाला अधिक सोपें जाईल. मराठी भाषेची ठेवण व घडण पाहतां तीमधील दोन-तीन शब्द गुंफून अथवा एखादी कल्पना घेऊन निर्माण होणारे वाक्प्रयोग बाजूला काढले तर राहणारे पर्यायी शब्द तितकेसे उपयोगी ठरणार नाहींत असें वाटल्या-वरून अशा तऱ्हेचा संमिश्र स्वरूपाचा शब्द-कौमुदी ऊर्फ सम-शब्द-कल्पना-भांडार हा संग्रह तयार केला आहे.

या ग्रंथाच्या वापरासंबंधीं सूचना एवढीच कीं, शेवटीं जी सूची दिली आहे तीमधून आपल्या लेखनविषयाशीं संबद्ध व मिळते-जुळते असे चार-पांच किंवा अधिकहि शब्द लेखकानें मुळांत पहावेत; व ते पुढें ठेवून आपलें लेखन विस्तारीत जावें. अशा प्रयोगांत आपल्याला अधिक अधिक उपयुक्त मुद्देहि सुचत जातील; आणि एकूण लिहिणें ठसठशीत व बांधेसूद होईल. नवशिक्या लेखकांना – फार काय सराइतांना देखील – आपल्या लेखनांत जोरकसपणा व विविध विचार-छटा पेलण्याची व व्यक्तविण्याची ताकद येण्यास हा ग्रंथ उपयुक्त ठरेल अशी आशा वाटते.

८१७, (नवा) सदाशिव पेठ,
पुणें २
ता. २६ जानेवारी १९६५

—य. ब. पटवर्धन

♧ ♧ ♧

श ब्द कौ मु दी

अकल्पित : : कल्पनातीत, बेसुमार, अपेक्षेबाहेर, दैवी, तडका-फडकीं, हद्द झाली, स्वप्नांतहि वाटलें नव्हतें, पूर्वसूचनेशिवाय, सर्व अंदाज फोल ठरले, बापजन्मीं वाटलें नव्हतें, ध्यानींमनीं नव्हतें, आधीं थांगपत्ता लागला नाहीं, अकस्मात्, अवचित, कोठें आगापिछा नसतां.

अकस्मात : : सहसा, अचानक, एकाएकीं, पूर्वसूचना न देतां, वळिवाच्या सरीप्रमाणें, अनपेक्षित, कल्पना नसतां, राजापुरी गंगेप्रमाणें, धूमकेतूप्रमाणें, मला काय हो ठाऊक ? कुणाला हें स्वप्न पडलें होतें ? कसलीहि प्रस्तावना न करतां.

अखेर : : टोंक, शेवट, बिंदु, कळस, शेंडा, अंतीं, समाप्ति, शेवटीं, सरतेशेवटीं, अखेरचें पान, अंतिम संघर्ष, भरतवाक्य, शेवटचा पडदा, क्यू. ई. डी., उपसंहार, सूची व शुद्धिपत्रापर्यंत, तळ गांठला, शेवटचें क्षितिज, मृत्यु, शेवटची आपोष्णी, भैरवी, शेवटचा—तंतु–श्वास–बिंदु–क्षण–लकेर–अंक–प्रकरण–पर्व–कांड–डाव–धागा.

अगतिकता : : प्रयत्न थिटे पडतात, हात टेकावे लागतात, मात्रा चालत नाहीं, चुंबीत यावें लागतें ! हतबुद्ध झाला, तोंड काढायला जागा उरली नाहीं, मनगटें चावीत बसला, नष्टचर्य ओढवलें, सर्व व्याप आखडते घ्यावे लागले, मोठेपणाची भाषा बंद झाली, आपलेच दांत आपलेच ओठ; करतो काय !

अग्नि : : आग, भडका, स्फोट, पेट, विस्तव, ज्वाला, जाळ, वणवा, धडधडणारें धूड, अनल, अंगार, निखारा, आगीचा डोंब, लोळ, लवलवणाऱ्या अग्नि-ज्वाळा, वडवानल, अग्निनारायणाचा प्रकोप, पेटता चुडा, जिभल्या चाटणारा जाळ.

अजाण : : अनभ्यस्त, अनागस, अनिर्वचनीय कोंवळीक, निष्कपट, पाचपोंच नसलेली, भोळीभाबडी, अकपट, निर्व्याज, खुला, निरपराधी,

नेणता, ओंठावरचा जार अजून वाळला नाहीं, ओंठ पिळला तर दूध निघेल, कोत्या बुद्धीचा.

अजीबात : : कांहीं म्हणतां कांहीं नाहीं, पार गंधहि नाहीं, मुळासकट, धादांत, अज्जी, अडलंय डाव्या पायाचं खेटर ! नाहीं म्हणजे नाहींच, बिलकुल, एकदम, सेंट् परसेंट, संपूर्ण, साफ साफ, निखालस, संपूर्णतया.

अजेय : : दुर्दम्य, दुर्जय, दुर्भेद्य, दुःसाध्य, दुष्प्राप्य, दुर्लंघ्य, अजिंक्य, दुर्दमनीय, दुराराध्य, अजय, अनुल्लंघनीय, दुर्लभ, याला विरोध म्हणजे दगडाच्या भिंतीवर डोकें आपटण्यासारखें आहे, यानें कोणापुढें शरणागति पत्करली नाहीं, याचा पाडाव करणें कठीण, हा हातीं पडणारा नाहीं, पकडींत सांपडणार नाहीं.

अट : : शर्त, त्यांत एक ' तर ' आहे, जर-तारी भाषा, सशर्त, पण हें बऱ्याच गोष्टी पुऱ्या करण्यावर अवलंबून आहे, अटी–शर्ती, पण–परंतु, तरतुदी, त्यांत एक ' पण ' आहे; अपवाद व कलमें, कराराचीं पोटकलमें, विकल्प व संकेत.

अडचण : : अडथळा, व्यत्यय, घोटाळा, प्रतिबंध, मध्येंच काय उपटलें हें ! अडसर लागला, विघ्न, मधेंच ठेंच, पीडा, त्रास, प्रत्यवाय, बांधा पाडणारी गोष्ट, पेंच, मार्गांतला धोंडा, बिकट परिस्थिति, आर्थिक टंचाई, विरुद्ध घटना, पडलेला प्रश्न, नड, समस्या, बिनतोड अडवणूक.

अडवणूक : : बांधा काढणें, कोलदांडा घालणें, कांहीं करून चालत्या गाड्याला खीळ घालणें, कैचींत धरणें, पेंचांत टाकणें, खिंडींत गाठणें, वाटा रोखणें, गति रोधणें, मार्ग कुंठित करणें, आड भिंत उभी करणें, मध्यें आडवें येणें, नसते प्रश्न उपस्थित करणें.

अडेलतट्टू : : गंजीवरचा कुत्रा, खाईना खाऊं देईना, गवाणींतला कुत्रा, दुसऱ्याच्या कार्यांत खो घालणारा, विघ्नसंतोषी, हाटला तरी हालणार नाहीं, आडमाप, आडदांड, हेकट, कटकट्या प्राणी.

अत्यल्प : : कळत नाहीं माती सुद्धां, सगळ्याच बाबतींत हांकाहांक आहे; विशेष कांहीं हातीं लागलेलें दिसत नाहीं, पासंगास पुरणार नाहीं,

औषधालाहि नाहीं, कांहीं म्हटल्या कांहीं सुद्धां नव्हतें, त्या दोघांत अंतर म्हणून तें कसें राहिलें नव्हतें, सगळीकडेच गुडघाभर पाणी.

अतिशय : : किती तरी, फारच, पराकाष्ठेचा, मोठ्या संख्येनें, खूपच, उत्साहाला उधाण, सढळ मदत, घवघवीत यश, जबरें व्याज, खूप खूप लाजली, कुबेराचें भांडार जरी स्वाधीन केलें, मोठी आकर्षक, ही झुंबड, देणीं तुंबून राहिलीं, तें कांहीं विचारूं नका ! जो उठला तो म्हणतो, फार म्हणजे काय फारच ! अपरंपार, ढगाएवढें, पोटभर.

अतिशयोक्ति : : दिलें ठोकून झालें ! बंडल, अतिरंजित, फुगवून सांगितलें, अघळपघळ, तिखटमीठ लावून, मीठमसाला परून, एक हात लाकडाचा सव्वा हात ढलपा, तिखट-मीठ लावून वर्णन केलें, एवढ्याचें एवढें केलें.

अतुल : : अतुलनीय, अद्वितीय, यास जोड नाहीं, अजोड, याच्या-सारखा हाच ! झाले बहु होतील बहु परतु या सम हा, याच्या समान कोणी नाहीं, ' रामरावणयोर्युद्धं '– प्रमाणें, यास तुल्यबल धुंडाळावा लागेल, या तोलामोलाचा मिळणें अवघड आहे, अलम दुनियेंत यास तोड नाहीं, यापुढें इतरांची काय मातब्बरी ! या वाणाचा मिळायला पाहिजे ना ?

अदूरदृष्टीचा : : अविचारी, असेल तेव्हां दिवाळी नसेल तेव्हां शिमगा, उतावळा, उद्यांचा विचार नाहीं, पोंच नाहीं, जरा चार फुटांवरचें दिसायचें नाहीं यांना, लघु विचारांचा, आज हंडी शिजली कीं बस्स !

अधर्म : : धर्मभ्रष्ट बाट्य, इतोपि भ्रष्टः ततोपिभ्रष्टः, मेले विटाळचांडाळ मानीत नाहींत, विटाळ कालवतात, दिवसेंदिवस सश्रद्ध इसम विरळा, श्रद्धा रोडावली, माणुसकी लोपली, कळी प्रबळ झाला, अधर्माचें अभ्युत्थान झालें, सर्वांनीं धर्मावरच गदा उगारली, जीवनमूल्यें चळलीं, धर्माला ग्लानि आली.

अध्यात्मवादी (विरुद्ध विज्ञानवादी) : : एकाला जगांत शून्य तर दुसऱ्याला शून्यांत जग दिसतें, द्राक्षसंस्कृति विरुद्ध रुद्राक्षसंस्कृति, आधीं पोटोबा मग विठोबा, भोगवादी विरुद्ध त्यागवादी.

अधाशी : : ऊंस गोड पण मुळ्या सोड म्हणण्याची वेळ आली ! हावरा, मुळासकट ऊंस खाणें, खाखा सुटलेली नेहमींची, कश्शानं संतोष म्हणून कसा तो नाहीं ! सदा भुकेला मेला, तोंडाचें खिंडार सदा वासलेलें, हपापलेला, सदा आणखी पाहिजे. किती देऊन हे पुरे म्हणतील ?

अधिकार : : सत्ता, नियंत्रण, शास्तेपण, वरपगडा, पक्कड, अधिराज्य, हुकुमत, वरचढपणा असणें, कर्तुमकर्तुं अन्यथा कर्तुं शक्ति, वजन–छाप–अग्रहक्क–जबरी–बळ–सामर्थ्य–वर्चस्व–प्रभुत्व असणें वा गाजवणें, काडीची सत्ता आणि लाखाची मत्ता बरोबर होत नाहींत, सत्तेचा समतोल, सत्तेचें शिखर गाठण्याची धडपड, सत्तेची अधिदेवता सत्ताच.

अधिरेपणा : : शिजेतों राहवतें निवतों राहवत नाहीं, घाई, घिसाडघाई, दम निघत नाहीं, केव्हां करूं असें होतें ! व्यवहारमें खाना क्या-दम खाना हें विसरतें, गुडघ्याला बाशिंग बांधणें, येईतों सारखी चुळबूळ यांची !

अधूनमधून : : केव्हां केव्हां, अधेंमधें, कधीं तरी, सटीसामासीं, केव्हां तरी, पंधरा तीनवारीं, बदलून बदलून, आज आहे उद्यां नाहीं, तुटकफुटक, थांबून थांबून, आतां चालू मग बंद पुन्हां चालू अशा प्रकारें.

अधोगति : : अधःपात, तत्त्वच्युति, आचाराचा नीचांक गांठला, ढळला, घसरला, पडला, पतित झाला, खालीं गेला, स्वर्गांतून खालीं कोसळला, भुईसपाट विचारसरणी, नीच स्तरावरील जीवन जगताहेत, खालच्या पातळीवर उतरला, स्वत्त्व व सत्त्वापासून ढळला, निष्ठांचा लोप, हीन स्थिति, भ्रष्टाचार, अभद्राचार, गटारी जीवन, नष्टचर्य, कुप्रवृत्त, दुराचार, स्वैर बेलगाम जीवन, तत्त्वांपासून विचलित, आचारहीनता, सत्प्रवृत्तींचा नायनाट, नैतिक घसरगुंडी, दुराचार, गैरवर्तणूक, तत्त्वांचा त्याग, नरकाची उपासना, बाटणें, खालीं जाणें, तळ गांठणें, कलंकित होणें, सदाचारापासून दूर जाणें, गटारभेट केली.

अनपेक्षित : : आकस्मिक, अंदाजांत बसलें नव्हतें, दत्त म्हणून उभें, याची पूर्वकल्पना नव्हती, अपेक्षांना धक्का देणारी, स्वप्नींहि वाटलें नव्हतें, यथें हिशोब चुकला, आश्चर्यकारक, हा एकदम तडाखाच बसला, अकस्मात् विद्युत्पाताप्रमाणें, एकदम उपटलें, ध्यानीं-मनीं नसतांना मध्येंच !

अन्नान्नता : : इकडे खायला काय दगड मिळणार ? दोन वेळां घरांत चूल पेटायचा प्रश्न, सर्वभक्षी भुकेनें ग्रस्त, इमानाची चटणी–भाकरहि नशिबांत नव्हती, हाता-तोंडाची गांठ पडेना, बरेचदां फांके पडत, थंडा फराळहि केव्हां केव्हां घडे, रोजचें भागविण्याची जेथें मारामार ! अन्नान्न दशा, पोटापाण्याच्या हालांत दिवस काढणें, नशिबीं उपासमार आली, अधूनमधून सक्तीचे उपासहि घडत, अन्नावांचून डोळे पांढरे व्हायची वेळ आली.

अन्याय : : राम्याचा राग सोम्यावर, वड्याचें तेल वांग्यावर, घटिका पाणी पिते तासाला ठोका, चोराला सोडून संन्याशाला सुळीं, करतो एक व भोगतो दुसरा, एकाचें प्रायश्चित्त दुसऱ्याला, नाग पळाला बीळ धोपाटा खातें, मुखरस्तत्र हन्यते, हत्तींच्या झगड्यामध्यें केळींची दुर्दशा, खरूज एकाची मलम दुसऱ्याला, चोर सोडून साव पकडला ! मृदंगाला दोन्हींकडून थपडा, मध्यस्थाचें फुकाचें मरण, शिष्याच्या अपराधाकरितां गुरूला दंड.

अनावड : : नावड, अरुचि, अप्रीति, नको वाटणें, तिरस्कार, मनांत जवळ जवळ तुच्छताच, अप्रिय, प्रिय नव्हे, मनापासून याची भक्ति नाहीं, पाहिजेसें वाटत नाहीं, नसेल तर बरें वाटतें, त्यांत याला रस नाहीं.

अनिच्छेनें : : मारून मुटकून वैद्यबुवा, अगदीं नाहीं कसें म्हणायचें म्हणून तयार इतकेंच, मनांतून नको, एक तऱ्हेची ही बळजोरीच, अंतर्यामीं ऊर्मि नाहीं, राजी नसतां, पसंतीविरुद्ध, इच्छा मारून, हवें म्हणून नव्हे, माथीं मारलें म्हणून, केवळ दुसरा मार्ग नाहीं या कारणानें, तोंड कडू करून, टंगळमंगळ करीत, थंड रक्तानें, हौस नसतां, प्रत्यक्ष अवयव नकार देत असतां, जनाची लाज म्हणून, सक्तीमुळें रुकार, कर्तव्य म्हणून, वरून हुकूम झाला म्हणून.

अनिश्चय : : दोलाचल वृत्ति, धड कांहीं ठरेना, अंतर्द्वंद्व, मनाचें द्वंद्व, मनाची टांगलेली अवस्था, एक पाय तळ्यांत एक पाय मळ्यांत अशी स्थिति, अंतर्मनांत खोलवर सुरू असलेल्या घालमेली संपेनात, जीव खाली-वर होई पण निश्चय होईना, हें करूं कीं तें करूं ठरेना.

अनिश्चित : : अधांतरी, दुग्ध्यांत, डळमळीत, त्रिशंकूप्रमाणें अवस्था,

दोलायमान वृत्ति, हें सर्व अद्यापि टांगलेलें आहे, ही सुळावरची पोळी, नक्की कांहींच नाहीं.

अनुकरण : : नक्कल करणें, उसनें घेणें, सहीसही उचलणें, कित्याबरहुकूम घोटणें, तो नमुना पुढें ठेवून चालणें, ती ऐट आणणें, जणूं कांहीं हें त्याचें प्रतिबिंबच! जणों ही त्याचीच प्रतिकृति! वळण अनुसरणें, माशी टु माशी, सुळाबरहुकूम करणें, थोड्या फरकानें घेणें, तो करतो तसें करणें, स्वतंत्र बुद्धि न चालवतां पावलावर पाऊल ठेवणें, ब्लू-प्रिंट दोहोंचे एकच, फरक काय तो स्थलाकालाचा, बाकी सर्व एकच.

अनुकंपा : : दया, करुणा, कणव, कळवळा, कींव, द्रव फुटला, बेंबीच्या देठापासून कळवळा येतो, माझें मन हें समाज-सेवकाचें मन—आईचें मन—बघ दुःख कीं हो कासावीस, बघ दलितांचें जीवन कीं फोड हंबरडा! सहानुभूतीचा पान्हा, दयार्णव हेलावला, हृदयाला पाझर.

अनुताप : : पश्चात्ताप, मन खाणें, मनांत डिवचूं लागणें, अनुतापाच्या कांटेरी निवडुंगावरून फरफटत, विवेक-बुद्धींचे फटकारे बसत असतांहि, पश्चात्तापाचा भुंगा पोखरूं लागला, आपलींच मनगटें चावीत बसला, अंतःकरणांतली टोचणी.

अनुनय : : मनधरणी, अर्ज-विनंत्या करून पाहूं या कळी उमलते का! रुसवा काढणें, लोणी-मस्का लावणें, हांजी हांजी करणें, तालावर नाचणें, शब्द झेलणें, थुंकी झेलायला तयार, बूट पुसणें, शागिर्दी स्वीकारणें, गळ घालणें, करुणा भाकणें, प्रार्थना—विनवणी—धावा करणें, हट्ट घेणें, निकड—झक्कू लावणें, गळीं—हातापायां पडणें, रडून भेकून विनवणी.

अनुपस्थिति : : नसतांना, गैरहजेरींत, पाठीमागें, अभावीं, मागें, त्याच्या डोळ्यांसमोर नाहीं, अभावानें तळपले, तेथें ते नव्हते, कोठें दिसले नाहींत, यांची जागा रिकामी होती, समाविष्ट नव्हते, पंगतींत आढळले नाहींत पुकारले गेले पण आले नाहींत, गायब होते, तोंड दाखवलें नाहीं, आलेल्यांच्या यादींत नांव नव्हतें, परागंदा होते.

अनुप्रास (गमतीचे) : : नभाची शोभा, शान्त एकान्त, बरे झरे, गुंग करणारे उत्तुंग पर्वत, घरांचे परिसर, करडी नर्स, तरणी मास्तरीण,

पुढारी नव्हे पेंढारी, तगडा गडी, या भारी पोरी, दांड पांडोबा, दिग्विजयी दिगू, तोबा तोबा दत्तोबा, कवीला शिकविला, पचेल रुचेल व सुचेल तें, नाविन्यानें नाहलेला, अनाहूत अभिप्राय, सुवर्ण-सन्मानाला सुगंध, तो भासतो, भावनेचा भोवरा, सदा तापदा, मजेदार भडिमार, भटांची खटपट, वाचा व नाचा, जनांना अंजन, हुद्देदारांना गुद्दे, उघड जबडे, मोकळा गळा, धरती वरती फिरती, असा ठसा, हाच नाच, खेळांत मेळ, वास्तव प्रेमास्तव, या वराला आंवरा, फुलांची लांच, नेपथ्याचें पथ्य.

अनुभव : : प्रत्यय, प्रचीति, जगाच्या अनुभवानें स्वभावाचे कंगोरे घासले जातात, मी ती परिस्थिति अनुभवतें म्हणून मला तिच्या अडचणी समजून येतात, अनुभवांची देवाण-घेवाण नेहमींच फायद्याची ठरते, मोलाचा अनुभव.

अनुभव (कटु) : : स्वतःच्या चुकांना दिलेलें गोंडस नांव म्हणजे अनुभव. स्वत: मेल्यावांचून स्वर्ग दिसत नाहीं, पुढच्यास ठेंच मागला शहाणा ! टाकीचे घाव सोसल्याखेरीज देवपण येत नाहीं, जावें त्याच्या वंशा तेव्हां कळे, मी जास्त पाहिलें व भोगलें आहे, जीवनांत अनेक उन्हाळे व वादळें पाहिलेलीं, हा खर्च अक्कल-खातीं जमा केला, दुधानें तोंड भाजलें कीं मनुष्य ताक फुंकून पितो, प्रसूतीच्या वेदना वांझोटीला काय ठाऊक ? कल्पनेंतलें स्वारस्य संपलें.

अनुभविक : चार गांवची तंबाकू चघळलेला इसम तो ! बारा बंदरांचें पाणी प्यालेला, भलताच मुरलेला आणि चार डाव खेळलेला माणूस आहे तो, अडीच तपांचा डोळस अनुभव त्यांच्या मागें आहे, हें कांहीं यांना नवीन नाहीं, विविध घटनांतून तावून-सुलाखून निघालेले, अनेकवार गोते खाऊन आज वर आलेले, आयुष्यांतील सुखदुःखें चाखलेलीं, टक्के टोणपे खाल्लेला, अनुभवानें शहाणी झालेली.

अनुमान : : अटकळ, कल्पना, निष्कर्ष, तर्क, काडीचोर तो पाडीचोर, खोगीर दिसतें तर घोडा खाल्ला असला पाहिजे, सुतानें स्वर्ग गाठणें, ' ता 'वरून ताकभात ओळखणें, आज आठ दिवस सूर्य सकाळीं उगवतो तर उद्यांहि तो उगवणार असा अंदाज, कयास.

अनैतिक (वाङ्मय) : : औचित्यभंग केला आहे, वांकड्या वळणाचें, पारंपरिक सारीं मूल्यें उधळून लावलीं, जगाच्या प्रतिष्ठेचे संकेत मोडले आहेत, समाजाला घातुक, आजच्या वाङ्मयांत शिवण्यापेक्षां उसवणेंच फार चाललें आहे.

अपकर्ष : : पडता काळ, उतरती कळा, धंदा बसणें, हात न चालणें, वैभव कलंडलें, ठोकर लागली, दबला, मार खाल्ला, चालेनासा झाला, भुईसपाट झाला, जमिनींत गेला, धुळींत मिळाला, प्रगतिसूर्य काजळला, पूर्वीचें रंगरूप गेलें, अवकळा आली, मृतप्राय झाला, भरभराट संपली, जोम अटला, वैभवसूर्य खालीं आला, वैभवास हादरा बसला, डबघाईस अ.ला, ऱ्हासाचीं चिन्हें दिसूं लागलीं.

अपमान : : पाणउतारा, अवमान, मानखंडना, तेजोभंग, अवहेलना, उपमर्द, उपहास, उपेक्षा, नक्षा उतरविला, मानभंग, उन्मत्त उपमर्द, टाकून बोलणें, उघड उघड धिक्कार, जोड्याची देखील किंमत ठेवली नाहीं, खाशी केली, झक्क फजिती, सोळा आणे केली, लाजविलें, खालीं पहायला लावलें, मान सांगावा जना अपमान सांगावा मना.

अपयश : : सर्व खटाटोप पाण्यांत गेला, टल्ला खाल्ला, हात हालवीत परत आले, प्रयत्न असफल झाले, यश आलें नाहीं, अपयशाचे वांटेकरी झाले, दोरीवरील उडी हुकली, यशाचें माप पदरांत पडलें नाहीं, बस चुकली, आपटी घेतली, शेवटीं दोरीला छाती दुसऱ्याचीच लागली, म्हटल्याप्रमाणें झालें नाहीं, पराभव स्वीकारावा लागला, प्रयत्न कमी पडले.

अपशकुन : : कोणाचें तोंड पाहिलें कोण जाणें ! मांजर आडवें गेलें, तेराचा आंकडा उपटला, नाऱ्या शुभ बोल तर म्हणे मांडवाला आग लागली, कुठल्या द्वाड मुहूर्तावर निघालों कोण जाणें, तेवढ्यांत ही पाल चुकचुकली, पण येथें विधवा आड गेली ना !

अपहार : : लाट मारणें, उचलेगिरी, धनापहार, लांचलुचपत, हात मारणें, लंपास करणें, दडपणें, पैसा खाणें, अफरातफर, पैसे इकडे-तिकडे करणें, वाममार्गानें घेणें, चोरीच ती ! फसवणूक करून उचलणें,

हात लावणें, आपल्या पोळीवर तूप ओढून घेणें, फूस लावून नेणें, आपल्या नांवावर खोटेपणानें चढविणें, धनधान्य हडपणें.

अपेक्षाभंग : : वाटलें एक निघालें दुसरेंच ! अमृत अपेक्षितां विष निघालें, डोंगर फोडून उंदीर निघाला, वाघाची तयारी–सांपडलें कोल्हें ! सुंदरीऐवजीं चिचुंदरी हातीं आली, ऐकून धक्काच बसला, वाटलें वाघ्या निघाला पाग्या, गोषांत लपली वाटली अप्सरा निघाली बांद्र, फटाका नसून फुसका बाण ठरला, तिथेंहि भरंवशाच्या म्हशीला टोणगा झाला.

अफवा : : आंवई, कंडी, भुमका, लोकापवाद, कुजबूज, वदंता, बाजारगप्पा, बोलवा, लोकवार्ता, बभ्रा, गटारगप्पा, उडत बातमी, गावगटारांतील बातमी, दाट प्रवाद, कर्ण-पिशाच्च, कर्णोपकर्णी ऐकलेली हकिकत, सर्वांच्या तोंडीं एकच विषय, अशी बातमी फुटली, लोकांच्या तोंडाला आवर कोण घालणार ? बातम्याचें मोहळ पुनः एकवार उठलें.

अबोल : : मुखस्तंभ, घुम्या, मितभाषी, तोंडाला नेहमीं कुलूप ! शब्द तोलून मापून बोलणारा, अबोलका, मिटलेला शिंपला आहे, मौनीमहाराज नुसते, शब्द जड-जवाहिराप्रमाणें वापरणार, शब्दांची काटकसर करतो, रुची ओळखण्याला जीभ–दुसरा उपयोग जिभेचा फारसा माहीत नाहीं, मूक-नायक, सदा मुक्याचें व्रत.

अभाव : : आंवळ्याएवढें पूज्य, औषधापुरतेंहि नाहीं, ठणठणाट, त्या बाबतींत सगळा आनंदच आहे, या गोष्टी अभावानें तळपतात, उभ्या बाजारांत मिळणार नाहीं, त्याचा गंधहि नाहीं, या गोष्टींना तेथें थाराच नसे, नांव नको ! मुत्सद्देगिरी कशाशीं खातात हें तरी माहीत आहे का ? हीं यंत्रें बापजन्मीं तरी कधीं पाहिलीं होतीं का ! पाव टक्काहि नाहीं, काडीमात्र–एवढेंसेंहि – तिळाएवढें – सूतभरहि – टिकलीएवढें – नांवापुरतें –रतिभरहि–थेंबभरहि–मापटेंभर–अणुभरहि नाहीं.

अभिव्यक्ति (वाङ्मयीन) : : अभिनव तंत्रानें प्रतिभेचा आविष्कार, काव्यपूर्ण जिवंत चित्रण, आशय परिणामकारक रीतीनें मांडतात, कल्पकतेचें खत–पाणी दिलें आहे, ही कल्पना हळुवारपणें हाताळली आहे, तऱ्हेतऱ्हेच्या कल्पनांची विविध लेणीं चढविलीं आहेत, कथावस्तू हाताळण्यांत निराळेपण

दिसतें, जीवनाच्या कांहीं छटा बहारीनें रंगविल्या आहेत, कथावस्तूचा पद्धतशीर व प्रमाणबद्ध विस्तार, हळुवार रसाविष्कार.

अभेद्य : : दुर्गम, जलाभेद्य, प्रकाशाभेद्य, स्वराभेद्य, शस्त्राभेद्य, भेगाळणार नाहीं, शिरकाव होणें दुरापास्त, बोट आंत जाणार नाहीं, दुराराध्य, तेथें कांहीं मात्रा चालायची नाहीं, तटबंदींत चीर पडणार नाहीं, टवकाहि निघणार नाहीं, चटकन फुटणार नाहीं, अंतरंगांत प्रवेश मिळणें कठीण.

अभंग : : अखंड, अविभक्त, धड, शाबूत, अखंडित, सलग, सतत, अविच्छिन्न, अव्याहत, अबाधित, अ-फाट, कोठें चीर गेलेली नाहीं, जसाच्या तसा, कोठें टवका उडालेला नाहीं.

अभ्यास (निंदा) : : विषयाची चुळकाभर माहिती, क्लासमध्यें मिळवलेलें चमचाभर ज्ञान, ' ईषदीषच्चुंबित ' अभ्यास, पोपटपंची, पुढें पाठ मागें सपाट, अभ्यासांत यथातथाच, केवळ घोकंपट्टी, पुस्तकी विद्या, व्यवहाराशीं काडीमोड असणारें ज्ञान संपादिलें.

अभ्यासू : : दुर्दम ज्ञानपिपासा, अभ्यासरत, मिळेल तो ग्रंथ वाचून फडशा पाडी, नेहमीं उशापायथ्याशीं पुस्तकें, विद्या हेंच दैवत ! वाचन म्हणजे पंचप्राण, विद्यार्जनाची घोर तपश्चर्या आरंभली, विद्येचे खरे उपासक, सरस्वतीचे सच्चे सेवक, कट्टे सरस्वतीभक्त, ज्ञानोपासना मोठी व अखंड, विद्याव्रत घेतलेले, गाढा विद्यार्थी.

अमर : : चिरायु, अनंत, चिरंजीव, चिरंतन, अविनाशी, मरणातीत, मृत्युंजय, यमाची यावर सत्ता चालत नाहीं, यास शेवट नाहीं.

अयोग्य (कृति) : : लहान तोंडीं मोठा घास, पाठे बुद्धि, अवसाना-बाहेर उडी, साधनांच्या शुचितेकडे दुर्लक्ष, बाजारांत तुरी अन् भट भटिणीला मारी, खाकेंत कळसा अन् गांवाला वळसा, हातचें सोडून पळत्याच्या पाठीस लागणें, डोळ्यांत केर आणि कानांत फुंकर, आंधळें दळतें अन् कुत्रें पीठ खातें तशांतला प्रकार, आधीं कळस मग पाया, बैल गेला नी झोपा केला.

अर्धवट (बुद्धीनें) : : अर्धवेडा, रेम्याडोक्या, बुध्दू, रिकामडोक्या, टकुरींत कांहींच नाहीं, भेजा-मेंदूच कमी, डोक्यांत उणा, सेंग्या, पेज्या, अकलेच्या नांवानें शून्य, हाफ्-मॅड, सोंग नुसतें ! हेड-ऑफिस रिकामें, हें येडं, वेडापिसा, बुद्धिभ्रंश झालेला, देवानें बुद्धि वांटली तेव्हां हे बाहेर गेले होते, खुळचट.

अलिप्तपणें : : परकेपणानें, तुटकपणें, निःसंगपणें, परस्थाप्रमाणें, प्रेक्षकाच्या भूमिकेनें, न चिकटतां, दुरावा दर्शवीत, नातें-गोतें विसरून-तोडून, मध्यें अंतर ठेवून, झंझटांत स्वतः न पडतां, उपाधींत न सांपडतां, केवळ पंचाची भूमिका घेऊन जणूं काय आपण त्या गांवचेच नव्हत ! जणूं कांहीं आपला संबंधच नाहीं, एका बाजूला राहतात, रोवलेला पाय काढून घेऊन, अलिप्ततेच्या भावनेनें, मन गुंतूं न देतां.

अवघड : : कठीण, बिकट, सोपें नव्हे, अडचणीचें, मुष्किलीचे गुंतागुंतीचें, जटिल, दुर्गम, दुर्जय, दुर्दम्य, दुःसह, दुस्तर, शिकावयास कठीण, याचे धडे घ्यायला प्रयास पडतील, नक्कल करायला तापदायक, मेंदूत शिरावयास कठीण, तेथपर्यंत वाट मिळणें दुरापास्त, भलतेंच गुंतलेलें, तेथपर्यंत जाणें महाकर्म कठीण, महत्प्रयाससाध्य, चमत्कारिक, पेंचापेंचाचें, त्यांतून पार होणें अशक्य, हे ठरविणें काम कठीण आहे, बिकट प्रश्न, जरा जडच जाईल ! वाटतें तितकें सोपें नाहीं, या प्रश्नांचीं उत्तरें लिहितां लिहितां भुई थोडी होईल.

अवर्णनीय : : इतकें रम्य आहे कीं सांगतां पुरवत नाहीं ! शब्दातीत, वर्णनातीत, यापुढें शब्द थिटे पडतात, सांगाल तरी किती ?

अवर्षण : : पावसानें दगा दिला-डोळे वटारले, पर्जन्याभाव, पावसाचा रंग-चिन्हेंहि दिसत नव्हतीं, पावसाची संपूर्ण उघडीप होती, वृष्टीचा अभाव, कोरडें आकाश, पाण्याचें टिपूस नाहीं, वरुण रागावला, जमिनी सुकल्या.

अवज्ञा : : आज्ञाभंग, हुकूम मोडणें, सल्ला न ऐकणें, सूचना धाब्यावर बसविणें, आदेश न जुमानणें, निर्देश गुंडाळून ठेवणें, मन मोडणें, हुकुमाची तामिली न करणें, बंड उभारणें, संदेश झुगारणें, सांगितल्याप्रमाणें न करणें.

अव्यवस्था : : बजबजपुरी, बुजबुजाट, गैरकारभार, सुसूत्रतेचा अभाव, धरबंध नसणें, अंदाधुंदी, अनागोंदी–आंधळा–गलथान–भसभोंगळ, बारभाई गैरहिशोबी शिस्तहीन कारभार, अराजक, कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं, चारांचीं तोंडें चार बाजूंना, दहा लोकांच्या छप्पन्न तऱ्हा, येथें कोण कोणाला विचारतो ! कोणाचेंच बूड ठिकाणावर नाहीं, अंधेर नगरी झोटिंग पाच्छाही, पद्धत अशी कोणतीच नाहीं, नको तें आहे पाहिजे तें नाहीं, सारा शिस्तबद्ध सांवळा-गोंधळ, येथें हत्ती हरवला तरी सांपडणार नाहीं, उष्ट्या भांड्यांची यात्रा तशीच होती, टेबलावरील अनेक वस्तु आयत्या वेळीं लपंडाव खेळत आणि आम्हांला सर्वांना फुगड्या खेळायला लावीत, दिवाणखान्याचा प्रचंड अस्ताव्यस्तपणा प्रथम नजरेंत भरे.

अवाढव्य : : प्रचंड, विशाल, विस्तृत, जाडजूड, पसरलेलें, अजस्र, अगडबंब, महान, अनंत, महाकाय, भीमकाय, अक्राळविक्राळ, जगड्व्याळ, पाहतां दृष्टि फाटेल, लंबाचौडा, लांबच लांब, राक्षसी, पल्लेदार, चौरंगी, चतुरस्र, पर्वतप्राय, कोठच्या कोठें मोठा, गगनचुंबी, एखादा समुद्रच ! अथांग, दृष्टि पोंचत नाहीं, आकाशाला भिडणारा, अजगरासारखा, त्रिखंड-व्यापी.

अवास्तव : : स्वप्निल, अतिरंजित, नकली, अप्रत्ययकारी, बेगडी, नाटकी, अयथार्थ, प्रत्ययकारी नाहीं, कल्पनेंतच शक्य, हे नमुने कोठें मिळाले न कळे ! न आढळणारें, जीवनापासून दूर, केवळ आदर्शवादी, मनचाहे रंगांत रंगलेलें, कविमनाचे खेळ.

अविचार : : आततताईपणा, अविवेक, अविमर्श, तापलेल्या डोक्याची कृति, घिसाडघाईचे निर्णय, घे सुरी नी घाल उरीं, अर्ध्या हळकुंडानें पिवळा, दहा अंक मोजणार नाहीं, हुरळली मेंढी लागली लांडग्याच्या मागें, सारासार बुद्धीनें काळें केलें, जरा दमानें घेणार नाहीं, आलें तोंडाला बकलें, विवेकाचा खून, सारासार बुद्धि झाकळणें, योग्य सल्ला पालथा घातला, मनाचे दरवाजे मिटले, विचार आक्रसले, उसळणाऱ्या विकारांचें राज्य झालें.

अशक्त : : दुर्बल, बळहीन, निर्बळ, दुबळा, सामर्थ्यहीन, नि:सत्त्व,

कमकुवत, कमजोर, बापुडवाणा, माशीची लाथ लागून हा ब्राह्मण मरण पावेल ! उंदीर गेला उठी आणि आपल्या दोन मुठी, काडीपहेलवान, वाऱ्यानें उडेल.

अशक्तता (शारीरिक) : : निःशक्तता, दौर्बल्य, दुबळेपणा, शक्तिहीनता, शिथिलता, सामर्थ्यहीनता, विकलांगता, त्राणाभाव, क्षीणबल, पूर्वीचा तकवा नाहीं, अंगांत त्राण राहिलें नाहीं, ताकद संपुष्टांत आली, जोर खचला, दौर्बल्यानें झपाटलें, हाडांच्या पिंजऱ्यांत बळ उरलें नाहीं, अवसान गेलें, आडव्याचें उभें होतां येईना, जड शरीर जागचें हालेना, गात्रें शिथिल झालीं.

अशक्य : : पाणी घुसळून लोणी काढण्यासारखें, अशक्य कोटींतलें, असंभाव्य, होणें नाहीं, आहाराबाहेरचें, सशाचीं शिंगें शोधण्याप्रमाणें, ट्यूबमधून बाहेर निघालेली टूथ-पेस्ट आंत घालूं पाहण्याप्रमाणें, चित्त्याचे ठिपके नाहींसे करूं म्हणणें, कुत्र्याचें शेंपूट नळींत घालून सरळ करूं जाणें, कावळा धुऊन गोरा करणेंच होय ! माशानें गिळलेलें माणिकच हें ! मुंगी पाहून हत्ती पळाले अशांतलाच प्रकार, एकदां जगून झालेलें आयुष्य पुन्हां जगतां येत नाहीं, वाळूची दोरी करून आकाश बांधून आणण्याप्रमाणें, सुतराम् शक्य नाहीं, एक टक्का संभव नाहीं.

अश्लील : : बीभत्स, अभद्र, विकृत, ओंगळ, अचकट-विचकट, घाणेरडें, किळसवाणें, छचोर भाषा, सदभिरुचि व औचित्य यांच्या बंधनांची ओळखहि त्यांना फारशी नसे, किळसवाणी लेखणी, हा चिखल तुडविण्यांत काय अर्थ आहे ? बेताल मतांचें नंगें प्रदर्शन, पातळी न ठेवतां सोडलेले टीकास्त्र, कुविचारांची घाण, अधमपणाची कमाल मर्यादा गांठली आहे, गलिच्छ भाषाप्रयोगांनीं अपादमस्तक माखून निघालेले लेख, निर्भेळ वस्त्रगाळ निंदा, शिव्यांचा अतूट भाता, निरर्गल लेखणी.

अश्लील (कामुक) : : अनिष्ट वळणाची, विकृत कामगंडानें पछाडलेली, लोकवाङ्मय निर्मितीसाठीं नागर भाषेला नागडी केली आहे, जीवनांतील साऱ्या मूल्यांचा अधिक्षेप होता तो ! तरुणांच्या मनोभूमींत वाईट बीजारोपण करणारें, भडक प्रेमाचें चित्रण, हिडिस भोगवादाची परिसीमा, ओंगळतेचें

आगरच, जाणूनबुजून काम उत्तेजित करण्याचा हेतु धरून लेखणी चालविली आहे, असले हे प्रसंग भिटक्या मारीत सांगतात, भडकीलीं मसालेदार वर्णनें, मनाला उबग आणणारा कामगंड, भक्तिरसांत केवळ बुचकळून काढलेला नागडा शृंगार, कामकथा व रतिवर्णनें, नागव्या लेखणीनें लिहिलेले अश्लील लेख.

अष्टपैलू : : बहुरंगी, ढंगी, चौरस, विविध छटांचें, हरहुन्नरी, अनेक पैलूंचे घडलेलें, कंगोरेदार, नाना विषयांत प्रवीण, अष्टावधानी, सर्वंकष, विविधविषयस्पर्शी.

असत्य : : अनृत, बंडलबाजी, लटकें लटकें, खोटें, खरें नव्हे, नुसती थाप, लोणकढी, नरो वा कुंजरो वा, सत्याला सोडून, अवास्तव, धादांत लबाडीचें, खोटें-नाटें, थेगडी, इंद्रजाल, सत्याची–बचत–विपर्यास–काटकसर, सत्याचा अपलाप.

असह्यता : : सहनशक्तीचा कडेलोट झाला, हें बघवेना, साहणें मर्यादे-बाहेर गेलें, मांजरहि पंजा उगारील, गळ्यापर्यंत आलें, सहनशक्तीचा रबर तुटला, हें मात्र रेषेबाहेर गेलें, उंटाच्या पाठीवर ही शेवटली काडी पडली.

असहाय : : दावणींतलें जनावर, बापशेटीचा माल, मूग गिळले, धमकी-खालीं प्रतिकारशून्य वांके, गरीब गाय, कोणी वाली नाहीं, वास्तपूस्त करणारें नाहीं, नेणाऱ्या मागून फरफटत जाई, निराधार, निरुपाय, अगतिक, गत्यंतर नसलेला, त्याच्याशिवाय सद्गत नाहीं, स्वत:वर संतापून जळण्या-पलीकडे काय करणार ? त्याच्या क्षुब्ध मनांत अनेक अर्थशून्य वादळें निर्माण झालीं, दुसरें तरी काय करणार ?

असहिष्णु : : दुसऱ्याचें बरें न पाहणारा, आपणांस होईना सवत साहीना, असूया करणारा, दोन घ्यावेत दोन द्यावेत तें नाहीं, आपलें तेंच खरें, एका म्यानांत या दोन तलवारी राहणाऱ्या नव्हत.

अस्थानीं : : वारयोषितेच्या गळ्यांत मंगळसूत्राची निरर्थक व्यथा असावी त्याप्रमाणें, साधूंच्या मेळाव्यांत नटरंगी यावा त्याप्रमाणें, देवालयांत नटीचें चित्र टांगावें तसें.

अस्थिर : : डळमळीत, गडबड्या, धांदरट, चंचल, बिनबुडाचें भांडें, पायाला सदा भिंगरी व मनाला तशीच, तेरड्याचे रंग तीन-दिवस, कशाला चिकटून राहील तर शपथ, बारा पिंपळावरचा-मुंजा, कोठें पाय वा मन स्थिर नाहीं, आज हें तर उद्यां तें, धरसोड वृत्तीचा, डगडगणारा, वारा येईल तशा पाठ देणारा, केव्हां रंग बदलेल सांगता येत नाहीं, करनकरा स्वभाव, भुंग्याच्या वृत्तीचा, सारखी वळवळ !

अस्वच्छ : : घाणेरडें, अमंगळ, अभद्र, अशुभ, मलिन, ओंगळ, घाण, मळकट, मळकें, कळकट, गलिच्छ, ओकारी आणील असें, शेंबडें-लेंबडें, घृणास्पद, डागाळलेलें, चिकटमाकट, तेलकट, कूडाकचरा सांठलेलें, ओशट, तुपट, खरजुडे, बीभत्स, अशुद्ध, किळसवाणें, वेडेंविद्रें, तिटकारा येण्यासारखें, शिसारी आणील असें, सर्व उकिरडा माजलेला ! पावित्र्य हा शब्दच त्याच्याजवळ नाहीं, ईऽ करून बाजूला व्हाल !

असुरवृत्ति : : नागडा स्वार्थ, बेशरम लोलुपता, उन्मत्त काम, पापी नजर, रक्तपिपासा, सद्‌गुणांवर दुगाण्या झाडणें, भोंदू कोल्हेकुई, मानवी रक्ताची चटक, अधर्म हाच धर्म, पशुसमान भोगेच्छा, बुद्धाचा द्वेष, परवित्तापहरणांत आनंद, बळजबरींत यांचा पुरुषार्थ, सुरा व सुरामारी हें हिचें व्यवच्छेदक लक्षण ! अशक्त-दुर्बलांचा छळ, कृतघ्नता व कपट हीं स्वभावाचीं वैशिष्ट्यें; वचनभंग ही नेहमींची गोष्ट, तीव्र विकार व निरर्गल जाभ.

असंतोष : : असंतुष्टता, मनाची वळवळ व खवखव, अतृप्ति, सारखी भगभग, असमाधान, 'ततः किम्' संपणारें नाहीं, मनाची रुखरुख गेली नाहीं, अधिकाची हाव राहिली, वाढता हव्यास, आधिक जिंकायला उरलें नाहीं म्हणून दुःख झालें, कामनांचा उपशम झाला नाहीं, तोंडाला पाणी सुटत होतें, हावरट मनानें तें घेतलें, थोडक्यांत तृप्ति नाहीं.

अहवाल : : इतिवृत्त, रिपोर्ट, हकिकत, सिंहावलोकन, आढावा, परिचय, समालोचन, धांवता वृत्तान्त.

अहिंसा : : मनानें व शरिरानें दुसऱ्याला न दुखावणें, जिभेनें काम होईल तेथें हत्यार न चालविणें, हिंसक उपाय रोखणें, शांततामय मार्गांनीं

साध्य करणें, क्रौर्याचा निःपात, सामदामानें होईल तेथें दंड-भेद टाळणें, येथें खूनका बदला खून नहीं, अहिंसेंत सूडाचें वावडें आहे, निःशस्त्र प्रतिकार.

अहेतुक : : विनाकारण, सहजगत्या, विना-हेतु, निर्हेतुकपणें, केवळ वाट फुटली म्हणून, जातां जातां, मुद्दाम नव्हे, वाटेंत मिळालें म्हणून, कांही कारण आहे म्हणून नव्हे.

अज्ञातवास : : या व्यक्ति अंधारांत दडलेल्या आहेत, गुहेंत दडी, या कुग्रामांत येऊन स्वतःला एक प्रकारें पुरून घ्यायचें ठरविलें, जगापासून दूर, पडद्याआड जीवन, जनतेच्या दृष्टीआड, जेथें आपणाला कोणी ओळख-णार नाहीं, निनावी जीवन, उजेडापासून दूर काळोखांत, भूमिगत होणें, गुप्त संचार, थांगपत्ता नाहीं, बेपत्ता जगणें.

अज्ञानी : : अनभिज्ञ, अजाण, नेणता, निरक्षर, अंगठेबहाद्दर, नांगरे-दादा, अकटोविकट ज्ञान, त्याला काय येतें दगड ! आंधळ्यांची माळ, चहूंकडेच गुडघाभर पाणी, अज्ञानांधकारांत डुबलेले.

अंगलट (स्त्रीची) : : अंगानें भरलेली, सुस्त-मस्त-सुबक-मांसल अंगलट, सुडौल शरीर, उंच आटोपशीर देहयष्टि, तिचा यौवनभार वाढत होता, टुमटुमीत दिसते, बेदाणी मुलगी, अंगींमाशीं भरत चाललेली, अगदीं पेढेघाटी मुलगी.

अंतर्द्वंद्व : : आंतरिक झगडा, तो भीषण विचार नागाच्या फड्याप्रमाणें डोकें वर काढी व मनांत गरगरे; विरुद्धेच्छांनीं विचार बधिर झाले, विचारसंघर्षानें घायाळ झाला, अंतःकरणांत विचारांचे काहूर माजलें, मन हाच विचार चघळीत राही, असा विचार उगीचच डोक्यांत गोलांटी मारून जायचा, तिच्याविषयीं विचारांची अखंड गिरणी चालू असे, या विचारांची टोचणी मन अस्वस्थ करी, हॅम्लेट तऱ्हेचें अतर्द्वंद्व, हे विचार भंडावून सोडीत, मनाची ससेहोलपट होई.

अंदाजें : : आंतबाहेर, सुमारें, अंदाजीं, जवळजवळ, उणापुरा, स्थूलपणें, ठोकळपणें, सामान्यतः, अंदाजन्.

आई : : माता, जननी, जन्मदात्री, मायेचें पांघरूण, प्रेमाचें छत्र, दुधाची घागर, मूर्तिमंत वात्सल्य, साक्षात् त्याग, निरहंकारी प्रेमाचें प्रतीक, दयेची खाण, ममत्वाचें रसायन, शुद्ध बावनकशी प्रेम, साकारलेलें देवत्व.

आकर्षक : : मोहक, मन वेधून घेणारें, नेत्रदीपक, मंजुळ, दिलखेचक, चित्तवेधक, मनमोहक, लोभसवाणें, हृदयचोर, चित्तवेध करील, नजर खेचून घेणारें, मोहिनी घालणारें, हजारोंच्या नजरा विद्ध करणारें, हृदयावर घाला घालणारें, तोंडाला पाणी सुटेल असें, भुलवील रिझवील व खुलवील असें, लोहचुंबकाप्रमाणें दृष्टि ओढून धरील, ठसा उठविणारें.

आक्रमण : : अतिक्रमण, परप्रांतांत घुसणें–शिरणें, सीमोल्लंघन, दुसऱ्याच्या घरांत पाऊल ठेवणें, अनधिकृत प्रवेश, संमतीशिवाय शिरणें, कवाड मोडून आंत जाणें, आक्रमक हालचाली, स्वसीमारेषा ओलांडणें, हस्तक्षेप, चढाई, हल्ला, दुसऱ्याच्या कार्यक्षेत्रांत लुडबूड, आपल्या कुंपणाचा खांब पुढें सरकविणें, स्वतःचा उंबरा ओलांडून दुसऱ्याच्या उंबऱ्यांत पाऊल.

आक्रोश : : क्रंदन, रुदन, रडूं, आकान्त, ओरडणें, हंबरडा, टाहो, स्फुंदन, धाय मोकलून–ओक्साबोक्शी–ढसढसा–गळा काढून–पोटभर रडली, आकान्त–कल्पान्त–हलकल्लोळ–केला, हंबरडा–टाहो फोडला, तार-स्वरानें रुदन, हृदयाला पाझर फोडणारें क्रंदन, आकाशपाताळ एक करून सोडलें, हृदयद्रावक किंकाळ्या, रडूं कोसळलें, तिला रडूं फुटलें, ऊर बडवून दुःख करूं लागल्या, पृथ्वीच्या पोटांतील कढांना शेवटीं ज्वालामुखींत वाट फुटते तसें तिचें झालें.

आकाश : : व्योम, ख, नभ, आभाळ, अस्मान, अंतराळ, निर्वात अवकाश, नभांगण, नभोमंडळ, हें शून्य ब्रह्म, ही निळी पोकळी, विश्वाची पोकळी, अनंत अस्मान, नील नभ, निरभ्र आभाळ, निळें नभांगण, आकाश भरून आलें, नभ आणि नग यांच्या संयोगरेषेवरून, डोंगरमाथ्याचें चुंबन घेणारा आकाशाचा भाग, आकाश काळेंकुट्ट होऊन ढग गडगडले.

आचरट : : गाढव, मूर्ख, ढिला स्क्रू, अवचित, चक्कर, अचाट, अतिरेकी, असभ्य, अश्लाव्य, ढिला, तिरपागडा, अप्रासंगिक, प्रसंगाला अनुचित, आक्रस्ताळा, अर्धवेडेपणाचें, न देखिलें ना पाहिलें, अवलक्षणी, गैरशिस्त, अफाट, बेफाट, बेशिस्त.

आजार : : रोग, व्यथा, दुखणें, व्याधी, अस्वास्थ्याचें कारण, डिझीझ, सिक्नेस, बरें—ठीक नसणें, पडून असणें, शरीरव्यथा, रोगराई, प्रकृतीला विकृति, शरीरस्वास्थ्यांत बिघाड, शरीर तन्दुरुस्त नसणें, आरोग्यास अपाय, जिवावरचें दुखणें, विकलांगता, अपंगता.

आठवण : : स्मृति, स्मरण, गतगोष्टींची मनांत उजळणी, मनश्चक्षूं-पुढें येणें, जुने प्रसंग मनापुढें उभे राहणें, तल्लख स्मृति, आठवणीचे थवेच्या थवे जमा होत, माझें अवखळ मन पांखराच्या स्वैर वृत्तीनें घरकुलाच्या भोंवतीं घिरट्या घालीत राही, आठवण दिली, त्या शब्दांनीं झाली गेली घटना ढवळून वर आली, या आठवणीनें ' तिळा दार उघड ' या शब्दांच्या जादूप्रमाणें अनेक आठवणी जाग्या झाल्या, मनाच्या कोणत्या तरी बंद कप्प्याचा चाप एकदम उघडला, अनेक प्रसंग नजरेसमोरून तरळत गेले, मनाच्या सांदीकोपऱ्यांत दडलेले विचार वर आले.

आठवणी (तापदायक) : : या सर्व तापदायक स्मृति, आठवण सुखवीत होती—दुखवीत होती, ती मूर्ति डोळ्यांसमोरून हालत नव्हती, अंतर्मनाच्या अवचट चाळ्यांत अडकली, स्मृतींशीं खेळून दमले, ओल्याचिंब आठवणी, येथें स्मरणसांखळी भंगली, कालप्रवाहांत वाहून गेलेल्या माझ्या निरनिराळ्या मूर्तींचीं प्रतिबिंबेंच आहेत हीं.

आठवणी (सुखकर) : : ही आठवण माझ्या हृदयांत अढळ राहिली, आठवणींचा सुवास, स्मृतिसुगंध, मनहि गोडगोड विचारांशीं चाळा करीत होतें, ती सदा मनश्चक्षूंपुढें उभी असे, अनुभवलेल्या सुखाचा कल्पनेंत पुनः-प्रत्यय घेत होतों, मन सहवासाच्या स्मृतींत घोटाळत होतें, रंगेल आठवणी हृदयाच्या कडीकपाटांत जतन करून ठेवल्या होत्या, या भू-भागाशीं आयुष्यांतल्या किती तरी सुखद घटना निगडित झाल्या होत्या.

आठवणें : : मेंदूच्या सुपांत स्मृति–विस्मृति पाखडल्या, एवढें त्याला बट्ट आठवत होतें, ते दिवस पुढें उभे राहिले, मनाचा एक चोरकप्पा उघडला व त्यांतील रत्नें ओघळलीं.

आततताईपणा : : घे सुरी घाल उरीं, मागला–पुढला विचार असेल तर ना ? हिरवटपणा, अविचार, घिसाडघाई, पिसाटपणा, आलें डोक्यांत उगारला सोटा, दहा अंक कधीं मोजतील तर ना !

आत्मचरित्र (गुण) : : एक चित्तशुद्धीचें साधन, पुढच्यास ठेच मागला शहाणा हा उपयोग, स्वपातकांची वा दोषांची कबुली देण्यानें प्रमादांतून सुटका, इतरांना मार्गदर्शक ठरतें, स्वतःचें जीवन सर्वांपेक्षां आपणच जवळून न्याहाळलेलें असतें म्हणून एकांगीपणा अर्धसत्यता क्वचित् विपर्यास यांची येथें शक्यता कमी, कृतकर्मांची कबुली देण्याची संधि.

आत्मपरीक्षण (अभाव) : : आपण हांसे लोकाला शेंबूड आपल्या नाकाला, जो मूळव्याधीं पीडिला त्यासि पाहोनि हांसे खरजुला, जळक्यानें मळक्याला शिकवण्यापैकींच तो प्रकार होणार ! प्रथम आपल्या पायांखालीं काय उकिरडा माजला आहे तें पाहावें, दिव्याखालीं अंधेर, अंतर्मुख होऊन स्वतःला पाहणें हेंच कठीण, दुसऱ्याचें कुसळ दिसतें आपल्या डोळ्यांतलें मुसळ दिसत नाहीं.

आत्मप्रवणता : : या बाई आपले खासगी उमाळे कवितेंत कां घालतात तें कळत नाहीं ! स्वतःचे खासगी उमाळे सार्वजनिक प्रश्न या स्वरूपांत मांडले आहेत, या खासगत गोष्टी कां सांगाव्यात ? पात्रांच्या भाषणांतून पात्रांना बाजूला सारून लेखकच प्रकट होत असतात ! सदा स्वकेंद्रित, जेथें तेथें प्रथम पुरुषाला महत्त्व, मी व माझें जेथें तेथें.

आत्मानुभव : : जिवाशिवाची भेट, समाधि, ज्ञानजागृति, विश्वैक्याचा अनुभव, पुंडलीका भेटीं परब्रह्म आलें, आत्मसाक्षात्कार, स्वात्मदर्शन, मायापटल दूर होणें.

आतां : : अधुना, या क्षणाला, या वेळीं, सध्यां, आजकाल, या समयीं, आज घटकेला, तूर्त, एव्हांना.

आतुरता : : हुरहूर, बेचैनी, समुत्सुकता, पाण्यावांचून जसा मासा तळमळतो, उत्सुकता शिगेला पोहोंचली, वाटेला डोळे लावून बसला, अनिवार उत्कंठा लागली, भेटण्यासाठीं प्राण कंठाशीं आले, भेटीस उतावळा झाला, भेटीस आतुर, केव्हां पाहीन असें झालें, जीव डोळ्यांत आला, उतावळा नवरा गुडघ्याला बाशिंग अशी स्थिति, जीवाची लगबग.

आदर : : पूज्य बुद्धि, मनांत मानणें, भक्तिभाव, श्रेष्ठ समजणें, आदर-भाव, मानतों त्याला मी, आदरांजलि वाहणें, पूज्य भाव.

आदरणीय : : पूज्य, परमपूज्य, वंदनीय, मस्तक नत करावें असे, पूजनीय, आदरार्ह, मानाच्या पानाचे अधिकारी, सादर भीति वाटते, आदर वृद्धिंगत होतो, प्रेमादरास पात्र, प्रभातीं वंदन करावें, पंचकन्यांपैकीं एक, विभूति.

आदर्श : : सर्व सद्‌गुणांची खाण, गुणहि लोकोत्तर आहेत, माणूस असावा तर असा, अनुकरण करावा असा, यांचें चित्र डोळ्यांसमोर ठेवावें, सर्वांस मॉडेल्.

आधार : : टेकू, अडणी, अटकणी, पाया, टेकावा, नेटावा, टेकूचें, पावठणी, पायंडा, नेटा, आधारस्तंभ, पायाचा दगड, चौथरा, चबुत्रा, ज्यावर विसंबावें असें, सपोर्ट.

आधुनिक : : अद्ययावत् पद्धतीची, आजकाल भेटणारी, सध्यांच्या जमान्याची, नव्या जगांतली, अत्याधुनिक, जुन्याचा वास नाहीं, विसाव्या शतकाची, लेटेस्ट फॅशनची, या शतकांतील.

आनंद : : गंमत, मजा, सुख, चैन, मोद, हर्ष, प्रमोद, जम्मत, आह्लाद, उल्हास, प्रसन्नता, मनोविनोदन, मजा, उल्हसित चित्तवृत्ति.

आनंदित : : प्रमुदित, हर्षोत्फुल्ल, हृदयांत चांदणें फुललें, हर्षविभोर, चित्तवृत्ति तरारून आल्या, हर्षानें हृदय भरून आलें, हर्षनिर्भर, आनंद–लहरींनीं शरीर रोमांचित झालें, आनंदाचें भरतें, आनंद गगनांत मावेना, वृत्ति टवटवीत झाल्या, आनंदोर्मि आल्या, हर्षोन्मादानें फुलून गेली, आनंद पोटांत मावेना, चेहरा उजळला, हास्य फुटलें, सुखाच्या लहरींनीं रोमांचित झालें, पुत्र-जन्मसम आनंद, जीवनांतली ही हिरवळ, आनंदाला उकळ्या

फुटल्या, आनंदानें फुलकित झालें, सर्वत्र आनंदीआनंद, विरंगुळ्याचे कांहीं हृद्य क्षण अनुभवले, जीर्ण चेहरे उजळून निघाले, चेहरा प्रसन्नतेनें उजळला, वाटलें अक्षरशः हवेंत तरंगतें आहें, मन आनंदानें काठोकांठ भरून गेलें, वाटलें मी जागा आहे कीं स्वप्नांत आहें ? मन पाकोळीसारखें हलकें बनलें होतें, संसाराची फुलबाग झाली, बरें वाटलें, सुखाचा झराच भेटला, मस्त मजेंत मन आहे, घरीं जातांना मी ढगांवर तरंगत होतों, त्यांनीं अगदीं खांका वाजविल्या ! पाहतांच अंतःकरणांत लक्षदीप उजळले, पाहून हर्षवायु झाला, अंगावर रोमांच आले, हर्षलहरी अंगावरून तरळल्या.

आनंददायक : : हृद्य, रमणीय, मनोरम, मनोरंजक, रोचक, आह्लाद-दायक, मनोविनोदन करणारें, तोषदायक, संतोषकारी, अंतःकरण रिझविणारें, हृदयरोचक.

आनंदी : : रंगेल, उत्साही, उल्हसित, हंसतो-बागडतो, दुःखविरहित, सुखी, ' हसूबाई ' ' रडूबाई ' नव्हे.

आपपरभाव : : पंक्तिप्रपंच, मी खोबरें खाईन तूं करवंटी कुरतड यांतला प्रकार, मी व माझें सुटेल तेव्हां, माझें तुझें सुरू झालें, मांजरीचे दांत पिल्लाला लागतात का ? माझी पोर गुणाची थोर, दुसऱ्याच्या डोळ्यांत भसकिनी बोट शिरतें, एकाची टाळी दुसऱ्याची टवाळी, एकलाच झुकतें माप, भेदभाव करणें, एकाला चुचकारा दुसऱ्याला फटकारा, आपलें तें हां हो दुसऱ्याचें तें हीः हीः, पक्षपातीपणा, समभावानें वागवीत नाहींत, डावें उजवें करतील, वशिल्याचा माणूस पुढें सरकतो, आपला तो बाळ्या दुसऱ्याचा तो कारटा, एका ताटीं जेवणें नी घांस मोजणें.

आप्तवियोग : : माझ्या दैवाचें भांडें केव्हांच पालथें झालें होतें, फाटलेल्या आभाळाला ठिगळें कोठवर लावणार ? कंठ्यांतला हा मणी ओघळला, कपाळ फुटलें, कुंकू पुसलें, पाय मागें आला, उजवा हात गेला, पन्नास वर्षांचा हा जिवंत इतिहास अग्निगत झाला, ' यथा काष्ठं च काष्ठं च ' याचा अनुभव आला, पाठचा गेला व पोटचा पण गेला, आप्तेष्ट सर्व खपले.

आपुलकी : : मित्रभाव, जिव्हाळा, पोटतिडीक, आपलेपणा, स्वजन-वृत्ति, आप्तपणा, तुझें माझें नसणें, जवळीक, नातेंसंबंधच जणूं ! एकसंध मनें,

दुराव्याचा अभाव, मनानें एक, परस्परांत रहस्य, एकमेकांचा ओढा, दोन शरिरें पण आत्मा एक.

आपोआप : : स्वयंप्रेरणेनें, बाह्य शक्ति न लावतां, अनायासें, सहज, विनायास, प्रयत्नाविना, जसें कळीचें फूल होतें तसें, दोर लावावे लागले नाहींत, कोणी शिकवावें लागलें नाहीं.

आंधळा : : अंध, नेत्रहीन, दृष्टिहीन, चक्षुहीन, नेत्रांध, अंधाऱ्या सृष्टीचे रहिवासी, रातांधळें, दृष्टि गेली, डोळ्यांच्या खांचा झाल्या, डोळगांवचीं कवाडें लागलीं; अंधारगडची किल्लेदारी मिळाली, दृष्टीचें सुख माहीत नाहीं, डोळ्यांच्या कवड्या झाल्या.

आपत्ति : : आफत, संकट, बला, अडचण, दुःखद प्रसंग, त्रांगडें, दुरवस्था, दैव फिरलें, अडचणी, आणीबाणीची वेळ, खडतर दुर्दैव, संकटगर्ता, भलता पेंच-प्रसंग, जन्माची कमाई क्षणांत मातीला मिळाली, दैवानें दिलें कर्मानें नेलें, काळाच्या उदरांत वेगळीच विधिघटना जन्म घेत होती.

आभार : : आभारी आहें, शतशः धन्यवाद, शुक्रिया, मी कसा उतराई होऊं ? शतशः उपकृत समजतों, अनुगृहीतोस्मि, फार फार उपकार, कृतज्ञता व्यक्त करावी तितकी थोडीच आहे, तुमचें ऋण फेडणें शक्य नाहीं, सदैव तुमच्या उपकाराखालीं आहें असेंच वाटेल, किती उपयोगी पडलां म्हणून सांगू ! आभार कोणत्या शब्दांत व्यक्त करूं ? ऋणाचें ओझें सदैव वागवीन, कित्ती कित्ती चांगले आहांत हो ! कातड्याचे पायांत जोडे करून घातले तरी उपकार फिटणार नाहींत, शब्दांत आभार मानणें शक्य नाहीं, माझं एक काम कमी केलंत ! उपकार मानण्याला योग्य शब्दच नाहींत, केलें हें कसें विसरेन ? नुसतें ' थॅंक्यू ' म्हणून संपणार नाहीं हें, जन्मोजन्मीं ऋणी राहीन, आभार मानावे तितके थोडेच, कशा रीतीनें हें ऋण व्यक्त करूं ? यांनीं हे उपकार करून जणू मला विकतच घेतलें आहे.

आभास : : मृगजळ, दृग्भ्रम, भास, दृष्टीचा खेळ, मनोविभ्रम, केवळ स्वप्न, मनाचे केवळ तरंगच, चुकीची कल्पना, ती कविकल्पना ठरली, सावली, केवळ आरशांतलें प्रतिबिंब.

आराम : : सुखासीनता, सुखी जीवन, चैनबाजी, ऐषआराम, ताटावरून पाटावर अशी स्थिति, पोटांतील पाणी हालायला नको, सुखं च मे शयनं च मे, कांहीं कष्ट नाहींत, इकडची काडी तिकडे करायला नको, सुख डुचमळतें आहे, कसली काळजी नाहीं, मजाच मजा ! नेहमींच दिवाळी, चिंता माहीत नाहीं, दोन वेळां जेवून दहा तास तणावून द्यायची, चहा-चिवडा-चिरूट यांत मग्न.

आवार : : परिसर, अंगण, पडळ, मागली जागा, परसूं, क्षेत्र, बाजूची मोकळी जमीन, मळई, जमिनीचा इकडला हिस्सा.

आशय : : सारांश, तथ्यांश, ध्वन्यर्थ, सूचितार्थ, मथितार्थ, गर्भितार्थ, अर्थ, गोषवारा, गूढार्थ, वाच्यार्थ, भावार्थ, म्हणण्याचा रोख, एकूण विषय कोणता, म्हणायचें–सांगायचें–सुचवायचें–कळवायचें काय तें.

आश्चर्य : : विस्मय, अचंबा, चक्रावून गेलों, उपदेशानें चमकलोंच, सारेंच तिला अघटित वाटलें, विस्मयातिशयानें ती दगडासारखी निश्चलच होऊन गेली होती, आश्चर्य शिगेला पोहोंचलें, त्याच्या गंभीर चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह स्पष्ट झालें, आश्चर्यचकित, अनपेक्षिताच्या धक्क्यानें कोलमडलों, आ वासून पहातच राहिलों ! चर्येवरचें आश्चर्य द्विगुणित झालें, राहून राहून आश्चर्य व टतें, त्याच्या बालमुद्रेवर आश्चर्य धगधगत होतें, चमत्कार वाटला, विलक्षण वाटलें, स्तंभित झालों, पाहून तोंडच वासलें, आश्चर्यानें थक्क, आश्चर्याला सीमाच राहिली नाहीं, तिचे डोळे आश्चर्यानें बाहेर पडायची वेळ आली, ऐकून तो डामरी फटाक्यासारखा उडाला ! उदबत्तीचा चटका लागल्याप्रमाणें म्हणाला, ‘ हाय ! ’ तोंडांत बोटेंच काय सबंध हातच घातला नीं म्हणाला, डोळ्यांवाटे आश्चर्य थबथबूं लागलें.

आश्रित : : त्यांच्या वाटोळा फिरणारा उपग्रह, अवलंबून राहणारे, पंक्तीस असणारे, हुजरेपाणक्यांपैकीं, तोंडाकडे बघून जगणारे, त्यांच्या आधारावर विसंबणारे, आश्रयाला राहिलेले, पंक्तिपठाण, श्रीमंताच्या छप्पराखालीं राहणारे, यांच्या घराच्या वळचणीला हे पडून असतात, पैकेवाल्यांच्या थैलीवरचीं हीं बांडगुळें, सारखे आसपास करणारे, त्यांच्या देणग्यांतून यांची उपजीविका ! स्वतंत्र अस्तित्व किंवा करामत नाहीं, केवळ

चवरी ढाळणारे, त्यांची अन्नपाण्याची व्यवस्था यांचेकडे, पंखा झुलविणारे, या झाडाच्या छायेंत वाढलेले.

आशा : : बिलोरी आशा, आशा आणि भीति यांचा पाठशिवणीचा खेळ, हा विचार त्याला मनावेगळा करतां येईना, आशेचा चिवट तंतू अद्यापहि तुटेना, होईल होईलसें वाटे, जबतक साँस तबतक आस, आशा व अपेक्षा या जुळ्या बहिणी आहेत, आशेपोटीं मनुष्य जगतो.

आशाभंग : : जे मनोरे उभारले होते ते क्षणांत जमीनदोस्त झाले, आशेचा अखेरचा तंतु तुटला, सुखस्वप्नांचीं इंद्रधनुष्यें विरघळलीं, इच्छांच्या चिंधड्या झाल्या, वैफल्य सामोरें आलें, आकांक्षांस तडा गेला, मनीषांचा डोलारा कोसळला, हेतूंची राखरांगोळी झाली, आशेच्या पोटीं आसवें असतात.

आशावादी : : म्हणेल खुदा छप्पर फोडतो तें केवळ पावसाचें पाणी गळविण्यासाठींच नव्हे, प्रखर आशावादी, नकार घेणार नाहींत, झुंजत राहतील, यांना निराश बनविणें काम कठीण आहे. 'होऊ काका', अर्धे ग्लास रिकामें दिसलें तर अर्धे भरलेलें आहे असें म्हणणाराच्या दृष्टिकोनाचा मनुष्य.

आशाळू : : हा आशातंतु तिला बाहेर खेचीत होता, आतां करतील मग करतील अशी वाट पाहात, जिभल्या चाटीत आणखी मिळविण्यासाठीं टकून बसला, आसावला, वाटेकडे डोळे लावून राही.

आसन्नमरण : : अत्यस्वस्थ, परलोकच्या प्रवासाची तयारी केली, त्याच्यावर मृत्यूची झापड पडूं लागली, मृत्यु यायचा तो मात्र थांबत थबकत येत आहे असें वाटत होतें, त्याची प्राणज्योत मालवत होती, टाचा घाशीत मृत्युमुखीं पडतांना पाहिली, ती आतां फार दिवसांची सोबतीण नाहीं, देहाची व मनाची तगमग चालूं होती, नाकाशीं सूत धरलें होतें, निरवानिरवीची वेळ आली होती, मृत्यूच्या दारीं, तिचीं पावलें या धरतीवरून सुटत चाललीं होतीं, यमदेव एक एक पाऊल टाकीत जवळ जवळ येत होता, मृत्यु घिरट्या घालीत असतां, जीवन-मरणाच्या सीमेवर, मृत्यु 'आ' पसरून उभा राहिला, अंत्यशय्येवर असतांना त्या देहांतलें चैतन्य इहलोकाच्या सीमेकडे झपाट्यानें जात होतें, शेवटची घरघर लागली,

आसन्नमरण स्थितींत अंतकाळींच्या वेदना अनुभवीत, मरणाच्या पंथाला लागले, जवळ जवळ मसणवटींत जाऊन पोहोंचलेला माणूस.

आसपास : : परिसरांत, आसमंतात, घराच्या आवारांत, इकडे तिकडे जवळपास, अंतर्वतुळांतले, गाभ्यालगतचे, निकटच्या स्तरांतील, इर्दगीर्द, कोपरालगत, हांकेच्या अंतरावर, उंबऱ्याच्या पलीकडे, हे येथें पलीकडे, फार दूर जायला नको, पायाखालींच, आपल्याच अंगणांत, पायापाशीं, मांडीशीं, स्वतःच्या गल्लींतच, घराभोंवतीं. बागेला जोडूनच, पलीकडे, पाशीं, भोंवतीं, टापूंत, वरच, समोर, पुढेंच, आवतींभोंवतीं, तेथेंच मागेंपुढें.

आळशी : : ऐदी, ऐतखाऊ, इकडची काडी तिकडे करणार नाहीं, स्वतः हालचाल करील तर शपथ ! आळसकांदा, उद्योगधंदा नको, ओठावर ठेवलेलें जांभूळ आंत लोटायला दुसरें कोणी हवें ! घराला आग लागली तरी जागचा हालायचा नाहीं, 'हूं' म्हणेल कां तर नको म्हणायला दोन अक्षरें उच्चारावीं लागतात 'हूं' नें एकावर भागतें ! त्याच्या नाड्याच थंड, नुस्ता वाढलेला मांसाचा गोळा आहे.

आंघोळ : : स्नान, न्हाणें, अंग धुणें, बाथ, अभिषेक, कटि भिजविणें, सचैल–बाष्प–सूर्य-किरण–दिगंबरी–दुग्ध स्नान, कावळ्याची आंघोळ, भस्म-स्नान, अंगावर चार तपेल्या–तांबे ओतले, सार्वजनिक स्नानगृहांत माणसें जरा अंग विसळून येतात.

आवरणें : : आंखडून धरणें, संपविणें, विस्तारभयास्तव हें वर्णन करीत नाहीं, आतां लेखणीला लगाम घालतों, पेन गवसणींत टाकतों, अधिक लिहावें असें काय आहे ? आटोपते घ्या.

इतराजी : : मनांतून उतरला, प्रेम आटलें, मेहेरनजर संपली, ब्लॅक–लिस्टमध्यें जमा झाले, मर्जी खप्पा झाली, तब्येत बिघडली.

इच्छा : : मनीषा, वांच्छा, ईप्सा, हव्यास, अंतर्यामींचा हेतु, मनकामना, कामना, ईप्सित, वासना, मनोवांच्छित, मनोगत, मनींची इच्छा, शुभेच्छा, अंतर्यामीं प्रिय तें, मनोमन जें हवेंहवेंसें वाटतें.

इच्छित : : वांच्छित, मनोकामना पूर्ण करणारें, काम-तृप्ति करील असें इष्ट व मिष्ट, ज्याचे आजवर डोहाळे लागले होते तें, मनाच्या खोल गुहांत निवास करणारें, हवेंहवेंसें वाटणारें, मन ज्यावर जडलें तें, इच्छा केली तें, अंतर्यामीं पाहिजे असलेलें, हवें तेंच नेमकें.

इंद्रियदमन : : मनोविजय, इच्छाशम, इंद्रियदमन करण्यापेक्षां इंद्रियाची तृप्ति कमी हानिकारक मार्गानें करण्याची संधि दिल्यानें कार्य जास्त सुलभ होतें, मनोनिग्रहाच्या या शिकवणुकीचा एक वळसा तर पचविला, इंद्रियदमन म्हणजे मूग गिळून बसणें नव्हे, जो अन्याय मुकाट्यानें सहन करतो तो त्या अन्यायांत भागीदार होतो.

ईशकृपा : : म्हटलें देव पावला ! ईशकृपेचें छत्र, परमेश्वरकृपेनें तग धरून राहिलों, मुकं करोति वाचालं, देव देतो तेव्हां छत फाडून देतो, अनंत हस्तें कमलावरानें देतां किती घेशिल दो करानें, पंगुं लंघयते गिरिम्.

उघड : : स्वच्छ, अनावृत, असंदिग्ध, स्पष्ट, सुस्पष्ट, उघड उघड, नागवें, साफसाफ, प्रकट, प्रगट, व्यक्त, विशद, खुलें, खुल्लमखुल्ला, आड-पडदा न ठेवतां, निर्विवाद, वादातीत, रोखठोक, धादान्त, राजरोसपणें, दिवसाढवळ्या, चारचौघांपुढें, सूर्याला साक्षी ठेवून, हातच्या कंकणाप्रमाणें, रेषान्‌रेषा दिसेल, सहज दृष्टोत्पत्तीला येणारें, सहज कळून येईल, हें कांहीं सांगावें लागलें नसतें !

उजाडणें : : दिशा फांकल्या, काळोख संपला, अरुणोदय झाला, सूर्य जन्मला, भगवान् सहस्ररश्मि उदयाचलावर आला, तांबडें फुटलें, कोंबडा आरवला, चांगलें फटफटलें, झुंजूमुंजू झालें, उषा प्रकटली, दिवस आला, रात्र गेली.

उठाठेव : : लुडबूड, चोंबडेपणा, उपरेपणा, नसत्या पंचायती, उचापती, हेतुविना कृति, लांडे कारभार, रिकाम्या चांभार-चौकशा, लष्करच्या भाकरी भाजणें, ज्या गांवाला जायचें नाहीं त्याची वाट विचारणें, फुकट फौजदारी, उगाच पंचाइती, फुकट तसदी घेणें, उगीचच्या उगीच-खालीपिली घाई, एवढें सांगितलें कोणी ? काय गरज पडली होती मला ? पण नाहीं—

झक मारली नी भेटलों त्याला, नसते उद्योग, कांहीं कारण होतें हें करायचें ! कां ग बाई रोड तर साऱ्या गांवाची ओढ ! रिकामा न्हावी तशांतली गत.

उडी : : झेंप, उड्डाण, जंप, लांघणें, अंग खालीं झोकणें, वरच्या बाजूनें पार होणें, सूर मारणें, कोलांटी, अधांतरीं राहून आकाश पकडण्याचा प्रयत्न ! दरीच्या तळाशीं लवकरांत लवकर जाण्याचा यत्न, टप्प्याटप्प्यानें घरंगळत गेला, वर घसरणें, गरुडाची झेप, एका टांगेंत लांघणें, कड्या-खालीं अंग झोकणें, एका उडींत कुंपण पार केलें, तलावांत सूर मारला, गाडीनें कोलांटी खाल्ली, गनिमावर घसरला.

उणीव : : दोष, व्यंग, त्रुटी, खाडा, उणेपण, न्यून, न्यूनता, अभाव, कमीपणा, कमतरता, अधुरेपणा, लंगडेपणा, कांहीं बाकी राहणें, खाडे-दोष राहून जाणें.

उत्कर्ष (आर्थिक) : : योग्यतेस चढेल, चलती होईल, उत्कर्षाचें रहस्य यांत आहे, बरे दिवस येतील, चार पैसे खेळू लागतील, भरभराटीचे दिवस, दैव काढील, पांग फेडील, ऊर्जितावस्थेस चढेल.

उत्क्रान्ति : : पुनर्घटना व पुनर्जडण, वाट बदलली, फेरफार पण फार नव्हत, आमूलाग्र बदल, नव्याचे पचतील इतकेच वळसे, रूपान्तर, नदी तीच पात्र बदललें, कायापालट, जुने ठसे बदलले, घाउकाऐवजीं फुटकळ बदल, संक्रमण, नव्या युगाचीं पदचिन्हें, नवी श्रद्धा व नवी आशा यांची निर्मिति, जुन्यास नवे धुमारे, तीच धातू नव्या मुशींत, स्थलान्तर जरूर तर पण इच्छान्तर नव्हे, टप्प्याटप्प्यानें बदल, एक प्रकारें कवच न फोडतां पिल्लू बाहेर येणें.

उत्कृष्ट : : उच्च, सर्वोत्कृष्ट, ए वन्, लोकोत्तर, मारू, सर्वोत्तम, सर्वांत वरचढ, अजोड, सर्वांत चांगलें, मौलिक, अभिजात, सरस, झकासपैकीं, फार छान, झक्क, अर्क, सष्ठु, एकमेव, बिनतोड, कोणी हात धरूं शकणार नाहीं, प्रथम श्रेणीचें, तोंडांत मारील असें, लाखांत एक, त्याच्यासारखें तेंच, न भूतो न भविष्यति, एक नंबरचें, तसें दुसरें मिळणार नाहीं, अव्वल दर्जाचें, ना देखिलें ना पाहिलें, सर्वांत ज्येष्ठ. आघाडीवर तळपणारें, असामान्य, एकदम पसंत पडण्याइतकें, अग्रभागीं राहील, दृष्ट लागावी

एवढा उत्तम, दोष काढायला जागा म्हणून नाहीं, अमोल किंमतीचें, चांगलेंच उतरलें आहे, गुणवत्तेनें मोठा.

उत्तेजित : : (करणें) चेतविणें, डिवचणें, फुलविणें, चाळविणें, उठविणें, प्रोत्साहन–प्रेरणा देणें, भारणें, प्रोत्साहित करणें, उत्तेजन देणें, टाच मारणें, जागृत करणें, झोप घालविणें, तरतरी आणणें, नाडीचे ठोके वाढविणें, फणा उभी करणें, जीव आणणें, पाणी देणें, परजून धार आणणें, पडल्याचें खडें करणें, उद्दीप्त करणें.

उत्पादन : : निर्मिति, सृजन, निर्माण करणें, जन्माला घालणें, तयार करणें, कारखान्यांतून बाहेर काढणें, घडविणें, आकारांत आणणें, उत्पत्ति करणें, जगांत आणणें, पिकविणें.

उत्साह : : जोम, सजीवपणा, नेहमीं पाय पुढें, कशाला ना नाहीं, कशाला पाय गाळणार नाहीं, दुर्दम्य उत्साह फेसाळतो आहे, जोसांत, हें करूं तें करूं चाललें आहे !

उत्साही : : उत्साहाचे धुमारे–बुडबुडे येताहेत, सर्व कांहीं हवें, नवजीवन-प्रेरित, टणाटण उड्या मारतात, समुत्सुक, उत्साहाला उधाण आलें, उत्साह ओसंडून चालला होता–शिगेला पोंचला, इतके उत्साही कीं केव्हां केव्हां लगाम घालणें जरूर पडे, जीवनाचे अमृत-घट पिऊं इच्छिणारे, उत्साहानें नवजीवन संचरूं लागलेला, ताज्या दमाचा.

उदय : : भविष्याची आशादायक चाहूल, प्रगतीची शिडी चढले, वंशवृक्ष वाढीस लागला, नवयुगाची ही इमारत घडविली, अडचणींतून वर आला, व्यापक क्षेत्र मिळालें, नवजीवनाचा उषःकाल, ध्येयशिखराकडे पहिलें पाऊल, भाग्य उदेलें

उद्गार (पुरुषांचे) : : हात् तिच्या, यॅः, आहे ब्बुवा, पूछो मत्, अरे हो, बहोत अच्छा, तर हो, बराय्, हुड्त् तेरी, छान छान, छट्, हो ऽऽ हो, छ्याः छ्याः, म्हणतां काय ! अलबत्, अग ए, कर्म माझं, अरे गृहस्था ? भले बहादर ! चांगलं, द्या, अरे बापरे ! व्हौःऽ, अस्संक्का ! दे टाळी, बास् झालं !

उद्गार (स्त्रियांचे) : : इश्श, अय्या ऽ ऽ, होक्काऽ, बाप्या, एहेरे, बरं बाई, अगबाई, अग्गोबाई, हॅत्तेरे, टाटाऽ, चह्ला चावट कुठले, किनई, गडे, शर्थ झाली ! छे बाई, हो ग बाई, खरंच गडे, बघा हो, जुलूम आहे, ऊंः, हो पऽण, ब्बाई, होच्च मुळीं, वाऽगवा !

उद्वेग : : कंटाळा, उबग, तिटकारा, राग व निराशा, खंत, खिन्नता, अढी–मिठी बसली, उदासीनता, अगदीं पोट भरलें, वाऽ नको तें यापुढें.

उदार : : सढळ, सर्वांचा सहाय्यक, दिलदार, अनेकांचा पोशिंदा, उदारपणाच्या खेरीज सर्व बाबतींत नेमस्त, मुठी भरभरून देईल, रुंद अंतः-करणाचा, सर्वांना सामावून घेईल, व्यापक सहानुभूतीचा, त्यांच्या घरीं कोणा ना कोणाचा तरी हात ओला होतो, कर्णासारखें दातृत्व, आओ जाओ घर तुम्हारा, पदराला खार लावून घेतो, जन्मोजन्मीं फिटायचें नाहीं असें देणें, एकदां आपला म्हटलें कीं त्याच्यासाठीं वाटेल ती घस सोशील.

उदाहरण : : नमुना, मासला, वानगी, झलक, याहून अधिक उतारे किंवा उदाहरणें देणें म्हणजे बाजारांत आंबे खरेदी करण्यास जाणारानें मासला पाहतां पाहतां राशींतले सगळेच आंबे स्वतः कापून खाण्यासारखें होईल.

उधळपट्टी : : उधळ-माधळ, पैशाचा चुराडा, अत्तराचे दिवे जाळले, पुष्कळ पैसा नासला, ख्यालीखुशालींत पैसा उडविला, पैसे पाण्यांत घातले, बेसुमार खर्च, आडमाप–बिनहिशोबी–अवाचे-सवा खर्च, जिवाची मुंबई करून घेतली, वाटेल तितके खर्चायला मागें-पुढें पाहिलें नाहीं, सर्वच खर्च फुगत चालले, पैशाला पुष्कळ वाटा फुटल्या, भाड्यातोड्यांत ऐषआरामांत पैसे घालविले, वायफट पैसा जाऊं दिला, रोज घृतकुल्या चालल्या आहेत, म्हणे चांगली वस्तु आहे मग त्याला दोन पैसे जास्त लागणारच मग करा खर्च ! त्याची उधळपट्टी पाहिली कीं अलीकडे त्याच्या खिशांत पैशाचें झाड उगवलें असावें असें वाटूं लागतें, त्याच्या उधळ्या स्वभावाला मध्यंतरीं उपास पडला होता त्याचें हें पारणें कीं काय नकळे ! खिशाला न परवडेल असा हा खर्च कुबेराला भिकारी करील, हात फारच सैल सोडला, थाट एखाद्या संस्थानिकाला लाजविण्यासारखा !

उद्धट : : विनयहीन, चहाटळ, तिखट जिभेचा, माजोरा, मस्तवाल, आदरहीन, उलट उत्तरें करणारा, मार्दवहीन, घसकट, दांडगट, दांड, धट्ट, रगेल, बेगुमान, बेपर्वा, बोलण्यांत नरमाई नाहीं, आवाज भसाडा व वागण्यांत करडा, तिखट व उर्मट, वागण्यांत आदर नाहीं, चढेल, नजेरेंत शरम नाहीं, कोणी वडीलधारें आलें तरी ढिम्म् जागचा जागीं बसून राहील, उगाचच ताठम् गडी, ' अरे 'ला लगेच ' कांरे ' करील, शब्द खालीं पड्डं देणारा नाहीं, कधीं नमतें घेईल–नांव कशाला ? प्रश्नाला सरळ उत्तर देणार नाहीं प्रतिप्रश्न करील त्यांतून तुमचें उत्तर शोधा.

उद्धार : : पातकनाश, कलंक धुतला गेला, पूर्वस्थानापन्न केलें, मानसिक उंची वाढविली, प्रमोशनें यानें उद्धार घडविला, खेचून वर घेतलें, खालच्या थरांतून वर काढलें, स्वर्ग दाखविला निदानपक्षीं वरचा वर्ग दिला, बरी स्थिति आणली, अधोगति व अधःपाताची घसरगुंडी थांबविली, स्वर्गलोकाचीं द्वारें खुलीं केलीं, माणसांत आणला, संपूर्ण भलें नाहीं तरी वरच्या माळ्याची तर वाट दाखविली ! वरच्या टप्प्यास नेलें, ही मोट वर खेचली, रुतलेलें चाक वर ओढलें, गर्तेंतून वर काढलें, निःश्रेयस प्राप्त करून दिलें.

उद्योगी : : दीर्घोद्योगी, परिश्रम-देव, उद्योगांत खळ नाहीं, श्रमसातत्यानें वर चढेल, अपरंपार चिकाटीचे कष्ट, कष्टाळू, हात कामांत सदा गुंतलेले, हात कधीं रिकामे नाहींत, रिकामटेकडेपणा आढळणार नाहीं, उद्योगं पुरुष-लक्षणं याप्रमाणें चालणारे, सतत झटणारे, दिवसाचे २४ तासहि यांना कमी पडतात, यत्न तोचि यांना देव.

उन्नति : : प्रगति, भरभराट, उत्कर्ष, बढती, ऊर्जितावस्था, पुढें वाटचाल, महत्त्व प्राप्त होणें, वर चढणें, उच्च स्थानीं येणें, पुढें जाणें, नांवास येणें, योग्यतेस चढणें, दैव काढणें, नशीब काढणें, धनरेषा उमटणें, बरे दिवस येणें, उज्ज्वल भविष्याकडे वाटचाल करीत आहे, यशाकडे निश्चित पावलें टाकीत होते, प्रगतिपथावरील घोडदौड, अभिमानास्पद प्रगति, उत्कर्ष-मार्गावरील मैलाचे एक एक दगड मागें टाकीत वरच्या श्रेणींत गेले.

उपद्रव : : उपसर्ग, पीडा, झंझट, भुर्दंड, क्लेश, कष्ट, उच्छाद, भुणभूण, गांजवणूक, टुमणें, झक्कू, कटकट, टोंचणी, आग्रह, नेटा, जोरा, लचांड,

गंडांतर, कर्मकटकट, परपीडा शुक्लकाष्ठ, दुःखास कारण, विनाकारणचें बाळंतपण, फुकट भागोटा, नसतें विघ्न, व्यर्थ शीण व झीज, सौख्यास तडा, पायांतला कांटा, शरीरक्लेशास–मनोव्यग्रतेस कारण, मनाला ताण, गळ्यांतली घोरपंड, उशाशीं साप, जोड्यांतला विंचू, निखारा. त्रासाचें मूळ, हें संकट, ही वाहती जखम, हें उलट्या तोंडाचें गळूं, यांच्यापासून 'काका मला वांचवा' म्हणण्याची वेळ येते, नसतें खेंगटें, तोंड बांधून बुक्क्यांचा मार, हा आडून गोळीबार, छळणें, गांजणें. त्रास देणें, सतावणें, पीछा करणें, पीडा देणें, त्रस्त करून सोडणें, जाच करणें.

उपदेश : : सल्ला, मसलत, सांगी, आदेश, संदेश, शिकवणूक, मसलतीचे डोस, फुकाचा सल्ला, शुष्क उपदेश, उपदेशाचे घुटके, बोधामृत, परोपदेशे पांडित्यम्, कोणी काय करावें हें सांगणारे हे.

उपयुक्त : : फायदेमंद, उपयोगी, नफ्याचें, बरकत आणणारें, बरकतदार, मिळकत देणारें, त्यानें काम निभतें, तो काम देतो, त्याच्याशिवाय चालत नाहीं, त्यानें गरज भागते, तो एक आधार आहे, पोकळी भरून काढतो, उपयुक्त?—अरे तो तर महत्त्वाचा भाग! केंद्र, आंसाप्रमाणें आहे, अधिदैवतच.

उपवर : : तीन-चार वर्षें लग्नासाठीं ताटकळलेली मुलगी, मुलगी गळ्याशीं आली, दौरे काढण्यापेक्षां नौरे शोधा आतां! लग्नाच्या मार्केटमध्यें आली, वडील आतां पत्रिका घेऊन हिंडताहेत.

उपाय : : तोड, तोडगा, इलाज, मार्ग, सुटकेची वाट, तरणोपाय, रामबाण उपाय, उतारा, याच्यावर मात्रा काय? यावर तो काटशह, पळवाट, हें न होईल कशानें? या आजारावर औषध, यावर कोणती 'पथी' लागू पडेल?

उपाय (अयोग्य) : : अघोरी उपाय, सुतासाठीं मणी फोडण्याप्रमाणें, बहाल तासून खुंटी काढणें, अव्यापारेषु व्यापार, नसता फंदा, जुजबी उपाय, वरातीमागून घोडें, दाट झालें पाणी घाल पातळ झालें पीठ घाल, गवतानें अग्नि झाकण्याप्रमाणें, गळा कापला खोकला मिटला, भीक नको पण कुत्रा आवर, नुसत्या मलमपट्ट्या.

उपाय (चुकीचे) : : डोरलें पेरलें तर केळें कसें उगवेल? अंधापुढें

दीप नाचवून काय उपयोग ? तांतडीनें काम नासे, लोणी शेणांत घातलें तर काय मिळालें ? मूळ चेहरा स्वच्छ न करतां आरशांत रूप पाहिलें तर तें उजळलेलें कसें दिसेल ? दूध पाजून साप पोसला, विविध अन्नांचीं नांवें सांगून भोजनतृप्ति मिळवून देतां येत नाहीं, भक्कम पाहिजे म्हणून दगडाची नाव करणाऱ्याचे क्लेश फुकटच जाणार ! हातचें सोडून पळत्याच्या पाठीस लागणें, अंधाला अंधाचें मार्गदर्शन, आग सोमेश्वरीं बंब रामेश्वरीं, निरुपयोगी खटपट, आधीं कळस मग पाया, चुकीचा कित्ता, तहान लागल्यावर विहीर खणणें, आयत्या वेळची एकच धांवपळ, डोळ्यांत केर आणि कानांत फुंकर, प्रथम म्हशीचें डोकें कापा मग रांजण फोडा यांतला प्रकार, धुराला भिऊन आगींत उडी घेण्याचा प्रकार, म्हणण्याची वेळ येऊं नये कीं हें काय करून बसलों ! सोन्याची सुरी उरांत खुपसून घेण्यासारखें, चुडीत दाखवून वाघाला घरांत घ्यावें त्याप्रमाणें, केस उपटल्यानें का मढें हलकें होतें ? जेथें नख नको तेथें कुऱ्हाड कशाला ? अंगांत चोळी नी गांवाला आरोळी.

उपाय (योग्य) : : बिनतोड उपाय, यशस्वी तोडगा, ' सिंचन करितां मूळ वृक्ष ओलावे सकळ ', ' वश झाला राजा मग आपुल्या त्या प्रजा ', आधीं विचार करून तीर सोडावा, खोडावर घाव घातला कीं फांद्या खालीं येणारच ! विषावर विषाचा उतारा, लाठीस लाठी, कांट्यानें कांटा, एका दगडांत दोन पक्षी, नाक दाबलें कीं तोंड उघडतें, आगे लाथ पीछे बात, चांभाराच्या देवाला खेटराची पूजा.

उर्वरित : : राहतां राहिले किती ? दहा गेले पांच राहिले, प्रवास संपला, व्ही. टी. आलें, शिल्लक–बाकी–तळास जें उरलें तेवढें, तळाची खरवड.

उलट टोकें : : ती थंडपणें शंका काढीत होती मी उत्साहानें उतूं जात होतों, सुष्ट आणि दुष्ट टीकाकारांचें लक्ष वेधलें, बायको विलासी नवरा उदासी, उन्नति वा अवनति, प्रगति कीं पुच्छगति ? तो पुष्ट हे कृश, मजूरवस्तींत जा नाहीं तर हुजूरवस्तींत जा !

उलटापालट : : कुत्र्यानें शेंपटी हालवायच्या ऐवजीं शेपटीनेंच कुत्रें हालविलें ! माणकानें मासा गिळला, केव्हां गाड्यावर नाव तर केव्हां नावेवर

गाडा, कांहीं दिवस सासूचे तर कांहीं दिवस सुनेचे ! प्रत्येक कुत्र्याचीहि वेळ येते तेव्हां तो वरचढ असतो, बूट दुसऱ्या पायावर, शेंड्याजागीं बुडखा, यजमानाचे जागीं भटजी.

उसनवारी (वाङ्मयीन) : : दत्तक कल्पना, सही सही-भ्रष्ट नक्कल, केवळ तर्जुमा, हें साहित्य जुन्या बाजारांतलें आहे, बुद्धिहीन अनुकरण, अनुवाद ही उसनवारीच-तो प्रेयसीच्या बुरख्यावरून घेतलेल्या चुंबनासारखा असतो.

उंचवटा : : टेंगूळ, स्कंध, नाळ, गंडस्थळ, फुगोटा, चट्टान, कंगोरा, डोक्यासारखा भाग, पठार, सोंड, आवाळूं, जणूं भोपळे, गळूंच जणूं, चढा भाग, चोंच, ओठ, पुडा, रास, मोठासा द्रोण, घुमट, गोळा, सोंगटी.

ऊन (दुपारचें) : : कवडशांचे थरथरणारे ठिपके, सूर्य-किरणें झाडा-झाडांच्या पर्णराजींतून तीरांसारखीं आरपार निघून गेलीं होतीं, दुपारचें ऊनसुद्धां ! त्या झाडाच्या फांद्यांत शिरतांना आपलीं तप्ततेचीं वस्त्रें बाहेरच सोडून ठेवून आंत शिरत होतें ! ऊन रणरणतें आहे, उन्हाळा मी म्हणत असेल, थंडीचें नांव सुद्धां नाहीं.

ऊन (सकाळचें) : : उन्हें सांडत होतीं, सूर्याच्या किरणांनीं सोन्याचा सडा पसरला, पिवळ्या उन्हांत न्हाऊन निघालेलीं हिरवीं शेतें, बंद खिडक्यांच्या तावदानांतून ढोंपरभर उन्हें वर आलीं, लख्ख ऊन पडलें, सकाळचा हंसरा सूर्य, लख्ख सोनेरी उन्हें, दिवस इतका वर आला असेल अशी कल्पना नव्हती, कोंवळें ऊन अंग सुखवीत होतें.

ऋण : : कर्ज, देणीं, ॲडव्हान्स्, आगाऊ उचल, काढलेले पैसे, घेतलेली हात-उसनी रक्कम, उसनवारी करून आणलेला जिन्नस, बिनव्याजी पण परत करावयाची देणगी, चारचौघांकडून उभे केलेले पैसे, परत-फेडीच्या बोलीवर जमा केलेला पैका, कर्ज फिटतें पण व्याजाखालीं ऋणको मरतो, तुम्ही झोपलेले असा जागे असा धंदा करीत असा किंवा नसा इकडे कर्जावरील व्याज वाढतच असतें ! कर्ज हा दहा फणांचा नाग आहे—मुद्दल ही एक फणा तर व्याज बाकी नऊ फणा, बाजीरावहि सावकारांपुढें गोगलगाय होई, रणांगण गाजविणारे देण्यापायीं रडकुंडीस येतात, देणाऱ्याचा हात

वर व घेणाऱ्याचा हात खालीं असतो, कर्जाखालीं असणाऱ्या मनुष्याच्या सत्प्रवृत्ति हळूहळू पण निश्चित चुरडल्या जातात, कर्जबाजारी इसम सद्गुणी असणें कठीण, स्वकमाईपेक्षां कर्जाचा पैसा चटकन् खर्च होतो ! ऋणाच्या पिंजऱ्यांत शिरणें सोपें; त्यांतून बाहेर निघणें कठीण, ऋण काढून सण करणें आत्मघातकीपणाचें आहे.

एकछाप : : एका चणीचे आणि एक अंगठशाचे, एका मुशींतले, त्याच तोंडावळ्याचे, दोन वाटाण्यासारखे, हे दोन चिंचोके वेगळे कुठें ओळखतां येणारे आहेत? हा तसाच तो, रत्तीभर फरक नाहीं, हा लपवावा तो काढावा, जुळेंच म्हणाना !

एकत्व : : एकजिनसीपणा, अभिन्नत्व, काठी मारल्यानें पाणी वेगळें होत नाहीं, अंतर नाहीं, पोलादी ऐक्य, हे दोन पापग्रह एकत्र आले, जोडी जुळली, दोन शरिरें जीव एक, एकाच नाण्याच्या या दोन बाजू.

एकलेपणा : : एकाकी जीवन, आपलें म्हणायला कोणी नाहीं, नीरव आयुष्य, सोबत सुटली, एकटादुकटा जीव, माझा मीच; कोणाची साथ नाहीं, सडी व असहाय्य, जोडीदार नाहीं, गाडीचें एकच चाक चालतेंय्, ही दुक्कल फुटली, एकला चलोरे ! स्वतःस सोबत स्वतःचीच, सोबतीविना दिवस कंठायचे, एकटा जीव सदाशिव, अपत्यहीन जिणें, कोणाचा पाठिंबा-संगत नाहीं, मेला तरी खांदा द्यायला कोणी नाहीं, शिंपल्यांतलें जीवन, सर्वांनीं सोडलेला, समाज-बहिष्कृत.

एकसांची (लेखन) : : टांकसाळी, एका-कायम नमुन्याची, ठरलेल्या छापाची-साच्याची-धाटणीची-ठशाची विटाळी कविता, बांधील लिहिणें, पदें पाडलीं आहेत ! काडीमात्र वैविध्य नाहीं, ही नायिका त्यांच्या इतर नायिकांच्या मुशींतूनच ओतलेली आहे, एका सांच्यांत ओतलेल्या गणपतीं-प्रमाणें नायकाचे आईबाप एका कित्त्यावरून घोटून घेतलेले दिसतात.

एकसूत्रीपणा : : परस्परांचा मेळ, एकरंगीपणा, बांधीवपणा, सूत्र-बद्धता, एकसूर, एकमेकांत नीट गोंवलें जाणें, ताळमेळ जमणें, गुंफण, सांधे जमविणें, संयुक्त घडण, सह-कृति, बहुरंगीपणा काढून टाकणें, सर्वांचीं तोंडें एका दिशेला आणणें, एकच कार्यपद्धति आणणें.

एकलकोंडा : : माणूसघाणा, भिडस्त, आत्मकेंद्रित आणि तुटक वृत्तीचा, त्याला स्वतःचीच संगत सर्वांत आवडते, आपल्यांतल्या आपल्यांत राहतो, कोणाचा सहवास नको, शिंपल्यांत राहणारा, स्वतःच्या मठींत दंडी देतो, केवळ स्वतःच्याच व्याख्यानाला हजर राहतो; कारण त्याला इलाज नसतो !

एकान्त : : निर्जन जागा, रिकामें घर, खेंचाखेंचींतून दूर, नीरव स्थल, एकान्तवासाची कोठडी, हा एकान्तवास अंधारकोठडी सारखा भयाण वाटे.

एकी करणें–होणें : : समन्वय, संग्रह, एकसंध–एकत्रित–एकजूट–एक विचाराचे–एकपिंड–मैत्री–एकावयव रचना करणें, एकजीव, एकरूप–एकस्वरूप होणें, गठ्ठा–मोळी–गांठ बांधणें, सांगड–सांधा घालणें, जवळीक निर्माण करणें, एकात्मकता निर्मिणें, हितसंबंध गुंतविणें, साखळी जुळविणें, स्नेहरज्जूनें जखडणें, एक जूं दोहोंवर टाकणें, अविभाज्य घटक होणें, भिन्नतेंत एकत्व अनुभवणें, माळ बनविणें, जीवन–धागे गुंफले जाणें, मनानें जवळ येणें.

ऐकणें : : कानांवरून जाणें, कर्णसंपुटांत सांठविणें, कानीं येणें, श्रवण करणें, कान देणें, ऐकावयाला मिळणें, ऐकून घेणें, कानांच्या पडद्यावर हे शब्द आदळले.

ऐक्य : : एकात्मता, अभेद, अविभिन्नता, एकसंधीपणा, एकजीव, सर्व एक दिलाचे, एकजूट, एकसूर, एकजिनसीपणा, संयुक्त जीवन, मन-मिलाफ, अभिन्नपणा, फुटीर वृत्तीचा अभाव, एकरूपता, एक दृष्टी एक भावना, प्रयत्न करून फुटणार नाहीं, यांत दुसऱ्याचा हात नाहीं, बाहेरची सांवली येथें नाहीं, एक पंथ एक कार्य, सर्व दुवे नीट सांधलेले !

येथें कोणी परका नाहीं, जणूं एका घरांतील माणसें–एका कमळाच्या पाकळ्या, आपलेतुपलेपणा नाहीं, कोठें तडा गेलेला नाहीं, एक सर्वांकरितां व सर्व एकाकरितां, दुहीला रामराम, कोणी फितूर नाहीं, दोन शरिरें पण आत्मा एक, एकाच्या पायाला कांटा लागला तर दुसऱ्याच्या डोळ्यांत आंसू.

ऐट : : मिजास, झांक, ढंग, रुबाब, आब्यता, टेंबा, डौल, रोब, दिमाख नखरा, खोटा आव–डामडौल, मिशांस तूप लावून बाहेर पडणें, स्टाईल, गुर्मी, तोरा, शेखी, मोरासारखा डोलतो ! नोकझोंक.

ऐट (उसनी) : : वरून मस्ती पोटांत धास्ती, फुकट भपका, रिकामा मोठेपणा, अहेर चोळीचा आणि गजर वाजंत्र्यांचा, नांव मोठें लक्षण खोटें, नायकिणींचें वय गोसाव्यांनीं चोरलें, दुसऱ्याच्या नांवावर विकणारे, न बोलून शाहणा, दिखनेमें ढब्बू, घरावर नाहीं कौल आणि रिकामा डौल ! ऐट बादशाही धंदा भडभुंजाचा, तोंड म्हणत होतें एक मन म्हणत होतें एक, आव आणणें.

ऐटदार : : दिमाखी, रुबाबदार, झांकी, टेंचदार, फॅशनेबल, नीटनेटकें, सफाईदार, टापटिपीचें, ढंगदार, ढबदार, नोकझोकीचें, टिपटॉप, डौलदार, सुडौल, रेखीव, स्टाइलिश् , अद्ययावत्, मारू, झक्क, झकास, छाप टाकील असें, चट्टीपट्टीचें, शाही ढंगाचें.

ऐतखाऊ : : आयत्या पिठावर रेघोट्या ओढणारे, बडे बापके बेटे, आप कमाईचा नाहीं बापकमाईचा पैसा ! परपुष्ट जीवन, स्वतः कधीं घाम गाळलाय ? आयत्या बिळावर नागोबा, आळशी स्वप्नांत गुंग.

ओसाड : : भयाण, निर्जन, वैराण, नापीक, रेताड, वालुकामय, शुकशुकाट, वस्तीहीन, निर्मनुष्य, नीरव, कोठें चिटपांखरूं नाहीं, स्मशानवत् , कोठें गवताची काडी नाहीं, मनुष्यवस्ती पासून दूर.

ओळख : : मैत्री, स्नेह, पेहचान, परिचय, परस्परांची घसट, ओळखदेख, जानपछान, मान डोलावण्याइतपत तोंड-ओळख, हस्तीदंती पेहेचान, सौहार्द, चार घटका संबंध येतो इतकेंच ! जुजबी मैत्री, मानडोली ओळख.

ओठ (वर्णन) : : लाल चैत्राची पालवी, गाभुळ–ओठी, रक्तचंदनी, पोवळ्यासारखे, लालचुटुक, चिमणी जिवणी, पिकल्या तोंडल्याचा भास होतो, रसरशीत अधरोष्ठ, बिंबाधर.

औषध : : दवा, दवादारू, औषधपाणी, जडीबुट्टी, वैद्यकीय इलाज– उपाय, औषधी रसायन, टॉनिक, आसव, वल्ली, गुटिका, भस्म, अवलेह, मिक्श्चर, अरिष्ट, काढा, लेप.

अंदाधुंदी (राजकीय) : : कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं, बारभाई कारभार, चौघांचीं तोंडें चार दिशेस ! शुद्ध मोंगलाई, अंधेरनगरी, अस्ताव्यस्तपणा, एकसूत्रीपणाचा अभाव, विस्कटलेली घडी, चोऱ्यांचा सुळसुळाट, व्यापारांतील भ्रष्टाचार, उजळमाथ्यानें चालणारीं पापें, धरसोडीचें वर्तन, प्रगति पुस्तकी आंकडेवारींतच राहून जाते.

कटकट : : गोंगाट, किरकीर, पिरपीर, ठण्ठण् आवाज, खडखडाट, घरघराट, धडधडाट, कर्णकटु नाद, कानांतले किडे पळाले अगदीं ! पीडा, भगभग.

कडा : : कपाचे ओठ, धोतराचे कांठ, कड, नळीचें तोंड, टोंक, संपती बाजू, शेवट, धार, किनारा, सीमारेषा, किनार, तीर, शिखर, अग्र, शेंडा, कळस, बोथी, फाळी, ती बाजू, शेंपूट.

कणखर : : धक्के खाण्याची धमक असलेला, बेडर, निडर, ताठर, बळकट, टणक, जोमदार, लोखंडी कांबच ! झुंझार वृत्ति, जोरकस नाडीचे, सर्वांना पुरून उरेल, कडक, तडफदार, कडा, मोडेल; वांकणार नाहीं, पोलादी, घट्ट पिंडाचा.

कथा : : गोष्ट, किस्सा, कहाणी, दंतकथा, आख्यायिका, चुटका, लघुकथा, दीर्घकथा, लघुतम कथा, कौटुंबिक कथा, चुटकला, विनोद-कथा.

कथा (वाईट) : : यांच्या कथा-कलेची अजून टाळू भरायची आहे ! येथें सर्व वाङ्मयीन संकेतांची कत्तल केली आहे, कथाविषयाचा नासवून खरवस केला आहे, भडक प्रेमाच्या लघु-कथा, भावशून्य रड-कथा.

कथा (मांडणी) : : आखीव, रेखीव, आराखडा काढून लिहिलेली, कथानकाला गति मिळते, कथेला घाट येऊं लागला आहे, कथा येथून बाळसें घेते, शयनदृश्यांची लयलूट, हीं दृश्यें पेरलीं आहेत, कथेची प्रकृति खेळकर नसून गंभीर आहे, चांगली गोष्ट मोदकासारखी असते; पण तिची उकड साधणें जरा कठीण असते.

कथावस्तू (दोष) : : कथासूत्र, यांत योगायोगांची मेहेरबानी दिसते, सवंग माल, ध्येयशून्य कथांचा फापट-पसारा, चक्रम् लेखकाचा नवा विक्रम् ! संघर्ष फिका आणि कथानक तोकडें, अफाट कथा, कथानकाची

गति थंड झाली आहे, कथेचा सनसनाटी दिलफोडक शेवट, एक सामान्य आणि कच्ची कथा, घटनांची वाण, भारूड रचलें आहे, या लघुकथेची भट्टी नीट साधलेली दिसत नाहीं ! कथानक पुढें सरकत नाहीं.

मनाची पक्कड घेईल असें यांत कांहीं नाहीं, या लिखाणाचा अन्वयार्थ लावावा लागतो, गोष्ट अगदींच एवढीशी असते, कथा येथें कोलमडली, घटनांचे दुवे विस्कळित वाटतात, ठराविक प्रेम-त्रिकोणावर आधारलेली, ही कथा म्हणजे एक मुटकुळें कडबोळें किंवा गोधडीच होय !

कपट : : व्यूह, कारस्थान, लबाडी, तोंडघशीं पाडणें, मनांत दुसरेंच ! अंत:करणांत किल्मिष, डाव, गोत्यांत घालण्याचें षड्यंत्र, घातकी खड्डा रचला, संकटप्रसंगीं प्रतारणा, गोत्यांत आणलें, कावा, जाळें पसरलें, षड्यंत्र रचलें, खड्डा खणलेला ! चक्रव्यूहांत खेंचला, जाळें विणलें, डाव टाकला.

कपटी : : उफराट्या वृत्तीचा, वर गोरा आंत काळा, द्रोही, खोटा, हृदये तु हलाहलम्, पायघोळ संत, विषकुंभसम, दुटप्पी बगळा, गळेकापू, केसानें गळा कापला, कपट-कारस्थानी, हिकमती, कांगावखोर, उलट्या काळजाचा, कुभांडखोर, आंतल्या गांठीचा, दुसऱ्याच्या पायांत पाय घालणारा, अप्रामाणिक, काळ्याकुट्ट मनाचा, बोलण्यांत बोलणें नसणारा, बेभरंवशाचा भिड्ड, अवसानघातकी, दगलबाज, कळीचा नारद ! कानीं लागणारा, डामरट कोल्हा, लबाड, लुच्चा व कावेबाज, चारसो बीस, बंडलबाज, त्याचें अंतरंग रोगट, नागमोडी वर्तनाचा, पक्का भामटा.

कपडे : : वल्कल, वसन, वेष, पोषाख, कपडा, वस्त्रप्रावरण, वस्त्र, कापडचोपड, उभें लावून घ्यायला, दुबोटी लंगोटी, ठेवणींतले कपडे, सुरती साडी, बासनांतलें सोवळें, देश तसा वेश, एक नूर आदमी तर दसनूर कपडा ! कपड्यांची ओज आपण राखली तर कपडे आपली ओज राखतात, कापड कसलं वल्कलं नुसतीं ! अद्ययावत् पद्धतीचे–मळखाऊ–धुवट–पांढरेफेक–कपडे.

कपडे (बेडौल) : : अघळपघळ सदरा, लांडी चड्डी, टाचगें लुगडें, पादत्राणांचे द्रोण, हॅटचें तें पालथें घमेलें, तुटक्या काडीचा चष्मा, मेणचटलेली टोपी, अंगाला न येणारा कोट, माझा खादीचा पोषाख पाहून तो

म्हणाला कीं छान शोभतोय पासोड्या मारुती ! कुणा दुसऱ्याकरितां घेतले असावेत असें वाटणारे कपडे.

कबजा (महत्त्व) : : ज्याच्या हातीं ससा तो पारधी, ज्याच्या हातीं लाठी त्याची म्हैस, एक अंगुळ हक्क तर दहा अंगुळें कबजा.

कमजोर (मन) : : आपलें दूध उघडें; बोक्याला कशाला बोल ? आपलाच दाम खोटा, कच्च्या पायांत पाणी मुरतें, कच्चें मडकें, पिंजका बोरू, मनोदौर्बल्य.

कमतरता : : न्यून, कांहीं उणें पडणें, खाडे, कमीपणा, उणीव, पडती बाजू, व्यंग, लंगडेपणा, दुष्काळ, उणेपण.

कमाल : : पराकाष्ठा, अगदीं हद्द झाली ! शेवटचें टोंक गाठलें, बेहद्द, जास्तींत जास्त, अखेरच्या मर्यादेपर्यंत.

कमी (तुलनेनें) : : दगडापेक्षां वीट मऊ, त्याच्यापुढें निष्प्रभ ठरेल, मुंगीला मुताचा पूर, डोंगराएवढें दुखणें नी शिंपींत औषध ! कुठें मोगरा कुठें निवडुंग ? फरक दोन ध्रुवांइतका आहे, नगाऱ्यापुढें टिमकी ! जमीन–अस्मानाइतकी तफावत, तिच्या शेजारीं ही म्हणजे चंदनाशेजारीं बाभूळ, कोठें इंद्राचा ऐरावत आणि कोठें शामभट्टाची तट्टाणी ! सुख पाहतां जवापाडें दुःख पर्वताएवढें.

करमणूक करणें : : मन व्यग्र करण्याला मदत करणें, दुसऱ्याच्या तोंडावर हसूं आणणें, वृत्तींत जोश उत्पन्न करणें, विरंगुळा देणें, खेळविणें, मनाला विसांवा देणें, वेळ दवडण्यास हातभार लावणें, खूष करून टाकणें, मजा आणणें, मनाचा ताण कमी करणें.

कर्तृत्ववान (पुढारी) : : मुरब्बी राजकीय पुढारी, धूर्त मुत्सद्दी, पक्षसंघटक, उत्कृष्ट वादविवाद-पटु, कुशल कारभारी, बिकट प्रश्न हाताळण्याचें कौशल्य, प्रभावी व्यक्तिमत्त्व, विविध मतांचा समन्वय घालण्याचें कौशल्य, पट्टीचे वकील, कणखर व्यक्तिमत्त्व, राष्ट्र-भाग्यविधाते, स्वतःचें असें विशिष्ट स्थान निर्माण केलें आहे, निष्ठावान स्थिर वृत्तीचा कार्यकर्ता, कर्तबगार.

कल : : ओढा, वृत्ती, प्रकृति, ओढ, आवड, झोंक, झुकाव, तिकडे वळणें, ती बाजू आवडणें–प्रिय असणें, मनःप्रवृत्ति, रक्तांतच तें आहे ! त्या

बाजूस झुकतात, लोकांचा सामान्य कौल तसा पडतो, नैसर्गिक वळण तसें आहे.

कल्पकता (वाङ्मयीन) : : ही कथा वेगळ्याच विश्वांत घेऊन जाते, अनोख्या चतुराईचा प्रत्यय येतो, मनोविश्वांत विहार करविते, डोकेबाज कथानक, कल्पनाशक्ति पालवली, तरल कल्पनांचा भूलभुलैय्या, निसर्गावर मात केली आहे, कल्पनावारुवर बसून उड्डाण ! जगाला गवसणी घालणाऱ्या—वेगळ्या स्वप्ननगरींत नेणाऱ्या कल्पना, पर्यंकपंडितांचें स्वप्नरंजन, उत्तुंग प्रतिभाविलास, प्रतिभेचा उन्मेष वार्धिष्णु आहे, प्रतिभा जरेपासून अलिप्त आहे, कल्पकतेचें लेणें ल्यालेली, विविधरंगी उत्तुंग कल्पनांची हवेली उभी केली आहे.

कल्पना : : मनोरथ, मनोधारणा, तर्क, समजूत, विश्वास, गृहीत गोष्ट, अनुमान, स्वप्न, बुद्धितरंग, मनांत येतें तें, असिद्ध विधान, मनोव्यापार, संशय, विकल्प, विचार, व्यवहाराशीं संबंध नसलेलें, मनोवारुवर बसून केलेलें उड्डाण, डोळ्यांसमोर—मनश्चक्षूंसमोर आलें, समजलें, मनोमन साक्ष पटली, मनांत इमले बांधले, मनोराज्य, अंतर्मनापुढें चमकलें, मनांत आलें, मनाला चाटून गेलें, अंतर्यामीं भासलें, बुद्धीला ज्ञात झालें, अंदाज आला, अशा वेळीं कंटाळलेल्या मनाला कल्पनांचे कोंब फुटूं लागतात, कल्पनाशक्तीला पंख फुटूं लागतात, विकृत कल्पना मनांत थैमान घालूं लागल्या, अर्धी सुषुप्ति व अर्ध-स्वप्न भ्रम अशा दिडक्या स्थितींत होतों.

कला : : शास्त्रीय ज्ञानावर आधारलेला निश्चित कृतिनियमांचा समुच्चय, कलेची अनुभूति व्यक्तिसापेक्ष असते म्हणून तिचें स्वरूप सारखें बदलतें असतें, कलेचीं स्थिरमूल्यें सांगणें कठीण आहे, कला कृति शिकवतें, ध्येय-संपादनाचें साधन म्हणजे कला, कलेंत कौशल्य-कसब प्रधान अंग असतें, कलेचें अनुपानशास्त्र असतें.

कलेसाठीं कला, असली कला कसली; कलेवर हें ! कलेला जातपात नसते, कला व व्यवहार यांची सांगड घालणें कठीण असतें, पोटभरू कला कलावंतिणीच्या सदरांत मोडते, कलेचा उन्माद दारूपेक्षां मोठा असतो, कलेचा व्यापार मुळांत पाहिला तर एकप्रकारचा देहविक्रयच असतो ! मानव मर्त्य

तर कला अमर असते, सुखी क्षणांना कला पकडून चिरंजीव करते, ध्येयहीन कला असूंच शकत नाहीं, उच्च साध्य व कसब कलेंत येतात; नाहींतर ती केवळ कारागिरी होय.

कवि (वाईट) : : ' रद्दी कविता कधीं लिहूं नका ' हाच यांना सल्ला ! नवखा लेखक, ' भरीव ' म्हणजे पोट भरण्याजोगें लेखनकार्य, प्रतिभेनें निर्माण केलेले नसून छापखान्याने निर्माण केलेल्या लेखकांपैकीं ते आहेत, कविता कशाशीं खातात हें तरी माहीत आहे ? ' झटपट ' कवि, या कवींना आम्ही शरण आहों ! कविब्रुव, काव्याची वांती झाली ! या कवींच्या प्रतिभेचा मासिक स्राव, ' ट 'ला ट व ' प 'ला प जुळविणारे काव्यजुळारे, डुकरिणीसारखें विपुल नवकाव्य प्रसवतात.

कविता (चांगली) : : हें काव्य चाखून पााहण्यासारखें उतरलें आहे, ही कविता विनोदांत बुडवून करुणरसांत मिसळली आहे, स्वादिष्ट चवदार रुचकर पद्यमोदक, तासीव घोटीव शब्दरचना, करुणरस निथळणारी ही कविता, सुबक शब्दपंक्ति रुचकर उपमा रवेदार अनुप्रास असें हे पंचमेळी सौंदर्य–काव्यपंचामृताची मेजवानीच ! ओजस्वी काव्यपंक्ति, या ओळी उत्कृष्ट उतरल्या आहेत, दोन उल्लेखनीय चरण, गोडी अवीट आहे, कांहीं विशेष गोडवा आहे, अविस्मरणीय सौंदर्याचीं स्थळें, मधुर स्वररचना व काव्यकल्पना यांचा सुरेख संगम, अनुपम सौख्याचे क्षण गीतांत पकडून ठेवले आहेत !

कविता (वाईट) : : कवितेची पापडी जाड पण पुरण थोडें अशी स्थिति झाली आहे, विस्कळित शब्दरचना, उपमाउत्प्रेक्षांचें चिरोटे–घारगे–वडे न पचण्याइतके जास्त झाले आहेत, सांठवणीच्या सरबताप्रमाणें बेचव उपमा, असलें काव्य चिमट्यानेंही स्पर्श करण्यासारखें नाहीं; कंठस्थ तर करूंच नये ! संस्कृत क्लिष्ट शब्दांचें कीट चढलें आहे, अश्लील सूचितार्थ निथळणारी कविता, भक्तिरसाचें दूध अश्लीलतेनें फाटलें आहे, फसफसणारे कामुक वैषयिक शब्दप्रयोग व वासाळलेल्या जुन्या–शिळ्या कल्पना, हें काव्य झुणका म्हणून ठीक आहे; पण श्रीखंडासारखें पक्वान्न बरीक नव्हे ! हंगामी कवींची ही वीण, गीतें सामान्याहून सामान्य आहेत, काव्य या संज्ञेंत बसत नाहीं, या कवितांना बगल देऊन पुढच्या वाचाव्यात, विटाळी कविता.

गद्यसदृश व ओबडधोबड, नायकाचे गुण जंत्रीच्या स्वरूपांत दिले आहेत, जागोजाग रसभंग होतो, काव्याचा हा मोसमी प्रकार आहे, गूढगुंजनाची ऐट आणली आहे, नवकल्पनांचे घुटके, बेकार कल्पना, या गीतांत फारसें स्वारस्य वाटत नाहीं, ग्रामीण वातावरणाशीं ग्राम्य सलगी, प्रतिष्ठा तोकडी पडली आहे, चापट छातीच्या स्त्रीप्रमाणें ना जनानी ना मर्दानी, मुद्द्याचें गाळून अनावश्यकाचें भारुड, नुसती गुळगुळीत शब्दांची उधळपट्टी व बाकी सर्व गूढगुंजन ! फारसी शब्दांचें जबरदस्त वेड, भावनेचा शब्दांवर बलात्कार !

कविमन : : चांदण्यांचीं चुंबनें घेणारे कवि, स्वप्निल आदर्शवादी, बिसतंतूपेक्षां मृदु कविमन, न देखे रवि तें देखे कवि, हे चांदण्याशीं कां बरें झटापटी करतात ? तरुण वयांत टोपींत चांदण्यांचा चुरा ठेवून मी हिंडत असें !

कष्टाळू : : रात्रीं जागून काम करी, मी इथें कशाला मग ? मला काय खारांत घालायची आहे ? काम स्वतःच्या घरचें समजून केलें, कामांत अंगचोरपणा बिलकूल नाहीं, लादलेलीं कामें बिनबोभाट करणारे, फाईलींत कारकून बुडालेले, कामसू कष्टाळू आणि जबाबदार, झीज व कष्ट सोसण्याची तयारी, अंगमेहनतीनें काम करण्याचा नमुनेदार धडा घालून दिला, सगळी-कडे जातीनें बघायचें, क्रियापंडित, ‘ जो स्वयें कष्टताचि गेला तोचि भला ’ हा विश्वास, निढळाचा घाम काढी.

कसबी : : निष्णात, तयार, तरबेज, कुशल, कार्यकुशल, मुरब्बी, जाणकार, हातांत कला असलेले, कलाकुसरी, हस्तकलातज्ञ, कलातज्ञ.

क्रांति : : महत्त्वाचें संक्रमण, जुनें वळण मोडणें, प्रचंड फेरफार, पहिला ढांचा बाद होणें, मूळ घडण सुधारणें, अज्जी बदलणें, संपूर्ण उलथापालथ–चर्यापालट, जुन्याच्या जागीं नवें येणें, अनपेक्षित बदल किंवा बदलेली अपेक्षा, आंतरिक फेरफार, ताडफाड रूपांतर, राज्ययंत्र कोलमडणें, सत्तासंक्रमण, निराळा रागरंग, नवे विचार संचरणें, नवी विटी नवा दांडू ! नव्या काळाची पावलें उमटणें, मोठेच फेरबदल, मोठा फरक पडणें, नव्या अनुभवाचे जुन्या जीवनावर ठसे, जुन्याचा उंबरठा ओलांडणें, रूढीभंग.

अपरिचित प्रांतांत जाणें, पहिलें वरघटलेलें जीवन जाहीररीत्या संपणें, नव आचारविचारांचे धुमारे फुटणें, उत्क्रांतीचा मार्ग खुंटतो देह जीर्ण होतो

व पडूं लागतो तेव्हां देहत्याग करणें म्हणजे क्रांति, पाटीवर लिहून लिहून ती अगदीं गिचमीड झाली म्हणजे तीवरील सर्व रेषा पुसून टाकून फिरून लिहावयास बसणें, उत्क्रांति हा लांबचा मार्ग आहे; पण वाटेंत डोंगर आडवा आला कीं जवळची पायवाट आपण काढतों तीच क्रांति.

क्रियातंत्र : : रीति, पद्धति, मोडणी, मार्ग, गोम, रचनेचा तरीका, शास्त्र, सूक्ति, सूत्र, सरणी, खुब्या, चाल, डावपेंच, युक्ति, कार्यपद्धति, कार्यभाग साधण्याची वाट, प्याद्यांच्या चालीची माहिती, त्याच्या गणमात्रांचें ज्ञान, फॉर्म्युला, युक्त्या–प्रयुक्त्या, नियमावली, कार्यसंकेत, ' नो–हाऊ.'

क्रुद्ध : : संतप्त, तळपायाची आग मस्तकाला गेली, अंगाचा संतापानें तिळपापड झाला, माथें भडकलें, एकप्रकारची तिर्डीक त्याच्या मस्तकांत बसली, चिरडीस गेला, तडकला, पित्तप्रकोप, क्रोधायमान झाला, खाऊं का गिळूं केलें ! डोक्यांत राख घातली, पेटला, जळूं लागला.

राघोबाचा संचार झाला ! मस्तक तापलें, तप्त झाला, डोकें चढलें, कानशिलें लाल झालीं, रक्त सळसळूं लागलें, नाकाला मिरच्या झोंबल्या, संतापानें फणा उभारली, डोळे तांबरले, दांतओठ खाल्ले, नाकपुड्या फुगविल्या, डोळ्यांनीं अग्निवर्षाव केला, संतापाचे कढावर कढ येऊं लागले.

क्रूर : : नृशंस, निर्घृण, दयाहीन, निर्दय, भावनाहीन, रक्तपिपासु, नरराक्षस, हिंसक, उलट्या काळजाचा, दया-माया त्याला नाहींच ! खलात्मा, हत्याखोर, दयेचा गंध नहीं, माणुसकीचा लवलेश नाहीं, गरिबांचा काळ, काळपुरुष, जंगलचा वाघ, दुसऱ्याच्या जिवाशीं खेळ खेळणारा, तावडींतलें भक्ष्य सोडणार नाहीं, जिवंत सोलील, फाडून खाईल, प्रति तैमूरलंग, रक्तपाताची आवड, नरमेधानंद भोगणारा, भावनांना पायदळीं तुडविणारा, छळांत मौज मानणारा, कोमल भावना कुचलणारा, अंतःकरणहीन लांडगा, क्रूरात्मा क्रूरकर्मा.

कान्ति : : तेज, टवटवी, चकाकी, पाणी, तजेला, झळाळी, झकाकी, तेजःपुंज, सतेजपणा, चकचकीत, चमकदार, लुकलुकीत, चमचमणारें, तेजस्वी, झकाकित, झगमगणारें, झगझगीत, तुळतुळीत, पांढरे सफेद.

कान्ति (युवतीची) : : गव्हाळ कान्ति, नाजूक-साजूक, निरभ्र गात्रें,

तारुण्यानें मुसमुसलेली, तेजःपुंज, धुवट गोरी, शिसवी काळी, यौवनाची झळाळी, तारुण्याच्या मुशींतून आजच बाहेर पडल्यासारखी ती टवटवीत दिसत होती ! त्याची लालसर तेजःपुंज कान्ति, निरामय प्रकृतीची आणि कौमार्याची कान्ति अंगोपांगांवर विलास करीत होती.

तिच्या गळ्याची कान्ति वेड लावण्यासाठी होती, तिच्या लावण्याची झळाळी सर्वांगांतून प्रकट होत होती, यौवनाच्या नव्हाळीनें रसरसलेली, पाडाला आलेल्या फळाप्रमाणें तिच्या कान्तीवर तकाकी होती, पिठासारखा गोरापान वर्ण, कोंकणची राणी, गोरी भुरकी.

काम (खूप) : : इतकें काम काढलें आहे कीं बोलायची सोय नाहीं ! ढीग कामें, कामाचे डोंगर उपसण्यांत कांटा ढिला, धंद्याचा प्रपंच कोण करतो ? माझ्या उरावर हीं सर्व कामें आहेत ना ? माझ्या गळ्यांत आज पुष्कळ कामें आहेत, मान मोडेपर्यंत काम, आतां खरकटीं आम्हीं काढायचीं ! ही राड कोणी काढायची ? कामाचा रामरगाडा पाहतांच, रात्रीं ११ पर्यंत बिछान्याला पाठ लावायला होईना, बहुधा आम्हांला बरेंच काम घरीं न्यावें लागे, रात्रीचा दिवस करावा लागे, कष्ट उपसावे लागत, मानेवर खडा ठेवून कामें चालत.

कामचलाऊ : तात्पुरतें, वेळ भागविणारें, तकलादू, नड काढील इतकेंच, अडचण निभावण्यापुरतेंच, अड्डं देणार नाहीं, जुजबी, जितक्यास तितकें.

कामुकता : : वैषयिकता, शरीर-सुखाची आवड, भोगासक्ति, लैंगिक आसक्ती, भोगलोलुपता, विषयाचें प्रेम, कामप्रवणता, कामेच्छा, लंपटपणा, कटिशूळ प्रबळ असणें.

कायदा : : दयामूल क्रौर्य म्हणजे कायदा, समाज-जीवनास दिलेली विधि-निषेधांची भक्कम चौकट, न्यायदानाचा कणा, नियमावलि, दंडशास्त्र, किं कर्म किमकर्म हें जो सांगतो तो, व्यवहार स्थिरावण्यास केलेली निर्बंधावली.

कायदा (वाईट) : : जाचक निर्बंध, राक्षसी, हम करे सो कायदा, आडमुठे नियम, नियम-पोटनियमांचें कांटेरी कुंपण, भलते कायदे; भलत्या पळवाटा, मृत कायदा, अनेक खिंडारें व पायवाटा असलेले, कायदा म्हणजे

गाढव, कायद्याचें जातें भरडून काढतें, अशा कायद्यांनीं न्यायाचे हात बांधले जातात, न्यायानें असें होईल पण कायदा वेगळा आहे.

हे नियम जरा आंवळ बसत आहेत–समाज त्यामुळें अडसतो, नियमांची चिरेबंदी भिंत आडवी येते, कायद्याची करडी नजर स्वातंत्र्य हिरावते, असल्या कायद्यांचे हात लांबलचक नी बळकट असतात, कायद्याच्या जबड्यांत कोण नी केव्हां पडेल सांगतां येत नाहीं !

कायदे–भंग : : नियम झुगारले, बेकायदा वर्तन केलें, कायदेकानू पायदळीं तुडविले, मर्यादा उल्लंघिल्या, कायदा जुमानला नाहीं, कायद्याला धाब्यावर बसविलें, कायदा हातांत घेतला, कायद्यांतल्या पळवाटा हेरल्या, फरस हाच येथला अलिखित कायदा, कायदा राहिला कोर्टांत, येथें कायदा काय रडेल ? जंगलतोडीप्रमाणें येथें कायदेतोडही चालते ! कोर्ट म्हणून एक ठिकाण असतें याची कोणाला याद असेल तर ! कायद्याच्या डगला-पट्टेवाल्याला कशी झुकांडी द्यावी हें येथें सर्व पक्कें जाणतात, इकडे सर्वच अफाटपणा, नियमबाह्य आचार, दंडुक्यानें प्रश्न सोडविणें हा इथला अलिखित कायदा.

कायमचें : : एकदां वज्रलेप झालेलें, नेहमींचें, अगदीं काळ्या दगडावरची रेघ ! फत्तरावरची रेघ, अटळ गोष्ट, नित्याचें, पक्कें, निश्चित, यांत आतां बदल नाहीं, चिरंजीवी, अढळ, रुजून मूळ धरलेलें, यावच्चंद्रदिवाकरौ, सदाचें, जगाच्या अंतापर्यंत राहणारें, पुन्हां परतायचें नाहीं.

कारस्थान : : कपटव्यूह, पेंचांत धरलें, कात्रींत धरलें, आडकित्त्यांत धरलें, अडचणींत घातलें, त्याचे करवीं घडवून आणलें, त्याच्या दाढेंत मी सांपडलों आहें ! त्याचा हात शिरकला, खोटा बर्ताव, दुष्टानें डाव साधला, खिंडींत गांठलें, किल्ल्या फिरविल्या, कुऱ्हाडीचा दांडा गोताला काळ झाला ! जाळ्यांत पकडण्यासाठीं व्यूह रचला, घाट जमवून आणला, सावधगिरीनें जाळें पसरलें, आपण लावलेल्या या बेमालूम सांपळ्यांत सावजें कशीं आपोआप येऊन पडतात याची वाट पाहूं लागला.

कार्यमग्न : : कामांत गुंतलेला, कामाला जुंपलेला, कार्यरत, कार्यैक–विषय, दुसऱ्या कशाला फुरसत नाहीं, सदा काम-काम-काम ! वर डोकें

काढायला वेळ नाहीं, काम हेच बंधु पिता सर्व कांहीं, डोळ्यापुढें एकच विषय– कार्य, आपण बरें कीं आपलें काम बरें.

कालापव्यय : : वेळ फुकट घालविला, दिवस व्यर्थ गेला, कांहींच साधलें नाहीं, वाट पाहण्यात सकाळ उलटली, या तितिक्षेंत जन्म गेला, जिणें फोल झालें, हा एक तास निष्कारण खर्चीं पडला, तारुण्यकाळ निष्फळ ठरला, पंधरवडा वांझोटा गेला, एवढ्या वेळाची वाफ झाली.

काळजी : : या विचारानें अगदीं हवालदिल झाला होता, एक बाब तिला आंतून पोखरीत होती, मानेवर काळजीची टांगती तलवार, चिंता चिंता समानेते बिंदुमात्र विशेषत:, सर्वांचीं तोंडें काळजीनें करपून गेलीं, काळजीनें घांस घशांत घोंटाळत होता, काळजीचा भुंगा, काळजीनें पोखरलेलें, काळजीनें जेरीस आली, काळजीनें बेजार, मनाची हुरहूर, मनाला डिवचणी, चिंताक्रांतता, चिंतेची गर्ता, काळजीच्या भोंवऱ्यांत सांपडला, चिंतेचा विंचू, चिंतातुर जंतु, चिंतामग्न, चिंतांची कापणारी करवत, मनाची बेचैनी.

काळा बाजार : : नाडणुकीचा पैसा, आडवा व्यवहार, आडबाजार, लोकांच्या गरजेनुसार पैसा उकळणें, खोटा दुर्व्यवहार, बांडगुळी धंदा, नियमबाह्य देवघेव, आडवळणाचा व्यापार, ब्लॅक-मार्केट, गरजवंतांची पिळवणूक, तेढा उद्योग, अडवणूक करून फायदा काढणें, साठेबाजी करून मिळविलेला नफा, मागच्या दाराकडून खरेदी-विक्री, नियमांप्रमाणें न मिळेल तें मिळवून देण्याची जागा, लबाडीचा धंदा, लोकांच्या गरजेचें भांडवल करणें, चोरवाटेचा पैसा, निकडीवर कुरघोडी, वाममार्गाचें धन, गटारमार्गानें आलेली संपत्ति.

काळोख : : अंधार, अंधकार, काळोखी, प्रकाशाभाव, सावली. सावट, छाया, अंधारी, उजेडाचा अभाव, अंधाराचा बुरखा, काळोखाचा पडदा, मिट्ट सांवली, मिट्ट अंधारी, गुडुप्प झालें, आकाश व दिशा झांकळल्या, खायला येणारा दाट अंधार, कोंवळ्या अंधाराच्या गूढ सावल्या अंगाला स्पर्श करूं लागल्या, अंधाराच्या कुशींत शिरलेल्या पाऊलवाटांवरून, गुडुप्प अंधार, मावळतीला अंधाराची मिठी पडली, डोळ्यांत बोट घातलें तरी

दिसणार नाहीं इतका अंधार होता! रात्रीवर काळोखाची पुटें चढत होतीं, सावल्या लांबल्या, असूर्यंपश्या खोलींत होती.

कॉलेजकन्यका : : कॉलेजांतलीं आठआठशें हृदयें पायघडीसारखीं वापरून जाणारी पोरगी, कॉलेजक्वीन, लग्नाच्या वेटिंग रूममधील ही मंडळी, शिक्षणक्षेत्रांत विनाकारण शिरलेलीं हीं बुजरीं पाखरें, उपवर मुलींचा हा नित्याचा मेळावा, नुकतेच पंख फुटलेलीं हीं फुलपांखरें.

किरकोळ : : बारीक, तलम, रोड, सुदामा, ठेंगू, वामनमूर्ति, इवलीशी कुडी, फेदरवेट, लुकडा, भीमथडी तट्टू, केवळ काडी, बारक्या, नुसतें पडवळ, चवळीची शेंग, लवंगी मिरची, सडपातळ, उभंटा, उंचीच नुसती; रुंदी नाहींच! फुंकरासरशीं उडून जाईल अशा शरिराचा, फाटक्या शरिराचा, सुदामदेव, दुष्काळांतून आलेला, रेशनकाळांतला, रोड, निरुंद बांध्याचा, मांसविरहित हाडेंच, सांगाडा नुसता, शेलाटा, चापट छातीचा, टाटोळा, त्यानें घातलेला शर्ट-कोट हँगरवरील शर्ट-कोटाप्रमाणें वाटतो.

किळस : : घृणा, शिसारी, तिटकारा, पाहतांच नाकाला पदर लावावासा वाटेल, नको वाटणें, पाहतांच ओकायला येईल, दृष्टीसमोरही नको; जवळ तर नकोच नको! ओकारी आणील, घृणास्पद वाटतें.

कीर्तिमान : : दिगंत कीर्तीचे, प्रख्यात, विख्यात, सुविख्यात, सर्वश्रुत, गाजले, प्रकाशांतील व्यक्ति, अखिल भारतीय कीर्तीचे, नाव गाजवलेले, लोक नांव घेतात, चार लोक बरें म्हणतात, नांव केलें—कमावलें, चार-चौघांना माहीत झाले, दिगंत—अखंड कीर्तीचे, चांगला असा बोभाटा आहे, त्याचें नांव ज्याच्या त्याच्या तोंडीं झालें, पदरीं कीर्तीचें माप पुरेपूर पडलें, त्याच्या गुणांवर लुब्ध होऊन कीर्ति त्याच्याकडे धांवत आली, कीर्ती मागें ठेवून गेले, कीर्तीचे झेंडे देशाच्या टोंकाटोंकाला फडकले, घराण्याच्या लौकिकांत निःसंशय भर घातली, गांवाचें नांव केलें, चारचौघांच्या तोंडीं नाव झालें, कीर्तिदेवतेनें माळ घातली, सर्वांना चांगला म्हणून माहीत झाला, कीर्ति-दुंदुभि निनादूं लागली, लोक नांवाजूं लागले, कीर्तीचें अत्युच्च शिखर गांठलें, पुत्र व्हावा ऐसा गुंडा ज्याचा तिन्ही लोकीं झेंडा!

कुटाळकी : : चहाडी, गटारी चर्चा, कानाला लागणें, कोळसा

उगाळावा तितका काळाच ! उखाळ्या—पाखाळ्या, कुणाच्या तरी प्रेम-प्रकरणाचीं टरफलें उडवीत बसलों, नाहीं नाहीं त्या कंड्या उठविल्या, त्यांचें नेहमींचें सायको—ॲनॅलिसिसचें ऊर्फ कुटाळकीचें बोलणें, चहाडबुचके, बऱ्याच जणांना कानमंत्र दिला, कान फुंकले, टीका-टिप्पणी.

कुटुंब—नियोजन : : फॅमिली प्लॅनिंग, वंशविस्ताराला मर्यादा घालणें, वंशवेलीची थोडीफार काटछाट करणें, कुटुंबाचें गोकुळ न होऊं देणें, झेपतील एवढींच मुलें, वेलीला फुलें पण वेल फार न वांकेल इतकींच ! संततीचें रेशनिंग, दरडोई किंवा दरजोडी किती हें ठरविणें ! भावी पिढीची संख्या मर्यादित करणें, कुत्रीच्या पिल्लांप्रमाणें अफाट वाढ होण्यास प्रतिबंध करणें, पितृत्व व मातृत्व आटोक्यांत ठेवणें, बेसुमार प्रजननाला आळा घालणें, पद्धतशीर संख्या-नियंत्रण, खाणारीं तोंडें प्रमाणांत ठेवणें, लोकसंख्येची भरमसाट वाढ रोखणें, कुटुंबियांच्या संख्येंत बेतशीरपणा आणणें, कापडाप्रमाणें कोट कापणें, रोगट वाढ थांबविणें, जगांत येणाऱ्यांची भाऊगर्दी थोपविणें.

कुत्सित : : सर्वांग कुरवाळी उपटी एक रोमावळी, पिक्या बोराचा काळा ठिपका पाहणारा, कुजकें बोलणें नासके विचार व कावळ्याची दृष्टि, मर्म व न्यूनस्थानांवर सदांची नजर, वावगें बोलण्याची संधी शोधणारा, कोणत्याही चांगल्या गोष्टीकडे दुर्बिणीच्या उलट्या टोंकाकडून पाहणारा, जिभेवर सुरवंट विराजमान असतो, नाहीं काय तें पाहणार, न्यूनें हुडकणार ! नेहमींची पद्धत हेटाळणी—टवाळीची.

कुप्रसिद्ध : : बोभाटा झालेला, बभ्रा असलेला, गुण सर्वांना माहीत आहेत ! कीर्ति चार ठिकाणीं झालेला, त्याच्याविषयीं लोकांची कुजबूज आहे, बदनाम, त्याचें नांव सर्वांना माहीत आहे, पण कशाकरितां हाच काय तो प्रश्न ! त्यास समाजांतील खालचा निंद्य थर सरांस ओळखतो वरचा थर ओळखून असतो ! आपल्याबद्दल जास्तींत जास्त बोललें जावें अशा हिशेबानें तीं वागतात, लोकांत कुजबुज-दुष्कीर्ति-प्रवाद-आहे, दुर्लौकिकाचा, तोंडावर थुंकतात, नांव गमावलें.

कुमारी : : कोण्या भाग्यवंताची ठेव, लाजाळूचें झाड, कोमल किशोरी,

मुग्ध कलिका, बेदाणी तगडी पोर, तारुण्याच्या उंबऱ्यावर असलेली, बाळ्यासाठींची ही बाळी, अविद्ध रत्न.

कुरूप (पुरुष) : : लठंभारती, धटिंगण, रेड्यासारखा माजलेला, हें डेरेदार व्यक्तिमत्त्व, हेंगाडा, अंगानें चांगलाच जाडजूड, प्रोफेसर म्हणजे डोंगरे बालामृताची चालती बोलती जाहिरातच ! दाभणकाठी मिशा, ओंठावरच्या केरसुण्या, बटबटीत डोळ्यांचा, काळा, काळाकुट्ट, काळाढुस्स, मिट्ट काळा, डामरासारखा काळा, कुळिथाच्या रंगाचा, काळाकभिन्न, नुसता काळा हुप्पट, तुपट-तलकट कातडी, उंटासारखी मान, वेंधळी चाल, तोंडावर देवीचे वण, रांपलेला चेहरा, सुकट बोंबील, हाडकुळा, अस्थिपंजर, हाता-पायाच्या काड्या, पोटाचा नगारा, कुरूपपणाचें नोबेल प्राईज पटकावील, लांब-टांग्या बारीक-मान्या, आमरण ब्रह्मचर्याची प्रतिज्ञा घेऊन त्यानें समस्त स्त्रीजातीवर आणि पुढील मानव-वंशावर उपकार केले होते !

कुरूप (स्त्री) : : हिडिंबा, म्हाळसाबाई, काळी चिचुंद्री, कोळशांतील माणिक, हबशी नुसती ! हेंगाडी, शिद्दी, कुब्जा, अष्टवक्रा, बेढब, भावबंधनांतील इंदूबिंदू, नुसतें सोंग, कशी तरी दिसते, सौंदर्याची देणगी मुळींच नाहीं, दृष्टीसमोर नको वाटेल अशी, काळतोंडी, माकड नुसतें, खापरतोंडी, जरा पसरट घाटाची मुलगी, उंचीच्या बाबतींत निराशाच होती, बुद्धी घोडी लाल लगाम, इश्य रे बायको ! कांहीं तरीच दिसते ती, थोराड देह, शरीर एका अवजड वाळूच्या पोत्यासारखें हालतां हालत नव्हतें, अंगानें झपाट्यानें पसरायला लागली, अंगानें आडवी–तिडवी पसरली आहे, चेहऱ्यावर देवींचा छबिना नुकताच वस्ती करून गेलेला दिसत होता, पुरुषाळलेल्या स्त्रिया !

पाठीपोटीं सपाट उभी डोलकाठी ताठ ! अंगावर गुंजभरसुद्धां मांस नाहीं, डोळे विहिरीसारखे खोल, हातापायाच्या शिरा टरारून वर आलेल्या, देहाला आकार असा नव्हताच, डेरेदार पोटिमा झंपर आणि फलकारे मारीत चालणें ! काळी ढुस्स, ढूस घूस, लेवाडी बाई, निबर कांति, काय रंभाच लागून गेली आहे कीं नाहीं ? चेहरा म्हणजे ठोक्याचें पातलें, एक हाडकुळी मास्तरीण, शरिरावर अनावश्यक मांस दिसत नाहीं, ढोबळ सौंदर्य, पखाल-पार्वती, ढेरपोटी, पेढेघाटी, पायांचा फेंगडेपणा, फेंगड्या पायांची, नकटी, नाकाचा सोटा, रुंदट दांत, फत्कन बसणें नी फसकन हंसणें !

रूपसंपदेचा अभाव, फताड्या आकाराच्या प्रौढा, पोरगी यथातथाच, पालीसारख्या कुरूप पोरीचें व्हावें कसें ? एवढ्याशा पुरणाला वाटावें किती अन् नकट्या नाकानें नटावें किती ! काळीबेंद्री, हेंगाडी, विद्रूप, उंचाडी, किडकिडीत, अवजड, मुलींपैकी बहुतेक सर्व गाळच होता अगदींच टाकाऊ, रूप नव्हतें असें नाहीं पण रंगरंगोटी व नखरा यांची भर इतकी आहे कीं अति गुळमट चहा जणूं.

कुलीना : : जुन्या वळणांत वाढलेली, बाळबोध वळणाची, साधी सरळ मऊसूत, जी कधीं कुणाशीं मान वर करून बोलायची नाहीं, हें बोटचेपें काम नाहीं, नुसती नांवाची चारुशीला नव्हे, सत्कुलोत्पन्न सदाचारी.

कुविचार : : माझ्या मनांत सैतानानें कारखाना उघडला होता, अमंगल विचार डोकावत, कुविचारांची भुतें घेरूं लागलीं, ज्यांच्या डोक्यांवरील केंस आणि डोक्यांतील सुविचार विरळ झाले होते ! तिला वाटलें पोलिस लोक दंडुक्यानें गर्दी हटवितात त्याप्रमाणें मनांतील विचारांची गैरगर्दी हटवितां येईल तर किती बरें ! बिथरलेलीं मनें, तोटके विचार, बुद्धि कर्मानुसारिणी, अवदसा आठवते, बेलगाम मनाचे थेर सुरू झाले, मनांतलें काळेंबेरें जाईना, माझ्या मेंदूवर धुरळा बसला.

कृतघ्न : : बेइमान, हरामखोर, खाल्लेल्या मिठाला न जागणारा, उलटणारा साप, केलेलें न ओळखणारा, खाल्ल्या घरचे वासे मोजणारा, निमकहराम, अन्नाला न जागणारा, दूध पिऊन गरळ ओकणारा, वाढणाऱ्या हाताला चावेल असा, बापाला बाप म्हणणार नाहीं, प्रसंग आला कीं खाका वर करून मोकळा ! खाल्ल्या घराला चूड लावील, ज्याला चारावा रव तोच घेतो हाताला चावा.

कृतिशील : : कशासहि त्याचें पाऊल पुढें, नरका नारायण होण्याची सतत परिश्रमपूर्वक धडपड, त्याला सांगितलें कीं झालेंच समजा ! करूकाका बोलूकाका नव्हता, नुसते गर्जणारे नव्हेत पडणारे पण, कृतिवीर वाचिवीर नव्हेत, हातीं घेतलें तें केल्याविना सोडणार नव्हेत, त्यांच्या हातून तें घडेलच.

कृतिशून्य : : क्रियाहीन, पर्यंकपंडित, कृतिहीन, स्वभावांतील नाकर्तेपण उघडें पडलें, हळूबाई, केवळ बोलूकाका, वाचिवीर्य, आळशी, ऐतखाऊ,

निरुद्योगी, सुस्त, काळकाढू, आरंभशूर, निष्क्रिय, त्याच्या हातानें तें होणार नाहीं, नुसतें बोलणें तेवढें ऐकून घ्यावें! साडीची इस्त्री बिघडणार नाहीं किंवा चेहऱ्याची पावडर पुसून जाणार नाहीं अशा बेतानेंच त्या धडाडीनें कामाचे डोंगर उठवीत असतात! आधींच उल्हास त्यांत फाल्गुन मास, न कर्त्याचा वार शनिवार, बारीकसारीक अडचणींचा बाऊ करतात व पाय माघारीं घेतात.

कृतिहीनता : : घालाल तें खाईन नी वळचणीला पडून राहीन, प्रवाहपतिताचें क्षुद्र आयुष्य, करंटें जीवन, हातून कधीं घडेल याची शंका, नुसता शेणाचा गोळा.

केव्हां तरी : : उभ्या जन्मांत एकदां, सटीसामासीं, फुरसतीच्या वेळीं, उसंत मिळाली म्हणजे, तूर्त तरी नाहीं, पुढें कधीं तरी, कालो ह्ययं निरवधि-र्विपुला च पृथ्वी, प्रसंगविशेषींच दिसणारें.

केंद्रभूत : : चळवळीचे प्राण, या आसावर सर्व फिरतात, मध्यवर्ति, सर्व रस्ते इकडे वळतात, मध्यबिंदू, सर्वांचा गाभा, कर्ताकरविता हा, सर्वांच्या नेत्रांचा विषय, येथें येऊन सर्व फांद्या फुटतात, ही प्रत्येकाची चावडी.

केस (युवतीचे) : : विपुल केशसंभार, खेळकर, बटा, भरघोंस अंबाडा, लांबसडक केस, भुरुभुरु उडणारे केस, नाचरे केस, पौर्णिमेला जोडून ही कृष्ण अमावास्या! मागें दोन नागिणी, दाट कचसंभार, वेणींच्या दोन संगिनी.

कैद : : अटकाव, स्थानबद्धता, अटक केली, बंदिस्त केलें, गिरफदार झाले, तुरुंग दाखविला, बंदीशाळेंत टाकलें, कैदखान्यांत लोटलें, हाताला काढण्या घातल्या, बेड्या ठोकल्या, बिनभाड्याचें घर दाखविलें! हातकड्या दिल्या, फरासखान्यांत ठेवलें, नजरकैद फर्माविली, तुरुंग-पंढरीची यात्रा घडविली, स्थानबद्ध झाले, सरकारचे चार वेळां पाहुणे झाले.

कोट्या, श्लेष व अनुप्रास : : 'कार'ला न'कार' दिला, गट प्रगट होतात, चांचरतात पण चरतात, रावांचा ठराव पडला, हा कैवार नव्हे वार आहे, या ढोंगामुळें ते चकत व बिचकत, सत्ता सरली कसली पसरली! टनावारी संघटना, दोस्तीपेक्षां कुस्तीला तयारी, बुद्धापेक्षां युद्ध प्रिय, उच्च व हुच्च सर्व, या गाईची ही दांडगाई पचली, रेट सिगारेट

पितो, मानाकरितां थैमान करतात, ग्रामोद्योग कसले ग्राम्योद्योगच ! टाळतात कसल्या कवटाळतात.

कोडगेपणा : : निलाजरेपणा, निर्लज्जपणा, गेंड्याची कातडी, लतकोडगा, कश्शाची म्हणून लाज नाहीं ! लाज कोळून प्यालेले, निगरगट्ट, निबरट, चामट, कसली क्षिती नाहीं, इरसाल, हुज्जतखोर, इब्लिस, दिवसाढवळ्या न कचरतां उघड्या माथ्यानें कुकर्म करणारे, ना लाज ना मर्यादा ! कमरेचें काढून डोक्याला गुंडाळतील ! न लाजतां न मुरकतां, लाजभीड सोडून, बेदरकारपणें.

कोता : : अनुदार आणि कोत्या मनोवृत्तीचा, निरुंद व संकुचित दृष्टिकोनाचा, डबक्यांतला बेडूक, गांवढ्या गांवात गाढवी सवाष्ण ! येथें एरंडही मोठा समजला जातो, लांडी बुद्धि, आकसलेल्या मनाचा, याला नाकाच्या शेंड्याच्या पलीकडचें तरी दिसतें कीं नाहीं ?

कोतेपणा : : चहूंकडे बौद्धिक तोटकेपणा, संकुचित दृष्टिकोण, तळ्यांत राहून समुद्राच्या भरतीची का अपेक्षा करायची ? कूपमंडूकवत् जीवन, सरड्याची उडी कुंपणापर्यंत ! त्याची झेपच तेवढी, यांना तेवढें पुरतें, त्यांची आस तेवढ्यावरच असते, नाकपुडीएवढें यांचें मन, ८ बाय् १० च्या खोलींत तेवढेंच छोटें मन राहतें.

कोमल : : मऊ लोण्याहून असें मन, अंत:करणाची नवनीतसदृश मृदुता, मृदु पराप्रमाणें, नाजूक प्रकृतीचा, हळवा, ऊन्ह-वारा सहन होणार नाहीं, शिरीषकुसुमसम मृदुल, हल्केंफुल्कें, काठिण्याभाव, मोरपंखी, अर्भकाच्या गालाप्रमाणें मऊ गुळगुळीत व मुलायम, नाजूक-साजूक, टणकपणा कसा तो नाहींच ! गुलगुलीत.

कोरडा : : शुष्क, द्रवहीन, रखरखीत, वालुकामय, रसहीन, ओला नाहीं, सुका, न भिजलेला.

कोंडणें : : कोंडी करणें, वाट बंद करणें, मुसक्या बांधणें, पळवाटा अडविणें, स्वातंत्र्य हिरावणें, चहूंकडून विरुद्ध फळी उभी करणें, आंत ढकलून बाहेर कडी ठोकणें, थांबवून धरणें, बांध घालून अडविणें, कोंडमारा करणें, चहूंकडून घेरणें, कोंडवाडा दाखविणें, दाबून धरणें, विकास–

विस्तार बंद पाडणें, गुदमरायला लावणें, श्वास घ्यायला जागा न ठेवणें, बाहेरची हवा आंत यायलाही खिडकी न ठेवणें, चहूंकडून आवळीत आणणें.

कंजूष : : कवडीचुंबक, कद्रू, चिकट, चिक्कू, कृपण, अनुदार, पैशाचा लोभी, मख्खीचूस, तिमाजी नाईक, आंवळ गांठीचा, चमडी देईल पण दमडी देणार नाहीं ! संपत्तिदास, संपत्तिपूजनांत व रक्षणांत दंग, दांत कोरून पोट भरण्याच्या प्रयत्नांत राही, एक पैसा दक्षणा लक्ष प्रदक्षणा ! पैशाच्या बाबतींत बापाला बाप म्हणायला तयार नाहीं ! घट्ट मुठीचा, हातांतून सुटायचें नाहीं कांहीं ! कनवट कधीं सैल करणार नाहीं, बरेचसे अशोकस्तंभ जमा करण्याचा नाद लागला, सर्वांना नन्नाचा पाढा वाचील.

कंटाळा : : वीट, नको वाटणें, थकावट, त्रस्त वाटणें, मिठी बसणें, उद्वेग, पुरें झालें, रस जाणें, ' ओ ' येईपर्यंत होणें, त्यावरून मन उडालें, नको तें पुन्हां ! शिसारी, त्यांत आतां स्वारस्य नाहीं, डोळ्यांसमोर नको.

खचणें : : डोळ्यांपुढें काजवे चमकले, अवसान अर्धें खचलें, अवसान गळालें, साध्या गोष्टींचा बाऊ वाटूं लागला, दहशत घेतली, उलट खाल्ली, जेरीस आला, दबून गेला, हाय खाल्ली.

खरडपट्टी : : टाफरून बोलणें, सुनावणें, खरड–राड काढणें, जामणें, छेडणें, तासंपट्टी–हजामत – कोरडी – उलटीसुलटी – गुळगुळीत – झाडंपट्टी– कानउघडणी–खेटरपूजा–भोसडपट्टी करणें, गुरकावणें शब्दप्रहार, मर्मभेदी भाषण, वाक्ताडण, दटावणी, सपाटून हजेरी घेणें, पितर उद्धरणें, बोधपाठ देणें, ताशेरा झाडणें, झोड उठविणें, व्याख्यान पाजणें, बोलून बोलून पार भुस्कट पाडणें, काय कमी पूजा केली ? शाब्दिक कानपिचक्या–अहेर, उपदेशाचे वळसे, तिखट भाषण, शोभा करणें, तांगडून बोलणें, कठोर शब्दांची फैर झाडणें, रोकड्या शब्दांत सुनावणें, स्पष्ट शब्दांत जाणीव देणें, खडसून जाब विचारणें, हा फटकारा अगदीं ओल्या वादीचा होता ! बोलणीं खावीं लागतात, फैलावर घेणें, वाक्-बाणांनीं लचके तोडणें !

खराब : : मळका, वाईट, काय तो शेला ! हलका, नासका, बिघडलेला, शान गेलेला, शिळापाका, दुर्दशा झाली त्याची, तेज उतरलें.

खल-पुरुष : : दुर्जन, दुर्गुणांचा अर्क, अश्लाघ्य वर्तनाचा, कावळ्यासारखा सर्व-लक्ष्यी व सर्व-भक्षी, सापासारखा डूख धरणारा, उरफाटें काळीज, चित्त्यासारखा फसव्या, त्याचे आचार मोडके–धर्म सडका, गाळीव रत्न, राक्षस म्हटलें काय देवमासा म्हटलें काय जो काय आहे तो आहे, दुखावलेला साप हा ! दुर्योधनचा दुसरा अवतार ! चांडाळ-चौकडींतला एक, साऱ्या नीचपणाची गाळीव मूर्ति, माणुसकीची चाड सुटलेला, कसाब, खाटीक, सापाला दूध पाजलें तरी तो विषच ओकायचा ! रक्तपिपासु सैतान, काळीं कृत्यें करण्यांत पटाईत.

खात्री वाटणें : : असें प्रत्ययाला येईल–दिसून पडेल, पाहण्यांत येतात, सत्यता पटूं लागेल, आतां ही शिक्कामोर्तब झालेली गोष्ट आहे, मोती खोटें आहे; मला विचार ! याबद्दल दुमत होणें शक्य नाहीं, बालंबाल खात्री, मनाशीं खूणगांठ बांधून ठेव, ही वार्ता मेंदूच्या कप्प्यांत नीट घडी करून बसविली, चक्षुर्वै सत्यं, हातच्या कांकणाला आरसा कशाला ? या गोष्टी मनोमन सर्वांना ठाऊक आहेत, त्यांनीं पुरतें ओळखलें असेल, मनाची पक्की धारणा झाली.

खाद्यें (चांगलीं) : : सुग्रास अन्न, रुचकर पंचपक्वान्नें, रोचक व पाचक पन्हें, चपचपीत तूप असलेला शिरा, पिवळी टम्म भजीं ! मिठाईची उत्कृष्ट चव व दर्जा, शेव–चिवड्यासारखे चमचमीत पदार्थ, खमंग झुणका, फक्कड रस्सा, लोणीविरघळ तूप, खुमासदार बटाटेवडा, दर्जेदार श्रीखंड, ए-१ बासुंदी.

खादाड–खाबू, भोजन-हपापू, खाणारी पट्टीची आहे, या खुशालचंदांना लोकांचे घरीं पुरुखा झोडण्याखेरीज उद्योग नाहीं ! नेहमींचे सराईत पंक्तिपठाण, बुभुक्षित बोकोबा, बोकडासारखा चरतोय, तोंड आहे कीं तोबरा ! आकंठ भोजन करून येतात, खा खा सुटलेला, भोजनैकविषय, चांगलें पक्वान्न असलें कीं आडवा हात मारतात, कोणी पुढीस बोलावताहेत का याची वाट पहात असतात.

खुळा : : वेडा, बुद्धिहीन, मंद, मठ्ठ, ढ, वेडसर, अर्धवट, मूर्ख, बेअकली, अक्कलशून्य, महामूर्ख, गाढव, मेधाहत, भेजा नसलेला, गैरचलाख, चातुर्यहीन, गबाळग्रंथी, दगड, विचारहीन, प्रज्ञाहत.

खूप : : फार, बहु, अनेक, जबर हुंडा, ढीगभर उपकार, खंडीभर राग, चहाचें हांडे पाजतोस ! डोंगराएवढे उपकार झालेत, किती तरी विक्रेत्यांचें पेंवच फुटलें ! मग ढीगभर आभार मान माझे, टोपलीभर धन्यवाद, पसाभर हंसली, ढीग नाहीं म्हणतील; ऐकतो कोण ? भयकंर अभिमान आहे, अक्कलेचा गड्डा, गठ्ठाभर पुस्तकें, उंट भरून पोथ्यापुस्तकें, खच्चून जेव, दागिन्यांची रास, सरता सरत नव्हता, मला कोण धीर आला आहे म्हणून सांगू ! पाऊस मी म्हणत होता, अशा कथा किती सांगाव्या ? पैशा पांसरी, मोठ्या प्रमाणांत, फार दूरवर, लोकांची ही गर्दी ! गजान्त लक्ष्मी, प्रेमभावना व ममत्वबुद्धि ओसंडून वहात होतीं, अगदीं ओ येईपर्यंत.

खोटें : : बनावट; अरे हें पितळ; सोनें नव्हे ! दिखनेमें ढब्बू चलनेमें शिवराई, तोंडाला मिठी कपाळाला आंठी, उसन्या प्रसन्नतेचें सोंग करीत असलेले विक्रेते, रंग नवा पण ढंग जुनाच आहे ! मुलामा दिलेलें खापर, लग्नाचें हें नाटक, स्वागतापुरतें तोळाभर–स्मित करणारी रिसेप्शनिस्ट, साच्याचें जलेबी स्मित करणारी नटी–सर्व खोटें ! ही झाली दर्शनी बाजू.

खोललें : : उघडलें, खुलें केलें, फीत तोडली, दार उघडलें, पॅकिंग सोडलें, गुंड्या काढल्या, पडदा सरकविला, जा-ये आरंभिली, चालू केलें, पडदा उचलला, पानें फाडलीं, प्रवेश दिला, गुडदी उचलली, शिवण तोडली, स्क्रू काढले, टोपण उचकलें, वाट मोकळी केली, गांठ सोडली, मार्ग काढला, वर-पट्टी कापली, तोंड फोडलें, कॅप काढली, सर्वांना मिळेल असें केलें, प्रथम कळ दाबली, खटका सारला, प्रारंभ केला, नवीन सुरू केलें, अनावरण-समारंभ–वास्तुशांत केली, उद्घाटन केलें.

गमन (वर्णन) : : दाणदाण पाय आपटीत, वहाणांचा फटक् फटक् आवाज करीत, फरपटत ओढत गेलो, सुळक्दिशीं सटकला, पोरें सावलींत उनाडत होतीं, लटकदार चालणें, फेंगडी चाल, डुलडुल निघाल्या, रमतगमत निघालों, तुरूतुरू, दुडक्या चालीनें, पट्‌दिशी, झट्‌दिशी–घोडचालीनें–गर्रकन–ठणाणत–पावलें मोजीत, नागमोडी चालणें, थोडी दौड मारून परतले, मजल दरमजल करीत कूच केलें, शतपावली करीत होते, वन् टू वन् टू करीत, नेहमींच्याच टांग्यानें गेलों, तरातरा निघाली.

गमावणें : : जाणें, बुडणें, हरवणें, हातचें जाणें, बोटांतून निसटलें, दुरावेल, नाहींसें झालें, उडालें, संपलें, घालवलें, चुकलें, व्यर्थ गेलें, लोपलें, नष्ट जाहलें, खलास झालें, हुकलें, मुकलें.

नोकरीला आंचवावें लागलें, शिकार हातची गेली, संधि हुकली, मैत्रीला मुकला, नोकरी सुटली, घरेंदारें मातीस मिळालीं, कृष्णार्पण झालीं, टांक हरवला, लुप्त झाला, कुस्ती हरला, काम सुटलें, माणूस कामी आला, प्रेम तुटलें, बाटून दुसऱ्या धर्मांत गेला, शिक्षणावर पाणी फिरलें, नीतिच्युत झाला, घर वाहून गेलें, म्हतारा गमावला, सिनेमा हुकला, तो शिष्य फुकट गेला, कार्यक्रम चुकला, सत्त्व गेलें, रंग उडाला, प्रकाश लोपला, कपडा हरवला, सतीत्व भ्रष्ट झालें, भूक मेली, धंदा बसला, सैनिक कामास आला.

गरम : : उष्ण, तापलेलें, भडकलेलें, तप्त, गरमागरम, कढत, गरम याने हॉट, पांढरी उष्णता, संतापलेली जखम, हात न लावतां येईल असा, नुसता निखारा ! धगधगलेला, वितळण्याच्या बिंदूवर, चर्रर्र होईल, तापलेल्या तव्याप्रमाणें, उच्च तपमान.

गर्दी : : मोठा जमाव, अलोट जनसंमर्द, रेट लोक, खूपच खूप प्रेक्षक, अजस्र भीड, रांघ लागली, गच्च झुंड, मुंग्यांसारखीं माणसें, झुंडीच्या झुंडी, भाऊगर्दी, थवे, कीटकांचे पुंजके, सारखी झड लागली, कोट्यवधि, अगण्य संख्येनें उपास्थित जन, जणूं जत्राच भरली होती ! कळपच्या कळप, लेखकांचें खडें सैन्य, जणूं आठवड्याचा बाजार भरला, किड्यांसारखीं माणसें, गणती किती कराल ? गणतेच्या पलीकडे, सहस्रावधि, शेकडों, धो धो लोक जमले, नुसतें वारूळ, खेचाखेच, सभा थाटली.

माणसांचा रेटा, पथिकांची तोबा गर्दी, मुलींचा थवा, हत्तिणींचा समूह, अथांग जमाव, प्रचंड जनसमुदाय, ही भीड ! सायकलींची गिचमीड, कारकुनीणींची घाईगर्दी, सैनिकांचे लोटच्या लोट, प्रेक्षकांचे लोंढे, विद्यार्थ्यांच्या झुंडी, विक्रेत्यांचें पेंवच फुटलें ! किडींचा पुंजा, गर्दीचा महापूर, माणसांची चेंगट वर्दळ, गिऱ्हाइकांची एकच झुम्मड उडाली ! टोळांच्या पलटणीवर पलटणी, किडेमुंग्यांसारखीं हीं माणसें, रसिकांचा गराडा पडला,

मुंग्या वारुळाबाहेर पडाव्या त्याप्रमाणें, जणूं मुंग्यांचें वारूळच, त्या गजबजाटांत व कोलाहलांत मुंगी शिरायला वाट नाहीं.

गर्भश्रीमंती : : वडिलोपार्जित धनसंपत्ति, पिढीजात श्रीमंती, तोंडांत सोन्याचा चमचा धरून जन्मलेले, चालत आलेला पैसा, बापकमाईचा पैसा, थाट आजचा नाही रे; जन्मतांच तो रेशमी कपड्यांत जन्माला आला! यांच्या वडिलांच्या लहानपणीं आंघोळीला चांदीच्या घंगाळांतून पाणी घेत असत, आजोबांच्या वेळेपासून घरांत मोटार आहे.

गर्भारपण : : गर्भिणी–गर्भार झाली, दिवस राहिले, दिवस गेले, पोट वाढलें, गर्भ राहिला, विटाळशी बसायची थांबली, पोटांत मूल वाढूं लागलें, पोटाशीं आली, तिला अलीकडे हवं–नको व्हायला लागलें होतें, प्रीति–साफल्याचें घबाड माप मिळालें, गोड जाणीव होऊं लागली, तें गोड गुपित फार काळ लपेना, वेलीला फळ धरलें, दोहोंमध्यें तिसरें येणार असें दिसूं लागलें, आतां आपण कांहीं येथें दोघेंच नाहीं! ‘ वाढती ’ जबाबदारी, नाजूक अवस्थेंत, तो नऊ महिने नऊ दिवसांचा काळ, चिंचांवर वांछा जाऊं लागलीय्! सकाळच्या त्या ओकारीनें आशा सफल झाल्या, कूस उजवणार असें वाटूं लागलें.

गर्व : : घमेंड, अस्मिता, दिमाख, डौल, ताठरपणा, उर्मटपणा, ‘ग’ची बाधा, मुजोर वृत्ति, प्रौढी, गुर्मी व टर्रेबाजी, मिजासखोरपणा, अहंभाव, अहंमन्यता, ताठा, शिरजोरपणा, जाडा अभिमान, मी मी म्हणणारे, सुंभ जळालें तरी पीळ राहतो! नसता अभिमान, वर मान, गर्वाचें घर खालीं, पडले तरी माझेंच नाक वर!

गर्विष्ठ : : आढ्यतेनें नाकानें कांदे सोलणारा, अहंमन्य, घमेंडखोर, अभिमानानें टरों टरों करणारे, गर्वानें ताठलेले, जादा अभिमानी, तिरकम-शेठ, तिरशिंगराव, ताठलेले, तिस्मारखां, घमंडानंदन, बढाईखोर, माजोरा, मगरूर, बेपर्वा, कुर्रेबाज, ताठ, मिशी वर चढली, स्वर्ग दोन बोटें–चार बोटें उरला, हात स्वर्गाला पोंचले, त्यामुळें स्वर्गाला डोकें घांसत आहे असा त्यांना भास झाला, अहंकाराची खरूज उठलेला, अस्मान ठेंगणें झालें! कर्तृत्वाची जेव्हां तेव्हां बढाई मारणारे, फटकून वागतात, दुसऱ्याकडे ढुंकून

पहात नाहींत, कानामागून येऊन तिखट, विनय हा शब्द तुमच्या कोशांत नाहीं वाटतें ? सदा आपल्याच तोऱ्यांत.

गरिबी (पराकाष्ठेची) : : घरची चिंताकारक अर्थव्यवस्था, डबघाईस आलेलें घर, सदा पोट पाठीला लागलेलें, कुच रोटी कुच लंगोटी असा संसार, सदा रिकामा खिसा, घरीं ओढगस्त असे, आर्थिक विपन्नावस्था, गोधड्या धांदोट्या व चिंध्या यांचा संसार! खाली खिशानें हिंडावें लागे, भाताच्या इंडीसाठीं पैसे कसे उभे करतां येतील ही चिंता ग्रासी, अंतकाळापेक्षां मध्यान्हकाळ कठीण याचा अनुभव येई, वार लावून शिकत, तुटपुंजें बजेट, संसाराचें गाडें हें असें रें रें करीत चाले ! आयातीची विल्हेवाट सोपी व चटकन होई, धरित्रीच्या अंथरुणावर आकाशाची चादर पांघरून शयन करीत.

ग्रंथ (टाकाऊ) : : रुचिहीन प्रयत्न, एक तकलुपी कृति, भिकार चोपडें ! शाई व कागद यांचा फुकट नास, संग्रह असा-तसाच आहे, ' चालसे ' टाईप, कमदर्जाची निर्मिती, छापलाच तरी कशाला असें वाटतें ! सोशिक वाचकांचा अंतच पाहिला आहे, चालचलाऊ, निकृष्ट, निर्जीव, अवास्तव, बाष्कळ लेखनाचा नमुना, सदभिरुचीच्या कसाला उतरत नाहीं, प्रमाणहान, वाचकाच्या निराशेंत भर पडते, लेखकानें लेखनाच्या फंदांत पडूं नये असें सुचवावेंसें वाटतें, म्हणावेंसें वाटतें ' हा नाद सोड सोड ! '

गाणें (चांगलें) : : मधुर गळ्याची तिला निसर्गाची देणगी आहे, खुल्या कंठानें म्हणते, गवयाचें पोर रडलें तरी तें सुरांत रडणार ! कोकिळ-कंठी ताना, मंत्रमुग्ध करणारे स्वर, ही उडतीं-फडकतीं गाणीं, बांधलेले बोल व ताना, थोडेंसें छटेल संगीत.

गाणें (वाईट) : : स्वराची हेंगाडी भेसळ, संगीत धुडगूस, गाण्याची उबळ आली, न पेलणाऱ्या ताना, फार विरस झाला सर्वांचा ! गर्दभ गायनच तें, पिंजक्या ग्रामोफोन प्लेटीसारखा आवाज, ती हुडहुडी आणि ते अँय् व ऊँव् कांहीं कळेना ! शास्त्र खूप आहे पण गळा नाहीं.

गायन (चांगलें) : : हें गाणें नव्हे तर विश्वांतील नाना तऱ्हेचीं सौंदर्यें स्वर-मालांच्या पाशांत धरून खाँसाहेब आपणांपुढें खडीं करीत आहेत ! ती चीज ऐकून कानांचें पारणें फिटलें, गाणें-बजावण्याची धमाल उडवून दिली !

ती पदांत कांहीं वेगळाच गोडवा आणते, मधुर–सुस्वर–गोड–रुचकर गायनानें सर्वांच्याच वृत्ति न्हाऊन निघूं लागल्या ! तारसप्तकामध्यें पंचमापर्यंत ताना सहज घेऊं शकतात.

गायन (निंदा) : : रंगभूमीवर एक पात्र तानांचीं भेंडोळीं सोडीत होतें, गळ्याची फुंकणी झाली आहे, गवयाचा गळा पडला, तें रेंकणें व हुडहुडी भरल्यागत विव्हळणें ऐकवत नाहीं, आवाज कसला ? रसाचें गुऱ्हाळच ! ' वरतें करोनिया तोंड हांका मारितो प्रचंड, राग आळवितो नाना, गातो काय तें कळेना ! ' गद्धे–मल्हार रागांत गायन चाललें होतें.

गायन शिक्षक (निंदा) : : धंदा गवयाचा नसून गवळ्याचा होता, शिकवणीचे रतीब घालीत असत, दिलरुबा वाजवतात कीं खाजवतात तें माहीत नाहीं ! गाण्याचा ' बिझिनेस ' करतात, अस्सल चिजेला चुकून तोंड लावीत नाहींत, श्रीमंतांच्या मुलांची गाण्याची हंगामी हौस पुरवतात, पागेंतल्या घोड्यांना खिंकाळायला शिकवतात.

गांवढळ : : अडाणी, खेडवळ, ग्राम्य, खेडुती, गांवठी आडदांडपणा, बुद्दू, शहराचें पाणी न मिळालेला, आडमुठा.

गिऱ्हाईक (वाईट) : : दमडीचा सौदा येरझारा चौदा ! दमडीचें घेणें नी खंडीचा भाव, नमुना म्हणून एक एक करतां करंडींतले सर्वच आंबे चापील !

गुणगान (स्तवन) : : तोंडभर कौतुक, वारेमाप स्तुति, नामसंकीर्तन, गुणग्रहण, तोंड फाटेतो स्तुति, स्तवन, स्तुतिस्तोत्रें गाणें, शब्दपूजा बांधणें, भलें बोलणें, आरत्या ओवाळणें, भलावण, गुणांचें रसिकतेनें वर्णन, बरें म्हणणें, स्तुतिपर वाक्य तोंडावाटे काढणें, चांगली बाजू उजेडांत आणणें, कौतुकाच्या चवऱ्या ढाळणें, लोणी-मस्का लावणें, हरभऱ्याच्या झाडावर चढविणें, स्तुतीचा मलिदा-रतीब, चांगल्या गोष्टीची दखल, पंचारती ओवळणें.

गुन्हेगार : : नदीपार केलेले, चोर, दरवडेखोर, डाकू, चांच, ठग, लुच्चे, फसवे, लफंगे, खुनी, मवाली, गुंड, अपराधी, कायदेभंगी, सुरेसार, सराईत गुन्हेगार, अट्टल भामटे, कायद्याला भीक न घालणारे, अवैध वर्तनाचे, कानू तुडविणारे, न्यायकोर्टांना हवे असणारे, तुरुंगपीठाचे होऊं घातलेले पदवीधर ! बंदीशाळेचे स्नातक, खिसेकापू.

गुपचुप : : बभ्रा होऊं न देतां, निमूट, या हाताचें त्या हाताला कळूं न देतां, गुप्तपणें, आवाज होऊं न देतां, चिपचाप, कर्णोपकर्णीं होऊं न देतां, निमूटपणें, गुप्त, अदृश्य, अप्रकट, गुह्य, गूढ, आवृत, प्रच्छन्न, सुप्त, सात पडद्यांच्या आड लपलेलें, सातासमुद्रापलीकडलें, गोषांतलें, अंतरित, दडलेलें, ही अंदरकी बात, कसें ते भगवान जाणें ! यांत कांहीं तरी गोम दिसते आहे, मुरतें तिथेंच जिरतें, अवगुंठित, बुरख्यांतला, छपलेला, दृग्गोचर नाहीं, पडदानशीन, सूमिगत झाला, दिसून पडणार नाहीं, अगोचर पण आहेच, बाहेर नाहीं पण म्यानांत आहे, बाह्य देखाव्यांत लुप्त भासणारा, कातडीच्या आंत, वस्त्राच्छादित, बाह्य शेंदूराच्या आंत.

गुरू (खोटा) : : ' गुरु केला घरवासी आमच्या चुकल्या गाई म्हशी ' साऱ्या दाढीमिशाच; पण आंत गुरू कोठें आहे ? बुवाबाजी करणारा, तोतया, बनावट नाणें.

गुलाम वृत्ति : : बूटचाटूपणा,; वर हात खालीं लाथ ! थुंकी झेलणारे, गळेपडूपणा, दास्य, दस्यूपणा, निव्वळ चाट्या, दिल्या दामाचे कामकरी, स्वतंत्रपणा विकला यांनीं, दारावरचे जय-विजय केवळ, स्लेव्हिश मेन्टॅलिटी.

गुंड : : गटाचा—गल्लींतला दादा, मवाली, खरखरमुंडा, पुंड, लाख्या गगाजी, सोळभोक, उडाणटप्पू , अगदीं घोटींव डाकू,सरावलेला—निढावलेला—तडीपार होणाच्या लायकीचा गुंड, हुच्च—वर्गाचे अग्रणी ! टवाळ—कंपूचा अध्वर्यु, झोंड, इरसाल—इब्लिस वल्ली, गाळींव रत्न, लखनौचा बांका, अगदीं ' नग ' आहांत ! टग्या, धश्चोट, घातुक खोंड, घरफोडे डोईफोडे आणि कंपनीचे सूत्रधार व भागीदार.

गुंतागुंतीचा : : क्लिष्ट, पेंचदार, गुंता झालेला, लफडेबाज, कमळाचें जाळेंच ! एकमेकांच्या तंगड्या एकमेकांत अडकलेल्या, सरळ सोपें नाहीं, समस्याच ती ! अटकणी-खटक्यांचें साम्राज्य, सुश्लिष्टतेचा अभाव, आंत शेंकडों भानगडी, उकलायला कठीण, हजार टिकाणीं नागमोडी व पुढें-मागें, उकल पडायला कठीण, अनेकांचे हितसंबंध यांत गुंतलेले, चाकांत चाकें, माथेपच्ची करावी तेव्हां यांतला धागा हातीं लागेल !

गेला : : बाडबिस्तरा गुंडाळून प्रयाण केलें, चालता झाला, गाशा

गुंडाळला, आंवराआंवर करून पार झाला, वाळवी नाहींशी होते तसा कुठें गेला पत्ता नाहीं ! गमन करतीं झालीं, नाहींसा झाला, संपला, आटोपला, वन् टू वन् टू करीत रस्ता कापला, झटकला, सूं बाल्या केला, कामीं आला, पळाला, मजल मारली, इतकी तयारी केल्यावरच त्याचें बूड हाललें.

गैरमार्गानें : : येन केन प्रकारेण, कसेंही—वाटेल तें करून, युक्तिप्रयुक्तीनें, वाममार्गानें, आडवळणानें, सूक्तासूक्त विचार सोडून देऊन, वळणावळणांनीं, आडचालीनें, मागल्या दारानें, भलत्याच रीतीनें, प्रलोभनें—आमिषें दाखवून, चोरी—चहाडी करून, काळ्या बाजारानें, शक्कल लढवून, आक्षेपार्ह साधनांनीं, धोपटमार्ग सोडून, लांचलुचपतीनें वजन आणून, चिठ्ठ्याचपाट्यांनीं, वशिला लावून, धाकदपटशानें साम-दाम-दंड-भेद सर्व करून, फूट पाडून, कायदे चुकवून, कपटानें व दुसऱ्याच्या डोळ्यांत धूळ फेकून.

गैरमुद्याचें : : गौण अंगास विशेष महत्त्व दिलें आहे, येथें तीं देण्याचें प्रयोजन काय ? दुसरा विषय मध्यें घुसडला आहे, मुद्याला गैरलागू, वडाची साल पिंपळाला, मजकुराची घालघुसड, मुख्य प्रश्नाला बगल दिली आहे, येथें झुडूपच झोडपलें आहे ! मुद्दा सोडून, कुठच्या कुठें लिहिणें ! कशाचा काय संबंध ? वाष्कळ लेखन, भुस्सा फार, दाणा कमी; प्रस्तावनाच मोठी; ग्रंथ एवढासा, काय म्हणायचें तेंच कळत नाहीं !

गोंगाट : : गडगडाट, खडखडाट, कोलाहल, कटकट, घरींट, गडबड, आवाज, ठणठणाट, या गोंगाटानें मुडदे सुद्धां उठून बसले असते ! कानठळ्या बसतील असे आवाज, ठाण्ठाण् आवाज, जयघोष, कोल्हेकुई, अगदीं मासळीबाजार, जल्लोष, शांततेच्या चिंध्या करणारी आरडाओरड, हेंगाड्या बोलींतला गलबला.

गोंधळ : : बेशिस्ती, सांवळा गोंधळ, कशाचा कशाला मेळ नाहीं, कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं ! शुद्ध मोंगलाई, एकच धांदल, सर्वांच्या तंगड्या एकमेकांत गुंतलेल्या, सर्व वस्तु सरमिसळ झालेल्या, सर्व कांहीं उलटेंपालटें.

गौप्यस्फोट : : बेंड बाहेर पडलें, बभ्रा, लंपडाव उघडा पडला, उघडीक झाली, रहस्य उघडें झालें, मनसुवा स्पष्ट झाला, पोटांतलें चार लोकांत

झालें, गौप्याला वाचा फुटली, गुप्तता संपली, खायचे दांत दिसले, छपलेलें रस्त्यावर आलें, सोनाराची सून उकिरड्यावर आली, अभ्रा निघाला, पितळ दिसली, परिस्फोट झाला, ही गोष्ट षट्कर्णी झाली, अंतस्थ कावा ओळखला, ही गोष्ट चारांच्या तोंडीं झाली, अंडींपिल्लीं बाहेर काढलीं, रहस्यभेद, झाकली मूठ उघडली, बुरखा बाजूला केला, काळोखांतलें उजेडांत आणलें, पोटांतलें ओठांत आलें, पितळ बाहेर पडलें, आंत काय आहे तें कळलें.

गंभीर : : उदासवाणा, गंभीर प्रकृतीचा विनोदाची ओळख नाहीं, तोंडावरची सुरकुता हालणार नाहीं, मर्तिकाहून आत्तांच आला असा चेहरा, सुतक्या कोठला ! हंसण्याशीं वैर, जणू कांहीं जगाच्या राजकारणाचें ओझें यांच्या अंगावर, धीरगंभीर, भिंतीसारखा निर्विकार चेहरा, स्मिताचेंही वावडें, गंभीरोदात्त, विनोद हा पदार्थ त्यांना माहीत नव्हता, सदा कडक व कठोर, तोंडावर कधीं हास्य-रेषा उमटेल तर शपथ, जणूं कांहीं कोणाला पोंचवून आलेत ! सुतकी चेहरा.

घटस्फोट : : काडीमोड, तलाक, सोडचिठ्ठी, विवाह-विच्छेद, विवाहाचें गाडें काडीमोडाच्या खडकावर आदळलें, नवरा-बायको वेगळीं झालीं, लग्न तोडलें, नवरा बायकोचें नातें कायद्यानें नष्ट केलें, दोन्ही दोन दिशांना जायला मोकळीं झालीं, दुसऱ्या घरोब्याला स्वतंत्र झालीं, विवाहसमयींच्या आणाशपथा कोर्टांत रद्दबातल केल्या, जीवनसूत्रें विलग झालीं, संसार-रथाचीं चाकें निखळून बाजूला पडलीं, विवाहसूत्र तोडलें.

घड्याळ : : घटियंत्र, वालुकायंत्र, भिंतीवरील दिमाखानें रखवाली करणारें घड्याळ हा अकारण तडफडाट पाहून ठणकन् हंसलें ! शेजारच्या घरांतल्या घड्याळांत ठण् ठण् करून दोन वाजले, तिथल्या भल्या मोठ्या घड्याळाचा भारदस्त लंबक काळाच्या दाराशीं नेमक्या येरझारा घालीत आल्या-गेल्या मिनिटांची दक्षतेनें नोंद ठेवीत होता, घड्याळांत कर्र्र् असा आवाज होऊं लागला आणि बऱ्याच वेळानें एक निरुत्साही टोला पडला.

घडामोडी : : आलटापालट, नवे उत्पात, काय झालें गेलें तें, ताज्या घटना, काय काय घडलें तें, बदलाबदल, मांडणीचा थारेपालट, उल्लेखनीय

प्रसंग, बढत्या घटत्या, उचापती, प्रसंग, नवीन उपक्रम, उत्पत्ति-स्थिति-विलय यांचें विवरण, दरम्यान काय झालें, पुलाखालून किती पाणी गेलें, कोण ढांसळले, कोण सावरले, कोणाची वासलात लागली, कोण घसरलें कोण पसरले--सावरले, कोणते घडे थापले व कोणते मोडले, बसले किती उठले किती, बाळें आलीं किती; किती बुढ्ढे खपले, सारांश काय घडामोडी घडल्या, आले कोण गेले कोण कोण बुडले कोण तरले.

घर : : बंगला, निवासस्थान, राहतें बिऱ्हाड, घरकुल, फ्लॅट, खोली, गाळा, माळा, चाळ, वाडा, निकेतन, मंदिर, गृह, वस्तीचें ठिकाण, घरटा, मकाण, मठी, कुटी, पर्णकुटी, इमारत, इमला, बंगली, हवेली, झोपडी, राहुटी, प्रासाद, सदन, निवास, खोपटें, तंबू, छप्पर, पडवी, गोठा, महाल, मनोरा, आडोशाची जागा.

कौलारू छप्पर, टोलेजंग बंगला, भव्य प्रासाद, टुमदार इमला, अलीशान इमारत, छोटीशी मठी, वास्तव्याची जागा, चिरेबंदी वाडा, चंद्रमौळी भाड्याची वीत-टीचभर जागा, केमळी झोंपडी, डोकें टेकायला निवारा, हा फ्लॅट म्हणजे कपाटांतील एक कप्पाच आहे ! विंचवाचें बिऱ्हाड पाठीवर त्यांपैकींच ! घर कसलें ? धर्मशाळा; नुसती मशीद भासते, शवपेटिका वाटते, या नाकपुड्यांएवढ्या खोल्या, एकाकी भयाण घर, तळमजल्यांत एक असूर्यंपश्या खोलींत सर्वांचा वावर, बंगल्याचें तोंड गोखलेरोडवर निघालें होतें.

घाई : : घिसाडघाई, तारांबळ, गर्दीगर्दीनें, धांवत पळत, शक्य तेवढा वेळ वांचवीत ! कधीं जिवाला उसंत नाहीं, नेहमींचीं पळापळ, आयत्या वेळीं हें उचल तें घे असा प्रकार ! संथपणाचें नांव नाहीं, जणूं मागें वाघ लागलाय ! धीरानें घेतलें तर बिघडेल का ? गडबडीनें दीड–दोन तासांत सर्व भाजून काढण्यांत आलें !

घाऊक : : ठोकवंद, ठोक, एका घासानें, एका मुठींत, एका वेंघेंत, एका उडींत, एका दमांत, त्याचा एकच घोट केला, एका शब्दांत, एकाच कटाक्षांत, एका चाव्यांत.

घाण : : कूडाकचरा, केरकचरा, राड, शेणखळा, वाहती गटारें,

तुंबलेलें पाणी, ढोपरभर कचरा, चिखल, हिडीस घाण, दुर्गंधी, नाकाला रुमाल लावून जाणें भाग पडे! डुकरांचा स्वर्ग, विष्ठा व नरककुंडें, दारीं गटारगंगा! मलमूत्र साठवलेलें, सडकें अन्न व बुरसलेल्या पत्रावळी, नासकीं फळें, खरकट्याचा उग्र दर्प, कागदाचे कपटे, कापसाचे रक्त माखलेले बोळे; त्यांतच एखादें मेलेलें मांजर.

घाणेरडा : : मजीत, मळकट, गलिच्छ, अस्वच्छ, असंगळ, चिकटमाकट तेलकट, मातट, घृणास्पद, ओंगळ, धुरकट, मलिन, मळलेला, गढूळ, गैरटापटिपीचा, तांबरलेला, किटण चढलेला, चिखलांत डुंबलेला, कलंकित, नवेपणा उडालेला, जुनाट, बुरसट, किडींनीं खाल्लेला, रोगण गेलेला, डागाळलेला, नुसता सूवर, डाग पडलेला, नरकवत्, विष्ठामय, वास मारणारा, पाहतांच नाक धरावेंसें वाटेल! खाऊन ओकारी येईल, किळसवाणा, पाहून शिसारी येते.

घाबरत : : भीत, रडत, गाळण उडत, भयभीत, धडकी भरली, घाम फुटला, त्रेधातिरपीट, पांचावर धारण बसली, विजार भिजली, पोटांत वायगोळा उठला! कसलें काय नि कसलें काय! भीतीनें ओठ पांढरे पडले, थरकांप उडाला, त्-त्त-पप्पची वेळ आली, फें फें उडाली.

चढाओढ : चुरस, खेचाखेची, पुढें जाण्याची परस्परांची खटपट, स्पर्धा, अहमहमिका, पुढाकारासाठीं धडपड—शर्यतच लागली जणूं! तूं का मी पुढें चाललेंय्, रस्सीखेंच चालली आहे, दुसऱ्यास मागें टाकण्याचा आटापिटा.

चप्प : : ओठांना गमटेप लावल्यासारखा गप्प, तोंडांतून अवाक्षर काढलें नाहीं, हूं नाहीं कीं चूं नाहीं, वाचाच बसली म्हणाना! तोंड बांधल्यागत, जीभ चालेच ना मुळीं! कोठें कसलाच आवाज नाहीं, टांचणी पडली असती तरी तो आवाज ऐकायला आला असता, सर्वांचीं तोंडें बंद झालीं, सर्वांनीं आळी-मिळी गुप चिळी केली.

चर : : भुयार, गुहा, बीळ, खळी, विवर, छिद्र, भोक, खड्डा, खळगा, खबदाड, भोसका, विहीर, रंध्र, भेग, चीर, खांच, पन्हाळी, फांटा, खोबण, चकारी, चाकोरी, घट्टा, चरा, रेषा, फरा, खोल धार, घडी, शीर,

खोलपट्टी, दुमड, वळचण, खंदक, दरी, घळई, गल्ली, मार्ग, खिंडार, खिंड, खिडकी, गटार, खोरें, दरड, भगदाड, घळण, नेटें, बसलेला भाग, पंचपात्रें, आंत गेलेली तळी, कोनाडा, द्रोण, दबलेली बाजू, खिसा, कप्पा, भांडें, खालवर–खालीं सरलेला भाग, बसका तुकडा, मारती बाजू, उतार, उतरंड.

चर्चा (वाईट) : : शब्द-पैंजण घुमवीत राहिले, वांझोटी सूचना, विरुद्ध लोकांची सांगड घालण्याचा प्रयत्न, चर्चेत बॉम्ब् टाकला, शब्द–घर्षण, चर्चेची चक्की चालू झाला, मुख्य प्रश्नाला बगल देऊन वाद केला, वादाची धूळ उडविली, तोंड कीं मारी ! थडाथड उत्तरें, जतन केलेल्या शिव्यांची देवघेव, जिभेची करवत चालविली, मौनाचा भंग केला, वाभाडे काढले, अकलेचे तार तुटले, तोंडाचें कुलूप तोडलें, प्रश्नोत्तरांची घनचक्कर, वैचारिक घर्षण व तज्जनित ठिणग्या उडाल्या.

चवचाल : : स्वच्छंदी, छिनाल, गळेपडू, गुलछडी, नटवी, तऱ्हातऱ्हा करते, मौजमजेची भोक्ती, उच्छृंखल, भुलवण्या दाखवते, दांड कार्टी, ओढाळ बायको, वय सोळाचं, लय घोळाचं ! इष्काचा खेळ खेळणारी, उन्मादक चोचल्यांचें हिला आकर्षण, चित्तवृत्ति बावचळविते, धृष्ट नजरेनें पाहणारी, महान खोडील.

चविष्ट : : रुचकर, अमृतोपम, गोड, रसनेला तोष दिला, जिव्हा-सौख्य पुरवील असें, खमंग, रसदार, चटकपटक, झणझणीत, सुमधुर.

चहाडी : : कर्णपिशाचाकडून कळलें, चहाड्या सांगत ती त्या मध्यम–वर्गीयांच्या चाळींतल्या जीवनाची खरूज मोठ्या चवीनें खाजवूं लागली, हें कानांवरून गेलें आहे, कोणी तरी कान फुंकले, आपल्या पाठीला डोळे आहेत का ? शेण माती घेऊनच उठतें ! एका कानानें ऐकावें दुसऱ्या कानानें सोडून द्यावें, अमृताच्या घटांत जहरी सर्पानें गरळ ओकलें, त्या पिशाच्चानें तिच्या संसाराला कोलीत लावलें.

चाल (युवतीची) : : हंसगति, गजगामिनी, चटकमटक करांत गेली, कटिभागाचा हिंदोळा करीत-अंग मुरडात–लचकत–मुरडत–शरिराला गोल

हेलकावे देत गेली, देहलतेच्या रम्य हालचाली, कमरेंत लचकत तरतरा निघाली, झपूझप् पावलें टाकीत तटकन् वळली, लगालगा येत होती.

चालढकल : : टाळाटाळी, चुकवाचुकवी, हें काम फार दिवस आंबत टाकलें, दिरंगाई केली, उद्यांवर ढकललें, वायदे करीत राहिले, म्हणाले पुढें बघूं तूर्त नको, देएंगे दिलाएंगे चालविलें, आजचें मरण उद्यांवर, तारखा टाकल्या, पेस्तर सालीं करूं म्हणाले.

चालणें : : भटकणें, फेरफटका–सहल–खेटा–रखडपट्टी–भ्रमण–यात्रा करणें, निघणें, सुटणें, सटकणें, येणें, धावणें, हालणें, सरणें, पोंचणें, फिरणें, फिरावयास जाणें, रस्ता धरणें, चालतें होणें, गमन करणें, पायभाडें देणें, पाय मोकळें करणें.

चांगला : : भला, सात्त्विक, लोभस, शुद्ध, पवित्र, चोख, सच्चा, गुणवान्, प्रमाणबद्ध, देखणा, शोभिवंत, सुव्यवस्थित, प्रमाणशीर, ऐटदार, सुरेख, मारू, सुंदर, बांधीव, घोटीव, आटपशीर, घाटदार, गुळगुळीत, झक्क, यथायोग्य, टीपेंतला, उत्कृष्ट, भलतेंच उत्तम! झकास, सुष्ठु, नेकदार, छान, ए १, दर्जेदार, रसदार, गोड-गोड, मधुर, रोचक, रुचकर, रसनेला, तोषक, अमृतोपम, तोंडाला पाणी आणील असा, आवडेल असा, नजरेंत भरणारा, आकर्षक, दर्जेदार, अस्सल, जातिवंत, अभिजात, तेजस्वी, कांतिमान, पांढराफेक, ओजस्वी, शुभ्रधवल, गौर, निरभ्र, लख्ख, दृष्ट लागण्यासारखा.

असाधारण, अजब, लोकोत्तर, विलक्षण, कर्णमधुर, मंजुळ, प्रासयुक्त, सुस्पष्ट, अस्खलित, रसाळ, धष्टपुष्ट, कुशाग्र, तीव्र, कडक, टोंकदार, ताकदवान, गाढा, माहितीपूर्ण, ऐसपैस, भक्कम, सुसज्ज, भरलेला, गोटीदार, मजबूत, घट्ट, हितप्रद, उंच-निंच, लाभदायक, फायदेमंद, गुणकारी, हितकारी, पावणारा, तल्लख, पाणीदार, टिकाऊ, स्फटिकवत् स्वच्छ, साफसुथरा, कोरा करकरीत, वेगवान, चलाख, चपळ, कार्यक्षम, कुशल, कसदार, निष्ठावान, विश्वसनीय, विश्वासार्ह.

सरळसपाट, चढायला सोपा, सलज्ज, मुग्ध, निष्कपट, विनयी, मर्यादशील, सुसंस्कृत, पक्व, शुभ्र, झणझणीत, सणसणीत, ठाशीव, मृदु, कोमल, मऊ,

रेशमी, तलम, मोरपिसी, सरस, गुणी, घवघवीत, सढळ, स्मरणीय, नाणावलेलें, समर्पक, प्रसंगोचित, मार्मिक, सव्यसाची, समन्वयात्मक, शाबूत, धड, नाविन्ययुक्त, नवें, स्वतंत्र.

चांदणी : : तारा, तारका, नक्षत्र, ग्रहगोल, उल्का, पडता तारा, गगनवेलीवरचीं नक्षत्रांचीं सुकोमल फुलें, तरंगणाऱ्या मेघखंडांनीं झांकलेल्या चांदण्या पुसट दिसत होत्या, आभाळांत चांदण्या क्षीणपणें चमचमत होत्या.

चांदणें : : चांदण्याचा शिडकाव, सृष्टि ज्योत्स्नामय झाली, ही चांदणी रात्र रेशमाच्या धाग्यासारखी मऊ होऊन डोलते आहे असें वाटलें, चहूंकडे पांढरी शुभ्र जादू पसरली. चांदण्यातली चंदेरी दुनिया, आंब्याच्या झाडावरून चांदणें ठिबकत होतें ! चांदण्यांत भिजलेली हिरवळ, चांदणें पिठासारखें पडलें होतें, काळा अंधार आणि पांढरें चांदणें ठिकठिकाणीं भूमीवर मिसळून कालवलें गेलें होतें, चांदण्यांत न्हालेला सृष्टि, पिठोरी दुग्ध-धवल चांदणें, रात्र तलम चंदेरी वस्त्र नेसून विश्वाच्या वीणेवर विश्रांतीची शान्त रागिणी आळवूं लागली होती ! भरती आलेल्या समुद्रांत चांदणें डुचमळत होतें, चांदण्याचें झिरझिरीत वस्त्र नेसून झाडें शान्त उभीं होतीं.

चित्रविचित्र : : ठिपक्या-ठिपक्यांचें, पटाईत, पट्ट्यापट्ट्याचें, विविधरंगी, इंद्र-धनुषी रंगाचें, चट्टीपट्टी, रंगीबेरंगी, शबल, बुट्टेदार, धब्बे धब्बेवालें.

चितारणें : : चित्रणें, आकृति काढणें, रंगविणें, चित्र काढणें, रेखाकृति, चित्रित करणें, व्यक्तिदर्शन घडविणें, मनश्चक्षूंपुढें उभें करणें, रेखणें, रेखाटणें, रेखांकित करणें, रंगात उतरविणें.

चिन्ह : : खूण, प्रतीक, निशाणी, ट्रेडमार्क, छाप, लक्षण, येणाऱ्या गोष्टीची चाहूल, शिक्का, आकृति, ठसा, पदचिन्ह, पायठसा, मागमूस, वण, डाग.

चुकला : : प्रमाद घडला, गलती झाली, जरा घसरलाच ! घोडचूक केली. नाहीं तरी त्याचें जरा ' हें 'च झालें ! चूक कसली खिळा, बरोबर केलें नाहीं, बिनचूकपणाची ऐट जिरली.

चुकार : : अंगचोर, अंगकाढू, चुकारतट्टू, कामचुकार, वेठीला धरल्यागत

काम, केव्हांच झुकांडी देईल, यांचें घड्याळावर लक्ष, काम इथें मन बाहेर, वेठ मारून दिली, चाकराला इथें पडचाकर पाहिजे, पान-तंबाखूंत पाव वेळ घालवीत, उशीरां येऊन लवकर पळणार ! कशी तरी संपादणी, डायरी भरली कीं संपलें, वायदे लावतील. लगेच पण-परंतु सुरू केलें, पगाराला आधीं; कामाला कधींमधीं, अंग काढून घेतल्यासारखेंच, जें टाळतां येणार नाही तेवढेंच करायचें, विशेष काम असेल तेव्हां हटकून सिकनोट ! सांगितलेलीं कामें वेळेवर झालीं कीं मग काय ? कामझोड्या नादीं गप-झोड्या.

चुंबन : : मुका, पापा, चुंबा, साखरचुंबा, अधरामृतसेवन, ओष्ठपीडन, ओष्ठमीलन, अधरपान, ओठांवर ओठ टेकविणें, अधरसुधाप्राशन, दोहोंत विभागून पुन्हां अख्खी राहणारी वस्तू ! जें दिलें अथवा घेतलें तरी अर्थ एकच तें म्हणजे चुंबन, मुळांत कांहीं नाहीं तें तोडून दान करण्याचा अयशस्वी प्रयत्न, वेडेचार करण्याच्या करारावर केलेलें शिक्कामोर्तब, प्रेमाची चौथाई-सरदेशमुखी, प्रेमाची जकात-वसुली, हृदयाचा मुका मार, प्रेमाचा विसार, तोंडाला तोंड देणें, निसटत्या भेटीची पुसटती जाणीव, अनुरागानें दुसऱ्यावर घेतलेलें तोंडसुख, प्रेमाच्या हिशोबाची तोंडमिळवणी.

चूक : : गफलत, गल्लत, गलती, गाफिली, राहिलेला दोष, खाडा, स्खलन, अनवधानानें उद्भवलेली विसंगति, घोडचूक, हिमालयाएवढी चूक, अक्षम्य गल्लत, विधान सपशेल चुकीचें आहे, हें गृहीत-वाक्यच ठार चुकाचें आहे, त्यांच्यांत मुळांत एकवाक्यता नाहीं, बरोबर नाहीं, असायला नको तसें, बुद्धीला पटत नाहीं, यांत गलती होत आहे, हें नियमां-प्रमाणें नाहीं, अयोग्य, तसें नव्हे, मेळ बसत नाहीं, येथें कांहीं तरी बिघडलें आहे, उत्तराचा ताळा जमत नाहीं, दोन आकड्यांत तफावत पडत आहे, अंदाजाप्रमाणें निष्पत्ति नाहीं, कांहीं तरी हुकलें आहे, पोरबुद्धीनें भलतेंच करून बसला !

चेहरा (युवतीचा) : : वाटोळा मुखचंद्रमा, मुखेंदु, इंदुवदन, गोल चेहरा, डोळे–कपाळ–भिंवया–दांत अन् जिवणी— जिथल्या तिथें आणि व्यवस्थित होतें, मुखडा चंद्राचा तुकडा.

चेचणें : : बडविणें, धोपटणें, हापटणें, दळणें, भरडून काढणें, झोडणें,

ठेचणें, मळणें, चिरडणें, कुटणें, तिंबणें, पीठ पाडणें, भूस पाडणें, बत्त्याखालीं घालणें, कुट्टा करणें, तडाखे लगावणें.

चैन : : सुखं च मे शयनं च मे, ताटावरून पाटावर, घृतकुल्या मधुकुल्या, मनमानी मौज, मनमुराद सुख, सर्व दृष्टीनें आराम, समोर सर्व सुखें हात जोडून उभीं ! जिवाची मुंबई, जीव चांगलाच सुखांत ठेवी, बिन-गरजांच्या वस्तूंवर अफाट खर्च चाले, खा प्या मजा करा असें चाललंय्.

चोरी : : हाताळपणा, स्तेनकर्म, चौर्य, धनापहार, चौर्यकर्म, शर्विलकी, उचलेगिरी, हस्तलाघव, भामटेगिरी, जिन्नस उडविणें—मारणें- लंपास करणें—ढापणें—उचलणें—नाहींसा—गडप करणें, खिसा कापणें, या वस्तूंना पाय फुटले, या वस्तूंवर जादू झाली— त्या नाहींशा होऊं लागल्या, जागीं वस्तू टिकत नाहीं.

चंचलता : : लहरीपणा, थिल्लरपणा, आज हें उद्यां तें ! केव्हांच लहर फिरते, तेरड्याचा रंग तीन दिवस, कशांत बूड स्थिर नाहीं, नित्य नव्याची आवड, भ्रमरवृत्ति, नुसता वारा, बायका क्षणांत हंसतील क्षणांत रुसतील—ऊन-पाऊस सारा !

चंद्र : चंद्रिका, चंद्रकोर, रजनीनाथ, तारानाथ, रोहिणीपति, सोम, पराती एवढा चंद्र, शुभ्र ढगांच्या पायघड्यांवरून पौर्णिमेच्या चंद्राची वरात नुकतीच कोठें निघाली होती, पश्चिम क्षितिजावर मावळती चंद्रकोर टेकली होती.

छोटें : : इवलीशी पुंजी, हें पिल्लूं—बछडें—वासरूं ! थोरांची ही पॉकेट इडीशन्, खेळण्यांतल्या बंगल्याप्रमाणें, एवढेसें नखाएवढें पोर, चिमुरडी मुलगी, वयानें व आकारानें धाकटें, लघु, लहानगें, निरुंद, तिच्या मानानें हे शिंगरूंच ! टीचभर, व्याप्ति लहान, लांबींत टांचगें, सूक्ष्म, लांबी-रुंदींत कमी, लहानसें, चमचा दोन चमचे, आखूड, छोटेखाना.

जन्म : : भूतलावर अवतरणें, अवतार,' उगम पावणें, प्रथम प्रकाश पाहणें, उदय, पोटीं येणें, कूस उजविणें, वंश-वृक्षाला फळ लागलें, तिसरें माणूस आलें, उद्भवलें, आत्म्याला शरीर मिळालें, आम्हीं आईला झालों !

जलदीनें : : गोळीसारखा, हरिणगतीनें, पाठीस वाघ लागल्यागत, सशाप्रमाणें, साडे तीन-मिनिटांत-पळांत, केव्हांच्या केव्हां, दिसतो न दिसतो

असा, तडाखेबंद, एका खेपेंत, चुटकीसरसें, वेळ न लावतां, फुटलेल्या सेकंदांत, एक श्वास टाकायला वेळ लागेल एवढ्यांत, वेळ न गमावतां, वेळ कसा तो लागलाच नाहीं! हें लिहावयास वेळ लागेल त्याच्या आंत, विद्युत्पाताला अवधि लागेल एवढ्यांत, नुसती गाडी! प-ळा हा शब्द पुरा होण्याच्या आंत, बाणाच्या वेगानें, धाडदिशीं.

त्वरेनें, तांतडीनें, गडबडीनें, हां हां म्हणतां, डोळ्याचें पातें लवतें न लवतें तोंच, विमान वेगानें, सुळकन, पटदिशीं, केव्हांच, क्षणार्धांत, जोरानें, सुसाट, तुफान वेगानें, वायुवेगानें, विद्युद्वेगानें, आवाजापेक्षां जलद, भरधांव दौडत, निमिषार्धात, द्रुत गतीनें, पळत पळत, धांवडत, आज इथें तर उद्यां तिथें! म्हणतां म्हणतां, तडित् वेगानें, मेलगाडी, हरिणाच्या चपळाईनें, त्वरेनें, पट्कन, चटकन, लौकर, तत्क्षणीं, लगबगा, ताबडतोब, शीघ्र गतीनें, वेगानें, धांदलीनें, घोडदौड करीत, केव्हांच, चटपट, झट्दिशी, सोडलेल्या बाणाप्रमाणें.

झटपट, भिंगरीसारखा, वणव्याप्रमाणें जलद, महिने कसे गेले तें कळलें नाहीं, लौकरांत लौकर, म्हणतां म्हणतां, पाहतां पाहतां, हातोहात, पाय ठेवावेत न ठेवावेत तोंच, जादूसारखा, यक्षिणीची कांडी फिरल्यागत.

जवळचा : : हाताशीं, केवळ चार पावलांवर, गांवाच्या पंचक्रोशींतच, कुत्र्याच्या भुंकभर लांबचा, जवळपास, भिडून, अंगालगत, लगतच, कोपरापाशीं, पाठीशींच, मध्यें बोट सरकणार नाहीं, शेजारीं, पाठीला पाठ लावून, मुंगी जायला वाट नाही, निकटवर्ती, निकटचा, दुसरा, पुढचा, नंतरचा, लगतचा, पाठीवरचा, मागला, दुय्यम, बाजूचा, लगोलगचा, हाताजवळचा, पूर्वीचा, तदनंतरचा, शेजारचा, खालचा, पुढला, पुढ्यांतला, पाठीमागचा, पुढल्या अनुक्रमाचा, त्यामागून येणारा, हांकेवरचा, हातावरचा, ढुंगणालगतचा, घर-अंगण असा.

जाणूनबुजून : : बुद्धया, बुद्धिपुरस्सर, समजून-उमजून, हेतु-पुरस्सर, कळून सवरून, विचारपूर्वक, परिणाम ओळखून, मापून-जोखून, विचार करूनच.

जादू : : किमया, नजरबंदी, हातचलाखी, मोहिनी विद्या, जादूटोणा,

छूमंतर, जारण मारण, भुताटकी, चेटूक, जंतर मंतर, काळी विद्या, हिप्नॉटिझम्, करणी, भानामती.

जालीम : : खरमरीत, जहाल, कडक, तीव्र, प्रखर, झणझणीत, जोराचा, खणखणीत, दणकेबाज, ठणठणीत, सणसणीत, झोंबरा, ज्वलज्जहाल, धारदार, चावरा, टेसदार.

जाहिरात (करणें) : : प्रसिद्धि देणें, चारचौघांत माहिती करून देणें, प्रसिद्धिकें पाठविणें, ताशे बडविणें, बोलण्याचा विषय करून टाकणें, जनतेसमोर आणणें, गुणवर्णनाचीं हस्तपत्रकें व भित्तिपत्रकें काढणें, समाजाच्या नजरेंत भरविणें, कीर्ति वाढविणें, जगजाहीर करणें, गुणांची तुतारी फुंकणें.

जाहिरातबाजी : : घटं भिद्यात् पटं छिंद्यात् पैकीं प्रकार, आपलेच ताशे बडविणें, अहो रूपं अहो ध्वनिः, आपल्याच मालाची जाहिरात करणें, चहूंकडे बोलबाला करणें, कांहीं करून डोळ्यांत भरविणें, स्वतःचें स्वतः नामसंकीर्तन, आपल्याच भित्तिपत्रिका गांवभर डकविणें, कोणीकडून नांवाजून घेणें, चार लोकांची नजर आपल्याकडे ओढणें, ढोलकें पिटून गर्दी जमविणें, आपल्या नांवाचा जिकडे-तिकडे गजर होईल अशी तरतूद करणें, आपला भोंगा सतत वाजवीत ठेवणें हें नेहमींचें धोरण ! स्तुतिपाठक जमा करणें, बोलणाऱ्याची बाजरी खपते; गप्प बसणाऱ्याचा गहूं खपत नाहीं हें पक्कें ओळखून वागणें, लोकांनीं झिपरी म्हणून तरी ओळखावें म्हणून बट कपाळावर ओढून ठेवणें, घराच्या धाब्यावर उभें राहून तुतारी फुंकून जगजाहीर करणें.

जिद्दी : : हेकेखोर, हट्टी, हेकट, मारीन किंवा मरेन अशा जिद्दीचा, सतीचें वाण घेऊन–शीर हातांत घेऊन, जरी ब्रह्मदेव खालीं आला तरी सोडणार नाहीं, जिवावर उदार होऊन, मृत्यूची पाळी आली तरी उलट खायची नाहीं या पणानें, शेंडी तुटो वा पारंबी तुटो–पर्वा नाहीं !

जिव्हालौल्य : : जिभेचे चोचले, खाण्याची वांछा, रसनेच्या चवीढवी, चटोर जीभ, फार चटकफटक खाणीं सदांचीं, दररोज नवें पक्कान्न पाहिजे आहे, आचार्यांपेक्षां आचाऱ्याची निवड मोठ्या कसोशीनें होते ! चारी ठाव जेवणाशिवाय भागत नाहीं, तिखटमिखट मसाल्याचे षोकी, भज्यांचा वास

आला कीं तोंडाला पाणी सुटलेंच ! आज बटाटेवडा उद्यां दहींवडा; रोज नवे प्रकार पाहिजेत, सारखें स्वयंपाक-घरांत लक्ष.

जिव्हाळा : : अंत:करणाचा ओलावा, तळमळ, त्यासाठीं अंतःकरण तुटतें—द्रवतें, पोट-तिडीक, आत्यंतिक प्रेम, नितांत ममता, दुसऱ्याच्या सुखांत आपलें सुख पाहणें, केवळ कामापुरते एकत्र आलेले नव्हत, ओढून ताणून आणलेली आपुलकी नव्हे ! संकट उभें राहिलें असतां धांवून येईल.

जुळणारा : : एक आवडीचा, मिळते—जुळतेपणा, मिळतें-जुळतें घेण्याचा स्वभाव, उभयतांचें रहस्य पुनः जुळवून दिलें, त्याचें जमतें सर्वांशीं, भंगलेलीं अंतःकरणें इत:पर एक झालीं, स्वभावानें मित्र-जोडाऊ, स्वभावांचा सांधा जमतो, हे रंग परस्परांना पटतात, त्यांचे छत्तीस गुण जमतात, हा जणूं त्यांतलाच तुकडा भासेल, जणूं एकसंधच ! हें त्यास विरोधी नाहीं, याचें रंगरूप तेंच त्याचें; विभिन्नत्व वाटत नाहीं, परस्परांत साम्य आढळतें.

जुलूम : : जबरदस्ती, बळजोरी, सक्ती, अत्याचार, मुस्कटदाबी, बळजबरी, जाचणें, जाच, छळवाद मांडणें, सतावणें, ताप देणें, सक्तीची मागणी, अन्यायी वागणूक, शारीरिक पीडा देणें, सामर्थ्यानें दडपणें, इच्छा डावलणें, शक्तीचा दबाव टाकून नमवणें, मनाविरुद्ध वागणूक, इच्छेविरुद्ध संमति मागणें, जबरी-संभोग.

जेवण : : भोजन, नाष्टा, न्याहरी, खाना, खाणें, फराळ, फलाहार, जलपान, डिनर, फीस्ट्, टिफिन, ब्रेकफास्ट, अल्पोपाहार, मेजवानी, चहापाणी, आहार, मधल्या वेळेचें, उपासाचें, लंच्, मीठभाकर, पुख्खा, उष्टावण, तोंडांत टाकण्यासाठीं कांहीं, अन्नोदक पोटपूजा, थोडें खाद्य, एक गोळा भात, दोन प्रहरची तयारी, भाताची हंडी, दाढेखालीं कांहीं हवें, पोटापाण्याची व्यवस्था, कांहीं चहा-चिवडा तर ! पोटोबाची तयारी, उपवास सोडण्याचें साहित्य, तोंड चाळवायला कांहीं.

जेवलों : : कचकून जेवलों, आडवा हात मारला, एक डझन केळ्यांचा फडशा पाडला, अंजीर गट्ट केले, पोहे गडप केले, श्रीखंडाच्या बशीभर वड्या नाहींशा केल्या, बत्तासे खाऊन टाकले, भाजी यथास्थित चापली, खच्चून फराळ केला, दाबून खाल्लें, सोल्यांचा फन्ना उडविला, सुपारीचा

बकाणा मारला, चट्टामट्टा केला, एकादशी दुप्पट खाशी, अखेर अन्न हातींपायीं आलें.

जोडणें : : शिवणें, जवळ आणणें, एकत्रित करणें, इकट्ठा करणें, मिसळणें, बांधून टाकणें, जुळविणें, धागे गुंफणें, धागे जोडणें, एकजीव करणें, सांधणें, जखडणें, गुंफणें, डकविणें, चिकटाविणें, एकत्र करणें, कलम करणें, एकत्र टांचणें, गोफ विणणें.

जोडपें (विजोड) : : वरण-भात आहे, उदबत्ती व घर असा प्रकार ! एकावर शून्य अशी जोडी, तो आणि ती म्हणजे दहाचा आंकडा, शालजोडीला कांबळ्याचें ठिगळ, माकडाला रत्न, अप्सरेनें घुबडाच्या गळ्यांत माळ घातली ! या रथाचें एक चाक ठेंगू आहे.

जोम : : जोश, उत्साह, आवेश, उल्हास, तरतरी, धमक, रग, मनगटांतला जोर, सजीवपणा, रंगेलपणा, मस्ती, दमदारपणा.

जोराचा (प्रयत्न) : : नेटाचा-निकडीचा-आटोकाट प्रयत्न, स्वयंस्फूर्त उपक्रम, हिरीरीनें पुरस्कार, मेहनत, प्रयत्नांची शिकस्त, अविरत कष्ट, प्रकरण धसास लावलें, विचार प्रसृत केले, जागृति केली, त्यांचें पोषक भरीव कार्य, इकडचा डोंगर तिकडे केला, आकाश-पाताळ एक केलें ! कर्तव्य चोख बजावलें, काया झिजवली, कार्य अंगीकारलें, यावज्जीव सेवा, सक्रिय भाग, देशाच्या हांकेला ओ देऊन, एक ना दोन शेंकडो प्रयत्न, बोलल्या-प्रमाणें कृति, पुण्याई खर्ची घातली, आरंभशूर नव्हते, कार्याला पुष्टी दिली, शुश्रूषेचा वसा घेतलेल्या सेविका.

झाड : : वृक्ष, रोपटा, रोप, वेल, वल्ली, लता, तण, झुडूप, जाळी, झाडी, घनदाट झाडी, निबिड कुंज, सरळसोट वृक्ष, गगनचुंबी वट, स्थितप्रज्ञ वड, फांद्यांच्या पानांची सळसळ, बाहेरचा पिंपळ सळसळत होता, निसर्ग-शोभेनें नटलेलें हवेचें ठिकाण.

झांटिपी : : अवदसा, चांडाळीण, हडळ, कृत्या, कैदाशीण, हिडिंबा, जहांबाज बायको, त्राटिका, कर्कशा, पुरुषी पोरगी, गजघंटा, महामाया, तोंडाळ बायको, नारो शंकराची घंटा, मुलुखमैदान तोफ, ढालगज भवानी, उससेभी जादा, आखाड सासू, बहाद्दर नारी, दिसायला सुंदर पण असते

भयंकर! गोगलगाय नी पोटांत पाय, नवऱ्याशीं उभा दावा, ती केवळ सस्तन वर्गांतील प्राणी इतकेंच! तिनें त्यांची नाडी बरोबर ओळखली होती-पाणी जोखलें होतें, हे तिच्या समोर नांगी टाकतात, तिच्यापुढें हातच काय डोकें टेकलें, माहेरच्या वैभवाचे पोवाडे गाण्यांत तरबेज, तुमची एकुलती एक सख्खी बायको! त्राटिकेच्या टीपेंत लागलेला आवाज, आवाजही झालाय आडवा तुझ्यासारखा!

मूर्तिमंत आक्रस्ताळेपणा, हुकुमशाहीचा हा मूर्त आविष्कार, हें पार्सल देवाघरून चुकून 'स्त्री'चा शिक्का पडून आलेय, तिचा तो पुरुषी खाक्या, मर्दानी बाला, बाई कसली ती; नवऱ्याला गर्भार करील! नवऱ्याला दे माय धरणी ठाय करील, संन्यास मार्गाची थोरवी पटविणारें हें अमोघ साधन, नांव व वेष यामुळें स्त्री म्हणायचें! भीमकाय भामिनी, पहिल्या पट्टींतील आवाज, हिच्या वाटेस कोण जाईल? भव्य महिला, शरम-लज्जा हिच्या कोशांत नाहींत, महिषासुरमर्दिनी, खडकावरून मोकळा गाडा न्यावा तसा तिचा आवाज, बायको तोंडाळ व शेत दगडाळ यासारखें दुर्दैव नाहीं.

झिडकारलें : : कटविलें, कापलें, संबंध तोडले, त्यजिलें, भिरकाविलें, नेटानें अव्हेरिलें, अंगावर पडलेल्या झुरळाला झटकावें तसें झटकलें, जोड्याशीं उभें केलें नाहीं.

झिंगणें : : नशा चढणें, ब्रह्मानंदीं टाळी लागणें, सुस्ती आली, त्यानें दिलेलें मधुर जल प्राशन करतांच अत्यानंद झाला व भूमि हालतेशी वाटूं लागली, दोन-तीन चषकांतच मद्यानें डोक्याचा किल्ला सर केला! धुंदी चढली, दारू चढली, भांग अंगावर आली, तार लागली, डोकें चढलें, तर्र झाला, गरगरूं लागलें, भान हरपलें, मद्योन्मत्त, गुंगी आली, 'ब्राम्ही' स्थिति आली.

झोपड-पट्टी भाग : स्लम्स्, गल्ल्याकुच्च्यांचें साम्राज्य, शहराची काळी बाजू, गुंडांचें माहेरघर, भूलोकींचा नरक, जीवनाचा हीनतर स्तर येथें दिसेल, खोपटांतले संसार, दरिद्री चेंदलेल्या गलिच्छ वस्त्या, माणसें म्हणजे किड्यांचे पुंजकेच.

झोंप (जड) : : डोळे जडावले, डाराढूर झोपले, कुंभकर्णी झोंप,

मुडद्यासारखा झोंपतो, डोळ्यांवर सदा झांपड, देऊं पुन्हां ताणून ! ब्रह्मानंदीं टाळी लागलीय्, सर्व विश्व झोपेंत बुडालें, माणसें घरोघर निद्राधीन झालीं, झोंप अशा कीं उशाशीं ढोल बडवले तरी तो जागा व्हायचा नाहीं ! जाग कुणाला आली तरचा ना प्रश्न ? जाणीव–नेणिवेच्या पलीकडील अवस्था अनुभवीत.

टणक : कठीण, कठोर, दगडासारखें कडक, न बदलणारें, वज्रवत्, शिळेसारखें, पाषाणासारखें, न पाझरणारें, पोलादी फत्तरासारखें, दृढ.

टाकणें : : त्यजणें, टाकून देणें, परित्याग करणें, सोडून देणें, ओकणें, फेंकून देणें, विसर्जन करणें, नांव सोडणें, कृष्णार्पण करणें, तिलांजलि देणें, वर तुळशीपत्र ठेवणें, संबंध तोडणें, फारकत करणें, खालीं करणें, निवृत्त होणें, सर्वसंगपरित्याग.

टाकाऊ (ग्रंथ) : : आजकाल जें 'कडबा' वाङ्मय निर्माण होत आहे त्यांतलें, एकंदर दर्जा सामान्य वाटतो, उच्च कसोटीला उतरत नाहीं, सटरफटर सहित्यांत जमा करावें लागेल, निर्जीव व परिणाम–शून्य, सामान्य पातळीची कृति, तुटपुंज्या शिदोरीवर केलेला व्यर्थ प्रपंच, यांत तपस्येची झांक आढळत नाहीं, याच्या संबंधीं जितकें कमी लिहावें तितकें चांगलें ! अशा अध्याकच्च्या पुस्तकाच्या प्रसिद्धीच्या हौसेचा मोह लेखकानें टाळावा, अशीं पुस्तकें डझनावारी आहेत, वांझोटा प्रयत्न, बेकार खटाटोप, हें पुस्तक न वाचलें तर वेळेचा अपव्यय टळेल, पाथरवटाच्या दुकानांत जाऊन चंदनी मूर्तीची अपेक्षा करण्यांत काय अर्थ आहे ? रटाळ लिखाण, निरीक्षणाचें भांडवल नाहीं, ठिगळें लावलेली गोधडी, नवनिर्मितीच्या बाबतींत लेखकाच्या अंगीं शून्य ताकद आहे, कथेंत खडेपाकड पुष्कळच आहेत, भाकडकथा वाटते, सर्व लेखन अळणी वाटतें, दुय्यम दर्जाच्या किरट्या कथांपैकीं एक, लिहिण्यांत व्यर्थ कालापव्यय केला आहे.

टापटीप : : सुव्यवस्था नीटनेटकेपणा, ठाकठीकपणा, सुरळीतपणा, झकपकपणा, चकचकीत चमचमणारें सर्व कांहीं, अजागळपणाचा अंश नाहीं, शिस्तींत लावलेलें, सुनियंत्रितपणा, घासून पुसून स्वच्छ, झाडून पुसून लखख, ब्रॅंड्–न्यू दिसणारें, आरशासारखें–आंत तोंड पाहून घ्यावें !

धुळीचा अंश नाहीं, जागच्या जागीं सर्व, एका धारेंत–टीपेंत काम आहे, कोठें गाफीलपणा नाहीं, कुठें कुठें एवढी घाण नाहीं, स्वच्छता निर्मळपणा व बेतशीरपणा यांचा आदर्शच.

टाळाटाळ : : अळंटळं, चुकारपणा, उद्यांवर ढकलणें, चालढकल, अंगचोरपणा, बगल–झुकांडी–हुलकावणी देणें, तोंड चुकविणें, मोहरा बदलणें, देएंगे–दिलाएंगे चालविणें, दुसरीच बाजू पकडणें, नुसते वायदे करीत वेळ काढणें, टोलवाटोलवी, देणें चुकविणें, बुट्टी देणें, दांडी मारणें, तूर्तास टाळें घालणें, पुढें केव्हां तरी, आजचें उद्यांवर टाकणें, केवळ शब्दच्छल, गुळमुळीत उत्तरें देणें, मुद्दा टाळणें, फांटा पाडणें, दुसऱ्याचा हवाला देऊन मोकळें होणें, पेस्तर सालावर ढकलणें, कागदी घोडे नाचविणें, दुसराकडे बोट दाखविणें, बोलण्याचा सूर बदलणें, दुसऱ्याला गड–सासवडाच्या फेऱ्या घालायला लावणें.

टिकाऊ : : चिरंतन, भक्कम, अविनाशी, अमर, पक्कें, त्रिकालाबाधित, टवका उडणार नाहीं, मरण नाहीं, अमरपट्टा घेऊन आलेले, पुरून उरेल, काळ-पुरुषावर विजय मिळवील, उडून जाणार नाहीं.

टीका : : समीक्षा, मल्लीनाथी, परामर्श, विचिकित्सा, चिकित्सा, रसग्रहण, परीक्षण, कीस काढणें, स्पष्टीकरणार्थ लिखाण, दोषदर्शन, विरुद्ध मत, बारकाईनें चर्चा, टीका नव्हे कुचेष्टा, बारकावे हेरणें, बिंगें बाहेर काढणें.

टीका (कडक) : : जालीम झोंबणारी टीका, गुळगुळीत केली, अगदीं चंपी–हजामत केली, विदारक टीका, विखारी उपहास, टर उडवली, जालीम निर्भर्त्सना, हत्यार धरलें–झोड उठविली, बिनचूक शरसंधान, रटारट रट्टे लगावले, कडाडून हल्ला चढवला, खरपूस समाचार, मर्म-भेदक लेखणी, कांहीं बाकी ठेवली नाहीं, शालजोडींतले अहेर, शेलापागोटें दिलें आहे.

टीका (कुत्सित) : : भलेपणाची झिलई आहे इतकेंच, चिल्लर आक्षेप घेतले आहेत, तिरकस परीक्षण, लेखणीची नागमोडी चाल दिसून येते, कुचोद्यपणानें टीका करून घेतली, केवळ शब्दच्छल, आडून गोळ्या, टोंच मारली आहे, कोमट स्तुति, थंडें कौतुक, चकणा उल्लेख, जळका आनंद

प्रगट केला आहे, कारल्याहून कडू, टीकेची वाममार्गी चिखल—फेंक, व्याजोक्ति-व्यंगोक्तिपूर्ण, वक्रोक्तीनें बरबटलेले स्तंभ, आडमार्गी कोटिक्रम, सरळ सोडून आडरानांत शिरतात, खोडसाळपणाची व व्यक्तिगत, कुचकीं मनें प्रकटवलीं, शिंतोडे उडविले आहेत, नाक मुरडलें आहे, केवळ विविध वैगुण्यांची जाणीव करून देणारी, यांत पदोपदीं व्यंग व उपहास ध्वनित होतो, अशा टीकेनें रसिकांच्या अंगाचा तिळपापड होतो, या टीकेला उत्तर म्हणून हें पुस्तक डोक्यावर फेकून मारावेंसें वाटतें ! जिभेची मिरमिर शमविण्यासाठीं ही टीका आहेसें दिसतें.

टीका (चांगली) : :—मर्मग्राही, तर्कशुद्ध, सुसंगत, अप्रिय पण पथ्यकर, समतोल, उत्कृष्ट छाननी व विवरण, खरमरीत प्रत्युत्तर दिलें आहे, कवि-कृतींचा चोखंदळपणें परामर्श घेतला आहे, सत्यावर विदारक प्रकाश टाकला आहे, आपल्या निर्णयाच्या पुष्टीकरणार्थ उदाहरणें दिलीं आहेत, मर्मज्ञ रसग्रहण, मनाला पटणाऱ्या गोष्टी सांगितल्या आहेत, तर्कशुद्धतेच्या दृष्टीनें या टीकेंत एकही ढिली जागा नाहीं, गुळगुळीत टोमणे व रेशमी चिमटे घतले आहेत, नवमताची टोपी डोक्यावर घालूनच परीक्षण केलें आहे, ही टीका अगदींच दुर्लक्षित करण्यासारखी नाहीं. हें दाहक सत्य यांनीं उघड केलें आहे, शत्रूलाहि न्याय देणारी, हे जखम करण्यापूर्वीं फुंकर घालतील.

टीका (जहाल) : : चावरी जळजळीत टीका, खरखरीत खरमरीत विखारी उत्तरें देण्याची खुमखुमा दिसते, गरम स्वागत, टीकेचा डोंब, एकमेकांवर शब्द प्रहार, वाभाडे काढले आहेत, प्रखर टीकास्त्र सोडलें, ताशेरा झाडला, लेखणीच्या फेकी, टीकेची झोड उठवली, लेखणीची करवत चालवली, कडक व भडक विधानांनीं भरलेली.

टीका (ढोंगी) : : लेखकाविषयीं प्रेमाचा पघळ पान्हा, भलतीच प्रांजल टीका ! कवीस घाऊक सल्ला दिला आहे, वाजवीपेक्षां फाजील प्रकाश टाकला आहे, फाटकें स्तवन, काजळलेलें वर्णन, मल्लीनाथी, केवळ समर्थनवादी, जीवघेणी क्रूर थट्टा केली आहे, हेत्वारोप व अन्याय्य दोषारोप केले आहेत,

दुटप्पी धोरणाची— उडाला तर कावळा बुडाला तर बेडूक म्हणणारें हे ! एका बाजूला मिरची इतकें तिखट व दुसऱ्या बाजूला मधाइतकें गोड.

टीका (दोषदृक्) : : स्वत:ला नामवंत समजाणारे समीक्षक हे सुंदरीच्या मुखावरील तिळावर सूक्ष्मदर्शक यंत्र ठेवून म्हणतील कीं ही हबशीण आहे.

टीका (वाईट) : : थोडे मुद्दे जास्त गुद्दे ! हे शेरे नव्हेत ताशेरे, अतिव्याप्तीचा दोष, तर्कटी अकांडतांडव, बुद्धया धूळफेक, तेढा अर्थ लावून केलेली, एकांगी व पूर्वग्रहदूषित, तर्कदुष्ट व हेतुप्रेरित, अचाट बुद्धिमत्तेचें अफाट प्रदर्शन, मंडनापेक्षां खंडनाकडे वळते, एका बाजूस झुकलेली, सत्यापलाप केला आहे मांगल्याची विटंबना, सज्जनांची टवाळी, दोषदर्शी विवेचन, कावळ्यासारखी पंगुत्वावर टोच, शिव्यांची सरबत्ती, किरकोळ दोष मोठा करून दाखवला आहे.

टीकाकार (वाईट) : : आडांतील बेडूक, दोषदृक् कावळे, कुइकुई करणारे कोल्हे, खंवट खोबरें, भों भों करणारे चार उभे झाले, घूत्कार करणारीं घुबडें, दोन्ही डगऱ्यांवर हात ठेवणारीं वटवाघुळें, चिंतातुर जंतु, कलुषित, एकांगी, फाजील चिकित्सेखोर, पढिक, संयमाचें वावडें असलेले टीकाकार, यांची दृष्टि कावळ्याची; वृत्ति लांडग्याची; बुद्धि गाढवाची व दांत सापाचे.

ढुमणें : : पिरपीर, लकडा, भुणभूण, सारखा झक्कू, सतत घोकतेय हें करा तें करा ! मागें ही पीडा, मागची कटकट.

ठार (झाले) : : धारातीर्थी पतन पावले, युद्धांत कामीं आले, जखमांनीं शेवट/ झाला, सांथीस बळी पडले, त्यांचें शिरकाण झालें, मुंडकीं उडालीं, जिवाची दोरी तुटली, घटका भरली, मुडदे पडले, खून झाले, महाघोर मृत्यु झाला, मृत्यूच्या खाईत पडले, जलसमाधि मिळाली, शंभरी भरली, संपले, खतम झाले, जिवास मुकले, प्राण घेतले गेले.

डाग : : पट्टा, व्रण, तीळ, धब्बा, ठिपका, कलंक, खूण, खाडा, चट्टा, शिंतोडा, ओरखडा, बुट्टा, शिडकाव, चिखलाचें नक्षीकाम, काळसर भाग, तुळशीचें पान, धूसर भाग, ओशट जागा, धांवती रेषा, बोट-ठसा, हात-ठसा.

डोळे (युवतीचे) : : टपोरे–लाजाळू–बदामी–भित्रट–वात्रट–खेळकर डोळे, नेत्रांचीं कृष्ण-कमळें, करवंदासारखे डोळे, नयनांबुजें, आयत नेत्र,

कमल-नयन, सुलोचन, हंसरे डोळे, डोळे हंसले, मृगलोचनेचे नेत्रकटाक्ष, दृष्टींत आव्हान, नयनांतला लोभसवाणा भाव.

डोंगर : : अचल, पर्वत, भूधर, अद्रि, टेकडी, टेकाड, डोंगरमाथा, पहाड, घाटमाथा, उंचवटा, चट्टान, पठार, उन्नत भूप्रदेश, कडेकपारी, उघडेवाघड डोंगर, निळसर भूधर, उभा सुळका. बोडकीं टेकाडें, उत्तुंग पर्वतराजि, मस्तक उंचावणारे डोंगरमाथे, अस्ताचल, डोंगरांची चिंचोळी सोंड, खडकाळ डोंगराळ भाग.

ढग : : अभ्र, मळभ, मेघ, पयोधर, जलद, हस्तिसदृश मेघमाला, आकाशांतला हा पिंजलेला कापूस, आकाशांत ढग जमले, आभाळ ढगांनीं भरून गेलें, मेघ भरून आले, अभ्रांची काळोखी आली, वर ढगांची धांवपळ सुरू झाली, अभ्राच्छादित दिशा, ढग आकाशांत गर्दी करूं लागले, क्षितिजावर काळेसावळे ढग अवतरूं लागले, ढग धरित्री फुलवितात—शेतें हिरवीगार करतात—जगाला जीवन देतात.

ढोंग : : केवळ थोतांड, रिकामा डौल, मायावीपणा, आव आणणें, दंभ, दांभिक संपादणी, वरकरणीपणा, बतावणी, खोटा बर्ताव, नुसता आविर्भाव, मानभावीपणा, उसनें अवसान, कपाळाला आठी आणि तोंडाला मिठी ! बोलणीं हिताचीं करणी कसाबाची, जितके मोठे तितके खोटे, दुसऱ्याचें नांव आपलें गांव.

ढोंगी : : दांभिक, हे लोक मनाच्या चोरकप्प्याची किल्ली कधीं कोणाच्या हातीं देत नाहींत, यांच्या आचारांत व विचारांत मोठी तफावत असते, आपला हेतु गुलदस्तांत ठेवतात, यांच्या व्यवहारांत प्रकट न करण्यासारखें रहस्य असतेंच, त्यांच्या मनाचा अंत लागत नाहीं, पक्का आंतल्या गांठीचा, या झोपेचें सोंग करणाऱ्यांना कोण उठवील ! करून सवरून दाखवतील कीं आपण त्या गांवचेच जणूं नव्हेत, जाणूनबुजून दुर्लक्ष करून आव आणतील विसरल्याचा, वर निःसंग पण चार-चौघांसारखे चापून जेवतात कीं ! बोलण्याशीं विसंगत आचरण, सर्व गोष्टींत यांचे मोठे हेतु व 'पोट-हेतु' पण असतात.

बोभाटा झालेल्या माणसांचीं नांवें ऐकतांच हे फाजील संभावित लोक तीं नांवें तोंडांत आल्यास चूळ भरल्याचा आविर्भाव आणतात.

तडजोड : : हात-मिळवणी, कांहीं देवाण-घेवाण, सुवर्णमध्य गांठणें, अर्ध्या वाटेवर भेट, तत्त्वांना व मागण्यांना थोडी मुरड घालणें, वाटाघाटींनीं निर्णय घेण्याची वृत्ती बाणविणें. कांहीं तुझें कांहीं माझें, अर्धं त्यजति पंडितः, दुसऱ्याचा नूर व आपली कुवत पाहून मिळतें घेणें, फिफ्टी फिफ्टीवर वाद तोडण्याची तयारी, आपलेंही कांहीं सोडणें, तुझें कांहीं मान्य अशी वृत्ति, विरुद्ध टोंकांचा समन्वय साधणें, भाकरी अर्धी मोडणें, कांहीं तुला कांही मला, नीतींत ध्येयांत व व्यवहारांत सुंदर समझोता करविणें, वेळीं कर्तव्यांनाही मुरड घालणें, थोडा आवश्यक लवचिकपणा स्वीकारून बाजू सावरणें, विरुद्धांची सांगड घालणें.

तडाखा : : वार, झटका, हिसडा, रट्टा, टोला, झपाटा, फटकारा, दणका, लाथ, थप्पड, चापट, ठोस, धडक, मार, फटका, घाव, बुक्का, खोंच, आघात, धक्का, रामरट्टा, रामटोला, हिसका, गुद्दा.

तफावत : : फरक, वैधर्म्य, भिन्नता, वेगळें असणें, अंतर, मेळ न बसणें, ताळा न जमणें, बेरजा चुकणें, मोठें भगदाड आहे दोघांत, टोकें मिळत नाहींत, कोठें हे कोठें ते! काल एक बोलला आज दुसरें, सांगण्यांत तीन तऱ्हा, याचे आंकडे वेगवेगळे आहेत.

तयारी : : सिद्धता, तरतूद, आगाऊ व्यवस्था, आधींचा प्रचार, जमीन खणून बेणणें, पाया भरणें, चौकट उभारणें, काढा उकळून ठेवणें, साधन-सामुग्री जमविणें, शिजवून तयार ठेवणें, पूर्व-तयारी, मांडामांड करणें, पूर्व-सूचना देणें, तंबू उभारणें, उबवून ठेवणें, जमवाजमव करणें, लंगोट—चड्डी चढविली आहे, तवा तापविला आहे, जाळें लावून झालें; शिकार येण्याचीच काय ती वाट! शिट्टी फुंकायाचाच काय तो अवकाश, पुरेसें भांडवल उभें केलें आहे, कच्चा माल साठविला आहे, नांगर जुंपला आहे, नांगरट संपली, कुदळ—फावडें यांचें काम झालें आहे, सिग्नल देऊन झाला, पाया पक्का केला, पाऊल रोवलें, तंबोरा लावला आहे, बॅंड-वाजंत्रीं सांगून झालीं, चंबू-गवाळें बांधून तयार, अनेक रंगीत तालमी झाडल्या आहेत, कच्चा खर्डा लिहून तयार झाला आहे, अभ्यास पुरा झाला.

तरुण (छटेल) : : छानछोकी, छचोर, छाकटा, रंगेल चंडोल, चटोर,

चहाडबुचका, हुंगे भुंगे, रोड-रोमिओ, फुकटे फक्कडराव, मपकेबाज;पोषाख, शंभर टक्के गुलहौशी, प्रेम-पंढरीचा वारकरी, कोठें जरा सौंदर्य दिसेल तिथें चिकटायला येणारा मुंगळा, बचकभर हंसणें एवढ्याशानें; फकाफका सिगारेट ओढीत उभें राहणें असें एकूण ध्यान, तो आला आहे हें सेंटवरून अर्ध्या फर्लांगावरून ओळखावें.

तरुणी (छटेल) : : चटोर, थिल्लर, ती पुरुषांच्या वाह्यात संभाषणांत रस घेण्यास शिकली होती, हें पाणी निराळेंच आहे, काय तऱ्हातऱ्हा करते! निव्वळ मौजमजेची भोक्ती, हिला लाज-विनय यांचा संपर्कहि झालेला दिसत नाहीं! नलगे नलगे बळेंच बिलगे अशापैकीं, अशी नतद्रष्ट पोर, चंचल अस्थिर व थिल्लर, सर्वांना पुरेवाट केली उच्छृंखल वृत्तीनें! फुलपांखरांसारखी वागते, भलतेंच टीपेंत काम आहे, भुलावण्या दाखविण्यांत पटाईत, छचोर आणि स्वच्छंदी मुलगी, डोळे मोडत, लाडिक झोंबाझोंबी करते, कंबर लचकत लचकत ती गुलछडी बोलत असते, उगाचच भाव खाते, तिची ती लाडेलाडे बोलण्याची लकब व सैल बोलणें.

तरुणी (वर्णन) : : निरभ्र गात्रें, सर्व जेथल्या तेथें व प्रमाणबद्ध, गव्हाळ गोरी, नितंबिनी, सुमध्यमा, तिचें ढोबळ सौंदर्यही मन वेधी, सिंहकटी व गजगामिनी, कमनीय देहयष्टि, सुडौल बांधा, सुंदर तनुयष्टि, गोंडस अंगलट, घट्ट बांधा, ही गोड लांच, बेफाम रूप, हें प्रीतीचें तारूं, नक्षत्रासारखी मुलगी, असीम रूपसंपदा, हें मखमली सुख, लावण्यमंदिरा, नजरांची खंडणी घेत जाणारी, प्रेक्षकांच्या मनांत प्रीतीचीं चोर-पावलें उमटवी, हिचें दर्शन हें दुःखावर उताराच, प्रफुल्लयौवना, तिच्या तनुलतेला यौवनसुलभ भर आला होता, तारुण्याच्या उंबरठ्यावर पदार्पण करणारी.

बांधेसूद हात, भुजलतांची गोलाई व नितळपणा, हंसरे डोळे, चांफेकळीसारखें नाक, गाड वाटोळा चेहरा, केसांच्या दोन सैलसर वेण्या, सुरळीत मुलगी, सुवाच्य चेहरा, आरशासारखें मन चित्तांत उबदार स्वप्नें, हृदयसिंहासनाचा मानकरी शोधणारी, विनयाचें हृद्य झिरझिरीत वस्त्र ल्यालेली, लाजेनें चूर, बुजरी नजर, लाजरी बुजरी शांत व सौम्य, नयनांतला लोभस-

वाणा भाव, देहवीणा हेलकावीत नेत्रांचें शरसंधान करीत निघे, स्मिताची चिथावणी देई.

तर्क : : आडाखा, अंदाज, होरा, कल्पना, अनुमान, कयास, मनाची उडी, मनांत येतें, मन सांगतें, अनुमान धपका, भविष्यकाळांत दृष्टिक्षेप, गोळाबेरीज काढली, विचारांची चाहूल घेतली, मनांतलें ओळखलें, 'ता' वरून ताकभात काढला, सुतानें स्वर्ग गांठला, अचूक हेरलें, असा होरा धांवला, दोन व दोन चार केले, आडाखा बांधला, अजमावलें, निष्कर्ष काढला, पुसट कल्पना केली, एवढ्या आधारावर हें सर्व कवित्व रचलें.

तर्कदुष्टता : : अपसिद्धान्त, गुरवावरून देवतेची योग्यता ठरवायची काय? खोगीर दिसतंय घोडा खाल्ला असला पाहिजे, तर्कट, खोडील निष्कर्ष.

तऱ्हा : : प्रकार, सांचा, ढांचा, नमुना, ढंग, घाटणी, मांडणी, ठेवण, छाप, घर्त, वळण, लकब, पद्धत, दुसरी ढब, भिन्न बनावट, वेगळा घाट, तिसरीच छटा, अन्य मोडणीचे व रंगरूपाचे विविध नमुने, वेगवेगळे छाप, विभिन्न ढांचे, कोणी कसे कोणी कसे! हरप्रकार वेगळा, एक दुसऱ्यासारखा नाहीं, प्रत्येकाची ठेवण वेगळी, तऱ्हेवाईक, नाना प्रकृतींचीं, विविध घडणींचीं, हें कांहीं वेगळेंच!

तलास : : धुंडणें, हेरणें, थांगपत्ता, शोध, हुडकून काढणें, शोधणें, माग काढणें, कोठें मिळतें तें पाहणें, चार ठिकाणीं चौकशी करणें, ठावठिकाणा माहीत करून घेणें, पत्ता लावणें, धुंडाळणें, बारीक रीतीनें पाहणें, मागें कुत्रा लावणें, संबंधाचा छडा लावणें, कारणापर्यंत जाणें, सूक्ष्म निरीक्षण करणें, सूक्ष्म विचारांत शिरणें, घटक ओळखणें, कार्यकारणसंबंध जुळविणें, तळाशीं जाऊन पाहणें, मिळतो का पाहणें, नक्की माहिती मिळविणें, पाठलाग चालविणें, मागावर असणें, मूळ पाहणें, मागमूस काढणें, शहर धुंडून काढा व आणा त्याला.

तळ : : बूड, पाया, चौथरा, खालचा भाग, बैठकीची जागा, जोतें, बुडखा, बैठक, खालचें टोक, पायथा, खोलांतला भाग.

तज्ञ : : जाणकार, विधिज्ञ, तंत्रज्ञ, जाणता, त्यांत विशेष गम्य असणारा, अधिकारी, विशेषतज्ञ, पारंगत, पटु, दर्दी, सखोल अभ्यासू, प्रभुत्व असलेला,

मुरलेला, मुरब्बी, जोडण–तोडण–घडण–सर्वांत तज्ञ, सर्व उड्या–पेंच–डाव जाणणारा, त्याच्या सर्व वाटा माहीत असलेला, चोरकप्प्यांसह सर्व पाहिलेला, त्याचा यांत हात धरील असा कोणी नाहीं, सर्व पैलूंचें–बाजूंचें ज्ञान झालेला, या विषयांतील ज्ञान यांचे पुढें हात जोडून उभें आहे, अशा गोष्टींत पेंवलेला, याचा ताल ठेका सर्व हा जाणतो, सर्व अंगें आत्मसात् केलीं, कांहीं अडलें तर यांना विचारा, यांना यांतलें कांहीं सांगायला पाहिजे का ? कला संपूर्णपणें यांना अवगत, म्हणेल तें करून दाखवितां येईल असा.

त्याग : : अस्वीकार, परित्याग, टाकून देणें, कंडम करणें, फेकणें, मोडींत काढणें, आंतून अंग काढून घेणें, वाटेस लावणें, झुरळासारखें झटकणें, जुन्या वहाणेप्रमाणें कोंपऱ्यांत टाकणें, सोडून देणें, दूर करणें, माघारीं लावणें, आल्या वाटेनें परत पिटाळणें, स्वतःला त्यापासून विलग करणें, रद्दींत टाकणें, साभार परत करणें.

त्रास : : भोग, श्रम, क्लेश, झंझट, खटपट, उच्छाद, ताप, पीडा, उपाधी, खटाटोप, हें गजकर्ण, ब्याद, झक्कू, दुरवस्था, हाल, लकडा, भगभग, शुक्लकाष्ठ, भुणभूण, पिरपीर, हें झेंगट, बळजोरी, तसदी, तोशीस, शरीरपीडा, भणभण, सतावणें, पिच्छा पुरविणें, नको करणें, नसतें ओझें, फुकाचा व्याप, लष्कराच्या भाकऱ्या, मनस्ताप, उगाच पाय तापवून घेतले, गंडस्थ उपरि पीटिका, एकाचा रोग अवघ्यांचा भोग, घोडी कामासाठीं; शिंगरूं उगाच बरोबर धांवतें, अक्काबाईच्या म्हशी आणि बकाबाईस उठाबशी.

ताठ : : ताठर, टणक, कडक, नुसती कांब, सरळसोट, भक्कम, न लवणारा, लवचिक नव्हे, मोडेल पण वांकणार नाहीं, सडेसोट, कोठें वांक नाहीं, राजाभाई टॉवर सारखा उभा.

तात्पर्य : : आशय, संदेश, सार, भावार्थ, तथ्यांश, बोध, सारांश, मथितार्थ, गोषवारा, ध्वन्यर्थ, सूचितार्थ, थोडक्यांत गोळाबेरीज, काय म्हणावयाचें आहे तें, ग्रथित नीतितत्त्व, घ्यावयाचा धडा, थोडक्यांत अर्थ, सांगण्याचें सूत्र, लेखांतला ध्वनि, लेखकाचा सल्ला, लेखनहेतु, त्यांतील सूत्र.

तापट : : फट् म्हणतां ब्रह्महत्या व्हायची! कोपिष्ट आणि धारदार भावनेचा, तापट व हेकेखोर, चिडका बिब्बा, पित्तप्रकृति, जमदग्नीचा

अवतार, रागीट पण तितकाच प्रेमळ, तिच्या आक्रस्ताळेपणाला सीमा नाहीं, रक्तांत अतोनात संताप.

तारतम्य : : लहान-मोठें ओळखणें, दह्यांतूनच ताक व लोणी निघतें; पण तीं दोन्ही एका मोलानें मागूं नयेत, हिरा व गारगोटी समान लेखूं नयेत जरी तीं पृथ्वीच्या पोटांतच जन्मतात, जमीन काळी मध्यम कनिष्ठ असेल त्याप्रमाणें कसावी लागते, ज्याचा जसा अधिकार असेल तसा त्याला उपदेश करावा, जेवढें ओझें तो साहील तेवढेंच द्यावें.

तारुण्य : : यौवन, जवानी, ऐन उमेद, ज्वानी, विशी-पंचविशीचें वय, कोवळें वय, उमेदीचें वय, जीवनाची मध्यान्ह, उमलत्या जीवनाचा काळ, सळसळणाऱ्या रक्ताचें वय, विषयासक्ततेचीं वर्षें–कालांश, उमडती जवानी, ऐन उमेदीचीं वर्षें, मोरपंखी कल्पनांनीं फुलविलेला जीवनकाळ, जेव्हां स्वप्नांचा सडा पडतो तो काल, ज्या काळांत भावनात्मक क्षुधा मोठी असते, मन सौंदर्य-पिपासु असतें, एक मुलायम स्वप्न, स्वप्निल कालखंड, कांहींहि घातलें तरी शोभून दिसेल असें वय, जीवनांतील मादक भर्जरी सौख्याचे दिवस, गाफील क्षण, तारुण्यांत सारीं सौंदर्यें रमणी-रूपानें प्रतीत होत असतात. युवतिदर्शनानें सारें भाव-विश्व हादरून निघण्याचें वय.

तिरसट : : तिरकस वृत्तीचा, तिरशिंगराव, तिस्मारखान, चिडखोर, तापट, तामसी, पित्तप्रकोप होतो, रागीट, कुत्र्याचें मूत, प्रकृतीचा पापड केव्हांच वांकडा होतो, पिरपिरा, तुसडा, तऱ्हेवाईक, तिरपाकडा, एककल्ली, कुत्र्याचें शेपूट वांकडें तें वांकडेंच ! लहरी, खत्रूड.

तीव्र : : कडक, झणझणीत, सणसणीत, जहाल, भडक, धारदार, टोंकदार, बोंचक, भडकीलें, खोल, लागट, जहरी. खरमरीत, असह्य, वरच्या पट्टीचें, कर्कश, खरखरीत, कांटेरी, अणकुचीदार, पाजळलेलें, तल्लख, पाणीदार, तेज, कापील अशी वस्तु, निखरपातें. ही बोंच असह्य आहे, हें दुःख हृदय चिरीत जातें, सणसणीत उत्तर मिळालें, भडक विधानें, धारदार सुरी, बोंचक उद्गार, भडकीला थाट, खोल पीडा, लागट प्रत्युत्तर, तल्लख बुद्धि, जिभेचें निखरपातें, जहरी फूत्कार, कर्कश किंकाळी, कांटेरी वाट,

तुकडा : : खंड, अंश, भाग, विभाग, कांड, पेर, फाळका, काप,

मणका, फांटा, कामटी, खांड, काप, चिटोरें, टीचभर तुकडा, कातळा, धांदोटी, चिरोटी, चिंधूक चिरटोळी, पाकळी, पाळें, टोंक, पट्टा, पट्टी, पाट, दुवा, अयन, कला, सर्ग, प्रकरण, टिकली, ढलपी, टक्का, ठिकरी, खापरी, कस्पट, टोला, थोटूक, बुडखा, कळपा, ठिगळ, चतकोर.

तुटक : : जेवढ्यास तेवढें वागूं लागला, कोणाशीं रहस्य नाहीं, आपल्या-आपल्यांतच राहतो, शब्दास शब्द; इतकेंच, बोलण्यांत कुठें तरी चटकन कापून टाकतो, स्वतःतच रमणारा, शेजाऱ्यांत याला रहस्य नाहीं, जगावेगळें याचें जग, यांची जग जोडण्याची वृत्ति नाहीं, दहा शब्द बोलावे तर हा एक शब्द बोलणार ! कोणाला जवळ येऊं देणार नाहीं, तुसडें वागणें, स्वतःला जाणूनबुजून अलग ठेवतो, चार-चौघांत मिसळत नाहीं, अधेंमधें घळईनीं बाजूला पडले आहेत, जोडणारा पूल नाहीं, अलग अलग वसलेले, एकमेकांत संबंध थोडा, बाजूला पडललें.

तुरळक : : मधून मधून, अपवादादाखल, अगदीं हाताच्या बोटांवर मोजण्याइतकें, सटीसामासीं दिसणारें, इन मिन सव्वातीन, अगदीं अल्प, कोठें आहे कोठें नाहीं, नांवाला, उगीच, केव्हां तरी, क्वचित्.

तृप्ति : : समाधान, इच्छा केली तें पावलों, आकंठ तृप्ति, प्राप्तं प्राप्तव्यं दृष्टं दृष्टव्यं, जें हवें तें मिळालें, मनकामना निवाल्या, गड जिंकला, वखवख गेली, वासना शमल्या, आतां इच्छा उरली नाहीं, हांव संपली, प्यास बुझाली, तृप्तीच्या ढेकरा देत, संतुष्टता आली.

तेजस्वी : : चमकदार, चकचकीत, चकाकी असलेलें, चमचमणारें, चकाकीत, चकचकणारें, ओजस्वी, ओजयुक्त, तेजोमय, तेजःपुंज, तेजदार, कांतिमान्, पाणीदार, झगझगीत, लखलखीत, झगमगणारें, झळाळी असलेलें, लुकलुकीत, प्रकाशयुक्त, प्रकाशमान, डोळे दिपविणारें, लुकलुकणारें दीप्तियुक्त, किरणोत्सर्गी.

तेजहीन : : मलिन, गढूळ, ओपट, ओशट, मातट, मळकट, कळकट, मवाळ, ढगाळ, अभ्राच्छादित, गंजलेलें, काळोखीचें, काळवंडलेलें, कळाहीन, चकाकी गेलेलें, ओजहीन, तेजविहीन, प्रेतकळा आलेलें, पारोसें दिसणारें, रंग उडालेलें, लकाकी लोपलेलें, धुवट-गोरें, खापरतोंडें.

तोचतोचपणा (वाङ्मयीन) : : ठराविक, तोच तोच मालमसाला, साचेबंद कथा, उष्ट्या उपमा, वापरून चोळवटलेलें कथानक, अनेकदां वापरून चोथा झालेले प्रसंग व उपमा, शिळे विषय, नवोन्मेषांचा अभाव, कांहींच वेगळेंपण नाहीं, त्याच तोंडवळ्याच्या कल्पना, वापरून गुळगुळीत झालेले शब्दप्रयोग, अति परिचयानें बोथट झालेल वाक्प्रयोग.

तोतया : : बनावट, खोटा, दुसऱ्याचें सोंग घेणारा, फसवायच्या हेतूनें दुसऱ्याची भूमिका वठवणारा, आपण दुसरा कोणी आहों असें भासविणारा, भिन्न व्यक्तिमत्त्व धारण करणारा, दुसऱ्याचें कातडें पांघरून वावरणारा, दुसराच कोणी म्हणून वेळ मारून नेणारा, खोटा पार्ट करणारा, कमअस्सलानें अस्सलाची नक्कल.

थाप : : बंडलबाजी, असत्य भाषण, लांब लांब बाता, लोणकढी देणें, शब्दांच्या वावड्या उडविणें, शब्दजंजाळांत गुंतविणें, खोटें सांगणें, बनवाबनवीचा प्रकार, शब्दांची घसरगुंडी, गप्प झोकणें, शब्दजाल, शब्दांची फेंकाफेंकी, बगलेंतली काढून देणें, मीठ लावून सांगणें, कांहीं तरी गुलाबी कथा सांगणें, तोंडास येईल तें ठोकून देणें, फुगवून सांगतो, उचलली जीभ लावली टाळ्याला, एकाचे एकवीस करून वर शून्य देतील हे ! देणग्या देऊं करतात; देत नाहींत, गर्जेल तो पडेल काय ? बोलण्यांत पूर्ण शंभर टक्के भंपकबाजी, नुसती फेकाफेकी, सत्याच्या काटकसरीचा प्रकार दिसतोय ! गप्प दिली, त्यांत चिमूटभर सत्य आणि मूठभर तिखट-मीठ आहे.

थेट : : तडक, न थांबतां, सरळ-सरळ, आड वाटेला न जातां, पार, मध्यस्थाविना, आरपार, टोंक गांठणारें, थ्रू, मध्यें स्टेशनें घेत नाहीं.

थोडें : : इवलेंसें, तिळमात्र, बारीकसारिक, नांवाला आहे, लवलेशहि नाहीं, केवळ शेषांश, लेशमात्र, अणुवत् , नाममात्र, नांवाचें, औषधापुरतें, अंशमात्र, सूक्ष्म, थोडकें, विरळा, कांहींसें, ईषन्मात्र, अणुमात्र, छोटें, छोटेखानी, अधुकसें, पुसट, किंचिन्मात्र, जेमतेम, बेतशीरच, क्षुद्र, अत्यल्प, लघु, लघुतम, तोटकें, शपथेला, टिंब–ठिपका–मुंगी–तीळ–नाकपुडी–नया–पैसा–नख–टिकली किंवा कण यांएवढेंच, चिमूट–मूठ–चमचा–चुळका–

अथवा शिंपलीभर, आहे कीं नाहीं याची वानवा, म्हणण्यासारखें नाहीं, राहतां राहिलें किती ? बिलकूल म्हणजे अगदींच नाहीं, चिमटींत येईल.

तसें फार नाहीं, आहे आहे नाहीं नाहीं, फूल नाहीं फुलाची पाकळी, जितक्यास तितकें, सूक्ष्मदर्शक यंत्रांतूनच पहावयास पाहिजे, हजारांत एक अंश आहे इतकेंच, सुईच्या अग्रावर राहील इतकेंच, केवळ शास्त्रापुरतें, फारसें नाहीं, एवढें-तेवढें, तसूभर, रेसभर, अति विरळ माया, कोसट देशभक्ति, माफक सहानुभूति, अंमळ थकलों, अणुमात्र, दिक्कत, लेशमात्र झोप, रतिभर सुद्धां विकार, एवढीशीहि अक्कल नाहीं, धड पाहिलें देखील नाहीं, टीचभर भरारी, काडीमात्र फरक, ह्यांत काय मोठेंसें ? रुमाल तो काय नी त्याची किंमत ती काय ? अगदीं कोठें म्हटल्या कोठें दिसत नाहीं, चमचाभर ज्ञान, मर्जीबाहेर एक दोरीभरहि.

थोर (व्यक्ति) : : मोठा माणूस, लोकोत्तर पुढारी, हुकुमी वक्ता, लोकमान्य नेता, लोकधुरीण, जगद्वंद्य, साधु पुरुष, हुकुमी एक्का, एक अमोघ शक्ति, राष्ट्राचें भूषण, थोर परंपरेचे जागली, वादातीत मोठेपणा, गगनाप्रमाणें विशाल मन, सागराप्रमाणें अपार दयालुत्व, अलौकिक व्यक्तिमत्त्व, निःसीम माहात्म्य, राष्ट्राला ललामभूत, समाजांत असाधारण स्थान, सकलगुणोपेत, मनाचा मोठा, हृदयाचा मृदु, कर्तव्यांत कठोर.

थंड : : गार गार, गारेगार, गारढोण, गारठलेलें, शीतल, सर्द, थंडावलेलें, बर्फासारखें-कालासारखें-प्रेतासारखें थड, हिमशीतल, शहारे आणील इतकें थंड.

थंडी : : शीत, शैत्य, गारवा, थंडावा, गारठा, सर्दी, जाडा, ठंडक, शीतलता, गारपणा, हिंवाळा, थंडथंड, बर्फाळ हवामान, तपमान उतरलें, सर्वत्र गारीगार, थंडीचा कडाका, कडाक्याची थंडी, हवेंत गारवा, सारें थंड-गारठलेलें, थंडीची. लाट कोसळली, दहा वाजले तरी उन्हांत दम नव्हता

दम (देणें) : : जिभेला डाग देईन माहीत आहे ! तोंड सांभाळून बोलत जा, रट्टा लगावला तर पाणी मागूं देणार नाहीं, पाय कलम करीन पुढें सरसावलास तर ! बायकोचें कुंकू पुसून या, जीभ हांसडून काढीन,

गांठ आहे तुमच्या डोक्याची आणि माझ्या लाठीच्या टोकाची, घरादारावरून गाढवाचा नांगर फिरेल, होतास कीं नव्हतास करून टाकतों, बच्चंजी सांभाळून रहा, कर तर खरा; मग दाखवितों काय तें ! जीव नकोसा झालाय का तुला ?

दमणें : : थकावट, भागवटा, दमछाक, थकणें, श्रमित होणें, श्रमणें, कांटा ढिला झाला, कढी पातळ झाली, थकून-भागून गेला, कस्त काढली गेली, हा गडी आतां बाद झाला, धाप लागली, गलित-गात्र झाला, आतां जागचें उभें राहणें कठीण, केव्हां पडेनसें झालें आहे.

दयावंत : : कृपाळू, कनवाळू, दयाळू, दयेचा सागर, क्षमाशील, दयाबुद्धि, दीनबंधु, कृपाशील, कुणाचीहि कणव वाटेल असा, दयार्द्र दृष्टीचा, दयासिंधु.

दयास्पद : : करुणास्पद, दयनीय, अनुकंपनीय, फत्तरालाहि पाझर फोडील असे, मन हेलावतें, पाहून मनाला पीळ पडतो, हृदय द्रवतें, करुणा-दया वाटते, सहानुभूति निर्माण होते, कणव उत्पन्न होते, दयेचा पाझर फुटतो, कींव करावीशी वाटते, कसा रे हा असा असें वाटतें, आंतडें तुटतें, दिसतांच डोळ्यांत पाणी तरारतें, साक्षात् दयेला दया उत्पन्न होईल, दयासागर हेलावेल, करुणाजनक, काळीज दुभंग करील अशी, केविलवाणें, त्यास कारुण्याचें मुलायम आवरण आहे.

दर्जेदार : : आदर्श, छान, उत्कृष्ट, उत्तम, झकास, चांगलें, लख्ख, एक नंबरी, स्वर्गीय, प्रथम श्रेणीचें, फर्स्ट् क्लास्, वरचढ, सुरस, सरस, शेलकें, ढंगदार, फर्मास, झक्क, ठेवणींतलें, अस्सल, खानदानी.

दर्शनीय : : नेत्राल्हादकारी, नेत्राल्हादजनक, नेत्रदीपक, सुखदर्शन, नयनरम्य, सुभग-दर्शन, नजरओढू, एकटक पहाल, अनिमिष नेत्रांनीं पहाण्यालायक, दृष्टीला सुखकारक, नजरेखालून घालण्यासारखें, नेत्रविषय होईल असें, नजर खेचील, दृष्टि भारील, बघितल्याशिवाय राहवणार नाहीं, पहावें असें मंजुळ दृश्य, हें लोभस बक्षीस पहातच रहावें ! नेत्रांस मेजवानी, नजर ओढून घेईल, पहावें पहावेंसें वाटणारें, दृष्टीनें प्यावें असें, नजर गार करील.

नेत्रांस तोषवील, काय बिशाद आहे नजर तेथें न खिळेल? नजरेंत भरल्याशिवाय रहात नाहीं, एकवार नजर फिरवालच, नजर अटकविणारें, डोळे चिकटतील तेथें!

दरिद्री : : कफल्लक, निर्धन, भुकेकंगाल, धनहीन, भणंग-भिकारी, हा कोण भडभुंजा? याचक, भिक्षुक, भिकारी, भणंग, गरीब, निष्कांचन, भीकमाग्या, दळभद्री, अंगावर फुटका मणीसुद्धां नाहीं, फुटक्या कपाळाचे, ज्यांचें पोट हातावर आहे, दरिद्रीनारायण, दारिद्याच्या पंकांत रुतलेले, नेहमीं यांचा हात पुढें, खल्वाटो निर्धनः खचित्! लंकेची पार्वती.

दरी : : खोरें, खिंड, घळई, खिंडार, भगदाड, घळण, दऱ्याखोऱ्यांत, समांतर टेकड्यांच्या दुबेळक्यांतला भाग.

दाट : : गाढ, मोठा, निबिड, गच्च, जोराचा, घट्ट, गर्द, जवळ जवळ, निकटचा, घनिष्ठ, जवळचा, दाट शाई, दाट वरण, दाट मैत्री, दाट संभव, दाट वस्ती, दाट झाडी, दाट पानें, दाट रंग, दाट लव, दाट वीण, दाट स्पर्श, दाट संशय, दाट तर्क, दाट आशा, दाट संबंध, दाट नातें, दाट उत्कंठा, दाट हेतु, दाट विश्वास, दाट प्रेम, दाट तर्क, दाट काळोख, दाट अज्ञान, दाट जाळी, दाट डिझाईन, दाट भोकें, दाट पाकळ्या, दाट सैन्य, दाट गर्दी, दाट झुंज, दाट अक्षरें, दाट मोहोर, दाट वेणी, दाट आंब्या, दाट सुरकुत्या, दाट रेघा, दाट धुकें, दाट शेवाळ, दाट गवत, दाट ढग, दाट प्रकाश, दाट घरें, दाट वाहतूक, दाट धूर, दाट कापूस, दाट ठिपके.

दाणगट : : जबरा, धसकट, धसमुसळ्या, धश्चाट, दांडगा, खरखरीत स्वभावाचा, आडवातिडवा, आडमाप, जाड मानेचा, रुंद छातीचा, हाडपेर मजबूत, मस्तवाल, ही स्वारी प्रत्येक गोष्टींतच–बाबतींतच दांडगेश्वर होती.

दारू : : मदिरा, मद्य, सुरा, वारुणी, मद्यार्क, सोमरस, हातभट्टीची, अंमली पेय, बाटली, ओली आग, पेटतें पाणी, नरकाचा सोपान, बुद्धिनाशाचा खास उपाय, ब्रह्मानंदाची वल्ली, भूलोकींचें अमृत, गृहसौख्याचें होमकुंड

दारिद्य : : दैन्य, हलाखी, भुकेकंगाल स्थिति, उलटी अंबारी हातांत, जवळ छदाम नाहीं, उद्यांची वानवा, कफल्लकपणा, अठराविश्वे दारिद्य, विपन्न दशा, हातांवर संसार, नेहमींची परवड, आर्थिक चणचण, खाला-

वलेलें राहणीमान, दांतांवर मारायला पैसा नाहीं ! खिशांत कवडी नाहीं, दोन घास अन्न मिळण्याची भ्रांत, नाण्यांची टंचाई, अन्नाला महाग, पोटापुरतें मिळण्याची वानवा, हातीं नरोटी, उपाशी पोटाला गोळाभर अन्न मिळेना, विष खायला जवळ पैसा नाहीं, पोटाची खळगी कशी भरावी हा प्रश्न

कनवटीला पैसा नाहीं; रुपया कुठला ? हातांत जवळजवळ भिकेची झोळी आली, हातीं नारळाची आई, खर्च आणि मिळकत यांत मेळ घालणें जड जाऊं लागलें, चौपदरी हातीं घ्यावी कीं काय असा प्रसंग आला ! अब्रू उघडी पडली, दुसऱ्याच्या दारीं जाण्याची वेळ आली, आर्थिक समस्या भेडसावूं लागली, मासिक बजेट बसवितां बसवितां अंतर्बाह्य टेकीस आला, त्याच्या घरीं सुखाची हंडी कधीं चुलीवर चढली नाहीं, दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहण्याचा प्रसंग गुदरला, घसरती परिस्थिति, धड अब्रू झाकायला वस्त्रहि मिळत नाहीं वेळेवर.

सारा जन्म पळीपंचपात्र बडविण्यांत गेला, दारिद्र्य पांचवीला पुजलें, आर्थिक दुःस्थितींत खितपत पडला आहे, बापडा जन्मभर सरपटत चालला, हें त्यांनीं बापजन्मीं पाहिलें नसेल, यांच्या उशाला धोंडा व भुकेला कोंडा; दुसरें काय ?

दारिद्र्य (दुष्परिणाम) : : अन्नासाठीं लाचार, दरिद्र्याचें मनोरथ उद्भवतात व नष्ट होतात, पैशाच्या अभावीं सर्व व्यर्थ ! दारिद्र्यदोषो गुणराशि नाशी, परिस्थितीच्या फेऱ्यापुढें माणूस अगतिक होतो, या परिस्थितीनें जीवन सदा आक्रसलेलें, आयुष्य बेचव होऊन जाई, सद्गुण व धनही लुप्त होऊं लागलें, दारिद्र्याच्या खातेऱ्यांत गुण सडतात.

दारिद्र्य (लाचारी) : : गोळाभर अन्नासाठीं टोपलीभर शिव्या खाव्या लागतात, गोठ्यांत निजणारानें बैलाच्या मुताची घाण येते असें म्हणून भागेल काय ? घोड्यावर स्वार होऊन काय जमिनीवरचें गवत खातां येणार आहे ? दरिद्र्यांना दुसऱ्याचें नेहमीं घ्यावें लागतें आणि घेणाऱ्याचा हात नेहमीं खालीं असतो व देणाऱ्याचा वर असतो. भिकेची हंडी शिंक्यास चढत नाहीं, दुधाची तहान ताकावर भागवावी लागते, भूक

कमकुवताला पापांत टाकते, गरीब गाईच्या पाठीवर कुणीही थाप मारावी; चावऱ्या कुत्र्याच्या वाटेस कोण जाणार ? गरिबी येते व लाज जाते, उपकारकर्त्यांला देणार काय ? तर दोन हस्तक तिसरें मस्तक, लक्तरें नेसलेली नग्न लाचारी तोंड उघडूं देत नाहीं, कुंभाराची सून उकिरड्यावर यायचीच, पण हे गरिबीचे कपडेच चहाडखोर; त्यांनीं मत बिघडविलें.

दारिद्र्य (मगरूरी) : : भिकेची भाकरी आणि म्हणे शिळी कां ? हातीं गांठ झोळीची नी इच्छा मात्र पोळीची, भिकाऱ्याला ओकारी फार ! गरिबीचा कुर्रा बिलकूल सहन होत नाहीं.

दांत (युवतीचे) : : ती हंसली की पांढऱ्या शुभ्र बदकांची एक रांगच रांग पाण्यांतून डोकें काढून पाहतांना तिच्या तोंडांत दिसे, तिच्या सुंदर दांतांची पलटण लखलखन् चमकून गेली, कुंदकळ्यांसारखे दांत, रुंदट दातांवर पातळ ओंठ.

दिलजमाई : : मतभेद वितळवून टाकले, पूर्वीची तेढ व दुरावा संपला, आपण-तुपणच्या दुराव्यांतून तुम्ही आम्हीच्या सांकळिकींत आलों, म्हणालों ' मी तुझ्या शब्दाबाहेर नाहीं ', समझोता झाला, किल्मिष गेलें, मनें साफ झालीं.

दिवा (वर्णन) : : अवेळीं लागलेला रस्त्यावरील दिवा अंधाराची वाट पहात कोपऱ्यावर मिणमिणत उभा होता, दिव्यांच्या हिरवळीवर सांडलेल्या उजेडांत, मिणमिणणारी दिवली, कोपऱ्यांत एक कंदील ढणढणत होता, धुरकटलेल्या कांचेच्या आंत ज्योत फडफडत हाती, दिव्याची सूक्ष्म तिरीप, कंदील धूर ओकूं लागला.

दिसणें : : दृष्टीस येणें, नयनांचा विषय होणें, दृष्टोत्पत्तीस येणें, नजरेंत भरणें, पाहण्यांत येणें, दर्शन घडणें, दिसून पडणें, दृष्टिपथांत येणें.

दुखणाईत : : रोगग्रस्त, रोगपीडित, आजारी, रुग्ण, गुप्त रोगानें ग्रासलेला, दुखणेकरी, व्याधीनें पछाडलेला, रोगजर्जर, अंथरुणावर पडून आहे, अंथरूण पकडलें आहे, अंथरूण धरलें, झिजत पडलेला, खंगत चाललेली प्रकृति, तोळामासा प्रकृति.

दुटप्पी : : दुतोंड्या, दुरंगी व दुहेरी, आंत एक बाहेर एक, बाहेर

गोरा आंत काळा, दोन डगरीवर हात, चिमणीबरोबर आणि ससाण्याबरोबरही पळणारा, मनांत एक बाहेर एक, चोराबरोबर चोर व सावाबरोबर साव, एका दगडानें दोन पक्षी मारूं जाणार, तुमच्याशीं मैत्री; शत्रूशीं सूत, तरला तर म्हणणार कावळा बुडाला तर बेडूक, नरो वा कुंजरो वा पंथाचे, साधलें तर पाहणार; नाहीं तर आमची इच्छाच नव्हती म्हणून मोकळे !

दुटप्पीपणा : : पोटांत एक ओठांत दुसरेंच, दुटप्पी व दुतोंडी, उगाच कांगावा, तोंडदेखलें कौतुक, पोकळ वल्गना, खोटा बनाव, नाटकी हातभाव, पैठणी आग्रह, मायावी आश्वासनें, नक्राश्रू, फसवा नखरा, दिखाऊ प्रेम, वरकांतीं गोडी गुलाबी, वरकरणीं हंसणें, बाह्यात्कारी आदरसत्कार, अंदरकी बात दुसरीच, चावावयाचें नि चाटायचें, मनांत एक जनांत एक, दाढी धरून टांचा तुडविणें ! वेड पांघरून पेडगावला जाणें, विचारांत उदार; आचारांत अनुदार, आंतून गट्टी बाहेरून तुट्टी, साप साप म्हणून भुई धोपटतात, एक पाय तळ्यांत एक पाय मळ्यांत, रखवालदारांत मिसळून रखवालदार व चोरांत चोर असा दुतर्फी डाव.

दुपार : : सूर्याचे किंचित कडकलेलें ऊन्ह, कवडशांचे थरथरणारे ठिपके, ऊन्ह पाझरत होतें, कोंवळी दुपार, सूर्य डोक्यावर आला तेव्हां, टळटळीत दुपार, ऊन्ह मी म्हणत होतें, रणरणणाऱ्या उन्हांत, भगवान् सहस्ररश्मि माथ्यावर आला होता, दोन प्रहर झाल्यावर, हिरव्या मखमलीवर खंजीर ठेवावा तशी दुपार दिसत होती.

दुबळा : : नालायक, दुर्बळ, सामर्थ्यहीन, मेंग्या, क्षीणप्रकृति जरत्कारू, पाण्याचें पितर, फुंकर मारला तर उडून जाईल, कमकुवत, जणूं रक्तपिती झाली आहे, क्षयी, दुष्काळांतून निघालेला, पेज्या, फेदरवट्.

दुर्घटना : : दुःखद व धक्का देणारी घटना, मासलेवाईक प्रसंग, अनिष्ट घडामोडी, संतापजनक प्रकार, इकडे कांहीं बरेच वेडेवांकडे प्रकार घडले, अक्काबाईचा फेरा, पंचमहाभूतांचें थैमान, आकाश फाटलें, कोसळणाऱ्या मोठ्या संकटाचे पाय वाजूं लागले.

दुर्दैव : : नशिबाचे भोग, ललाट—लिखितच तसें ! नशिबाचा फेरा, दुर्घटनांचा ससेमिरा, प्रारब्ध; दुसरें काय ! नियतीचें दुष्ट चक्र, फुटकें—खोटें नशिब,

क्रूर ईश्वरी संकेत, परिस्थितीचा भोंवरा, अक्काबाईचा फेरा, दैवाची क्रूर लीला, सारा परिस्थितीचा खेळ आहे, दैवाची वांकडी नजर, नशिबाची कवटीच उलटी लागली! खडतर दुर्दैव, दैवदुर्विलास, अटळ भवितव्य, कपाळींच लिहिलेलें, ही अस्मानी सुलतानी, देवाची मर्जी, ही अशुभ विधि-घटना, अटळ दैवगति, दैवाचा फासा उलटा पडला, दुर्दैव पाठीशीं लागलें, दैवच आडवें आलें, ललाट–रेषाच तशी, अशुभ ग्रहयोगाचा हिसका.

दुर्दैवी : : जीवनांत कित्येक गोष्टींनीं त्याच्याकडे पाठ फिरवली होती, त्याच्या जीवनाचा घडा सदैव पालथाच होता, आयुष्यांतली प्रत्येक महत्त्वाची संधी हुकली, नेहमींच बस् हुकली, मुक्या दुःखांची नि तिची नित्य गांठ, तो जीवन नेहमीं सरपटतच जगला.

दुर्मिळ : : हा कपिलाषष्ठीचा योगच, हजारांत एक, सशाच्या शिंगा-इतकाच दुर्मिळ, त्रिभुवन धुंडाळून न मिळणारें, हें कोणा बहाद्दरानें आजवर पाहिलेलें आहे ? न भूतो न भविष्यति, हे लोक कांहीं आभाळांतून पडत नसतात ! नवस करून सुद्धां मिळणें कठीण, तीन जन्म घ्यावे लागतील यासाठीं, सबंध दुनियेंत औषधालाही मिळण्यासारखा नाहीं, मिळणें दुरापास्त.

दुर्बल-दीन : : ओठांवर आलेलें पोटांत गिळण्याची संवयच होती तिला ! मेलेलें रक्त, डोळ्यांवर कातडें ओढून स्वस्थ बसे, दुबळा, भित्र्या कोंकरा-सारखा अगतिक.

दुर्बोध (ग्रंथ) : : पचनीं पडण्याजोगा नाहीं, ग्रंथ सामान्य वाचकांच्या कक्षेबाहरचा आहे, अगम्य, अनाकलनीय, अर्थबोध होणें कठीण.

दुर्लक्ष : : अनवधान, गैरलक्ष, उपेक्षा, हेळसांड, अनास्था, हयगय, बेपर्वाई, डोळेझांक, मला काय त्याचें ?— ही वृत्ति, काणा–डोळा, ध्यान न देणें, जरा चौकशीही नाहीं, आलों हें कळलेलेंही दिसलें नाहीं, प्रश्न केला पण उत्तर नाहीं, कानांवर पडलें कीं नाहीं कोण जाणें ! पण लक्षांत कोण घेतो ? कोणाची यावर नजर फिरत नाहीं, डोळ्यांवर कातडें ओढणें, डोळ्यांना भात बांधून बसलेत, त्याकडे पाठ वळविली, ऐकलें न ऐकलेंसें केलें.

दुष्कृति : : असदाचार, बेतालपणाचें वर्तन, कुकर्म, अनाचार, पापा-चरण, दुष्ट कर्म, पापी कृत्य, दुर्योधनी आचार, वाईट वागणें, कृष्ण कर्म,

काळें कृत्य, नागडी कृति, निर्लज्ज स्वैराचार, मनमानी वागणें, नृशंस कृत्य, काळी वर्तणूक, दुराचार, कसलें हें वागणें ? बट्टा लावण्यासारखें वागणें, हें शोभतें का यांना ? संस्कृतीस न शोभेसें कृत्य, चांडाळासारखें वागणें, कलुषा कबजीची कृति, दैवानें दिलें कर्मानें नेलें, मेल्यानें असा दावा साधला.

दुष्टपणा : : नागमोडी वर्तनाकरितां प्रसिद्ध, सत्प्रवृत्ति कोळपून निर्माल्यवत् झाल्या होत्या, पश्चात्ताप आणि सज्जनतेचे उठलेले उमाळे दबले गेले, तो म्हणजे दुखावलेला साप ! वैयक्तिक द्वेषबुद्धि वर येई, मानवी मन निर्दयपणाची केवढा कमाल मर्यादा गाठूं शकतें तें दिसलें, कुठें फेडाल हीं पापें चांडाळांनो ! अनन्वित अमानुष रानटी कृत्यें, छळण्यांत पाशवी आनंद घेत.

दुष्प्राप्य : : मिळण्याला कठीण, अवघड, कठीण, टप्प्यापलीकडलें, कोठें ते कोठें आम्हीं ! आवांक्याबाहेरचें, भगीरथ प्रयत्नांनीं मिळालें तर मिळेल, देवांनाही दुर्लभ, दुर्मिळ, हातीं येणें कठीण, प्राप्त होण्याची वानवा, लाभ होणें कठीण, एवढें नशीब शिकंदर नाहीं, तेथें पोहोंचणें कठीण, चटकन् खिशांत पडणार नाहीं, तीं द्राक्षें आंबट आहेत, झोळी पसरून काम होणार नाहीं, परिश्रम-साध्य, दुःसाध्य, जवळजवळ असाध्य, आवांक्या-टप्प्या बाहेरचें, टिटवीला समुद्र, त्यापुढें उद्‌बाहुरिव वामनः

दुराग्रह : : हट्ट, जिद्दीपणा, जिद्द, आपलेंच खरें मानण्याचा कल, बुद्धीवर पूर्वकल्पनांचा चढलेला गंज, गृहीत मतांचें शेवाळें, न सुटणारा मनाचा पीळ, हेकट मनोवृत्ति.

दुरावणें : : मनानें दुरावली, अंतरली, तुटलें मन आणि फुटलें मोती सांधत नाहीं, परकेपणा आला, अंतर पडलें, संबंध तुटले, मध्यें मतभेदांची दरी निर्माण झाली, आत्मीयता गेली, जवळीक लोपली, स्नेहरश्मि तुटले, ओलावा नष्ट झाला.

दुरुस्ती : : टाके घालणें, ठिगळ लावणें, पालिस्तर देणें, जोड देणें, रंगसफेती, डागडुजी, पहिल्यासारखें करणें, मरम्मत, रिपेअर्स्, नेटा देणें, रफू करणें, जरा पॉलिश् मारणें, खाड काढणें, ठाकठीक करणें, सांधे पक्के करणें, भगा लिंपणें, डाग देणें, उजळा देणें.

दुःख : : शरीर-पीडा, व्यथा, शोक, मनस्ताप, अंतःकरणव्यथा,

सुखाचा अंत, आंतरिक दुःख, मनाचा ताप, सुखाचें बाष्पीभवन, व्यस्त-प्रमाणांत आनंद, दारुण यमयातना, आंतल्या आंत तडफडाट, अश्रूंत भिजलेला ऐश्र-आराम, चीर गेलेलें सुख, सुखास खग्रास ग्रहण, मरणप्राय-अपरंपार-डोंगराएवढें-असह्य-तीव्र दुःख, दुःखाचा कडेलोट, दुमजली खेद, अधिक क्षेत्रफळाची पीडा, सुखसंवेदनांची टिकटिक बंद पडली, ही अधिक अश्वशक्तीची खेदभावना, दुःख हाच जीवनाचा गुरुत्वमध्य ठरे, जगून जें प्राप्त केलें त्याचें मोजपात्र दुःखच होतें, ताठा फार वाढूं नये म्हणून दुःख ही संरक्षक झडप सतत काम करीत असते, स्वभावजन्य दुःखाला उपाय नाहीं.

दुःखांत कोण कुणाला पुसतो ? अंधारांत सावलीसुद्धां नाहींशी होते, दुःख चक्रवाढ व्याजानें वाढत जातें, विभागलें कीं दुःखाची आंच कमी होते, जगतांत सर्व सुखी असा कोण आहे ? दुःख नेहमीं पर्वताएवढें असतें हाच संसाराचा नियम, जग हें काडेचिराइताचा एक भला मोठा काढा आहे, हे दिवस फारसे सुखाच गेले नाहीत.

दुःखविह्वल : : दुःखार्त, ब्रह्मांड आठवलें, दुःखानें फाटून गेला, अंतःकरण शतशः विदीर्ण झालें, दुःखांत घोळत-पिचत-शिजत-बुडत राही. दुःखानें जेरीस-टेंकीस आला, अंतःकरणाचे तुकडे झाले, हृदयांत आगीचा डोंब उसळला, हृदयाला शतशः इंगळ्या डसल्या, हा विचार काळजांत चिरत जाई, शोकाचा उमाळा येई, त्या घावानें सुजलेलें मन सुन्न होऊन जाई, दु खाग्नींत भाजून निघाला, मन हळहळलें, जीव होरपळून निघाला, अंतःकरणांत दुःखाचे कढ येत, दुःखाचे असह्य चटके हृदय विदीर्ण करीत, या दुःखाचा उद्रेक स्वस्थ बसूं देईना, या दुःखाच्या धक्क्यानें हतबुद्ध झाला.

अंतःकरण विषादानें भरून गेलें, मनावर दुःखाचे करकोचे पडले, पोटांत तोडत होतें, असह्य मनस्तापाचे बळी, अंतःकरण अगदीं चुरडून टाकल्यासारखें व्यथित झालें, पोटांत कालवून येई, जीव व्याकुळ झाला, पाहून आंतड्याला पीळ पडे व भडभडून येई, जड मनानें परतला, माथ्यावर वज्राघात झाल्यासारखें वाटलें, विषण्ण-दुःखी व सचिंत बसे, डोक्यांत कोणी घण

घालीत आहे असें वाटतें, या वाक्यानें जुन्या दुःखावरची खपली काढली गेली होती, या उद्गारानें त्या दुःखावरच बोट ठेवलें होतें.

हृदयांत कांहीं तरी कांचल्यासारखें होऊन हळूहळू तुटत आहे असा तिला भास होत होता, ते शब्द अंतःकरण जाळीत राहिले, ही अवज्ञा सुईसारखी बोंचली, किनाईन घेतल्यासारखा कडवट चेहरा केला, मनावर दुःखाची सततची सावली पडली.

दूरचा : : दूरस्थित, लांबवरचा, अंतरावरचें, टोकाचें, कुठल्या कुठें ? जवळ नाहीं, साता समुद्रापलीकडलें, दृष्टीच्या टप्प्यापलीकडे, योजनावरचें, मनानेंही न पोंचण्यासारखें, चार समुद्र आणि अर्धी पृथ्वी आड येईल, जवळ का आहे तें ? कोठें हें टोक कोठें तें टोंक ?

दूरदृष्टि : : आगाऊ कल्पना चालवून तयार ठेवणें, पुढचें आतां हेरणें, उद्यांचा अंदाज आज हवा, प्रत्येक तरतूद दुहेरी ठेवणें ही दूरदृष्टि, धनुष्यास दोन नव्हे तीन दोऱ्या असणें जरूर असतें, वाघाच्या शिकारीची तयारी करावी तेव्हां मांजर खास सांपडतें, प्रथमच सर्व निर्लेप सोवळी व्यवस्था करावी, कोणत्याही प्रसंगाला पुरे पडतील अशा योजना केल्या.

देशद्रोही : : हे लोक म्हणजे एक मोठें प्रश्नचिन्ह आहे, पाया पोखरूं पाहतात, बिनधरबंधाचे फुटीर वृत्तीचे लोक, परक्यांचे हस्तक, गुप्तांत गुप्त गोष्टी बाहेर झिरपवतात, दुसऱ्या देशांना दत्तक गेलेले घरबुडवे फितूर लोक, दुसऱ्यांचीं घरें भरनात, राजकीय हितसंबंधांचा बिनदिक्कत सौदा करणारे, पंचम स्तंभीयांच्या कारवाया, अस्तनींतले निखारे, फितुराचें विष रक्तांत भिनलेलें, घरबुडवे, देशद्रोही, संघटनेंतलें खिंडार, सवत्या सुभ्याची मागणी करणारे आत्मघातकी.

देह : : शरीर, काया, आत्म्याचें पांघरूण, हाडामांसाचा गोळा, देहाची ही खोळ, मातीचा हा ओला माठ, संसारसागर तरून जाण्याची ही नाव, धर्मार्थकामांचें हें साधन, जीवाचें घरटें, रक्तमांस-चरबी-चामडी घातलेली ही पिशवी, सर्व साध्यांचें साधन, देहाचें हें घर, वासनांचा जुडगा.

दैव : : प्रारब्ध, नशीब, सद्दी, प्राक्तन, तकदीर, नियति, किस्मत, भाग्य, ईश्वरी सूत्र, विधिघटना, दैवगति, नशिबाचा खेळ, विधिलिखित,

ललाट-लेख, ईश्वरी संकेत, परमेश्वराची अतर्क्य लीला, नशिबाची झाकली मूठ, गाढवभर अकलेपेक्षां रतिभर दैव अधिक असतें ! मनुष्यानें दिलेलें पुरत नाहीं; देवानें दिलेलें सरत नाहीं, हार-जीत कोणाचे स्वाधीन नाहीं, अनंत हस्तें कमलाकर देतो; पण तितकेंच अनंत हस्तें कमलाकरानें नेतां किती रक्षिसी दो करानें असा अनुभव दैव देतें, दैव मोठें लहरी आणि निर्दय आहे; तें एका क्षणांत आकाशांतल्या उल्केला पृथ्वीवरला पाषाण करून सोडतें.

दैववाद : : ईश्वर ठेवील तसें रहावें, ललाटरेषा काय ठरवील तें, ठेविलें नारायणें तैसेंची रहावें, ईश्वरेच्छा बलीयसी, करणी देवाची, दैवांत–भाग्यांत असेल तें खरें ! हे सर्व दैवाचे खेळ आहेत, विधिलिखित कोण बदलणार ? असेल माझा हरी तर देईल खाटल्यावरी, प्रत्येक दाण्यावर खाणाऱ्याचें नांव लिहिलें असतें, प्रत्येकाचा शेर कोठें तरी असतोच, जो पोट देतो तो दाणेही देतो, भगवानाची लीला अगाध आहे, नेमानेमाच्या गोष्टी आहेत या ! दुबळा मानव दैवाचा दास आहे, साखरेचें खाणार त्याला देव देणार, भवितव्य अटळ आहे, होणार तें होई कशास चिंता ? संचित कर्मानें घडतंय हें सर्व, ईश्वरी सूत्रानें घडणाऱ्या गोष्टी आहेत या, देव देतो तेव्हां छत फाडून देतो, दैवांत नसेल त्याला कोण काय करणार ?

दोष (देणें) : : त्याच्या नांवानें कां खडे फोडतोस ? त्याच्यावर ठपका कां ठेवतोस ? त्याला कां दूषण देतोस ? त्याचें खापर गोविंदाच्या डोक्यावर फोडलें, तुझें टेंपर माझ्यावर नको रहायला, उखाळ्या-पाखाळ्या काढण्यांत काय अर्थ आहे ? त्याच्या नांवानें कां बोटें मोडतां ? सर्वांनीं नांवें ठेवलीं– बोल लावला, शोभा करतील माझी ! आतां दादासाहेब किती जोडे मारतील ते मारात.

दोषयुक्त : : कोता, अपुरा, लंगडा, खोड असलेला, कमकुवत, तोटका, आंखूड, उथळ, संकुचित, सदोष.

घडधाकट : : धडाकडा, धट्टाकट्टा, सबल, धट्ट, निरोगी, बळकट, पैलवानी, मल्ल, त्याला काय धाड पडली आहे ? बलभीम, इमारत केवढी

मोठी आहे, फोडला तर दोन होतील! तगडा, आडवें मनगट, याच्या वाटेला कोण जाईल? याला रोखणारा कोण?

धडपड : : सततोद्योग, प्रयत्न, खटाटोप, खटपटी-लटपटी, झटणें, परिश्रम, मेहेनत घेतली, जग पालथें घातलें, करायचें कांही बाकी ठेवलें नाहीं, प्रयत्नांचा पराकाष्ठा केली.

धन (महिमा) : : जंव मोठा चाले धंदा तंव बहीण म्हणे दादा, जन हे सुखाचे दिल्या घेतल्याचे, देण्यास जवळ कांहीं असेल तर सर्व, जोंवरी पैसा तोंवरी बैसा, दाम करी काम.

धन-संचय : : गंगाजळी, पैशाची सांठवण, पै पैसा करून जमा केलेली पुंजी व शिल्लक, कंजूषपणानें कोंडून राहिलेली लक्ष्मी, मख्खीचूसपणा करून जमविलेलें, थेंबें-थेंबें तळें साचे, दहा हजार रुपये तरी मागें टाकले, गांठीला किती आहेत–वांचले–मागें टाकले–बाजूला काढले–उरवले–पेटींत किता?

धन-लोभ : : धनलोलुपता, धनपिपासु, पैशाची प्यास–भूक, बळकट धनेच्छा, कनकाचा मोह, नोटांचें प्रेम, सोन्याचें आकर्षण, पैक्याची हांव, संपत्तीचे भुकेले, सुवर्णाची मोहिनी, नफ्याचे हव्यासी, पैसा पैसा करणारे, धनाची खा खा, अर्थाचे दास, यांची लक्ष्मीभक्ति मोठी, पैशा-अडक्यासाठीं वखवखलेले, कुबेर हें त्यांचें आराध्य–दैवत, संपत्तीच्या मागें लागलेले, लक्ष्मीचे पूजक, गाय जशी आंबोणाकडे धांवते तसे पैशामागें धांवतात, चमडी देगा दमडी नहीं देगा, पैशाचे गुलाम, खोप्यानें पैसा ओढण्याची हांव, जणू घरावर सोन्याचीं कौलें घालायचीं आहेत! माडीवर माडी चढविण्यांत दंग, लक्ष्मी घरांत आणण्यांत पटाईत, मिळेल तेथें ओरबाडून घेण्यांत सराईत, बाईपेक्षां कमाईकडे लक्ष, नवरीपेक्षां डावरीकडे लक्ष! नाण्यांचा खुळखुळ आवाजच प्रथम ऐकू येतो.

धनाढ्यता : : याचकाचा हात खालीं आणि दात्याचा वर असतो, पैसे आले तशीं त्याचे डोळे फिरले, जिच्या घरीं ताक तिचें वरतीं गेलें नाक! जिच्या हातीं नाहीं पाटली तिला सतरंजीखालीं लोटली, निर्धनाला लाथ अन् धनवानाला माथा! लक्ष्मी-पुत्राच्या लहरी, श्रीमंताच्या नाजूक मनाला लवंग या शब्दानेंही उष्णता होते.

धनापहार : : पैशांवर डल्ला मारतात, व्याजासाठीं मुंड्या पिरगळतात, ठेवी गिळंकृत करतात, फंडाची अफरातफर, लांचलुचपतीची–आडमार्गाची मिळकत, विश्वासानें पैसे ठेवावयाला दिले त्याच्या टाळूवरून पार हात फिरवला, गिळलेलें माणिक-मोती, लांडी–लबाडीनें हस्तगत केलेला माल, घर आपल्या नांवावर चढविलें, हरामाचे काळे पैसे, गरिबांचें थेंब थेंब रक्त शोषून मिळविलेले पैसे, पापाची कमाई, घरें धुऊन नेलीं.

धरसोड : : चंचलपणा, कोठेंही स्थिरता नाहीं, आज हें उद्यां तें ! अनिश्चितपणा, दोलाचल वृत्ति, भ्रमर-वृत्ति, एक ना धड भारभार चिंध्या, बारा पारांवरचा मुंजा, थिल्लर वृत्ति.

धर्मग्लानि : : यांचा परलोकापेक्षां इहलोकावरच विश्वास, पाखंडी विचार फोफावले, तत्त्वांना मुरड घालण्याची वृत्ति वाढली, चालू घडी आपली हा दृष्टिकोन, अंतर्मुखतेची ओळख नसलेला समाज, दिवसें-दिवस धर्मश्रद्ध लोक विरळा, धर्मश्रद्धेच्या परंपरेची साखळी तुटली आहे, धर्मग्रंथ यांना जरी कोळून पाजला तरी फुकट ! बुद्धापेक्षां युद्धच पसंत, सब-झूट पंथ वाढला, श्रद्धा रोडावली.

धर्मगुरु : : महंत, संत, फकीर, प्रेषित, साधु, द्रष्टा, महर्षि, ऋषी मुनि, गोसावी, प्रवचनकार, कीर्तनकार, उपाध्याय, भटजी, भटभिक्षुक, याचक, वेदोनारायण, धर्मोपदेशक, पाद्री, देवमूर्ति, आचार्य, शंकराचार्य, महाराज, महामुनि, यति, सिद्ध पुरुष, पुजारी, गुरव, संन्यासी, भिक्षु, भिक्षुणी, धर्ममार्तंड, मुल्ला-मौलवी, काझी, वैदिक कार्ये करणारा

धष्टपुष्ट : : गालावर गाल चढलेत आताशा, बाळसें धरूं लागलाय, आडव्या अंगाचा–काठीचा–बांध्याचा, गलेलठ्ठ, ढेरपोट्या, खादीचें शरीर, लठ्ठंभारती, नुसता मांसाचा गोळा.

ध्यान–धारणा (खोटी) : : यांचें ध्यान तीन तऱ्हेचें— बक-ध्यान, मीन-ध्यान व मार्जार-ध्यान ! गळ्यांत टिळेमाळा पण लक्ष बोचक्यावर, वर भोळा आंत काळा, डोळे मिटलेले पण लक्ष लोण्यावर किंवा बँक अकाउंटवर.

ध्यास : : पुनः आपली विचारांची माळ गुंफूं लागला, तोच तोच

विचार रुंजी घालूं लागला, मनानें घेतलें, ही एकच इच्छा आकांक्षांचा विषय झाली.

ध्येय : : प्राप्तव्य, साध्य, अंतिम हेतु, टप्पा, लक्ष्य, टार्जेट, गांठावयाचें टोंक, पोहोंचावयाचें बंदर, व्ही. टी., जीवन-हेतु, काय मिळवावयाचें तें, उद्दिष्ट्हेतु, अंतर्यामींची इष्ट-देवता, जावयाचें तीर्थक्षेत्र, बद्रीकेदार, ज्या क्षितीला धांवत जाऊन छाती लावायची ती, इष्ट हेतु, मनांत ठरलेलें, वांछित, मनोवांछित.

ध्येयप्राप्ति : : कल्पना फलद्रूप होण्याच्या मार्गांत आली, श्रमसाफल्याचा निःश्वास सांडला, कृतकृत्य झालों. इच्छा केली तें पावलों, कृतं कर्तव्यं प्राप्तं प्राप्तव्यं, जीवन कृतार्थ झालें, मनकामना तृप्त झाल्या, जीवन-हेतु सफल झाला, अखेर साधला, शिखर गांठलें.

ध्येयवाद : : दूरवरचीं क्षितिजें हेरणें, आदर्शवाद, आदर्श जीवनवाद, अभ्युदयाचा विचार, उद्यांचीं सोनेरी स्वप्नें, सुनहरी स्वप्नें, महत्त्वाकांक्षेनें उजळलेलें मन, उंच भरारी, सत्यं शिवं सुंदरचें दर्शन घेऊं इच्छिणें, आकाशाला गवसणी घालण्याची ईर्षा, कल्पना-वारूवरून दूरदूर उड्डाण, सूर्यापर्यंत जाऊन पोंचण्याच्या इच्छा, आकांक्षेच्या उड्या, उद्यांच्या जगांत वावरणें, हीं उद्दिष्टें उरापोटाशीं लहानपणापासून घट्ट धरून ठेवलीं होतीं ! बेत नी शेत सारखींच; पीक पदरांत पडेल तव्हांच खरें, आकाशींच्या चांदणीला खुडून आणण्याची खोटी मनीषा, कावळा होऊन हजार वर्षें जगण्यापेक्षां ध्येयवादानें उजळलेलें कांहीं वर्षांचें जीवन चांगलें, ध्येयाशिवाय जीवन म्हणजे सुगंधहीन पुष्प.

ध्येयहीनता : : सुकाणू-विना तारूं, दिशाहीन व ध्येयहीन, जीवनाच्या सर्व अंगांना व्यापाराचें रूप आलें आहे, जीवनाचा बौद्धिक व आत्मिक कणा शिल्लक राहिला नाहीं, सदभिरुचि व सदाचार राखण्याबद्दल सार्वजनिक औदासीन्य, कर्तव्यापासून च्युत, विरुद्ध तत्त्वांशीं व गटांशीं लगट, वाटेल त्या पक्षाशीं हात-मिळवणी करण्याची तयारी, विरोधी पक्षांशीं चुंबाचुंबी सत्तारूढ पक्षाचे झांजावालेच पुष्कळ !

ध्वन्यर्थवादी (नांवें) **: :** तिडमिडे किडमिडे अ‍ॅन्ड् सन्स् , फुकटमल

बुडवानी, दोंदे पोंदे पोंक्षे आणि कं०, माथेरान हेअर कटिंग सलून, सावळाराम गोंधळेकर आणि कं०, ढब्बू पिल्लू आणि बंधू, घरफोडे डोईफोडे आणि मंडळी, मिस् सोनामुखी, दे. भ. धोकाराम, श्रीखंडे लोखंडे भातखडे आणि कंपनी, गायतोंडे गायधनी आणि मित्र.

धाडस : : धैर्य, धिट्टकलेपणा, जिवाचा धडा करून, मनाचा हिय्या करून, साहस, धिटाई, शौर्य, वीर्य, शूरपणा, बेडरपणा, वीरकृत्य, अडग वागणूक, वीरश्री दाखवली, साहसे श्रीः, धाडसाला लक्ष्मी वश, दर्यांत तारूं लोटलें आहे; कुठें लागेल तिथें लागेल, छातीचा व्यापार.

धीट : : धृष्ट, बेडर, अडर, निडर, न खचणारा, निर्भय, धिटकुला, शूर, छातीठोक, धाडसी, बेधडक, मर्दानी, धीटाचा, निधड्या छातीचा, खंबीर, धीरोदात्त, कच न खाणारा, बेफिकीर, धैर्याचा बिनघोर मेरू, अडग धैर्याचा, जवळ हिंमतीचा अलोट खजिना होता, मूर्तिमंत धीटपणा, तिजोरीसारखा माझ्यापुढं उभा होता ! हिंमत व साहस जबर, आपत्तींची तमा न बाळगतां, सरळ सांगेल बचेंगे तो और भी लढेंगे, धीर सो गंभीर.

धुकें : : धुक्याचें पांघरूण, दंवाचें चमचमणारें माणिक-मोतीं, पहांटेचे दंवकण–दहिंवर डंवरलें, धुक्याचा पातळ पापुद्रा.

धोका : : भय, जोखीम, बांका प्रसंग, विस्तवाशीं खेळ, आणीबाणीची वेळ, जिवावर बेतण्याची वेळ, संकटकाळ, जिवावरचा प्रसंग, प्राणसंकट, काळरात्र, वैऱ्याची रात्र, अंगावर शेकण्याचा संभव, नुकसानीची शक्यता, नसती तोहमत, वाटे संसर्ग पोहोचेल कीं काय ? संकट-पिशाच्चाची उलटीं पावलें, संकटाची काळी सावली, केव्हां होईल तें सांगतां येत नाहीं ! दहशतीचें वातावरण, काळपुरुषाच्या जबड्यांत काढलेला काळ, केवळ आजचें मरण उद्यांवर टाकलें, धोका कोठल्या थरावर गेला आहे, संकट पुरतें टळलें नाहीं, काळ आला होता पण वेळ आली नव्हती, सर्वनाशाची शक्यता, फजितीची वेळ.

धोक्याची (परिस्थिति) : : त्रांगडें निर्माण झालें, लष्करी समस्या, बांका प्रसंग, आगींतून निघून फुफाट्यांत ! इकडे आड तिकडे विहीर, डळमळतें आसन, वादळापूर्वीची शांतता, एखादें गांधील माशीचें पोवळें

उठावें तसें, धडगत दिसत नाहीं, शत्रु दंड थोपटून तयार, जीवित व मालमत्ता धोक्यांत आली, गोष्टी या थराला येऊन पोचल्या, तप्त वातावरण.

धोरण : : वागणुकीचा तरीका, पोलिसी, विचारपूर्वक पूर्वकल्पित आचार, साचेबंद वागणूक, इच्छेपेक्षां उपयुक्ततेकडे पाहून वागण्याची दिशा ठरविणें, आधीं ठरून गेल्याप्रमाणें प्रश्न हाताळणें, विशिष्ट आचार-संहितेप्रमाणें प्रश्नाला सामोरें जाणें किंवा बगल देणें, संमत झालेल्या सामूहिक सिद्धान्तांप्रमाणें कृति, आचारविचारांची पूर्वनिश्चित पद्धत, आवड संपली कीं धोरण आलें ! मुळांत सक्ती नसूनहि आवड दाखविणें, पुढें पाहून पाऊल टाकणें, बऱ्या-वाइटाचा विचार करून कृति आरंभिणें, कृतीला लागलेली स्वमताची झालर लपविणें, प्रथमच धोरण ठरलें की मनांत रण माजत नाहीं, उपस्थित समस्येकडे पाहण्याची बुद्धिनिष्ठ तऱ्हा.

धोरणीपणा : : आधीं गुंतूं नये मग कुंथूं नये, पुढच्याच्या ठेचेवरून मागच्यानें शहाणें होणें, पुढें नजर ठेवून चालणें, परिणामांचा अंदाज घेऊन कृति, मनांतलें सर्व न बोलण्याचा संयम.

नकली : : बनावट, खोटें, कमअस्सल, असली नव्हे, दिखाऊ, कृत्रिम, बतावणीचें, खरें नव्हे, पितळ सोनें नव्हे, केवळ दर्शनी, आंत वेगळेंच ! दांभिक, आणलेलें सोंग, वरवर सारखें, १४ कॅरट.

नकल : : उसनवारी, नगास नग आणणें, कल्पना दत्तक घेणें, सही सही तेंच, ऐट उचलणें, त्यांचें पाणी लागलें, मोर नाचला म्हणून लांडोर नाचूं लागते, कार्बन् कॉपीच ही ! हुबहू तेंच, तोच ढांचा, तसूंभर फरक नाहीं, याला काढावा त्याला ठेवावा, तोच नमुना उचलला, तसेंच वागूं लागला.

नकार : : नन्नाचा पाढा वाचला, नकार-घंटा दिला, नकारपक्षीं उत्तर मिळालें, नकारानें संभावना केली, तोडून टाकलें, वाटाण्याच्या अक्षता लावल्या, डावललें, धुडकावलें, तोंडाला पानें पुसलीं, नामंजूर केलें, धिक्कारलें, तुकडा पाडला, मागणी केराच्या टोपलींत टाकली, अस्वीकृति दर्शविली, झिडकारलें, दाराची वाट दाखविली, उद्यांवर टाकलें, म्हणाले

आपण भेटूंच, प्रश्न येतांच मान फिरविली, नव्हे–नको सुरू केलें, संमति राखून ठेवली, अळंटळं केलें, दुसऱ्याकडे बोट दाखवलें.

नकारात्मक उत्तर मिळालें, अव्हेरलें, मूक विरोध केला, मुद्दा टाळला, प्रश्नाला फांटे फोडले, अंग काढून घेतलें, नाट लावला, दार बंद केलें, अर्धचंद्र दिला, फक्त बोलून गार केलें, संमति नाकारली, असहकार दर्शविला व केला, तेवढ्यांत दुसरें काम काढलें, प्रश्नाला वेगळी कलाटणी देऊन मोकळे झाले, चर्चा आंखडती घेतली, करूं पुढें केव्हां तरी म्हणून बाजूला सारलें, अशुभस्य कालहरणम्; दुसरें काय? कशाला होय म्हणतील तर ना? न बोलतां हातांनीं नाहीं म्हटलें, स्पष्ट नकार, वाटाघाटींस टाळें लावलें.

त्यांच्या नाहींचा होय कसा करावा हा प्रश्न आहे! त्याचा नाहीं म्हणजे नाहींच, केवळ भृकुटिभंगानें नकाराची कट्यार खुपसली, संपलें म्हणून सांगितलें, त्यांचें भाषण–प्रभुत्व मोठें–त्याला कोणत्याहि प्रस्तावाला दहा भाषांत नाहीं म्हणतां येतें, भरमसाट दर सांगणें किंवा अटी घालणें हा नाहींचाच एक प्रकार.

नकार (स्त्रीचा) : : स्त्रीचा नकार म्हणजे होकारात्मक नकार, नकारात्मक होकार, नकारात्मक नकार किंवा होकारात्मक होकार कांहींहि समजावें; पण कोणतें केव्हां तें उमगणें कठीण!

नकाशा : : तक्ता, आलेख, आराखडा, बाह्यरेषा, मानचित्र, नमुना, आकृति, प्रमाणचित्र, रेखाचित्र, नक्शा, चार्ट, स्केच् ग्राफ, ब्लूप्रिंट, मॅप्.

नको : : तें तुलाच लखलाभ होवो! यास हात जोडून नमस्कार, फुकट दिलें तरी नको, गरज नाहीं, आमची वांछाच नाहीं, आमच्या कामीं येणार नाहीं, आपल्याकडेच ठवा, परत घेऊन जा, इतर गोष्टींनीं आमची गरज निभेल, तुमच्याशिवाय चालवूं, आम्हांला नाहीं पाहिजे, बस्स! कशाला तें? याची कांहीं आम्ही मागणी केली नाहीं! हें कांहीं आमच्या चौकटींत बसत नाहीं.

नग्नता : : अनावृत अवस्था, अर्धावृत शरीर, दिगंबरावस्था, विवस्त्रता, उघडे अवयव, जन्माला आला त्या अवस्थेंत, अंगप्रत्यंगांचें उघडें दर्शन, वस्त्रहीनता, लाज झाकायला कांहीं नाहीं, नागडेपण, नंगेपण, अंगावर बारकी

लंगोटीहि नाहीं, द्राक्षवेलीचें पानही योग्य जागीं चिकटविलें नाहीं, दिगंबरदर्शन, अर्धस्फुट दर्शन, ' स्ट्रिप् अँड् टीज् ' चा प्रकार.

नदी : : ओढा, नाला, दर्या, झरा, निर्झर ओहोळ, पन्हळ, झरी, झरणी, कालवा, गटार, झिर्पा, पाटा, निर्झरिणी, सरिता, जलौघ, गंगा, पर्वतकन्या, सागरपत्नी.

नपुंसक : : षंढ, शिखंडी, तृतीय-पंथी-प्रकृति, निकामी, नालायक, पुरुष नव्हे, बृहन्नडा, कमी, पावणे-आठ, पूर्ण ' निरुपद्रवी, ' कमजोर, स्त्रीच्या दृष्टया फुकट, बुळा.

नरमला : : पारा–ताठा उतरला, मिजास उतरली, अक्कड गेली, ऐट जिरली, निशाण खालीं केलें, दिमाख संपला, रग जिरली, जोस संपला, टेंव ओसरले, नजर वांकली, भाव खालीं आला, मऊ आला– पडला ! कडकपणा–पूर्वीचा रंग गेला, सातव्या पट्टीवरून पांचव्या पट्टीवर आला, मान जरा खालीं झाली, भाषा बदलली, वांकला, निवला, खचला, विरघळला, सौम्य झाला, जेरीस–वठणीवर–ताळ्यावर आला, भाषा नरम झाली, अभिमानाला सुरुंग लागला, कोमलपणा आला, गर्वहरण झालें, थोडेंफार सौजन्य दिसूं लागलें.

नवरा : : पति, नाथ, घरधनी, कारभारी, कुंकवाचा धनी, मालक, घो, भर्ता, ज्याचे नांवें मंगळसूत्र घातलें तो, मुलांचा बाप, भाकर देणारा, आर्यपुत्र, ' इकडे ' ' हे ' ' मिस्टर '.

नवरा (नालायक) **: :** ही गरम तर तो थंड गोळा, हौसेसाठीं केला वर दिवसा खोकला रात्रीं ज्वर, म्हातारा नवरा गमतीला, केवळ कुंकवाचा आधार, बायकोपुढें शेर, उंबऱ्यांत पाऊल टाकलें कीं गडी ताठरलाच ! बाहेर गोगलगाय नि घरांत कर्दनकाळ, मिळमिळीत सौभाग्य, निरुपद्रवी नवरा मिळाला आहे, स्त्रीलपट–स्त्रीपरायण–स्त्रैण पति.

नव्याचें प्रेम : : जुन्याला लाथा आणि नव्याला माथा, नवें तें हवें म्हणणारा, सुधारणोत्सुक.

नवेपण : : ताजगी, अजून शिक्काही पुसलेला नाहीं, काल वापरायला काढल्यासारखी नव्हाळी, अजून जुन्यांत जमा नाहीं, कोरी करकरीत,

ब्रँड् न्यू, नव्या दमाची, नाविन्यानें नटलेली, अननुभवी, कोऱ्यांतली, कारखान्यांतून आज बाहेर पडलेली, नित्य नवी, नवी झळाळी, पॅकिंग् सोडलें असेल इतकेंच ! पॉलिशही कायम आहे, नांवाला सेकंड् हँड्, या जागेला नवा.

नष्ट करणें : : खिमा करणें, औषधास शिल्लक न ठेवणें, कापून काढणें, पितराच्या भेटीला पाठवणें, भूस पाडणें, गाडून टाकणें, बरबाद करणें, टवका उडविणें, जिवें मारणें, चिरडणें, ठेचणें, सफा करणें.

न्याय : : योग्य तो निवाडा–निर्णय, ज्याचें त्याला देणें, ज्याचें गेलें त्याला भरपाई व जो चुकला त्याला शिक्षा, जगांत कधींच मिळत नाहीं ती गोष्ट मिळवूं पाहणें, कायद्याप्रमाणें वासलात, फैसल्ला, येथें कोणालाही झुकतें माप नाहीं, भल्याबुऱ्यांतून योग्य तो निष्कर्ष काढणें, चुकीचें परिमार्जन करण्याचा प्रयत्न, कोणीही कुरकूर करणार नाहीं अशा रीतीनें झगडा तोडणें, कायद्यांत बसेल तें देणें अथवा देवविणें, हक्काची चोख अंमलबजावणी, अपराध्याला शासन व निरपराध्याला रक्षण, रुजू व योग्य सल्ला सांगणें, कोणती बाजू बरोबर तें ठरविणें, कोठेही बाजू झुकती नाहीं, न्यायाचा धारवाडी कांटा समतोल धरणें, रामशास्त्र्याच्या मुखानें बोलणें.

न्यायबुद्धि : : समतोलपणा, न्यायाचा धारवाडी कांटा, व्यक्तिनिरपेक्ष निर्णय, समतोलपणाचा कांटा अणुमात्र ढळूं दिला नाहीं, प्रति रामशास्त्री प्रभुणे !

न्यून : : मर्मस्थान, बिंग, छिद्र, उणीव, कमीपणा, कमतरता, उणेपणा, येथेंच घोडें पेंड खातें ! दुर्निवार अडचण ती इथेंच आहे, कच्चा दुवा, लंगडी बाजू, थिटेपण.

न्हाणीघर : : हमामखाना, स्नानगृह, बाथरूम, आंघोळीची खोली, अंग धुवायला जागा, जलक्रीडागृह, स्नानासाठीं अडोसा, मोरी, बंदिस्त जागा, उभें लावून घेण्यास जागा.

नाइलाज : : जातों ऽ जातों–काय करतोस ? आलें देवाचिया मना तेथें कोणाचें चालेना, कांहीं करतां येण्यासारखें राहिलें नाहीं, कांहीं मात्रा चालेना, माझ्या हातीं कांहीं राहिलें नाहीं, अक्कल खुंटली, सर्व मार्ग संपले, हवें होतें

म्हणून का हें केलें ? त्यापुढें हात टेकले, बाण हातांतून निसटला होता, तें आतां हातांबाहेर गेलें.

नाखुषी : : आवडीपेक्षां निरुपाय म्हणून, इतराजी, कां ग बाई कुंथली तर बसली जागा रुतली, नाराज, असंतुष्ट, सक्तीची खुषी, मोठ्या मिनतवारीनें कबूल केलें, मी उत्सुक नाहीं, यांनीं माझी मोट बांधली आहे ! मोलें घातलें रडाया, मनांतून नकोच असतें, स्वेच्छेनें नव्हे, मर्जी नसतां, केवळ कर्तव्य म्हणून, अनिच्छेनें, मनांत नापसंत असूनही, स्वतःची इच्छा दुर्लक्षून, मनांत नसतांना, मन मारून, हवें नसतांना, थोड्याफार जबरदस्तीला मान तुकवून, बळजोरीला बळी पडून, जुलमाचा रामराम, बळें बळें, केवळ नाइलाजानें, मारून मुटकून तयार केलें, स्वतःची आवड बाजूला सारून, सक्तीमुळेंच, केवळ उपचार म्हणून, तोंडें वेडींवाकडीं करून, तसें म्हटलें तर पाहिजे होतें कोणाला ?

नाजूक : : नरम, मऊ, सौम्य, मखमली, मोरपंखी, हळुवार, तरल, मृदुल, मृदु, कोमल, व्हेल्व्हेट्–साटिनासारखें मऊ, वेलदोड्यानें सर्दी लवंगेनें उष्णता होईल, हात लावला कीं कोलमडेल, जरा ऊन लागलें कीं लालीलाल ! त्याचा जीव केवढासा ? थोडासाही बदल चटकन् टिपणारें, नाजूक साजूक कोमलांगी.

नाटक (चांगलें) : : ' ही ' गर्दी करून पब्लिक उभें ! बहारदार चाली, गाणीं ठणकावून म्हणत, हरढंगी भूमिका, चित्रपटाचा चवदारपणाहि आहे, भूमिका नितांत सुंदर व्हावी म्हणून पोषाखही भरजरी, अस्सल छापाचा व्हिलन, अजर आणि अमर नाटक, शाही थाटाची नेपथ्य रचना, अद्ययावत् पद्धतीची प्रकाशयोजना, कथानक सहज उलगडत जातें तसतसा नाटकास भर येत जातो. सुटसुटीत खटकेबाज सवाद.

नाटक (वाईट) : : नेभळी नाट्यकृति, टिनपॉट् हाडकुळें नाटक, नेपथ्यरचना सरासरीची, सजावट उजवी हवी होती, लोक भर्जी मारतील असें गायन, अशा नाटकाला प्रेक्षकवर्ग लाभणें कठीण, नट बनण्याची उबळ आलेले हौशी नट, ढाबळ नायिका, फाटका हीरो, अभिनयाची बाजू शून्य, मुख्य पात्रें व आडपात्रें आडगिप्हाइकी मिळविलेलीं दिसतात ! पात्रांत

पक्क्या-कच्च्यांची खिचडी झाली आहे, एकसाची भूमिका, पात्रांची जा–येच मुळांत संथ, नाटक सपाट पडलें आहे; बसलें म्हणायला हरकत नाहीं ! यांचीं नाटकें एकामागून एक दणादण आदळलीं आहेत, चांगल्या कथानकाचा चिवडा करून टाकला आहे, तर्कशून्य वेढूट प्रसंगांची खिचडी, लघुकथेचें नाटक केल्यामुळें तें पातळ झालें आहे, कथानकाला फारच थोडी गति मिळते, नाटकाची बांधणी पक्की नाहीं, नाटकाचा बहुतेरा भाग प्रेक्षकांच्या डोक्यावरून जातो, नाटकाचा बहुतांश पार्श्वभूमीनें व्यापला आहे आणि पार्श्वभूमींत नाट्य फारच थोडें आहे.

नाटकी : : मनापासूनचें नाहीं, वरवरचें, अवडंबरयुक्त, पोकळ, पोंचट पण वरून ठाशीव, कृत्रिम, जादा प्रेमळ व अभिनययुक्त, खऱ्याचा केवळ आभास उत्पन्न करणारें, खोट्या दाढीमिशा लावून त्यांवर ताव देऊन बोलावें तसें हें सर्व वाटतें, जिभेच्या मुळापासून पण बेंबीच्या देठापासून नव्हे, खोटारडी मायावी कळकळ, तो ठसकाच तसा वाटतो नाटकी ! ओढून आणलेला अभिनिवेश, दिसायला प्रांजळ; पण त्यांत ओंजळ-भर नाटक, तोंडाला रंग फांसून बोललेलें बोलणें हें ! भूमिका वठविण्यासाठीं-स्टेज साजरें करण्यासाठीं केलेलें.

नापसंती : : अप्रिय असणें, मनास न येणें, नामंजूर, डावलणें, अनावड, मनांतून बाद करणें, धिक्कारणें, वाटेला लावणें, परत करणें, मर्जीस न येणें, त्याच्या चेहऱ्यावर नापसंतीची रेषा उमटली.

नायक (सुंदर) : : तरणाताठा, उंचापुरा बांधा, विजिगीषु वृत्ति, हंसरा चेहरा, भक्कम शरीरयष्टि, कीर्तिपिपासु मन, मानी, नजरेंत स्नेहार्द्रता, विशाल भालप्रदेश, धारदार नाक, उत्तुंग आकांक्षा, रुंद छाती, पिळदार दंड, काळेशार केंस, घट्ट पिंढऱ्या, प्रसन्न व्यक्तिमत्त्व, अंतःकरणाचा उदार, धीरगंभीर, कर्तव्यकठोर, धाडसी बेडरपणा.

नायिका (सुंदरी) : : अवयवांत रेखीवपणा, शुक्राची चांदणी, गालावर गुलाब, चांफेकळीसारखें नाक, हंसगति, रंभोरु रूपवती, केतकीसारखा वर्ण, कमल नयना, अप्सरेसमान रूप, गुणवती, लज्जावती, चंद्रबिंबासमान मुख, पोंवळ्यासारखे ओठ, शंखासारखी, मान, सिंहकटी, तन्वी श्यामा शिखरि-

दर्शना, सुंदर चीज, कुलीन, रुबाबदार शापभ्रष्ट देवताच ! कोकिळकंठी, सौंदर्याचें रसायन, धनुष्याकार भृकुटी, मोहक बांधा, कर्पुरासारखा गौर वर्ण, सुभगदर्शना, कुंदकळ्यांसारखे दांत, कृष्ण केशकलाप.

नालस्ती : : निंदा, टवाळी कुचाळकी, चहाडी, कुचाळी, हेटाळणी, चुगली, चिखलफेक, टीका, नांवें ठवणें, दोष काढणें, शिवीगाळ, कुचकें नासकें बोलणें, दोष टिपणें, निखंदणें, बोल लावणें, लाखोली, कुजबूज, काळें फांसणें. जखम टोकरणें, दोष ठेवून वर्मावर बोट ठेवणें, वाभाडे काढणें, कोळसा उगाळणें, अफवा उठविणें, कानाचा चावा घेणें, कंडी पिकविणें, तिच्या बोलण्याची सटीक सुधारलेली आवृत्ति दुसरेच दिवशीं निघाली, काकूंच्या तोंडांत कधी तीळ भिजत नसेच ! चार तोंडें बोलूं लागलीं, वरिष्ठांच्या कानाशीं लागतो.

नालायक : : निकम्मा, नाचीज, बेवकूफ, रिकामटेकडा, नपुंसक, षंढ, बेकार, दीडदमडीचा, कमजोर, अकार्यक्षम, हातून कांहीं निभायचें नाहीं, डरपोक, शेळपट, फुकट माणूस, केवळ खुळखुळा, मनगटांत जोर नाहीं, जिभेंत तडफ नाहीं.

नाविन्ययुक्त : : कोरें करकरीत, अपूर्वाईची गोष्ट, अविद्ध मौक्तिक, नवनव्हाळीचें, क्षुण्ण मार्गाबाहेरचें, आगळेंच, स्वतंत्र, ताजें, नवीन, अक्षुण्ण असें, वेगळें, अनोखें, अपरिचित, जगावेगळें, भिन्न, सांच्याबाहेरील, ब्रॅण्ड, न्यू, तऱ्हाच निराळी ! नव कल्पनांनीं नटलेलें, यास नवकल्पनांचे धुमारे फुटले आहेत, दाणेदार काऱ्या कल्पना, नवनवोन्मेषशालिनी, वेगळाच आविष्कार, कालचें आज नाहीं, सारखी बदलती रूपें, नवें नऊ दिवस, खेळणें तीन दिवस, नव्याचे नऊ दिवस मेल्याचे तीन दिवस.

नाविन्याभाव (पुस्तकांत) : : शिळाच विषय, उच्छिष्ट कल्पना, तेंच तेंच वर्णन चवीनें चघळतात, उष्टी व शिळी कोटी, कायम ठशाचें, भाषा एकाच सांच्यांतून ओतल्यांसारखी दिसते.

नाहींसें (झालें) : : संपलें, लोपलें, नष्ट–गायब–गुम्–गडप–लुप्त–भूमिगत–कटाप–खलास–अदृश्य–डोळ्यांआड झालें, त्याची वाफ झाली, अंतर्धान पावलें, हरवून गेलें, मागमूस उरला नाहीं, खूण–निशाणी जाग्यावर

राहिली नाहीं, मुळेंही राहिलीं नाहींत, काळाच्या उदरांत गडप झालें, कोणींतरी मारलें ! वाटलें होतें कीं नव्हतें ? कोठें उडालें कळत नाहीं, रंग उडाला, भक्ति रोडावली, कुंकू वाढलें, तेज फिकें झालें, पाया उखडला, पैसा चोरापोरीं गेला, माहितीचें विस्मरण पडलें, स्वास्थ्य संपलें, समता आंखडली, राज्य नेस्तानाबूत झालें, ढग पळाले.

नित्य : : नेहमीचें, सदाचें, सदानकदा, सर्वकाळीं, दररोजचें, केव्हांही, चिरंतन, अनंत, अखंड, तिन्ही त्रिकाळीं, त्रिकालाबाधित.

निपुण : : दर्दी, कुशल, वाकबगार कसबी, निष्णात, मुरलेला, हस्तलाघव असलेला, सराईत, पट्टीचा, कार्य-पंडित, कला-खोर, चार डाव खळलेला, कार्यनिपुण, कला–विद्.–कोकिळा–निधी–भास्कर–तज्ञ–पारंगत-कोविद,: या कलेचा पीएच्. डी.–मास्तर–आत्माच जणू ! मर्मज्ञ, जाणकर, कालोदधींत मज्जन केलेला, इंगित ओळखणारा, मुरब्बी, डावपेचांत भिजलेला, शिखर गांठलेला, बारकावे समजणारा, जाणता, तळापर्यंत गेलेला, नांव केलेला, कला करतलामलवत् असलेला, त्या विषयांतला शेवटला शब्द, त्यांत त्याचा हात चांगलाच चालतो, ही कला त्याच्या बोटांवर खेळते, त्याच्या सारखा माणूस हें केव्हांच झपाटून टाकील ! याच्या सर्व ताना घेऊ शकणारा.

निभावणें : : निभावून नेलें, वेळ मारून नेली, प्रसंग साजरा केला, वेळ भागवली, नाटक पार पडलें, कसाबसा काळ काटला, रेटलें इतकेंच !

नियमितपणें : : वेळचे वेळीं, ठरल्या वेळीं, नेमक्या घडीला, कधीं खाडा नाहीं, जेव्हांचे तेव्हां, कधीं उशीर नाहीं; कधीं लवकर नाहीं, घड्याळाप्रमाणें न चुकतां दररोज, मागें पुढें होत नाहीं. अळंटळं नाहीं, अपेक्षित वळीं, अखंडपणें, मध्यें बंद न पडतां, त्या वेळीं व्हायचेंच !

निरर्थक : : व्यर्थ, फुकट, बेकार, मढ्याला शृंगार, पारशाला विडी आणि शिखाला वस्तरा देण्याप्रमाणें, बाभळीच्या रानामध्यें आम्रफळ शोधण्याचा मामला, आंधळ्याला आरसा व षंढाला रमणी.

निर्भयता : : तात्पुरता जीव भांड्यांत पडल्यासारखें वाटे, त्याची क्षिती बाळगीत नाहीं, छातीवरून एक दडपण उचलल्यासारखें, थोडें हायसें

वाटलें, भीति हां हां म्हणतां पळून गेली, जिवांत जीव आला, आतां माझा जीव खालीं पडला, समाधानाचा सुस्कारा टाकला.

निर्लज्ज : : बेशरम, निलाजरा, सर्व टीका पचविणारा, कोडगा, निगरगट्ट, कमरेचें सोडून डोक्याला गुंडाळणारा, लाज कोळून प्यालेला, निर्लज्ज : सर्वदा सुखी, लाज कशाशीं खातात हें माहीत नाहीं, ना लाज ना खंत, लाजलज्जेच्या नांवानें इल्ला, सभ्यता नसलेला, जीवनाच्या कोणत्या तत्त्वज्ञानाचा अर्क ही मंडळी प्यायली आहेत ? निढावलेला, भीति लाज-लज्जा ह्या भावना माणसांना असतात; तुला कोठल्या ? स्वर्गांतल्या देवांना तरी भिऊन वागा.

निर्लज्जता : : लाज आतां वितळली होती, लज्जा संकोच नकळत पसार झाले ! विनयबंधनें शिथिल झालीं, लज्जेबरोबर वस्त्र गळालें, भीड मेली, लाजलज्जा गुंडाळून ठेवली, डोक्यांतून शरम गेली, सारी मर्यादा दूर टाकली, हेतूंचें निलाजरें स्पष्टीकरण, मन धिटावलें, उभयतांच्या प्रणयाचा दांडगा धिंगाणा सुरू झाला, प्रेमिकांचा धमाल कार्यक्रम प्रेक्षकांनाही बेहोषी आणील असा उतरला.

निराशा : : इच्छा मारल्या, आवडींना लगाम घातला, हें मेलें मढें—मेंढरूं आतां आगीला भीत नव्हतें, त्याच्या मनानें पलट खाल्ली, त्याच्या विविध स्वप्नांच्या झिरमिळ्या तुटून गळूं लागल्या, रंग ओसरलेली, विटलेली, कष्टांत न्हाऊन निघालेली, मनानें खचला, वृत्तीनें खंगला, हातपाय गाळले, उल्लसित वृत्तीचा अंकुर वठून कोळ झाला, पदरीं घोर निराशा पडली, अखेरचा आशातंतू तुटला, अंगावर निराशेचें दाहक रसायन सांडून घेतलेंच, आशांचा चक्काचूर झाला, जडमूढ झाला, तिच्या चित्ताचे तुकडे तुकडे झाले होते; ते जुळवून सांधणें तिला फार कठीण जात होतें, त्याच्या मनाचा चौथराच खचूं लागला, निराशेचें ताटच पुढें वाढून ठेवलें होतें, सुखस्वप्नें कोसळलीं, आतां हातांत फक्त असंख्य सुंदर स्वप्नांचा चुरा उरला, जीवानें हाय खाल्ली, आशा दुरावत चालली.

आकांक्षांची कबर, जिवंत मृत्यु, इच्छांचा सक्तीचा संन्यास, नैराश्याचा घनदाट काळोख, ओसाड जीवन, निराशेची खोल दरी, आशाभंग,

मनीषांचें मरण बघितलें, मनींचीं स्वप्नें भंगलीं, निराशेचे काळे ढग पसरले, आशेचा तंतू तुटला, आशेचा मृत्यु, आशा थकली, सप्तरंगी आकांक्षा निमाल्या, कोठें आशेचा किरण दिसेना, निराशेच्या गर्तेत आदळला, सारे सारे बेत जमीनदोस्त झाले, साऱ्या आशा दग्ध झाल्या, वैफल्यानें ग्रासला गेला, निराशेचे धसके बसले, निराशा ही निर्जळी असते !

निरिच्छ : : उदासीन, निष्काम, वैरागी, वासनाहीन, लोभापासून अलिप्त, वांछा नसलेला, फलापेक्षा न ठेवणारा, इच्छानाश झालेला, मोह नसलेला, मनानें न चिकटलेला, इच्छेची वखवख गेलेली, आशारहित वृत्तीनें राही, फलाशारहित, अभिलाषा लोपली, तृप्तीची ढेकर आधींच दिली आहे.

निरुद्योगी : : रिकामटेकडा, बेकार, कामधंदा नाहीं, घरीं बसून आहे, रिकामा, बे-काम, निष्काम बसून आहे, बिगरधंदा, सध्यां हात मोकळे आहेत, कशांत हात गुंतलेला नाहीं, कांहीं हातपाय हालवीत नाहीं, कांहीं कामच नाहीं, व्यवसायहीन, व्यवसाय धंदा नाहीं, यांना सदाचीच फुरसत, खाणें पिणें झोंपणें यांत वेळ जातो, वृत्ति-हीन, चकाट्या पिटणें हाच यांचा धंदा, पायावर पाय टाकून बसतो.

निरुपद्रवी : : सालस, गरीब, हाडाचा मऊ, नरम, साधु पुरुष, सरळ-मार्गी, कुणाच्या अध्यांत ना कुणाच्या मध्यांत, कुणाचेंही वांकडें करणार नाहीं, आपण बरे कीं आपलें काम बरें असे, मेणापेक्षांही मऊ, नाकासमोर जाणारा, दुसऱ्याच्या कामांत ढवळाढवळ करणार नाहीं.

निरुपम : : अजोड, बिनतोड, अतुल, त्यांच्या थोरवीला पाड नाहीं, त्याची कोणाला सर येत नाहीं, त्याच्या सारखा तोच ! झाला नाहीं होणार नाहीं, न पाहिला न देखिला, त्याच्या जवळ येतील इतका कोणीही नाहीं, एकमेव, आद्वितीय, यांच्या तोलाचा मनुष्य नाहीं, निर्दोष, खोड काढण्यास जागा नाही.

निरुपयोगी : : निर्माल्यवत्, फुकट, व्यर्थ, नाकामयाब, निकम्मा, नाचीज, गैरफायदेमंद, बेकार, पडीत झडीत, पौरुषहीन, रद्दी, वांझ, बाद, केवळ भारभूत, कामांतून गेलेला, केवळ अडगळच, केवळ चोथा उरलेला ! अजागलस्तनवत्, हंशील नाहीं, कामाचें नाहीं, त्याचें कांहीं करतां येणार नाहीं, नापीक, मोडींत टाकण्याजोगें, चीर गेलेलें, कृतिशून्य, व्यवहारांतून-

वापरांतून गेलेलें, त्यांत कांहीं लाभ नाहीं, सृजनाक्षम, धारणाक्षम, शुष्क, बोथट, जुनाट, कार्यनिष्पत्तीच्या दृष्ट्या शून्य, सामर्थ्यहीन, शक्तिहीन, बधिर, मृतवत्.

जें कशाशी जमत नाहीं, ज्यानें कोठलीच शोभा वाढत नाहीं, ज्यास कार्यक्षेत्रच नाहीं, ज्याची कार्यक्षमता विझलेली आहे, अवेळीं आलेलें, धंद्याच्या दृष्ट्या अनावश्यक, ज्याचा उपयोग ना अरत्र ना परत्र, यास गिऱ्हाईक कोणी मिळणार नाहीं, जो कोणालाच पावणार नाहीं, वस्तीला अयोग्य, वाहतुकीला बंद, धनोत्पादक नव्हे, मोडकें-सडकें, चार धंदे करील तेंही नाहीं ! त्यानें कोणताच कार्यभाग साधणार नाहीं, त्यालाच कोणी आधार दिला तर हवाय्, जें हवें तें त्याच्या हातून होणार नाहीं, कामांतून गेलेलें

मेंढीच्या शेपटीप्रमाणें, माशा हाकलायला उपयोगी नाहीं लाज निवारायला उपयोगी नाहीं ! निष्फळ, अरण्यरुदनवत्, त्याचा भोक्ता कोणी नाहीं, ज्याचा हात चालत नाहीं, त्यावांचून अडणार नाहीं, ना खायला ना प्यायला ना ल्यातला उपयोगी.

ज्याला फळ धरत नाहीं, ज्यानें रक्षण होत नाहीं, जें स्वतः सुखित होत नाहीं व दुसऱ्याला सुख देत नाहीं, फक्त दिसायला काय तो मोठा, त्याच्या अस्तित्वाचा हेतूच काय ? देखावा काय तो ! विकासास पोषक ठरत नाहीं जीवोत्पत्ति व जीवधारणा यांचे कामीं येत नाहीं, त्यापासून कोणताही इष्ट परिणाम घडून येत नाहीं, असलें काय नसलें काय एकच, केवळ निर्माल्यवत् रसहीन रुचिहीन फळासारखें.

निरोगी : : निरामय, आरोग्यसंपन्न, कधीं कपाळाला सुंठ माहीत नाहीं, आजाराचें नांव माहीत नाहीं, धट्टेकट्टे, कधीं पडसें-खोकला नाहीं, ठणठणीत प्रकृतीचे, निकोप, विकृतिविरहित, अविकृत, तंदुरुस्त, उत्कृष्ट शरीरसंपदा.

निवडक : : गाळीव, वेचक, हातांनीं खुडलेलें, ऐरेगैरे नव्हेत, सातपदरातून घेतलेलें, कातीव, छाटून घेतलेलें, पाखडून घेतलेलें, हातनिवडीचें, चाळणींतून उरणारें तवढें.

निश्चय : : हा विषय मनावेगळा केला, मनाशी खूणगांठ बांधली, मनोमन ठरविलें, मनांत पक्कें केलें, मनाचा निश्चय झाला, मनाचा घडा केला, कांहींएक ठरवून टाकलें, भीष्मप्रतिज्ञा केली.

निश्चयी : : भीष्मप्रतिज्ञ, कृतनिश्चयी, महानिश्चयी, मनाचा खंबीर, आमचं ठरलें कीं ठरलें ! जाम बदलणार नाहीं; मग शेंडी तुटो वा पारंबी तुटो ! विचाराचा पक्का, त्याचा संकल्प म्हणजे दगडावरची रेघ, कांहींसा हट्टी, जिद्दखोर.

निश्चल : : निःस्पंद, गतिशून्य, गतिहीन, हालचाली बंद, स्तब्ध, नीरव, प्रेतवत्, स्थाणूप्रमाणें, नुसता दगडाचा पुतळा, स्पंदनहीन, नाड्याच बंद, हृदयाचा ठोकाहि बंद ठेवून, संगमरवरी पुतळ्यासारखा, पापणीहि हालत नव्हती, अनिमिष नेत्रांनीं, पाषाणवत् चलनवलन रहित, न डोलतां न हालतां, चालणें बोलणें बंद, सर्वांलाच ब्रेक लागल्यागत, शेंपूटही न हलवतां, छातीहि वरखालीं न होतां, देवासारखा, अचेतन, अचल.

निष्फळ : : निरर्थक, वांझोटें, फलविरहित, फलहीन, अर्थहीन, निष्पत्ति कांहीं नाहीं, फुकट बाळंतपण ! त्यांतून कांहीं निघालें नाहीं. नुसतें पिष्टपेषण, वंध्यामैथुनाप्रमाणें, फुसका बार, जिरलेलें गर्भारपण, हातीं आलें धोपाटणें, त्याचें बक्षीस कांहीं नाहीं, मोबदला नाहीं, चीज नाहीं, चार बरे शब्दहि कोणी बोलेना, वायां गेले, सर्व गटाराची भर, मातींत गेलें, नसता खटाटोपो भयंकरः, नुसती तोंडाची वाफ, सगळेंच मुसळ केरांत, जल_ताडनवत्, पालथ्या घड्यावर पाणी, धुळींत गेलें, थोट्याच्या हातीं तलवार देण्याप्रमाणें, हंशील नाहीं, काय चाटायचें आहे त्या वैभवाला ! ना अरत्र ना परत्र ! आग लागो त्याला !

निसर्ग (मानवी भावनांचा मित्र) **: :** सुन्न सकाळ, मिस्किल पहांट, करारी दुपार, मेघांचे कोसळणारे अश्रू, भारावलेले ढग, आकाशही गहिंवरलें, धुसफुसणारा वारा, ढगांचा हुंदका, ढगांची आकाशांत दंगामस्ती, रद्दी सूर्योदय, कावेबाज सूर्य, दरडावणारी आगगाडी किंचाळली, ढालगज लाट, फटकळ तोफा, खट्याळ मोटार, खडकाळ रस्ता लाथाडीत मोटार निघाली, बेशरम चंद्र, हरामखोर अरुणोदय, पावसाची मारझोड, जवान

झाडें, हंसणारी पहांट, अस्फुट सकाळ, पावसाचे उनाड हस्तक ढग, दिशांचे निःश्वास, पृथ्वीच्या मांडीवर विसांवला.

निसर्ग-दृश्य : : नजाका, प्राकृतिक दृश्य, नयनरम्य-चित्तवेधक-रोमांचकारक-मोहक-सुंदर-सुरेख-आकर्षक-रोचक-विलोभनीय-देहभान हरपविणारें दृश्य, मनोरम, रमणीय देखावा-सृष्टिदर्शन, निसर्गाची किमया, नजर जिथवर जात होती तिथवर पाहून डोळ्यांचें पारणें फिटलें, किती पाहिलें तरी पुरेंसें वाटत नव्हतें, ही रमणीय स्थळें ओलांडतांना मनाला सुखसंवेदना झाल्या, स्नानगृहांतून बाहेर पडलेल्या सुंदर स्त्रीसारखी सृष्टि, थक्क करून सोडणारें दृश्य नजरेंसमोर आलें.

निःस्पृह : : लालसाहीन, वांछाहीन, कोणाची पर्वा करणार नाहीं, निःस्पृहस्य तृणं जगत्, कोणाची शिल्लक ठेवीत नाहींत, सुतळीच्या तोड्याला हात लावणार नाहीं, सडेतोड, तनसडीला शिवणार नाहीं, कसला लोभ नाहीं, यांची इच्छा जाईल असें कांहींच नाहीं, यांना हिऱ्या-माणकांचीं पेंडें मातीसमान व परदारा मातेसमान आहेत, सोन्या-मोत्याचा-चौदा कॅरट सोन्याचाही मोह नाहीं-नव्हता, त्यांना पाहिजे असें कांहीं नाहीं, स्वतःच्या इच्छा नाहींत, आंतला हेतु कांहीं नसतो, त्यांना स्वतःच्या कुऱ्हाडीला धार लावायची नाहीं, असेल माझा हरी तर देईल खाटल्यावरी अशी यांची स्थिती, द्रव्यलालसेचा अभाव, इच्छा मेलेल्या.

निंदक : : मांजरांपक्षांही माणसेंच या जगांत अधिक आडवीं येतात ! यानें फांटे फोडले, शंकाकुशंका काढल्या, यांची संवय नेहमीं गांवचीं गटारें उपसायची, कशाला आपण जीभ विटाळावी ? पण नाहीं; या आमच्या दोस्ताची जीभ पाघळली ना ! यांची वृत्ति भारी चिकित्सेखोर, दोषदर्शनाची पाचर ठोकण्यास सदैव तयार, हा प्रश्न तसाच राहूं द्या, बीळ उघडा कशाला ?- पण पटेल तर ना ? निंदेची हौस, निंदकाचें घर असावें शेजारीं,- पण घर शेजारीं एवढ्यानें कुठें भागतें ? घरांतच निंदक !

निंदा : : कर्णमैथुन, चहाडी, चुगली, कानमंत्र, विचिकित्सा, निखंदणें, जखमेवर टोंच, कुटाळकी, दोष हेरणें, वर्मावर बोट ठेवणें, खजाळी, न्यूनांचें प्रकटन, गुणांकडे कानाडोळा, अवगुणांकडे उघडा डोळा.

निःशस्त्र : : शस्त्रहीन, बिनहत्यारी, हात रिकामा, हत्याराविना, प्रतिकाराला साधन नाहीं, लाठीकाठी–तरवार–बंदूक–बरची–कट्यार किंवा पिस्तूल कांहीं न घेतां, हातांत विळा-कोयताही नाहीं, संरक्षणाची हमी देवावर किंवा शत्रूच्या हृदय-पालटावर ठेवली ! बाहुबलापेक्षां हृदयबलावर विसंबला, जास्तींत जास्त वळलेल्या मुठी हेंच हत्यार, बैलानें शिंगें वाघानें नखें व दांत तसेंच विंचवानें नांगी बाजूला ठेवून जाण्याप्रमाणें, शब्द व जीभ यांनींच लढणार, धनुष्यासारखा भुंवया असतील तर त्याही चढवायच्या नाहींत हा निर्धार; कारण त्या पण हत्यारेंच होत !

नीतिमान : : साफ नैतिक प्रकृतीचा, बाळबोध वळणाचा, पापभीरु माणसें, नीतीची चाड बाळगणारा, चरणींची धूळ मस्तकीं लावण्यासारखें, आमचें घराणें फूटपट्टी सारखें सरळ आहे.

नीरस : : शुष्क, रसहीन, सौंदर्यहीन, निकस, सहारा वाळवंटाप्रमाणें, वांझोटें, वालुकामय, कोरडें, निष्प्रभ, वैराण, औषधाच्या कॅटलागप्रमाणें.

नुकसान : : हानि, मातेरें झालें, ही पोकळी भरून काढणें आमच्या शक्तीबाहेरचें आहे, कधींहि भरून न येणारें नुकसान, परीक्षेचें–वेळेचें खोबरें झालें.

नुकसानी (आर्थिक) : : घस पडली, दिवाळें फुंकायची वेळ आली, आंतबट्ट्याचा व्यापार ठरला, आर्थिक तोशीस-आर्थिक फटका खाल्ला, ठोकर बसली, चाट बसली, धंदा नुकसानींत आला, गोत्यांत आला, अद्दल घडली, कुठं सांठवलेले २–५ रुपये यांत गेले, कमावलेलें सर्व गमवायची वेळ आली, दहा रुपयांना गोत्यांत आणलें, त्यानें मला तीन आण्याला गंडा घातला, या पायीं मला पांचशें रुपयांची फोडणी बसली ! दोन पैसे मिळवले होते ते गेले, तीन हजारांवर म्हणजे शेपटीवरच गेलें, व्यापारांत घातलेलें भांडवल अजून उभें राहिलेलें नाहीं, कित्येक हजारांना नागविलें, व्यवहारांत आपल्या पायांवर धोंडा घालून घेतला, गेलें तें सर्व म्हटलें कृष्णार्पणमस्तु.

नेभळट : : पोंचट, शामळू, नपुंसक, षंढ, तृतीय पंथी, पेज्या, हळूबाई, पौरुषहीन, मेणबाहुली, मेंचट, अजागळ, अव्यवस्थित, बावळट, मेंग्या, दळभद्री, तो म्हणजे नुसती भेंडीची भाजी ! फारच नाजुक-साजुक,

पाणी–दम नाहीं, नाकावरची माशी उडायची नाहीं, अजून आईची सोबत पाहिजे, मुदलांतच चलाखी नाहीं, नुसता देवीचा मुखवटा, भुसभुशीत विरोधक, दुबळें नेतृत्व, यु यु म्हणून बोलवावें असेंच, यांचें परपुष्ट जीवन, ही मेंढीची शेपटी ना लाज सांभाळायला ना माशा हाकलायला उपयोगी, खेंटरासारखें तोंड घेऊन उभा, तो पडला पुळपुळीत, वेंधळा मुलखाचा, लेंचापेचा.

नेहमीं : : सालोसाल, रोज, दैनंदिन, हरघडी, दर–दिन, नित्याच्या, अष्टौप्रहर, तिन्ही त्रिकाळ, हररोज, प्रतिदिनीं, बारमाही, जेव्हां तेव्हां, उठल्यासुटल्या, पुनःपुन्हां, प्रत्यहीं, सांजसकाळ, सदैव.

नोकर : : सेवक, गुलाम, चाकर, गडी, अटेन्डट्, सर्वंट्, माणूस, हस्तक, बगलबच्चा, एजंट, अडत्या, प्यून, चपरासी, हुजऱ्या, दास, चौकीदार, बेयरा, मदतनीस, हुजऱ्या, मजूर, कामकरी, कामगार, दस्यू, हुकमी माणूस, रामा गडी, मदतगार, दुय्यम, श्रमिक, मोलकरीण, नोकराणी, पाणक्या, वाढपी, आचारी, हमाल, हरकाम्या, सांगकाम्या, चिटणीस, मुनीम, परिचारिका, हाताखालचा माणूस, क्लार्क, असिस्टंट, ऑफिसबाबू, कर्मचारी, कष्ट उपसणारा, बंदा, आश्रित, संग्रहांतलीं माणसें, पदरीं असलेले.

नोकर (निंदा) : : बोलायला बांका कामाला फांका, नुसता बोलूकाका, बोलून तोंड दुखविणारा पण काडी उचलून ठेवणारा नाहीं, बध्या बंबोल्या इसम, करूकाका ते वेगळेच हे ते नव्हेत, जिभेची नुसती वळवळ, बोलेल फारतर, गोडबोले पण करकरे नव्हेत, नुसता बडबड्या, तोंडपाटिलकी पाहून घ्यावी, वाचिवीर नुसता, बोलभांड, कामटाळू, चाकराला पडचाकर हवा, उद्योगापेक्षां उपद्व्यापीच, ठराविक कामही नीट न करणारा अति सामान्य माणूस, घाण्याच्या बैलासारखा, अगदी ऑफिस–क्लॉक आहे ! ढापणें लावलेलें ढोर चरक ओढीत रहावें त्याप्रमाणें, हा म्हणजे शुद्ध वडाराचा गाढव, सांगितल्या कामाचे धनी, वरिष्ठाची थुंकी झेलणारे, टिप्प्या ये म्हटल्यावर खालीं मान घालून धांवत येणारे, ताटाखालचें मांजर, दिल्या भाकरीचा सांगितल्या चाकरीचा, धीटपणें पापणी वर करून पाहण्याची

शक्ति नाहीं, गोंडा घोळणारे, ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी, हाताला हात लावणें हेंच काम, शब्द झेलण्यास तयार, विकत घेतलेलीं माणसें, मालकाशीं निमकहराम, धन्यास धत्तुरा आणि चाकरास मलिदा.

पाय धू तर म्हणे साखळ्या केवढ्याच्या ? नाकापेक्षां मोतीं जड, खर्चणाराचें खरचतें आणि कोठावळ्याचें पोट दुखतें, वशिल्याचें तट्टू, एकट्यानें मरायचें तरी किती; इतर उडाणटप्पू, लाल फीतवाले, पायरी सोडून वागे, नोकरी हेंच प्राप्तव्य, तो वरिष्ठांचे डोळे पाहून वागत असतो, वरिष्ठांच्या कानाशीं लागतो.

नोकर (स्तुति) : : इमानास जागणारा, कष्ट उपसणारा, उपकार कृतज्ञतापूर्वक स्मरणारा, वक्तशीर, कामाला वाघ, जिभेचा संयमी, सव्वा हात लेखणीचा कारकून, सदा सेवेंत मग्न ! आपण बरे कीं आपलें काम बरें, असा कामझोड्या मजूर पाहिजे ! पडेल तें काम नी मिळेल तो दाम, धांवून धांवून करतो, हाताचा जलद, भान रहात नाहीं, जीवापाड मेहनत करतो, सदा कामाला जुंपलेला, मेहनतीची शिकस्त करतो, एवढ्या कामाची दोन तासांत वाट लावील, उच्चपदस्थ प्रथम श्रेणीचे अधिकारी, वेळ सत्कारणीं लावतो, काम चोख बजावतो मुशाहिरा मागून घेतो.

नोकरी (निंदा) : : वर हात नी खालीं लाथ, गांवचा राजा गांवांत बळी परदेशीं गाढवें वळी, जास्त काम कमी दाम, जन्मा आला हेला पाणी वाहतां मेला, नोकरीचा चरक, शुद्ध गुलामगिरी, सुळावरची पोळी, नोकरीच्या रुपेरी शृंखला, अळवावरचें पाणी, उभी चाकरी, मास्तरकीच्या नव्वद टिकल्यांवर उदरनिर्वाह, पोट जाळण्यासाठीं पोटाची–खळगी भरण्यासाठीं हें सर्व, पोट पाठीला लागलें आहे ना ? नोकरीचा खुंट पकडला, रेट, डेट आणि वेट यांखेरीज असतें काय पोस्टांत ? सर्वांची तब्येत राखतांना कावून गेलों, ही एक हरकामी पोरगी अन्नावारी मिळाली.

नोकरी (स्त्रियांची) : : पैसे कमावण्याची शक्ति असलेल्या स्त्रीला घरांत डांबून ठेवणें म्हणजे आपला पैसा व्याजीं न लावण्यासारखें आहे.

परका : : दूरचा, बिगरनातेवाईक, लांबचा, अनोळखी, अपरिचित, बाहेरचा, बाहेरील, ज्यासंबंधीं जवळीक नाहीं, स्थानिक परिस्थितीस नवखा,

येथला नव्हे, नवखा, परद्वीपस्थ, परदेशी, असंबंधित, जातीबाहेरचा, साता समुद्रापलीकडचा कुठला कोणीकडचा? जातकुळींतला नाहीं, जमातीबाहेरचा, इतर देशीय, देशांतरीचा, काय संबंध? आमच्यांतला नव्हे, काडीचा संबंध नाहीं, नेहमींच्यांतला नव्हे, स्वदेशाबाहेरील, ना नात्यांतला ना मित्र! विगोत्रीय, परप्रांतीय, दूरदेशीय, स्वदेशीय नव्हे, आप्तेष्टांतला नव्हे, दुरावलेला, भिन्न रक्ताचा–वंशाचा–जातीचा, विजातीय.

परतंत्र : : दुसऱ्याच्या इच्छांचे बंदे गुलाम, सुकाणूवर हात दुसऱ्याचा, हुकमाचे धनी, हुकुमाची तामिली करणें एवढेंच यांच्याकडे, मालकाचे दासानुदास, अस्वलाची दोरी रामोशाच्या हातांत, दुसऱ्यानें नाचवावें तसे नाचणारे, परवानगीखेरीज इकडची काडी तिकडे करतां येणार नाहीं, लगाम दुसऱ्याच्या हातांत! जामदारखान्याच्या किल्ल्या दुसऱ्याच्या हातांत, पायांत सांखळ्या नाहींत इतकेंच, सोनेरी बेड्यांत अडकलेले.

अक्कलहि गहाण पडलेले, तसूची स्वतःची हुकमत नाहीं, ही कळीची बाहुली मात्र, बोलविता धनी वेगळाची, सत्तेचे गुलाम.

परदोषदर्शन : : आपल्या डोळ्यांतलें मुसळ दिसत नाहीं पण दुसऱ्याच्या डोळ्यांतलें कुसळ दिसतें, जो मूळव्याधीं पीडिला त्यासी देखोनि हांसे खरजुला.

परप्रत्ययनेयबुद्धि : : दुसऱ्यांच्या मताच्या आहारीं जातात, जन्मभर दुसऱ्याच्या आधारानें चालण्याची संवय, स्वतःच्या बुद्धीचें दिवाळें काढलें, दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिते, चारचौघांच्या मतावर यांची भिस्त, स्वतःचें लग्न करायचें का नाहीं या विषयावर चारचौघांचीं मतें ते घेतील!

परमेश्वर : : भगवान, विधाता, देव, जगन्नियंता, ईश्वर, स्रष्टा, देवाधिदेव, जगच्चालक, इष्टदेवता, दवता, कुलदेवता, ग्रामदेवता, जलदेवता, स्थलदेवता, उत्सवमूर्ति, आकाशांतला बाप, सृष्टीचा जनक, प्राणदाता.

परमेश्वर (गुणगान) : : कारुण्य-सिंधु, कृपाळू, दयाघन, दीनवत्सल, त्राता, दीनानाथ, कृपासिंधू, सर्वगामी, सर्वव्यापी, सर्वशक्तिमान, चराचरांत भरलेला, कर्ता करविता, अदृश्य गूढ शक्ति, कर्तुमकर्तुम् अन्यथा कर्तुमचें सामर्थ्य असलेला, ब्रह्मांड व्यापून दशांगुलें उरला, सर्वज्ञ, सृष्टिकर्ता, रक्षणकर्ता, विघ्नहर्ता, विश्वाधार, ब्रह्मांडाधीश, भवदुःखहारी, विश्वंभर, जगत्पति,

निजजनतारक, जगत्पाल, ऋद्धिसिद्धीचा नायक, तारक, जिवाचा विसांवा, सनातन, शाश्वत, अनादि, अनंत, सदाशिव, स्वयंपूर्ण, सत्यसंकल्पी, निर्गुण, निराकार, अगोचर, अज्ञेय, त्रिगुणात्मक, सर्वगुणसंपन्न, मुनिजन-मानसहंस, भावाचा भुकेला, सज्जनजीवन, वेदवंद्य, परमानंद, निरंजन, ज्योतिर्मय, निष्कलंक, वैकुंठवासी, परम पुरुष, पुरुषोत्तम.

पर्याय : : विकल्प, हें घ्या किंवा तें घ्या; कोणतेंही एक उचला, निवडीची मुभा, आवडीप्रमाणें निवड, ऑप्शन्, जें त्याची जागा घेऊं शकेल, त्यावर भागवतां येईल, दुसऱ्या कशानें निभणार नाहीं.

पराभव : : शरणागति, पराजय, पाडाव, अहंकाराची विकेट संपूर्ण उडाली, मनोधैर्याची तटबंदी कोसळून पडली, पक्की अद्दल घडली, बाजू समूळ उलटली, हार मानण्याचा प्रसंग आला, बसले हांका मारीत, खाल्ली गोलांटी, पक्षानें पागोटें गमावलें, शत्रू वठणीवर आला, चारी मुंड्या चीत ! हाताला यश आलें नाहीं, या ध्रुवाचा अस्त झाला, निश्चयाचें पानिपत झालें, गुर्मी उतरली, नाकीं नऊ आले, झपाट्यानें पीछेहाट झाली, दातीं तृण धरून शरण यावें लागलें, त्राहि भगवान् करून सोडलें, दे माय धरणी ठाय झालें.

जीव मुठींत घेऊन वाट फुटेल तिकडे पळत सुटले, दाणादाण झाली, पळतां भुई थोडी झाली, सपशेल आपटी खाल्ली, डाव हुकला, पाऊल पुढें पडायच्या ऐवजीं मागेंच पडलें, खटाटोपी व्यर्थ झाल्या, अखेर मान तुकवावी लागली, धटिंगपणापुढें लोटांगण घातलें, पड खाल्ली, या प्रकरणाचा चिवडा झाला, प्रयत्न पडला, हात हालवीत माघारीं यावें लागलें, हवेलंडी उडाली, आशेला गळती लागली, अयशस्वी ठरला, विरोधाची धार बोथट होऊं लागली, बोलणें खुंटलें.

पराभव (करणें) : : पाडाव करणें, पराभूत करणें, कंडू शमाविणें, खुमखुम जिरवणें, पाठ भुईस लावणें, वाकावयास लावणें, नमविणें, जिरवणें, कांटा काढणें, पायाच उडविणें, कणा मोडणें, नांगी मोडणें, दांत पाडणें, मस्तक ठेंचणें, पिसें खुडणें, खडे चारणें, खलास करणें, धुव्वा उडविणें, धूळ चारणें, तीन-तेरा करणें, होता कीं नव्हता करून सोडणें, पाणी पाजणें,

दशा दशा करणें, नेस्तनाबूद करणें, सफा करणें, मूळ उखडणें, जरब बसविणें, भुईसपाट करणें, खोडकी जिरवणें, कांडांत काढणें.

परिवर्तन : : बदल, उत्क्रांति, फेरफार, रूपांतर, परिस्थिति बदलली, स्वभावांत परिवर्तन झालें, जुनें तें गेलें, नव्यानें जुन्याची जागा पटकावली, व्याख्या बदलल्या, दुसरीं मूल्यें आलीं, झोंपेतून जागृतीकडे गेले, वाल्याचा वाल्मीकि झाला, मानवाचा अतिमानव होऊं पहात आहे, जुने आडाखे बदलावे लागत आहेत, हा चार दिवसांचा थारेपालट नव्हे; कायमचा बदल.

परिश्रम : : आयास, मेहनत, खटपट, कष्ट, अविरत श्रम, काबाडकष्ट, कष्ट उपसणें, प्रयास, जिवाचा आटापिटा, खस्ता, हाडाचीं काडें करणें, घाम काढणें, अंग मोडून काम करणें, जिवाचें रान करणें, जीव खाऊन काम करणें, जोडे फाडणें, मानेवर खडा ठेवून काम करणें, अहर्निश उद्योग, तिला घागरगड दिला आहे, रक्ताचें पाणी करून, घसा फोडून, श्रम करून का होईना पण केलें.

परिस्थिति (वाईट) : : परिस्थितीचा फेरा, साडेसाती, प्रतिकूल-अवघड-स्फोटक परिस्थिति, दयनीय अवस्था, अडला नारायण अशी स्थिति, दिव्याखालीं अंधार, आधारहीन, धागा तुटलेल्या पतंगाप्रमाणें, उत्साहशून्य-विरोधाचें-उलटें-रोगट वातावरण, अक्काबाईचा फेरा, काळच बदलला, मागलें तें राहिलें नाहीं, काळी पार्श्वभूमि, भोंवतालच्या मातींत छातीइतका रुतलों.

परीक्षा (अपयश) : : परीक्षेंत गोता खाल्ला, परीक्षेच्या तीन वाऱ्या झाल्या, परीक्षेशीं दोन हात करण्याचें कर्तव्य करीं इतकेंच, परीक्षेंतून हातीं-पायीं सुटतों कसा याची विवंचना, पेपरांत झीरोवर आऊट होतों कीं काय अशी भीति पडली, मॅट्रिकच्या दिल्लीदरवाजावर चार वर्षें धडका देऊनही एक फळीसुद्धां हादरण्याचें चिन्ह दिसेना ! शिक्षणाची गाडी पांचवीपर्यंत जेमतेम गेली; पुढें जायला सिग्नलच मिळेना ! नापासाच्या कांठावरून पासाकडे ढकललें जाण्याइतपतच मार्क पडत.

परोपदेश : : स्वयें आपणाचि रिता, रडे पुढिलांच्या हिता, परोपदेशे पांडित्यं, सल्ला चटकन् दिला; जातो घेतला जात नाहीं, सांगायला

काय होतें ? लोकां करी उपदेश आपण कोरडा पाषाण, रस्त्यांतील कोणालाहि विचारा—मुख्य मंत्र्यांनीं काय करावें तें तो नक्की सांगेल पण स्वतःसंबंधीं विचारूं नका !

पवित्र : : निर्लेप, सात्त्विक, शुचि, मंगल, शुद्ध, सोज्वळ, निर्मळ, शुचिर्भूत, दुधाची घागर, ऋषितुल्य, पुण्यश्लोक, देवासमान, गंगेच्या उदकासारखें, शंभरी नंबरी, केवळ गंगाजल, कासोट्याचें तीर्थ घ्यावें असें, पादस्पर्शानें लोक पवित्र होतील, पवित्रात्मे, शापभ्रष्ट देवताच, पाण्यांत टाकलेल्या लोण्याच्या गोळयांत पाणी शिरत नाहीं तसे निर्लेप, प्रसन्न व्यक्तिमत्त्वाचा, आपल्याला शापदग्ध अवस्थेंतून उठविणारी—आपल्याला उःशाप देणारी ही देवताच ! पावित्र्याचें मूर्तिमंत प्रतीक, व्यासंगी ऋषितुल्य जीवन, सोज्वळ सती, पुढें मान तुकवावी असें, चंदनासमान, अकलंकित, जणूं शुद्धोदक.

गंगेसमान, तुळसच दुसरी, सत्त्वशील, देवासमान, बावनकशी शुद्ध, शंभर नंबरी, तीर्थवत्, हिणकस नव्हे, कसास उतरणारें, प्रभातीं वंदन करावें असें, देव्हाऱ्यांत ठेवण्यासारखें, अकलंकित, भ्रष्टाचारापासून अलिप्त, पापापासून योजनें दूर, उपवासाला चालतील असे ! अनाचाराचा दुरूनहि वास नाहीं, सती-सावित्रीसारखी, पापाची पुसट ओळखहि नसलेला, सोंवळ्यास चालतील.

पश्चात्ताप-पीडित : : मनांत डांचत होतें, या उणीवेची-पापाची टोंचणी त्याचें मन त्याला तोडून तोडून खाई, हें जन्मभर खाल्ल्यावांचून राहणार नाहीं, मनाला अप्रशस्त वाटत होतें, रुखरुख लागून राहिली, अंतःकरणांत पश्चात्तापाची ऊर्मि उठली, कित्येक आठवडे मनाची घालमेल चालली होती, स्वतःवरच संतापून मनाशीं जळण्यापलीकडे काय करणार ? त्याचें काळीज त्याला खात होतें, विवेकबुद्धि जागी झाली, अपराध्या-प्रमाणें जड पावलें टाकीत आला, तोंड उतरलें, चेहरा पडला, मुद्रा दिल-गिरीची झाली, पश्चात्तापाच्या इंगळ्या डंसत होत्या, छातींत चावल्यासारखें होऊं लागलें.

पसंत : : अनुकूल, प्रिय, संमत, मान्य, आवडणारें, मनाला पटणारें,

मंजूर, आमच्या अपेक्षा सफल केल्या आहेत, ही संतोषाची गोष्ट आहे, पाठ थोपटतों तुमची, द्या टाळी ! याबद्दल मनःपूर्वक आभार, कौतुक करावें तितकें थोडें, हें आपल्याला पटतें, खूपखूप आवडलें, मनाला रुचलें.

पळविणें : : जबरदस्तीनें नेणें, उडविणें, लंपास करणें, उचलून नेणें, वस्तू मारणें-ढापणें, जबरीनें कबजा घेणें, लांबविणें.

पळाला : : काढता पाय घेतला, ढुंगणाला पाय लावून पळाला, यः पलायति स जीवति, यशस्वी माघार घेतली, पुढें भुंकत पण मागें सरत, सूंबाल्या केला, कसलें काय नी कसलें काय ! पळतां भुई थोडी झाली ! दौड केली; पण उलट्या दिशेनें ! पसार झाला, धूम ठोकली, बाडबिस्तरा गुंडाळून रस्ता धरला, चौखूर उधळला, डोळा चुकवून गुप्त झाला, काळें केलें, तुरी दिली, निसटला, पोबारा केला.

प्रकाश : : उजेड, कवडसा, उजळा, तेज, चकाकी, उजेडाचा पट्टा, दीप्ति, ऊन, किरणांचा झोत, तेजोवलय, पांढुरका भाग, झळाळी, आतप, झगझगाट, प्रकाश-झोत, उन्हाची धाप, सूर्यकिरण तेथें पडत होते, ज्योत्स्ना, लाईट.

प्रचंड : : विस्तृत, जंगी, राक्षसी, अगडबंब, भव्य, भयंकर, मोठा, धिप्पाड, भक्कम, उत्तुंग, अजस्र, महान, भीमकाय, थक्क करील असें, प्रचंड स्वरूपाचें, डोळे विस्फारील अशी अफाट, भीमासारखें बळ, मोठें जाडजूड.

प्रणय : : विलासी भावनाविष्कार, एकमेकांच्या जवळ येऊं ही इच्छा, निश्चय कसला; पाहतांच अवसान ढासळलें ! भावनोत्कट प्रेम, हृदय जळत राहिलें, मन भिरभिरत राहिलें, ओंजळींत लपवून ठेवलेलें तोंड वर करवेच ना, आत्मीयतेचा साक्षात्कार, भावविवश होऊन, पेटलेलें मस्तक, स्मृतीच्या पूजेंत रममाण झालेला जीव, परस्परांच्या जीवनाशीं एकरूप, आठवणीनें बेचैन, निकट सहवासाची लालसा, मनांत तुफान उठलें.

प्रत्यक्षांतील : : वास्तव सृष्टींतलें, दिसूं शकेल भासूं शकेल असें, काँक्रीट, अनुभवाला येणारें, पदोपदीं चर्मचक्षूंना दिसणारें, कल्पना-साम्राज्यांतलें नव्हे, अनुभवसिद्ध व प्रमाणसिद्ध, हक्प्रत्यय येईल असें, कवि-

कल्पना नव्हे, केवळ सैद्धांतिकहि नव्हे, इहलोकीं आढळणारें, सांगीव नव्हेत ऐकींव नव्हेत, स्वर्गीय नव्हेत, भूलोकींचें व्यवहारांत दिसणारें रूप, कवनें बाजूला ठेवलीं कीं दिसणारें, काव्यविहीन नागडें सत्य, दिसून पडणारें, जा म्हणजे आढळेल; पहा म्हणजे समजेल, खरोखरीचें, धडधडीत, धादांत हातच्या कांकणाप्रमाणें, भावगम्य तसेंच नेत्रगम्य व स्पर्शगम्य.

प्रत्युत्तर : : प्रत्युत्तराची गदा उचलली, टीकेची भालाफेक केली, निंदेचा फटकारा दिला, मुद्यांची सेना उभी केली, लेखणीचे गुद्दे चढविले, प्रतिटीकेचे जबरदस्त प्रहार केले, टाकानें झोडपलें, बिनतोड कोटिक्रमानें गप्प केलें, शड्डू ठोकून उत्तरास उभे राहिले व तें दिलेंहि छान ! शब्द खालीं पडूं दिले नाहींत, खडखडीत जबाब, रोकडें उत्तर.

प्रतिकार : : विरोध, प्रतिटोला, उलट जबाब, मज्जाव, धिक्कार, अटकाव, हरकत, प्रतिहल्ला, प्रतिचढाई, प्रतिरोध, उलट रेटा, प्रतिजबाब, उचलबांगडी, उलटें आव्हान, पारिपत्य, सर्व सामर्थ्य एकवटून विरोध, खाल्लेलें ओकायला लावूं ! आपली टणक बाजू दाखविणें, दाबून न दबणें.

प्रतिकार (योग्य) : : खटासी खट उद्धटासी उद्धट, ठकास ठक, भाल्यास भाला, जशास तसें, लाठीस लाठी जोड्यास जोडा, गोळीला गोळी, अरेला कारे, कांट्यानें कांटा, तोडीस तोड, शठं प्रति शाठ्यम्, दुष्टाशीं दुष्ट सुष्टाशीं सुष्ट, लुच्चाशीं लुच्चेगिरी, मनगटाला मनगट गुद्द्याला गुद्दा, शिवीस शिवी, तलवारीस तलवारीनें उत्तर, ठोशास ठोसा, आडवें आलें तर कापून काढावें लागतें, साप पाहिला म्हणजे तो ठेचल्याशिवाय सोडणें योग्य नाहीं, नाठाळांच्या काठी देऊं माथां, जसा भेटेल तसा प्रतिकार, तंगडी उचलून उचलबांगडी, रोखठोक उत्तर, जालीम आजाराला जालीम उपाय, अतिरेकावर जालीम उतारा, प्रति-आह्वानानें उत्तर, अंगावर आलें तर शिंगावर घेतलेंच पाहिजे.

प्रतिबंध : : अटकाव, शिरकाव थांबविला, हातपाय पसरूं दिले नाहींत, मागें परतावला, बोट शिरकूं दिलें नाहीं, पाळें रुजूं दिलीं नाहींत, पायबंद घातला, नांगी बोथट केली, शहाला काटशह दिला, मागें लोटलें, लोंढा थोपविला, विरुद्ध सामर्थ्य उभें केलें, उलट बाजूनें जोरा केला, वाटेंत भिंत

उभी केली, डाळ शिजूं दिली नाहीं, या तमासगिरांचे तंबू उखडा ! दंश करायच्या आंत सापाचा बंदोबस्त झाला पाहिजे, डाव हाणून पाडायची प्रथमपासूनच तयारी ठेवणें योग्य, दांडगाईला आळा, काबूंत राखणें.

प्रतिष्ठित : : माननीय, वंदनीय, मानसन्मान–मानाचें पान मिळालेला, गौरव झालेला, जगद्वंद्य, मानवंदनेचे अधिकारी, रावसाहेब रावबहादूर पगडी-पागोटेवाले, जड बूडवाले, या गांवचे पाटील, तेथले भाऊसाहेब–रावसाहेब, जरा ‘ गड्डे ’ लोक.

प्रमुख : : महत्त्वाचा, आघाडीचा, अग्रेसर, मध्यवर्ति, केंद्रभूत, विशेष प्रकर्षानें आढळणारा, अग्रभागीं चमकणारा, ज्याचें नांव तें ! ढोबळ, हा कोणी असा तसा नाहीं, अनन्यसाधारण.

प्रयत्न : : खटाटोप, जंगजंग पछाडले, आकाश पाताळ एक केलें, खेळेल तो पोळेल; चढेल तो पडेल, सहा महिने जोडे फाडले तेव्हां हें स्थळ मिळालें, कोळीदादाप्रमाणें दहादां चढलों तेव्हां टिकलों, हातपाय हालवून तर पाहूं ! अति नेटाचे–अल्पस्वल्प–भगीरथ–बुद्धिपुरस्सर–जिवापाड–कसोशीचे प्रयत्न, सतत झटले.

प्रयत्नवाद् : : नर करणी करे तो नरका नारायण हो जाय, प्रयत्नांतीं परमेश्वर, आधीं केलेंच पाहिजे, केल्यानें होत आहे रे, साहसे श्रीः प्रतिवसति, आपला परमेश्वर दोन हातांत आहे, मदायत्तं तु पौरुषम्, दैवबळापेक्षां अंग-बळानेंच काम निभतें, निढळाचा घाम हाच देव, योगः कर्मसु कौशलम्, कर्मण्येवाधिकारस्ते, करून करून सर्व कांहीं करतां येतें, जात्यावर बसलें कीं ओंवी सुचते, मनुष्य करील तर काय होणार नाहीं ? स्वतः चाकाला खांदा लावावा लागतो, ज्याचा स्वप्रयत्नांवर विश्वास तो अर्धी लढाई जिंकतो, करावें तसें भरावें, मनगटाच्या बळावर ज्यांचा विश्वास तेच देवाला प्रिय, करूं– काका वृत्ति, करणाऱ्यांकरितां जग आहे.

प्रयत्नें वाळूचे कण रगडितां तेलहि गळे असा विश्वास, एका कोळियानें घर उंचावर बांधलें तेथपर्यंत सातदां जाण्याची तयारी, यत्न तोचि देव, दैवाची कांस धरणार नाहींत– स्वबळाचीच, आपण करूं तरच सर्व होईल असा आत्मविश्वास, हातीं घेऊं तें तडीस नेऊं ही प्रतिज्ञा, थेंब थेंब पाणी

पडून अखेर काळा फत्तरहि फुटतो, अडचणींचें काय घेऊन बसलांत ? कारकुनाचा प्रेसिडेंट होईल, वाटेल तें काम करण्याची तयारी व वाटेल तेवढी अमर्याद महत्त्वाकांक्षा हेंच जीवनसूत्र.

प्रवास-शीण : : प्रवासांत पार घुसळून निघालों, नेत्र सुखावले तरी शरीर दुखावलें, बैलगाडींत बसून अंगाचा खुर्दा होऊन गेला, नको जीव होऊन गेला, कांट्यांनीं पायांची अगदीं चाळण झाली, सर्वांगाची चंपी झाली !

प्रशंसनीय : : प्रशंसापात्र, स्तुत्य, समर्थनीय, वंदनीय, आदर्श, मुक्त कंठानें स्तुति करावी असा, कौतुक करावें तितकें थोडेंच, शिफारस करण्याजोगा, फार भूषणावह, धन्यवाद देण्याजोगा, भरघोंस प्रशंसेस पात्र, वाखाणण्याजोगा, गौरवास पात्र, स्तुतिसुमनें वहावींत अशा, ही कांहीं लहान-सहान गोष्ट नव्हे !

प्रसंग (दु खद) : : दुर्दैवाचा अवचित घाला, एक प्रलयकारी घटना, दैवाचा दुष्ट डाव, नियतीचें क्रूर चेष्टित, दारुण आपत्ति, आकाशच कोसळलें, दुर्दैवी घटना, दुःखाचा डोंगर कोसळला, आभाळांतून कुऱ्हाड पडली, मोठी आफत, महान आरिष्ट ओढवलें, दैवाचा केवढा दुष्ट खेळ, आपत्तीचा फेरा, नवें संकट-अरिष्ट ओढवलें, डोक्यावर वज्राघात, दुःखाची खाई, विराट-दारुण दुःख, वैऱ्यावरहि असा प्रसंग न यावा ! दैवगति; दुसरें काय ? कोठें जाशी भोगा तर तुझ्यापुढें उभा, फत्तरालाहि पाझर फोडणारा देखावा, विषादपूर्ण सद्यःस्थिति, गंडस्योपरि पीटिका, खेदाची गोष्ट, गुदरलेला प्रसंग, जळतें दुःख, होरपळणारी आपत्ति, नशिबानेंच पाठ फिरवली, झालेला हा भोग, काय सांगूं कर्म माझें ? तसाच कांहीं प्रसंग ओढवला तर, काळजावर कोरला जाईल अशी घटना.

प्रागतिक : : पुढारलेला, आधुनिक वळणाचा, पुरोगामी, प्रगतिशील, अत्याधुनिक, नवयुगाचा नेता, पुढें पाय आहे, नव-विचारसरणीचे, उत्क्रांतिशील, वर्धिष्णु, अधिक पक्व, नवयुगाबरोबर चालणारे, नवें तें यांना हवें.

प्रायश्चित्त : : केलें तुका झालें माका, बूमरँगप्रमाणें स्वतःकडे परत ! करावें तसें भरावें, या हाताचा झाडा त्या हातावर, इच्छी परा तें येई घरा,

रांधावें तसें जेवावें, पेरतों तसें उगवतें, या हातावरचें त्या हातावर मिळतें, अद्‌ल घडली, फळें भोगणें आलें.

प्रार्थना : : आग्रहाची विनंती, अभ्यर्थना, याचना, गळीं पडणें, हात जोडणें, दाढीला हात लावणें, मनोमन उपासना, अर्ज-विनंती, मागणें.

प्रारंभ : : सुरुवात, खोलणें, प्रारंभिणें, पायाभरणी, प्रतिष्ठापना, आरंभ, श्री ग णे शा, अ ब क, प्रथमावस्था, प्राणप्रतिष्ठा, प्रथमारंभ, ओनामा, पहिली कुदळ – उडी – सलामी – पालवी–धार–अवस्था–तान–पट्टा, पहिला बार–अंकुर–पान्हा–उद्रेक–घांस, उद्‌घाटन, मुहूर्तमेढ रोवली, पहिलें भ्रमण–रडूं–पाऊल, त्याची किशोरावस्था, शैशवकाल, अर्भकावस्था, उषःकाल, उमलण्याचा काळ, दगड बसविला तेव्हां, ओम नमो गणपते झालें, एव्हांना कोठें अंड्यांतून पिल्लूं बाहेर पडलें, या मूर्तीसाठीं माती कुटली जात होती, सांगाडा घडत होता, बीजरोपणाची अवस्था, मूळ स्टेशन सोडलें तेव्हां, या नदीचा प्रारंभ झाला तेव्हां, फक्त चबुत्रा उभारला, तोंड फोडलें, मळीची फक्त माती फोडली, टांक कागदाला लावला, या बोटींत पाऊल ठेवलें, पहिला पट्टा ओढला, मुहूर्त केला, पहिला प्रवेश दिला, त्रिराचमय झालें तेव्हांची गोष्ट.

प्रियकर : : प्राणप्रिय, प्राणनाथ, हृदयनाथ, प्राणसखा, प्रियजन, स्वामी, सौख्यनिधान, जिवलग, सखा, जिवाचा जिवलग, जीवाभावाचा सवंगडी, प्राणाहून प्यार, प्रेमाचें माणूस, जिवाचा सोबती–कलिजा–धनी, आराध्य दैवत, बहिश्चर प्राण, मनांतील जादूगार, देहाचा स्वामी, जीवननौकेचा कर्णधार, जीवश्चकंठश्च असा कोणी, मनांतला जो आहे, पसंतीचा इसम, लव्हर, हृदयेश्वर, प्राणपति, आर्यपुत्र, कुंकवाचा धनी, ' गडे ', लाडका.

प्रिया : : प्रेयसी, लाडकी, प्राणेश्वरी, आराध्यदेवता, हृदयेश्वरी, हृदयाची राणी, प्राणप्रिया, अग ' ए ', माझ्या गोड मधा ! जिवलगे, सखी, हृदयस्वामिनी, माशुक, सर्वस्वाचा ठेवा.

प्रीति (टवाळी) : : प्रेमाचा हा अलोट धबधबा, रबरी चिवट चामट प्रेम, या घागरभर प्रेमांतून पंचपात्र पंचपात्र मिळायला हरकत असूं नये ! यांची प्रीति आज पान्हवली, असलें लष्करी दणदणीत प्रेम सहन व्हायला

कठीण, सेकंड् हॅन्ड् प्रीति, मोसमी प्रेम, लगेच हृदयांत प्रेमाची भट्टी सुरू झाली ! प्रासादिक प्रेम, सनातनी प्रीति, भरघोस ममता, तट्ट व घट्ट प्रेम, प्रणयाच्या पहिल्याच झटक्यांत चीत झाला, प्रेमसेवेला जुंपला, खस्सदिशीं प्रेमांत आला ! प्रेमाचें अंग आहे तिला, टिन्पॉट् प्रेम, सक्तीचें किरटें प्रेम, शुष्क वांझोटें प्रेम, तिच्या मधाळ प्रेमाचा हा असह्य घुटका, तमाम प्रेमिकांचें धाडकन् प्रेम बसलें, हा प्रीतीचा हबका साहेना, तिच्या प्रेमाचा हिसका माहीत नाहीं.

प्रेत : : शव, कलेवर, मढें, मुडदा, मृत शरीर, निष्प्राण कुडी, मयताचा देह, ही शरिराची प्राणविहीन खोळ, हें टाकून दिलेलें जीर्ण वस्त्र, हें सोडून दिलेलें घरटें, हा मातीचा अचेतन हंडा, हें चार खांद्यावरलें, ओंकारेश्वराचा हा आवक अवाक् माल, पार्थिव देह, चैतन्यहीन मांसाचा गोळा, प्राणपखेरू उडून गेलेली काया, देव लोपलेलें देऊळ.

प्रेम : : स्नेह, मर्जी, आपलेपण, आपुलकी, प्रीति, माया, माझेपण, आत्मभाव, ममता, अनुराग, जिव्हाळा, आसक्ति, हृदयदान, सौहार्द, मन जाणें, हृदय अर्पिणें, कामप्रेरणा, मनजुळणी, आवड, मोहब्बत, जीव जडणें, मानासिजाची पीडा, जवळीक, पोटतिडीक, कळवळा, कळकळ, मन बसणें, लुब्ध होणें, लट्टू होणें, फिदा होणें, हृदय देणें, सूत जमणें, वर खूष होणें, आरक्त होणें, मन आसक्त होणें, मनानें एकमेकांचें होणें, मर्जी बहाल होणें, अंतःकरण जडणें, मनानें स्वाधीन, आषक होणें, हवें हवें वाटणें, त्यावर जीव होता, मनांत भरणें.

अनिवार ओढ, अंत:करणाचा ओलावा, जिव्हाळा नी प्रेमळपणा, अंतर्यामींची पसंती, हृदयाची स्निग्ध भूक, रेशमी पाश, मायेची पखरण, हृदयांची अदलाबदल, इष्काचा खेळ, अंतःकरणांतील खोल व्यथा, दोन शरिरें पण मन एक अशी स्थिति, प्रीतीचें मृणाल बंधन, गोड फसगत, गुलाबी प्रकरण, एक नवा जीवनरस, आत्म्याचा प्रतिहुंकार, समृद्ध जीवनाचा सोपान.

प्रेम (अंकुरणें) : : प्रीतीचें रोप अंकुरलें, भावविश्व हेलावलें, प्रेमाचा पान्हा आला, प्रेमाचा शिरकाव, प्रेमाचा विसार, प्रेमसागराला भरती, हृदय उचंबळलें, प्रेम नये सांगतां बोलतां दावितां अनुभव चित्ता चित्त

जाणें, त्याच्याशिवाय ओकं ओकं वाटे, पण राहवतें कुठें ? सगळे पाश तिकडे खेंचताहेत, डोळे लागून राहिले वाटेकडे, मानसपूजा सुरू झाली, कांहीं मनाविरुद्ध झालें कीं वाटे चुकलें आपलेंच, जाळावांचून कढ नाहीं मायेवांचून रड नाहीं.

प्रेम (निंदा) : : अंगचोर माया, प्रेमाचें नाटक, भावनांची उधळपट्टी, वेळमारू प्रेम, प्रेमाचा पुळका, हें असलें जंगी वात्सल्य, हृदय पिघळलें-जीभहि, चंद्रमौळी प्रेम, ढिसूळ प्रेम, विवेकबुद्धीची कबर, सोनेरी मृगजळ, वाळूचा किल्ला, हृदयाची एक व्यथा, गुलाबी गफलत, दाहक सुख, मधाळ हलाहल, तारुण्याची गुंगी, यौवनोन्माद, भावविश्वाला हादरणारी भूचाल, विकारसर्पाचा विळखा, १०० टक्के तोट्याचा व्यापार ! विस्तवाशीं खेळ, टोपलीभर त्यागाचें गुंजभर अत्तर, कटिशूळाचें सभ्य नांव, ही इंगळाची नांगी, अविचारांचें बंड, दांड विकारानें मांडलेला उच्छाद, मनाची कैद, वासनांचा चक्रव्यूह, प्रेम म्हणजे प्लेगची गांठ.

मनाचा अति चोरटा व्यापार, साक्षात् मूर्खपणाला दुसरें नांव प्रेम ! इष्काचा प्याला जहरी असतो, बाह्यांगाची पूजा, मनुष्य प्रेमांत आला कीं बुद्धीचें दिवाळें वाजलेंच समजा, प्रेम आंधळें असतें, आसुरी विकाराचें तांडव नृत्य, गलिच्छ हेतूला स्वच्छ नांव प्रेम, चावट भानगडी, नाकासमोर चालूनहि जेथें सरळ वाट सांपडत नाहीं तो प्रेमाचा प्रदेश ! अश्रूंविना प्रेम नाहीं, प्रेमांत पेरूं तितकें पिकत नाहीं, प्रेमाच्या या उभ्या कणसांवर केव्हां कीड पडेल नेम नाहीं, जगण्यासारखें फार असून ज्यामुळें जिणें सोसत नाहीं-तें प्रेम, भासाचें नाजूक सुख, आनंदाचें स्वप्नचित्र, केवळ कामज्वर, डोळस आंधळेपण.

प्रेम (स्तुति) : : प्रेम म्हणजे हृदयांतील किलबील, गुलाबी सुख, हृदयाची जखम-हांक, पकडलेलीं स्वप्नें, गगनचुंबी आनंद, मखमाली मौज, रेशमी जम्मत, दिव्यत्वाचा साक्षात्कार, हृदयवीणेचा झंकार.

प्रेमिक (टवाळी) : : प्रीतीचे-सेवेकरी-मेवेकरी-माळकरी व वारकरी सर्व हजर होते ! अलीकडे प्रेमभिक्षुक नाहीं तरी फार झाले आहेत, पट्टीचा प्रेमिक तो, प्रेमशास्त्रांतला दशग्रंथी किंवा पीएच्. डी. मिळालेलाच असामी म्हणाना !

प्रीतीचे हे सुरवंट या दिवसांत कॉलेजें–रेस्टॉरंटमधून दिसूं लागतात, प्रेम-पंढरीचा हा नित्याचा वारकरी.

प्रोत्साहन : : पाठीवर कौतुकाची थाप देतात, 'छूं' म्हणणारे जवळच असतात, हूं चालूं दे म्हणून गोंजारतील, नगद बक्षिसें अशा स्वरूपांत पाठिंबा, आपुलकी दाखवून प्रोत्साहितात, गुणग्रहण करून नैराश्य घालवितात; किमान उत्साहावर विरजण घालीत नाहींत, सदा पाठीशीं उभे, म्हणतील घे उडी पाहतों मी मागचें ! आपण तान घेतली तर लयीवर त्यांची मान डोलेल ही खात्री, गोड शब्दांनीं काय जातें ? पण तें मिळणें महत्त्वाचें, स्वत:च्या उत्साहानें भारून उत्साह दुणावतात.

प्रौढा : : तिच्या चर्येतील मुग्धपणा जाऊन निबरपणा आला होता, बुद्धीनें आणि संस्कारांनीं प्रगल्भ होत चाललेली, चुंबन देण्याचें तिचें पहिलें वय सरून गेलें होतें आणि दुसरें वय अजून दूर होतें, नाजूकपणा कोळपला.

पाऊस : : वर्षा, बरसात, बारिश, पर्जन्य, पावसाळा, झड, सर, जलवर्षाव, वर्षाऋतूचें जलसिंचन, मेघसिंचन, जलधारा, टप्टप् सर, मुसळ-धार–धुवांधार–नागडा–झिमझिम–झपाट्याचा पाऊस, पाऊस भरून आला, पाऊस सारखा ओतत होता, पावसाला खळ पडण्याचें लक्षण दिसेना, आकाशाला सारखी गळती लागली होती, पावसाची झड–संतत धार–रिपरिप–बारीक झिरझिर, पाऊस कोसळला, वळिवाचा पाऊस गडगडत तडतडत उतरला, पावसाच्या टपटपीस सुरुवात झाली.

आकाशाचा अश्रुपात, जलधारांचें सिंचन, टपोऱ्या सरी, अचानक सरी धडाधड आल्या, पाऊस मी म्हणत होता, झारीनें पाणी ओतावें तशा सरी, केवळ गुलाब-पाण्याचा शिडकाव, थोडे नांवाला शिंतोडे आले, धरणीला अभिषेक झाला, मेघ बरसले, रिमझिम पाऊस पडत असतां उन्हें पसरलीं, पावसाच्या झिरझिरीमुळें, जलपुष्पांचा वर्षाव, पावसाचा बारीक कीस सृष्टिसुंदरीच्या साडीवर पखरण करतो आहे ! पावसाची बुरबुर चालूच होती, मोठमोठाल्या सरी, ती सर एखाद्या मोठ्या हालत्या स्तंभाप्रमाणें सरकत सरकत उजव्या अंगाला वळली.

क्षणांत धारा लागल्या, आकाश कोसळलें, तृषार्त धरणीला पाणी

मिळालें, हत्तीच्या सोंडेसारखा हा पाऊस, मेघांची पृथ्वीशीं जणूं धडक-भेटच! पावसानें खोलगट भागांतील रस्त्यांचे छोटे नाले बनले, टप्टप् थेंब, मैदानाला तलावाचें स्वरूप आलें, पाण्याचा लोंढा, वर्षाऋतूचा वर्षाव होतांच सर्वत्र गारीगार झालें.

पाठलाग : : मागावर असणें, पाठ पुरविणें, पिच्छा न सोडणें, तसेंच सोडून न देणें, धुंडाळून काढणें, मागोमाग धांवणें, पाठीवर राहणें, पाळत ठेवणें, सतत शोध घेणें, ससेमिरा लावणें, हात धुवून पाठीस लागणें, जळीं काष्ठीं पाषाणीं असेल तेथें हुडकीत जाणें, ब्रह्मसमंधाप्रमाणें पिच्छा करणें, पावलावर पाऊल टाकीत मागें हिंडणें, लगोलग येणें, मागें सावलीसारखें रहाणें, पावलांचे ठसे शोधीत जाणें, तो जाईल तेथें हा आहेच! निसटूं न देणें, नजरेच्या टप्प्यांतून सुटूं न देणें.

पाठिंबा : : दुजोरा, हातभार, कैवार घेतला, बाजू सावरली–घेतली, आब राखला, पाठीशीं राहिला, पाठबळ दिलें, लाज राखली, टेकूं दिला, नेटा दिला, पाठपुरावा केला, सांवरून धरलें, संभाळून घेतलें, उचलून धरलें, हात–आधार दिला, पाठ राखली, दिलासा–दुजोरा दिला, कड घेतली, तळी उचलून धरली, रदबदली केली, पाठीस घातलें, मागें उभा राहिला, बहुमोल सहाय्य, आपला वांटा उचलला, प्राथमिक गरजांचा पुरवठा केला, मोलाची मदत, कनवाळूपणानें सहाय्य, सक्रिय सहानुभूति, तुला मी आहें व मला तूं आहेस.

पादपूरक (वाक्यें) : : सांगितलें राज्या ऽ नाहीं रे अशानं व्हायचं, लिहून ठेवा, माझा शब्द खोटा ठरायचा नाहीं, हात्तिच्या! त्यांत काय रे एवढें ?, आपले ते ‘ हे ’ हो! बरं तर बरं ऽ, म्हटलें अस्सं का, पाहूं पुढें काय होतें तें, ह्यः ह्यः करून नाहीं भागायचें देवा! गेला बाजार एवढा तरी, भ्रम आहे तुमचा भ्रम; सांगतों ऐका, दगड माती नी धोंडे! कशाचा नाहीं पत्ता, एहेरे! दिवे ओवाळा, च ऽ ऽ र !, कसचें काय नि कसचें काय? तसं म्हटलं तर, म्हटलं तर आहे म्हटलं तर नाहीं, म्हणे, त्याचें काय झालें, इथेंच तर घोडें पेंड खातें, कसलं आपलं, तेव्हां काय म्हणतों मी, हो बरें आठवलें.

पान : : पल्लव, झाडोरा, पाचोळा, पर्ण, झाडाचें हृदय कीं फुप्फुस काय तें, पालवी, धुमारे, झांवळी, अंकुर.

पाप : : असद्वर्तन, वामाचार, असदाचार, धर्मच्युति, धर्मापासून घसरगुंडी, धर्माज्ञांचें उल्लंघन, अनैतिक वर्तन, अघोरी कृत्य, अनीतीच्या सरोवरांत पोहणें, पापाला बळ असतें तें फक्त पायांत.

पाप्याचा पितर : : देवानें चुकून जिवंत ठेवलेला माणूस, किरटें पोरगें, काडी-पेहेलवान, यमाची चिठ्ठी यांच्या नांवानें केव्हांच आलेली दिसते ! मेले नाहींत म्हणून जिवंत म्हणायचे.

पापिणी : तरुण कोंबडी, कुळाला लांछन, संशयित चालीची, बेताल वर्तनाची, वांकड्या पावलाची, चाकोरीबाहेरचें जीवन चाखलेली, स्वेच्छाचारी, स्वैर, दिवटी, वाहवलेली, बिनहिशोबी जीवन, भटकभवानी, ही कुजलेली फांदी कावळ्याचीच वाट पहात होती ! लंगडी मैना, विनयहीन तरुणी, दूषित कुमारी, अनीतीच्या सरोवरांत पोहणारी, लाजू लाजू मेली त्याच गांवीं गेली, तिलाहि खारट-तुरट चांगलेंच कळत होतें, लवचिक नीतिमत्तेची, वांकडी नजर वांकडा भांग वांकडें पाऊल, गुण पाघळलेन्, अध:पतित, हें टवटवीत कमळ चिखलांतलें होतें, फुटक्या अब्रूचा.

पापी : : पाहतांच सचैल स्नान करावें असे, अधूनमधून दुर्व्यवहारास चटावलेला, एक लाख शिव्या त्याला द्या आणि गंधाचा ठिपका भिंतीवर उठवा; अशा तऱ्हेनें हिशोब ठेवून भिंत भरून काढा, रागावण्याच्याहि लायकीचीं हीं माणसें नाहींत, आपलाच दाम खोटा ! त्याच्या बाबतींत अशक्य असें कांहींच नाहीं, पंचमहापातकांपैकीं सर्व केलेला.

पायधरणी : : अनुनय, हांजी हांजी, म्हणाले मला दूर लोटूं नका, अनुग्रह करा, जिवें मारलें तरी येथून दूर जाणार नाहीं, हे चरण मला पूज्य, मी येथून हालणार नाहीं, माझी सेवा घ्या, हें शरीर तुळसीपत्राप्रमाणें अर्पिलें, तारा किंवा मारा, माझी परीक्षा पहा, कड्यावरून उडी टाक म्हटलें तरी टाकीन, काय सांगाल तें करीन, आपली आज्ञा शिरसावंद्य मानीन, आपला शब्द तोच माझा वेद, तुमचा शपथबद्ध सेवक होतों, दाढीला हात लावला, पायधूळ डोक्यावर घेण्याची तयारी दाखवली.

पारतंत्र्य : : गुलामगिरी, दास्य, दस्युत्व, परधार्जिणें जिणें, दुसऱ्याच्या हुकमतीखालीं राहणें, परावलंबित्व, दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिणें, मोकळिकीचा अभाव, स्वातंत्र्यहीनता, मानेवर परसत्तेचें जूं, कर्ता करविता दुसरा.

पाल्हाळ : : अति विस्तार, पाटीभर बोलणें; गुंजभर अर्थ, वृथाच चर्चा, चऱ्हाट वळलें आहे, आशयाचा पारा हातांत गवसत नाहीं, विषय मूठभर अवतरणें हातभर, उगाच उपदेशांचें पुराण, कशास कांहीं पत्ता ? पोतेंभर शब्दालंकारांचें भुस्कट पाडावें तेव्हां मूठभर आशयाचा दाणा हातीं लागतो ! स्त्रियांनाच नव्हे तर लेखकांनासुद्धां संततिनियमनाची आवश्यकता पटवून दिली पाहिजे असें लिखाण वाचून मात्र वाटतें, कोण काय बोलेल याचाहि चघळ वृत्तांत. वर्णन मारुतीच्या शेपटाप्रमाणें लांबतें, मूठभर मियाची हातभर दाढी, लांबण लावली आहे, रिकामी उरस्फोड, शब्द-गारुडांत विचार लोपला आहे, याविषयीं पानेंच्या पानें भरलीं, नमनावारी घडाभर तेल खर्चायचें.

पाशवी : : रानटी, जंगली, रासवट, धसकट, पशुतुल्य-समान, पशूलाहि लाजवील असें वर्तन, नुसता बैल, रेडा, टोणगा, आहारनिद्राभयमैथुनं एवढेंच यांना माहीत ! साहित्यसंगीतकलाविहीन, दोन पाय आहेत म्हणून माणूस म्हणायचें, शेंपूट बाकी आहे, जनावरच तें ! संस्कृतीचा पूर्ण अभाव, मानवतेला काळिमा, विकाराचा गुलाम, सर्व व्यवहार उघड्यावर; प्रेमहि रस्त्यावर, पशूंतहि नातींगोतीं ओळखीत असतील; याच्यांत तेंही नाहीं, भादव्यांतला रेडा, नर-पशु, रान-माणूस नुसता, पुच्छविषाणहीन कोटीपैकीं, जंगली जनावराप्रमाणें, चारपायी संस्कृतीचा भजक, माणुसकीचा अभाव, वनचरवृत्ति, पशुसमान-पशुनिर्विशेष जीवन, जंगलीपणा, संस्कृतिहीनता.

पाहणें : : बघणें, नजर टाकणें, कटाक्ष फेकणें, नेत्रांत सांठविणें, नजरा-नजर होणें, दर्शन घेणें, निरखणें, नजरेनें टिपून घेणें, डोळ्यांनीं पिऊन टाकणें, दृष्टिसुख घेणें, नजरेखालून घालणें, हेरणें, डोळे फाड फाडून पाहतात, वक्र दृष्टि, धांवती नजर टाकीत, डोळ्यांचें पारणें फेडलें, नयनतृष्णा

भागविली, नयनविद्ध, केलें, दृष्टिक्षेप, नजरानजरी, दृष्टादृष्ट, लाजरा बुजरा कटाक्ष, लुकुलुकु बघत, टुकुटुकु पहात, भिरभिरत्या नजरेनें.

पाहुणचार : : हवें नको विचारणें, उठबस करणें, आगतस्वागत, अभ्यागताची चौकशी, या बसा झालें, सध्यांचा मधुपर्क चहा आला, दोन जेवणें व तीन चहा अशी बरदास्त.

पांगणें : : पांगापांग, गर्दी मोडा वाट मोकळी करा, चार ठिकाणीं चार चालूं लागले, दाटी क्रमशः ओसरली, प्रत्येकजण वाट फुटेल तिकडे गेला, मंडळी घरोघर परतली, जमाव मोडला, दाटी कमी झाली.

पांगापांग : : आमचे रस्ते बदलले, वर्षांतून एकदां तरी भेटायचे, संकल्प झाले आणि कधींहि पाळले गेले नाहींत, एका गांवांत राहूनहि गांठीभेटी अवघड झाल्या.

पांढरा : : धवल, शुभ्र, सफेद, फक्क, दुधाळ गोरा, गोरापान, गोरागोरा, धवलिमा, पांढरटपणा, गोरेपण, निमगोरा, फिक्कट–धुवट गोरा, पांढुरका, पांढरट, गोरटेला, कोमट पांढरा, चुनखडी–साखर–कापसा–चिनी कपा–लोण्या–खडू–पिठा–कागदाप्रमाणें, कोडा–चांदण्या–दुधा–तांदळाच्या धुणा–फणसाच्या चिकासारखा पांढरा, हिमधवल, फेनधवल, दुग्धधवल, पांढरा फटक–फक्क, पिठोरी, परीटघडी, पांढरेपण, चांदीच ! नितळ पांढरा, अंबाडीसारखे पांढरे केस, मोदकासारखी गोरी व गरगरीत.

पिछाडी : : पिछवाड, मागला भाग, पश्चात् भाग, पृष्ठभाग, मागलें टोंक–अंग, पाठीकडचा, पृष्ठवासी, पाठीमागल्या अंगाला, पलीकडचा, कटिपश्चात् भाग, उलट अंगाचा, त्याची पाठ.

पिटणें : : मारणें, मोडणें, झोडणें, आदळणें, ठेंचणें, कुटणें, तिंबणें, रगडणें, ठोकणें, कुबलणें, चोपणें, कुट्टया काढणें, चेंचणें, कांडांत काढणें, बुकलणें, तुडविणें, बडविणें, धोपटणें, हाडन्हाड नरम केलें, पेंकाटांत हाणलें, पाठींत धपाटा घातला, गठडी वळली, सोट्याचा प्रताप दाखविला, पाठीचें धिरडें केलें, पाठीवर फटका दिला, तडाखा लगावला, त्याचा खिमा केला, गचांडी दिली, त्याचा रेंच उतरविला, पाण्यापेक्षां पातळ

केला, कणीक तिंबली, मुठीचा प्रसाद दिला, दहापांच रपाटे हाणले, चामडी लोळविली.

पिळवणूक : : नागवणें, एक्स्प्लॉय्टेशन्, चरकांत घालून काढलें, रस पिळून घेतला, थोड्या दामांवर काम करून घेतलें, शोषून चिपाड केलें, गांजवणूक केली, शेवटच्या थेंबापर्यंत फायदा पिळला, पान्हा संपला तरी दूध काढणें चालूंच होतें! घे घेऊन कोरडें केलें, पैशाअडक्याचा निचरा केला, जवळ होतें तें शक्य तेवढें देऊन टाकायला लावलें, श्रम घेऊन योग्य मूल्य दिलें नाहीं, इच्छेविरुद्ध हक्क सोडायला सक्ती केली, मोबदल्याचे जितके थेंब निघतील तितके दाबून काढले, दानाची खुषीची सक्ती केली.

नेसूंचें धोतरहि काढून घेण्याची वेळ आणली, नाडून घेतलें, खिंडींत गांठून जबरीनें वसूल केलें, आपला फायदा तेवढा पाहिला, दुसऱ्याला ठणाणा करायला लावलें, हक्काचा तांदूळ घेऊन भुस्सा हातीं ठेवला, वाममार्गानें देणें भाग केलें, कामाचे तास वाढवून पगार उतरविला.

पुढारी : : नेता, अग्रेसर, अग्रणी, प्रमुख, अधिनायक, नायक, अधिदेव, म्होरक्या, राजा, अग्रगण्य, आघाडीचा वीर, अधिराजा, सूत्रधार, सूत्रचालक, धुरंधर, नावाडी, कर्ण-धार, शिरोमणी, सिरताझ, गणाधिपति, मार्गदर्शक, धुरा वाहणारा, सुकाणू धरणारा, एक्का, मॉनिटर, ग्रुप-कॅप्टन बोलविता धनी, कर्ता—करविता, सर्वेसर्वा, हुकुमशाहा, लीडर्, व्ही. आय्. पी. चालक मालक, मानवंदनेचा मानकरी, निशाणवाला, गाडींतला माणूस.

टोळींचा प्रमुख, गट—शहा, कळप—हांक्या, या कळपाचा धनगर, पक्षाचा पाटील, शिकारी कोण; हाक्या कोण, लगाम कोणाचे ताब्यांत बरें ? पक्षहाक्या, शिरोधार्थ प्राणी, पक्षचाबूक, पक्षदेवता, फोरमन्, हेड गँगमन, यांचा सेनापति, सर्वाधिष्ठित, सर्वगामी व्यक्ति, मुख्य मिस्त्री.

पुढारी (श्रद्धांजलि) : : दुःखितांचीं दुःखें वेशीवर टांगीत, गाऱ्हाण्यांना वाचा फोडीत, अनाथांचे नाथ, हे प्रश्न लोकमताच्या चावडीवर आणले, टनावरी संघटना केल्या, राष्ट्रामध्यें नवचैतन्य ओतलें, जनजागृतीचा धोपट मार्ग स्वीकारला, चळवळीचें बीज रोंवलें, सच्चे चळवळ्ये—बोलण्यांत व कृतींतहि, सूत्रें कुशलतेनें हालविणारा, चिरकाल स्मरणांत

राहील, शुद्ध विचार व ते व्यक्त करण्याची उच्च शैली, यांच्या देहावसानानें देशाचें मोठें नुकसान, जनता यांचे मार्गदर्शनास मुकली, हुषार सल्लागार, असामान्य पुरुष, सार्वजनिक आयुष्यांत शक्ति व धैर्य यांचा पुरवठा करणारी महान व्यक्ति.

पुत्र : : मुलगा, वंशदीप, बाळ, वंशवेल वाढवणारा, पोरगा, पोर, संतान, युवराज, पोटचें मूल, पोटचा गोळा, आपल्या रक्तामांसाचा गोळा.

पुनरुक्ति : : तोचतोचपणा, एका ठशाचें, तेंच तेंच, कायम ठशाचें, एकाच नमुन्याचें, बदलहीन, एका सांच्याचें, ठराविक, सांचेबंद, एकरंगी, एकढंगी, एकछाप, एकाच ढांच्याचें, तीच ग्रामोफोन प्लेट, ठरीव, एक जातीचें, या केवळ कार्बन कॉपीज् होत ! त्याच प्रसंग–क्षणांची पिस्कारलेली पिंजण ! बेचव पुनरुक्ति, हा सारा काथ्याकूट, हा विचार सारखा कांडला आहे, दळलेलें पीठ पुन्हां कांडलें आहे, त्याच मुद्द्यांचें पिष्टपेषण, तेंच तेंच उगाळीत बसले आहेत, तेंच तेंच तुणतुणें चालू, चर्वित–चर्वण.

पुरावा (कच्चा) : : केवळ शाब्दिक हवाला, म्हणण्याचा पाठपुरावा करीत नाहीं, कोणाची साक्ष नाहीं, पाहिलें ऐकलें म्हणणारें कोणी नाहीं, सिद्ध करायला चिठ्ठी-चपाटीहि नाहीं, सारा अंधारांतला कारभार ! कागदोपत्रीं पुरावा कायतो ! उंदराला मांजराची साक्ष, तथाकथित पुरावा, केवळ जाबजबाब, उजाडलें पण सूर्य कोठें आहे ? पुराव्याच्या सांखळींत पुष्कळ कच्चे दुवे आहेत.

पुरावा (बिनतोड) : : धादान्ताला सिद्धान्त कशाला ? हातच्या कांकणाला आरसा कशाला, त्याच्या पदरांत पापाचें मापच टाकलें, हा सूर्य हा जयद्रथ ! बाप दाखव नाहीं तर श्राद्ध कर ! चक्षुर्वै सत्यम्, पुराव्याची एकसंध सरळ स्पष्ट व सहजसुलभ सांखळी, या प्रकरणावर संपूर्ण प्रकाश टाकील असा बळकट पुरावा, सबळ पुरावा, बालंबाल खात्री करील असा.

पुरेसें : : जरूरीपुरतें, गरज भागविणारें, कामचलाऊ, यथावश्य, मनमुराद, निकड भागवील, यथेच्छ, पुरेल, काम निभेल.

पुष्कळ : : मुबलक, खूप, बख्खळ, भरपूर, म्हणाल तेवढें, हवें तेवढें, रेट, यथास्थित, वाट्टेल तितकें, रग्गड, चेपून, दाबून, चिक्कार, पाणी भरतें

आहे, विपुल, चापून, व्याल तेवढें, पोटभर, मनमुराद, मन चाहेल तितकें, हजारों, लक्षावधि, शेकडों, कोट्यवधि, अगणित, अमूप, अनेक, मोजदादीच्या पलीकडे, किती म्हणून सांगू ? मोजून मोजून थकलों, अगण्य, असंख्य, बहुत, फार म्हणजे फारच ! थवाच्या थवा, रांगाच रांगा, किती तरी, बरेंच, पैशास पांसरी, अजीर्ण होईल इतकें, वारेमाप, ढेकर येईल इतकें, खंडोगणती, ढीग पडले आहेत ! पाऊस पडतो आहे ! छप्पन्नशें, शेपन्नास, डझनावारी, गठ्ठेच्या गठ्ठे, हे थोरले, चांगले ओ येईतों, अतोनात, मुंग्यांप्रमाणें, एक ना दोन किती म्हणून सांगावें ?

बचकभर, खंडीभर—नें समृद्ध, गांवोगांवीं, सुकाळ झाला, गल्लोगल्लीं झालीं, टोपलीभर, पहावें तिकडे, तेंच, असे छप्पन्न, त्याला काल तोटा ? अपरंपार, दशदिशा व्यापून राहिलें, ग्रोसा—डझनावारी, शेकड्यांनीं आढळतील, मोठ्या संख्येनें, कीटश्च कोटायते ! नुसता पूर आलाय, भूछत्रांइतके मुबलक, नटीच्या साड्यांइतके.

पुस्तक : : ग्रंथ, किताब, वही, चोपडें, पोथी, बुक, चिकटबुक, टिप्पण, हीं ज्ञानाचीं मुक्तद्वारें, ज्ञानाचा दरवाजा उघडणाऱ्या या किल्ल्याच होत ! बोलका ढलपा, विद्वत्तेची खाण, ज्ञानगंगेचा कलश, माहितीची पाणपोय.

विचारांचा मार्गदर्शक, अनुभवांचा झरा, स्मृति-कोठार, विद्याधनाची बँक, विश्वदर्शनाचा झरोका, पांडित्याचे नेत्र, जतन केलेले विचार, पंडितांचीं स्मारकें, युक्त्याप्रयुक्त्या भरलेलीं पेवें, लोखंडाचें सोनें करणारा परीस, संस्कृति-प्रासादाचा चौथरा, दीपस्तंभच जणूं !

पूर्ण : : अख्खें, एकूण, सर्वच्या सर्व, आमूलाग्र, अजीबात, साफ साफ, पार, सपशेल, बिलकूल, अज्जी, निखालस, मुळापासून, सर्वस्वीं, परिपूर्ण, पुरेपूर, तळापासून, अंतर्बाह्य, चौफेर, एकूण एक, तमाम, निःशेष, आमूल, समूळ, चट सारा, झाडून सारा, समग्र, नखशिखान्त, आपादमस्तक, अपवादरहित, साकल्यानें, शेंड्याबुडख्यासकट, अविभंजित, अत्रुटित, अभंग, भाग न पाडतां, अखंड, फाळणी न करतां, न फोडतां, सलग, अथपासून इतिपर्यंत, या कडेपासून त्या कडेपर्यंत, सुष्ट दुष्ट सर्व, झाडून सर्व, अगदीं नाहीं, मुळींच नव्हे, शंभर हिश्श्यांनीं, रुपयाचे सोळा आणे,

सर्वंकष, सर्वतोमुखी, बालंबाल, सगळें, निरपवाद रीत्या, अ पासून ज्ञ पर्यंत, कांहीं वगळावगळ न करतां, शंभर टक्के, पायाच्या नखापासून डोक्याच्या शेंडीपर्यंत.

पूर्वग्रह : : दूषित दृष्टिकोन, पूर्वग्रह–दूषित नजर, रंगीत चष्मा, पूर्व–कल्पना, गैरसमज, चुकीचा ग्रह, विकृत दृष्टि, कावीळ झाल्याप्रमाणें पाहणें, मेंदूचीं कोळिष्टकें, मनावर चढलेला गंज, विचारशक्तीवर सांचलेला मळ, दृष्टिकोन संकुचित करणारी खोल अढी, पुराव्याशिवाय सिद्धान्त बांधणें, डोळ्यांतील वडस.

पूर्व-तयारी : : पूर्व–सिद्धता, प्राथमिक आंखणी, रूपरेषा ठरविली, ब्लू–प्रिंट केलें, आराखडा बनविला, मोजमापें घेतलीं, कच्चा खर्डा तयार केला, आगाऊ जागा निश्चित केल्या, स्थूलमानानें आद्य अंदाज घेतला, बजेट बसविलें, प्लॅन केला, रंगीत तालमी घेतल्या, रेषा मारल्या, योजना कागदावर उतरली, कागदी घोडे प्रथम तयार केले, टिप्पणी व याद्या झाल्या, स्केच काढलें, मोडणी व घाट आगाऊ निश्चित केला, ढांचा बनविला, मार्ग पसंत केला, प्राथमिक मांडामांड झाली.

पूर्व-नियोजित : : पूर्वकल्पित, आधीं ठरवून, प्रथम आंखल्याप्रमाणें, आगाऊ केलेल्या ब्लू–प्रिंटप्रमाणें, कट करून नंतर, जमवाजमव करून, जाणूनबुजून, आयत्या वेळीं सुचलेलें नव्हे, बेत करून, आधींपासून–च्याच कल्पना पुढें साकारल्या, ठराव करून, वचन-बद्ध होऊन, मांडामांड–रचना–जुळण केल्यावर, याची प्राथमिक आंकडे–मोड झाल्यावरच हें घडलें आहे, निश्चित केल्याप्रमाणें, दिसलें भासलें व केलें असें नसून पाहिलें निरखलें–ठरविलें व पार पाडलें, याचें टाइम-टेबल प्रारंभालाच ठरलें होतें ! जसा संकल्प सोडला होता तसें, सल्लामसलत करून मग हल्ला !

कॅलेंडरवर काट मारलेल्या दिवशीं, डायरींत टिपल्याप्रमाणें, याच्यासाठीं आधीं सभा भरल्या होत्या, विचारांची देवाण घेवाण झाली होती, याचे तिथि–वार–नक्षत्र ज्योतिष्याकडून आधींच आणले होते, पद्धतशीरपणें यादी केल्याप्रमाणें.

पूर्वपद :: पण कथा पूर्वपदावर–पूर्वस्थितीवर आल्यावांचून राहणार नाहीं, पुन्हां पाढे पंचावन्न, आली मूळपदावर, तो आपल्या वळणावर गेला, पुन्हां येरे माझ्या मागल्या, कुत्र्याचें शेपूट वाकडेंच! जैसे थे, मागें येणें, पुनरागमनाय च, जेथें होतों तेथेंच परत, कांहीं प्रगति नाहीं.

पृथ्वी : धरा, धरणी, जग, अवनि, मेदिनी, भू, वसुंधरा, भूतल, अवनितल, भूलोक, इहलोक, धरणीमाता, भूमाता.

पेंचप्रसंग :: शृंगापत्ति त्रांगडें, पेंच, बांका प्रसंग, अवघड वेळ, बिनतोड परिस्थिती, आणीबाणीची वेळ, अडचणीची स्थिती, पेंचदार समस्या, अक्रोड सिच्युएशन, प्राणसंकट, बिनतोड डाव, इकडे आड तिकडे विहीर, इकडे साप तिकडे दरड, धरलें तर चावतें सोडलें तर पळतें, इकडे आग तिकडे फुफाटा, खाल्लें तर बाधतें टाकलें तर श्रापतें, वाघ म्हटलें तरी खातो वाघोबा म्हटलें तरी खातो, अडचणीचें दुखणें नि जांवई वैद्य! समोर बैल मागें नाग, किल्ली आंत टाकून बाहेर खोलीला कुलूप घातलें, आई खाटीक बाप कसाई, आई खाऊं घालीना बाप भीक मागूं देईना, असंगाशीं संग नी प्राणांशीं गांठ, बोचकें कीं डोचकें गमवावें असा पेंचप्रसंग! दगडाखालीं हात सांपडला, गळा गुंतला, प्रसंग पडे बांका तो गधेको कहना पडता है काका, तोंड बांधून बुक्क्यांचा मार, तेरी चूप मेरीबी चूप अशी स्थिती, चोरीचा मामला हळूहळू बोंबला! आपलेच दांत आपलेच ओठ, न बोलावें तर साहत नाहीं बोलावें तर अब्रू जाते, यांत कुठूनही सुटका नाहीं, गाडा चिखलांत रुतला, कमळाच्या जाळ्यांत अडकल्यागत, नेहमींचा खोड्यांत अडकला जाण्याची भीति, धडपड करावी तर अधिकच खोलांत, चिमट्यांत धरल्यागत स्थिति.

मृदंगाला दोन्हींकडून थाप, प्रवाहाच्या ऐन मध्यावर नावाडी सोडून गेले, जणूं नकळत मधमाश्यांचें पोळें जागें केलें, ही डोक्यावर टांगती तलवार ठरली, गुपचूप राहतां शिंक येऊं लागली तसें, सभेंत बोलतांना कासोटा निसटला! कोणी ओळखलेंच तर आली का पंचाईत! प्रकरण अंगाशीं येतें कीं काय असें वाटलें, काय करूं कसें करूं झालें, ही निरगांठ सुटावी कशी? दोन पात्यांची ही कात्री आणि मध्यें माझे तुकडे!

पैसा (निंदा) : : पैशाचें प्रलोभन गुण शोषतें, कलह हे धनमूल असतात, गुळाचा पत्ता डोंगळ्यांना लागतो, पैसा आला कीं माणुसकी गेली, पैसा बोलतो आहे हा! एकच गोष्ट मनांत डांचते; या जगांत सुखाची पैशाशीं पडलेली सांगड योग्य आहे काय? आपकमाईचे पैसे कीं बापकमाईचे? रूपेरी शृंखला, बसून खाण्याची इच्छा, पैसा दैवत झालें कीं अनीति ही नीरांजन ठरते, सोन्याच्या तुकड्याची किंमत बापजाद्यांनीं भजलेल्या देवापेक्षां जास्त झाली आहे, सर्वच व्यवहार हल्लीं देवघेवीच्या ऐसपैस तत्त्वावर चालला आहे, रिकामें पोतें ताठ उभें राहूं शकत नाहीं, देणाराचा हात नेहमींच वर असतो घेणाराचा खालीं, लुळीपांगळी श्रीमंती, पैशाच्या समुद्रांत सदसद्विवेक बुद्धीचें प्रेत तरंगत असतें, जोंवरी पैसा तोंवरी बैसा, गुळाप्रमाणें पैशाला मुंगळे चिकटतात.

पैसा (विपुल) : : खोऱ्यानें पैसा ओढतो आहे, चांगलेंच उखळ पांढरें झालें, अगदीं नागवें कोल्हें दृष्टीस पडलें! अकल्पित धनलाभ, नाण्यांचा पाऊस पडला, लक्ष्मीची कृपा झाली, संपत्तीचा ओघ वळला, त्याच्या घरांत पैशांचा धूर निघतो आहे सध्यां, जाळायला पैसा आहे.

पैसा (सामर्थ्य) : : खिशांत चुरमुरे असले कीं कसलीही मासळी पागतां येते, पैशानें राजाची राणी विकत घेतां येते, दाम करी काम, द्रव्यानें सर्व वश, पैशाला पापें पचतात, दुभत्या गाईच्या लाथा गोड, असतिल शितें तिथें जमतिल भुतें, पैशानें दगडसुद्धां तोंड उघडतो, पैशानें इंद्राची इंद्राणीसुद्धां विकत घेतां येते! पैसा जोडतो पैसा तोडतो, रामकृपेपेक्षां दामकृपा मोठी!

पोकळपणा : : सारी कर्तबगारी पोषाखी होती, बोलघेवडे सुधारक, दुरून डोंगर साजरे, केवळ गप्पीदास, पोकळ बडबड, झांकली मूठ, मोठा बुडबुडाच, ताकाला जाऊन भांडें लपवायचें! तोंडदेखलें बोलणें, पोकळ अकांडतांडव, हंसण्याचें नाटक करीत, धार्मिकपणाचा नगारा बडवितात, खुर्चीवरून चर्चा, बोलण्यांत बोलणें नाहीं.

पोटार्थी : : भोजनवादी, जेथें भरे डेरा तोच गांव बरा, नोकरी हेंच प्राप्तव्य, भाडोत्री सेवक, दिल्या भाकरीचे, ज्याचें खावें मीठ त्याची चाकरी

करावी नीट, पोटोबा तोच त्याचा विठोबा, दुपारची वेळ भागविणें हेंच यांचें उद्दिष्ट.

फटफजिती : : फज्जा, जिरली, परवड, धांदल, कढी पातळ झाली ! रग जिरली, खात्री झाली, तीन-तेरा झाले, त्रेधा उडाली, पची झाली, जमिनीवर स्वतःची लांबी मोजली, पासले पडले, सगळाच मुदलांत घोटाळा झाला, गंमतच झाली, खूप केलीत, चेष्टा-मस्करीचा विषय झाले, करायला गेले काय नी वर झाले पाय ! अग अग म्हशी मला कांग नेशी अशी वेळ, बापापरी बाप गेला बोंबलतांना हात गेला ! तेरीबी चूप मेरीबी चूप, आतां काय करतो ? मारुतीचा बेंबी गार म्हणायलाच हवी ! तोंड दाखवायला जागा उरली नाहीं, सोळा आणे झाली, हा शेपूटतुटका काल्हा सर्वांना तोच सल्ला देणार ! तेल गेलें तूप गेलें हातीं आलें धुपाटणें ! साग्रसंगीत झाली, सगळेंच मुसळ केरांत गेलें, चुंबीत आले, नाकधुऱ्या काढाव्या लागल्या, चोरीचा मामला हळूहळू बोंबला, सर्व ऐट गळ्यांत आली, तंगड्या गळ्यांत आल्या, गुरूचा उपदेश गुरूला फळला, केलें तुका झालें माका ! खड्डा दुसऱ्याला खणला स्वतः आंत गेला, गरगरीत आपटले, सणसणीत आपटी खाल्ली, स्वाभिमान गिळावाच लागला, पळतां भुई थोडी झाली, लोटांगण घालावें लागलें, रावण पडला उताणा त्याच्या तोंडांत फुटाणा, तो प्रयोग अंगलट आला, सारेंच ओमूफस् झालें, त्याचेच दांत त्याच्या घशांत घातले गेले.

फसवणूक : : ढोंगी संपादणूक, बंडलबाजी केली, मागाहूनची सारवासारवी, कांहीं थातुरमातुर करून बनविलें, केवळ पोकळ देखावा केला, प्रत्यक्ष पाऊल उलट दिशेनें ! स्वतःच्या कृष्णकृत्यांवर रंगसफेती चढविली, डाग पुसावयासाठीं हें ढोंग उभें केलें, मायावी आश्वासनें दिलीं, करून नामानिराळा, दर वेळीं नवी क्लृप्ती करून मासा गळाला लावला, व्यूह मांडला व शिताफीनें चकविलें, मोहजालाचा प्रयोग गेला, सर्वांना आपल्या अकलेचा प्रसाद देऊन गेला ! या बोटाची थुंकी त्या बोटावर केली व पळवाट काढली, गुंगारा दिला.

फसविलें : : गुंगारा दिला, टांग मारली, आंगठा दाखवला, बंडलबाजी केली, हातावर तुरी दिली, चुकवलें, झुकांडी दिली, बनवलें, भुलविलें,

ठकवलें, फशीं पाडलें, गोत्यांत आणलें, आब्बा–मोरू केला, टोपी घातली, डोळ्यांत धूळ फेकली, कांहीं काळ नजरबंदीच केली म्हणाना !

फळें : : त्या हिरव्यागार फळांना कुणी तरी अरुणोदयांत बुडवून आणलें असावें असें त्यांच्या फिक्कट रंगावरून वाटत होतें.

फाजील : : चावट, चहाटळ, थिल्लर, हुच्चा, पाचकळ, पांचट, मिस्किल, छचोर, बाष्कळ, अश्लील, अर्वाच्य, वाह्यात, जिभेचा सैल, वात्रट, जादा, ग्राम्य, इब्लिस.

फायदेशीर : : लाभदायक, उपयुक्त, त्यांतून कांहीं प्राप्ति होईल, नफ्याचें, तुमच्या भल्याचें, किफायतीचें, फायदेमंद, त्यांत कांहीं सुटेल, त्यांत लभ्यांश आहे, हिताचें, हितकर, पथ्यावर पडेल, हात ओले होतील, तें कांहीं देऊन जाईल, हातीं कांहीं गवसेल, त्यांतून पीक निघेल, वाढावा मिळेल, बोनस सुटेल, व्याज–डिव्हिडंड याची खात्री, हा आंतबट्ट्याचा व्यवहार नाहीं, उखळ पांढरें होईल.

फांदी : : शाखा, फाटा, धुमारा, डहाळी, फांद्यांची–पानांची सळसळ, कळ्या–फुलांनीं डवरून गेलेली, त्या निष्पर्ण गांठींनीं भरलेल्या फांद्या एखाद्या जाखणीच्या बोटांसारख्या दिसत होत्या.

फुकटपगारी : : पांढरा हत्ती, फुकटखाऊ, कोठल्याशा कंपनींत फायद्यांतील ३५० रुपये कमी करायला मदत करतो, पगार व लायकी यांच्या व्यस्त प्रमाणांत ज्या नालायकांची वर्णी लागते त्यांपैकीं एक, आयत्या पे-शीटवर सही ओढणारा, कंपनीचा जांवईच ना तो ! सह्याजी-राव, छोटी सही कीं बडी सही इतकेंच यांना माहीत; पण पगार केवढा ! हे म्हणजे फर्मच्या तिजोरीचें मोठें भोक, तळीराम गार होईल इतका पगार घेतात, यांच्या पगारांत दहा माणसें येतील, दैवानें नव्हे मॅनेजिंग बोर्डानें दिलें आहे–खातोय्, या उंदरानें मोठेंच बीळ कुरतडलें आहे.

फुटणें : : तडकणें, मोडणें, भेगाळणें, तुकडे होणें, भगदाड–चीर पडणें, ठिकऱ्या उडणें, चिरा–तडा जाणें, भाग होणें, चक्काचूर होणें, तुकडा उडणें, टवका निघणें, कोने उडणें.

फूट : : भेद, नाना पंथ, फुटीर वृत्ति, एकजुटीचा अभाव, चीर गेली आहे, एकसंध नाहीं, चारांचीं तोंडें चार दिशांना, घरभेदे आहेत, दुवे घट्ट नाहींत, हेतुभिन्नता, जोडणारे सांधे कच्चे आहेत, एकजीव नाहींत, प्रकार प्रकार आहेत, भेगाळलेलें जीवन.

बडतर्फी : : अर्धचंद्र-डच्चू मिळाला, हकालपट्टी, कमी झाला, पटावरुन नांव निघालें, जा म्हणून सांगितलें, नोकरीवर गदा आली.

बढाईखोर : : स्वतःचा बडेजाव सांगणें, आपल्याभोंवतीं दिवे ओवाळून घेतो, नेहमीं आत्मपुराण चालवलेलें असतें, सर्वत्र प्रथम पुरुषी सर्वनामाचा संसार थाटला आहे! वल्गना करतो, सर्व वर्णन स्वतःचें व स्वतःच्या कर्तृत्वाचें, आपल्या कर्तृत्वाचें किस्से ऐकवतो, आम्हीं यंव् केलें नी आम्हीं त्यंव केलें हें सदाचें बोलणें.

बदचाल (पुरुष) : : ढिला, अनीतिमान, चाकोरीबाहेरचें जीवन जगणारा, दुराचारानें बरबटलेला, विषयासक्त, स्त्रियांचा विहित किंवा निषिद्ध सहवास घेतलेला, वाईट मार्गानें गेलेला, अनीतीच्या सरोवरांत पोहलेला व पोहणारा, पापाचा टिळा लागलेला, चोरटे संबंध ठेवणारा.

बदचाल (स्त्री) : : उडती मैना, भानगडखोर बायको, उनाड पांखरूं, केसभर गजरा आणि गांवभर नजरा, सडकें फळ, नासलेला आंबा, उष्टी पत्रावळ, इंद्र बदलतात पण ही इंद्राणी एकच आहे! कुलटा, भ्रष्ट, ती म्हणजे पोस्टाचें तिकिट, छिनाल सटवी, भटकभवानी, पापाचरणी, गुण पाघळले आहेत, जारिणी, व्यभिचारिणी, तिचें प्रेम खिरापतीसारखें आहे; कोणालाही मिळतें, नटरंगी मुलगी.

बदनामी : : जनापवाद, जननिंदा, अब्रूची खराबी, नांवास बट्टा, कीर्तीला कलंक, घराण्यावर डाग, कुळास लांछन, बेअब्रू, जगांत नाचक्की, लोकापवादाचा विषय झाला, अब्रूला काळिमा, बेइज्जती, बदलौकिक, दुर्लौकिक, दुष्कीर्ति, इभ्रतीवर शिंतोडे, नांव बद्दू झालें, तोंडाला काळें फासलें, अब्रू डागाळली, काळोखी लागली, अपकीर्ति, अब्रू धुळीस मिळाली, कमावलेलें नांव गमावलें, इभ्रतीची राखुंडी झाली, जगांत कमीपणा आला, लाज चवाठ्यावर आली, खालीं पाहण्याची वेळ आली, अब्रूचें भांडें तडकलें.

बदल : : परिवर्तन, स्थित्यंतर, संक्रमण, रूपांतर, फेरबदल, उन्नति, आजचें उद्यां नाहीं, कायापालट, फार फेरफार, जुनें जाऊन नवें आलें, आमूलाग्र नवेपण, ठेवणच बदलली, नवीं क्षितिजें दिसूं लागलीं, थारेपालट, नवीन पाउलवाटा.

बदल (वाईट) **: :** आज अमीर तर उद्यां फकीर, नित्य नवीं सोंगें आलीं; चालरीत सारी गेली, जुने डोळे नवे चाळे, नवी विटी नवें राज्य, आर्थिक व्यवस्थेस धक्का देणारी नवी घडी, पहिलें तें उरलें नाहीं, पहिला जमाना गेला, सर्वच पारडें फिरलें! गाडें उलटलें, यानंतर गाडीनें रूळ बदलले, उद्दिष्ट भिन्न झालें, मनू पालटला, काळ बदलला, नव्या बाटलींत जुनी दारू.

बलिदान : : प्राणाची–सर्वस्वाची आहुति, प्राणार्पण, सर्वस्वावर तिलांजलि, स्वार्थाचा होम, प्राण वेंचले, शिर उतरून दिलें, त्यागाच्या होमकुंडात स्वतःला फेकलें, सर्वस्व बिनतक्रार अर्पिलें, स्वतःचें घर स्वतःच्या हातांनीं पेटविलें, तनमनधन अर्पण केलें, आत्मसमर्पण, मृत्यूच्या जबड्यांत जाणूनबुजून मान दिली, सतीचें वाण बुद्ध्या हातीं घेतलें, जिवावर उदार होऊन पुढें झाला, स्वार्थाची चिता स्वतःच्या हातानें पेटवून दिली, स्वतःस जाळून उदबत्तीप्रमाणें इतरांस सुवास दिला, कोईप्रमाणें स्वतःला पुरून घेऊन जगाला गोड आंबे दिले.

बलिष्ठ : : ताकदीचा, समर्थ, बळकट, जोमदार, प्रबल, शक्तिशाली, रगेल, तगडा, धट्ट, दांडगा, भलाभक्कम, पहाडी ताकदीचा, बलभीम, सामर्थ्यशाली, धडाकडा, सुदृढ, स्नायूंत बळ आहे, तगड्या प्रकृतीचा, मनगटांत रग, वज्राप्रमाणें अभेद्य, लाथ मारील तेथें पाणी काढील! धक्के खाण्याची धमक, शापादपि शरादपि असा, अशा भानगडी निस्तरायला समर्थ, पोलादी मनगटाचा, पोलादी मनुष्य, कळीकाळालाही भारी, वांकड्या नजरेनें पाहण्याची कोणाची प्राज्ञा नव्हती, शेरास सव्वाशेर, विरुद्ध ब्र काढण्याची कोणाची टाप आहे? शत्रूला धूळ चारण्याची धमक, यांच्या वाटेस कोण जाणार?

ब्रह्मचारी : : लग्नाविना राहिला, सडाफटिंग माणूस, ना पाठी ना

पोर्टी कोणी, एकटा जीव सदाशिव, मजबूत ब्रह्मचर्य, कासोट्याचा खबरदार, एकट्याचा संसार, सर्व स्त्रिया त्यांना मातेसमान, खरा कार्तिक स्वामी अथवा शुक.

ब्रह्मचारी (निंदा) : : गृहस्थाश्रम झेपत नाहीं; संन्यास पाळत नाही, यांना आशा सुटेना देव भेटेना, खोटी लाज खोटा ध्येयवाद खोटें पावित्र्य यांचीं पांघरुणें घालून प्रेमांतलीं दुःखें वा जीवनांतलीं अपयशें लपवितात, मोडकेंतोडकें ब्रह्मचर्य, पकडला तर चोर नाहीं तर साव, मारून-मुटकून ब्रह्मचारी, यांचे कडीबंद सद्‌गुण खरे का ? हीं माणसें ब्रह्मानंदाचे खोटे मुखवटे चढवितात, बाहेर वेगळा आंत वेगळा, नियमांचें नसतें स्तोम, हें त्यांचें ढोंग आहे, 'डबाबंद' सद्‌गुणी, मेंगें लंगोट-बंद ब्रह्मचर्य, ब्रह्मचारी सदा भिकारी.

बाकी : : अवशिष्ट, उरलेंसुरलें, उच्छिष्ट, शेष, राहिलेंसाहिलें, उरलें तें, शेषांश, गाळ, तळचें राहिलेलें, ताटांत राहिलेलें, खरकटें-मरकटें, खरवड.

बायको : : कान्ता, बायडी, स्त्री, औरत, बिब्बी, अंगना, मंडळी, कुटुंब, माणसें, जीवनसहचरी, अर्धांगी, पत्नी, त्यांची ' अर्थें च कामे च ' कोठें आहे ? गृहस्वामिनी, होम-डिपार्टमेंट, होम–मिनिस्टर, त्यांचें अर्धांग, घरधनीण, नाकांतली वेसण, गळ्यांतली धोंड, सत्तेचे गुलाम, यांच्या गोठ्यांत बांधलेली गरीब गाय, संसारसाथी, हक्काचें माणूस, कारभारीण, सत्तेचें माणूस, प्रीतीचें आपलें माणूस, पायांतली वहाण, पायांची दासी, जिव्हाळ्याचें माणूस, गृहिणी, वधू, बेटर हाफ्, गृहराज्याची राणी, चूलमूल विभागाची व्यवस्थापिका.

बालंट घेणें : : तोहमत घेणें, कांगावा करणें, कुभांड रचणें, आळ घेणें, खोटा आरोप लादणें, दोष चिकटवणें, खोटेपणीं नांव घेणें.

बावळट : : नेभळट, मेषपात्र, अगदीं कसा रे तूं असा ? नाकावरची माशी उठायची नाहीं, नुसतें ध्यान, सोंग आहे, खेडवळ, बुध्दू, मेंग्या, डोळ्यांत तरतरी नाहीं, अजागळ व अव्यवस्थित, कोठें गेला तरी दारावर अडवतील ! मुखदुर्बळ, कधीं काय करायचें तें सुचायचें नाहीं यांना.

बाळ (राजस) : : मखमली गाल, ओठांच्या पाकळ्या, गोरटे गाल, चिमणे ओठ, लुटुलटू चालतो, बाळ चुटूचुटू पिऊं लागला, बाळराजा झोंपला, दुडूदुडू धांवत, सोन्यासारखें मूल, गोडींत गोड मुलाचे बोबडे बोल.

बाळपण : : बाल्य, पोरवय, शैशव, कुमारवय, लहानपण, बच्चेपण, शाळकरी जीवन, जीवनउषा, हुंदडाकुदायचें वय, सोनेरी प्रातःकाल, जीवनप्रभात, ते निष्पाप दिवस, जीवनवृक्षाची पालवी, हा मोहोर, अजून ओठ पिळला तर दूध निघेल ! मिसरूडहि फुटली नाहीं, अद्यापि अंड्यांतच आहे, अरुणोदयाचा काल, दुधी पेन्सिल घेऊन पाटीवर लिहण्याचें वय, जीवनांतला सोनेरी पट्टा, ज्या वयांत सर्वत्र स्वल्पविराम असतात.

बाळंत झाली : : प्रसूत झाली, पुत्रास जन्म दिला, कन्यारत्न झालें, बाळास जन्म दिला, बाळंतपणांत हातींपायीं सुटली, इस्टेटीस वारस दिला, बायकांच्या पोटांत गुपित म्हणून कसें तें रहात नाहीं–तिचें तसेंच झालें, तिची दर वर्षाला खाट ! किती वर्षांनीं पाळणा हालतो ! बऱ्याच बाळंतपणांमुळें तिच्या देहामध्यें अपूर्वाई कांहीं राहिली नव्हती, पुत्रजन्माचा आनंद तिच्या अष्टांगीं मावत नव्हता.

बांक : : कमान, कल, वळण, तेढा भाग, वांक, चक्राकार, तिरपणें, वळणें, वांकणें, नागमोड, तिरपाकडें होणें, जेथें रस्ता चकणा झाला आहे, पडती बाजू, झुकता भाग, दबलेली बाजू, डुबती बाजू.

बांधा (मुलीचा) : : सडपातळ, चवळीच्या शेंगेसारखा, शिडाशिडीत, उंचेली, उभी कुडी, अंगकाठी रेखीव, सुडौल बांधा, गोंडस–अटकर बांध्याची, जिथल्या तिथें प्रमाणबद्ध, वाढाळू, उफाड्याची पोर, उंच शेलाट्या अंगाची, अंगानें भरलेली, चणीनें लहान, सुबक मांसल अंगलट, ठेंगणी–ठुसकी, उत्तम कट्, चणीनें लहान, भरदार कणसासारखी सुबक बांधणीची देहयष्टि.

बिघडविलें : : नासविलें, खराब करून टाकलें, सत्यानास केला, बिब्बा घातला, कुजविला, शान घालविली, नीतिच्युत केलें, मोडलें, कोलदांडा घातला, मधें पडला, चव घालविली.

बुद्धि : : मेंदू, खोपडी, डोकें, भेजा, अक्कल, चलाखी, हुषारी, चातुर्य, टाळकें, डोचकें, मस्तिष्क, समंजसपणा, समज, बुद्धिवैभव, बुद्धितेज, शहाणपण, विद्वत्ता, पांडित्य, ज्ञान, तीव्र बुद्धिमत्ता, अंगची बुद्धि, विषयग्रहणशक्ति, ' ता ' वरून ताकभात ओळखणें, डोकेबाजपणा.

बुद्धिप्रामाण्य : : बुद्धिवाद, डोळस श्रद्धा, तर्काची कांस धरणें, दिसेल व पटेल तेंच करणें, अंधश्रद्धेचें कावील न होणें, बुद्धीच्या प्रकाशांत प्रश्न सोडविणें, आप्तवाक्याचा वरचढपणा झुगारणें, मेंदू सांगेल त्याप्रमाणें करणें, विचाराचा निकष लावणें, कोणी लोक म्हणतात म्हणून न मानणें, बाबा वाक्यं प्रमाणं हा सिद्धान्त न मानणें, डोळे व मन सताड उघडीं ठेवून वागत जाणें, तर्काच्या कसोटीवर घासून उरेल तेंच सत्य समजणें, विवेक हाच ध्रुवतारा, विचार हाच या संसारनौकेचा तांडेल, भावनाविवश न होणें, धर्मसिंधूही आडवा आला तरी तो बाजूस ठेवणें, विचारशक्तीच्या आगींत जें शुद्ध म्हणून उतरेल तेंच स्वीकारणें, शास्त्राच्या पायावर सिद्धान्तांची उभारणी करणें.

बुद्धिमान : : तल्लख, हुषार, चाणाक्ष, अक्कलवाला, धूर्त, चारित्र्याला बुद्धि-वैभवाची जोड, चतुर, कल्पक, चलाख, त्याच्या बुद्धीचे भिन्न भिन्न पैलू, व्यापक व सूक्ष्मग्राही बुद्धि, हें हेरण्याची दूरदृष्टि, याला चमचाभर अक्कल जास्त आहे, कुशाग्र बुद्धीचा, तैलबुद्धीचा, अशिक्षित-पटुत्व, यांच्याकडे अनंत युक्त्या व क्लृप्त्या आहेत, यांच्या बुद्धीची रग–भूक मोठी.

बुवाबाजी : : वृक्ष तेथें छाया बुवा तेथें बाया, मेंढीचें कातडें पांघरलेला लांडगा, घोर प्रतारणा, ढोंगी सोवळेपणा, दाखवायचे दांत वेगळे खायचे वेगळे, दिसतें तसें नसतें म्हणून जग फसतें, आपण शेण खाऊन दुसऱ्याचें तोंड हुंगणारे, बाहेर बरवा आंत हिरवा, बाहेर झकपक आंत भगभग, आपलें काम देवाचें नांव, दिसण्यांत बाळबोध कृतींत दुर्बोध, पोटांत काळेंबेरें, गायतोंडे गायधनी आणि कंपनी ! दाढीदीक्षित पुंड, मुखवट्यांचें जीवन जगण्यांत पटाईत.

बेअक्कल : : मूर्ख, निरक्षर, अनभिज्ञ, वेडा, नुसता घोडा वाढला आहे ! अक्कलखातीं शून्य, हीं माणसें डोक्यानें जरा ढिलीं असतात, नुसतें वाढलेलें बाळ, रांगडा, नांगऱ्या

बेकार :: उद्योगहीन, निरुद्योगी, बिन-रोजगार, घरबशा, व्यवसाय-हीन, घरीं मोडून खाणारा, धंद्यांत न गुंतलेला, मोकळे हात, ज्यांच्यापुढें कोणतें कार्यच नाहीं, कोणत्याही पेशांत न सामावलेला.

बेचव :: गुळमट, कळकट, पांचट, गुळचट, मिळमिळीत, पचपचीत, कवकवीत, गिळगिळीत, रुचिहीन, सेणचट, पचकवणी, अरुचकर, चवहीन, नीरस, अळणी, पुळचट.

बेजबाबदारपणा :: उचलली जीभ लावली टाळ्याला, कांहीं उद्यांचा विचार ? प्रसंगाला खांका वर करून मोकळे, होळीचे होळकर सारे, उत्तर-दायित्वाविषयीं बेफिकीर, दिला होता हो ठोकून, भरावें लागतें त्याला कळतें.

बेडौल :: बेढब, हेंगाडा, हेमाडपंती, बेंगरूळ, प्रमाणहीन, वेडावांकडा, तिरपगडा, बोजड, कळाहीन, आकारविहीन, लोळागोळा, आडमाप, अव्यवस्थित, आकारहीन, विद्रूप, कुरूप, कसें तरी.

बेलगाम :: अनिर्बंध, उधळलेला, स्वच्छंदी, स्वैर, अनियंत्रित, बेफाट, बेछूट, अनिरुद्ध, कोणाची वेसण वा दाब नाहीं, निरर्गल, उच्छृंखल, बंधनाच्या पलीकडे, ताब्याबाहेर गेलेला, नियंत्रक कोणी राहिलेला नाहीं, स्वैरसंचारी, या गाडीचे ब्रेक्स् मोडले आहेत, वाटेल तेथें जाईल व वाटेल तें कराल, जीवनास सुकाणूं नाहीं, सैराट, स्वतःचा शास्ता स्वतः, याच्यावर कोणाची मात्रा चालत नाहीं, मनमानी वागणूक.

बेवारशी :: ही काय बाप-शेटीची पेंड आहे ? हा बापाचाच माल कीं नाहीं ? अनाथ, कोणी वास्तपुस्त करणारा नाहीं, रस्त्याच्या कडेला पडलेली जिन्नस जणूं ! कोणीही जामावें, त्राता कोणी नाहीं, हवें त्यानें न्यावी अशी वस्तू.

बेशिस्त :: शिस्तहीन, गैरवक्तशीर, उच्छृंखल, मनचाहे व्यवहार, सर्व धिंगामस्ती–मोंगलाई, गबाळ-ग्रंथी कारभार, ना स्थळ ना काळ यांचा विचार ! काय वाटेल तें मनांत येईल तेव्हां करतील, योग्यायोग्यतेचा विचारच कोण करतोय येथें ? वेळेचें बंधन मानीत नाहींत, कशास कांहीं पत्ता नाहीं, छांदिष्ट अनिरुद्ध बेफाट वागणूक, भसभोंगळ कारभार.

बोलणें (वाईट) : : तोंडांतून हीं मुक्ताफळें काढलीं, बोलण्याच्या भरांत घसरले, मुखरस पाघळला, तोंड म्हणजे नुसती मोरी ! अचकट विचकट शब्द उच्चारले, नागमोडी भाषा, भाषा नेहमीं आडवळणाची, फुरशासारखी गिरकी घेऊन चालायची संवय, असं उखाणे घालूं नको; सरळ सांग, त्याचें आडून बोलणें, जांवयाचें पोर हरामखोर ! तेढें बोलतो, मुद्दाम योजून ठेवून म्हणतो, बोलणेंच तिरकें बोचक व खोचक स्वरांतलें, सोडली फुसकुली, वेचक शब्द-प्रयोग.

बोलणें (कृत्रिम) : : आपल्या चिरपरिचित परीटघडी आवाजांत स्वागत केलें, बोलण्यांत नाटक्या, अघळपघळ पण कळकळहीन, मधांत भिजलेल्या जिभेनें विनंती केली, बोलणें गोड; किती म्हणून सांगू ? तोंडांत खडीसाखर ठेवल्यागत, ठासून ठसक्यांत घोटीव स्वरोच्चार—नाटकी हीरो-सारखे, शब्दांचें जंजाळ पण खरेपणा नाहीं.

बोलणें (गोड) : : मिष्ठास भाषण, असें ठासून सांगून आम्हांला साखरेच्या पाकांत बुडवून टाकलें, रेशमी आवाजांत, गुलाबपाण्याच्या शिडकावासारखें, धन्यवादाचा शाब्दिक पाऊस पाडून, खडीसाखरेसारखें बोलणें, ज्यांत कोणत्याच प्रकारचें मत डोकावणार नाहीं अशा स्वरांत, लाघट बोलणीं, तोंडांत खडीसाखर ठेवून बोलणें ! साखर पेरीत आर्जवी स्वरांत.

बोलणें (थोडें) : : तोंडाचा चिकटा जाण्यापुरतें, होस हो इतकेंच, शब्दांची उधळण केव्हांच नाहीं, शब्द म्हणजे रत्नेंच—फार महागाईचीं ! मौनाला एखाद्या—अर्ध्या शब्दाचा तडा जाईल तेवढाच, मितभाषण, जीभ बहुतेक टाळ्यालाच चिकटलेली, तोलून मापून आटपशीर बोलतात, त्यांच्याकडून हो अधिक वेळां येतो; नको म्हणायला एक जादा अक्षर तोंडावाटे काढावें लागतें ! बहुतेक हावभावावरच भागवतात.

बोलणें (बेछूट) : : निरर्गल भाषा, सैल जीभ, त्याच्या जिभेला हाड नाहीं, जें मनाला येईल तें बकतो, अनिर्बंधतेला स्पर्श करणारा मनमोकळेपणा, बाउण्डरी मारली ! जीभ फार मोकळी सोडतां आहां ! जीभ जादा वळवळते, त्यांच्यावर अद्वातद्वा तोंडें सोडलीं, तुझ्या तोंडावर नुसत्या

लाह्या फुटत होत्या, ही मुलूख-मैदान तोफ गरजली, नाहीं नाहीं तें बोलला, शब्दांचा तुफानी भडिमार.

बोलणें (रागाचें) : : वसावसा फाड्फाड् बोलणें, संतापतात भडकतात व तडातडा बोलतात, वर्दळीवर आले, मामंजी कडाडले, टाकून बोलण्यांत सर्वांवर ताण केली, पुष्कळसें अगडतगड बोलला, द्वेषाचे फूत्कार, एकच गिल्ला केला, तिच्या तोंडाच्या ज्वालामुखींतून लाव्हा-रसाचे थेंब पडूं लागले, खेकसून अंगावर आला, झाली एवढी शोभा बस्स झाली ! अगदीं सोलून खाईल, तिच्या जिव्हास्त्रापुढें सर्व शरण, त्याला पुढें उभा करतात नी धोंडा फुटेल असें बोलतात.

बोलणें (वायफट) : : उगाच बोंब, चकाट्या, तोंडाची वाफ दवडली, बाताळूच्या बाता, गप्पीदास, फुकाचे बोल, गर्जेल तो पडेल काय ? क्रियेवीण वाचाळता, उगाच वाच्यता, वाचिवीर्य, या तोंडच्या गप्पा आहेत, उचलली जीभ लावली टाळ्याला, उगीच शब्दांची राळ, तोंड आहे म्हणून बोलायचें, तोंड करून बोलतोस तेवढा ! हवामानाच्या गप्पांना वळसे घेत मुख्य मुद्द्यावर पोहोंचलों, येथें हीं व्याख्यानें देणें म्हणजे भरलेल्या समुद्रांत पाण्याचे तांब्ये ओतण्यासारखें आहे, भाषणांचें पेंव फुटलें.

बोलभांड : : वटवट्या, बडबड्या, तोंडांत तीळ भिजणार नाहीं, ग्रामोफोन नुसता, तोंडाळ, वाचाळ, वाक्पटु, वाचिवीर्य, लांब जिभेचा, जिभेला हाड नाहीं, बोलघेवडा, बोलूकाका, चर्चापंडित, बोलणारी फांकडी आहे, गप्पीदास, त्याला सांगितलें तर तो भोंगा वाजवणार चार ठिकाणीं, बाताळू, लंब्याचौड्या बाता ठोकणारा, बोलण्यांत प्रतिबृहस्पति.

भपका (खोटा) : : घरांत उष्टीं बाहेर गोष्टी, बडें घर पोकळ वासा, दिसायला भपका, खोटा डामडौल, बेगडी सौंदर्य, छानछोकी, नुसता झकीपणा, दिखाऊपणा, नखरेलपणा.

भयग्रस्त : : जागच्या जागीं खिळला, पोटांत धस्स झालें, बोबडी वळायची पाळी आली, अंगावर झर्रदिशी कांटा उभा राही, पाहून छातींत धडकी भरे, डोळ्यांपुढें काजवे चमकले, दरदरून घाम सुटला, दांतखिळी बसली, छाती दडपून गेली, घणाच्या घावासारखे छातीचे ठोके पडूं लागले.

सर्दच झाला, थरकांप उडे, गर्भगळित झाली, घाबरगुंडी उडाली, भयशंकेनें गांगरला, मनस्वी भेदरला.

भरपूर : : पोटभर, रेट, अमूप, पुष्कळ, ओ येईपर्यंत, लागेल तितकें, हवे तेवढे, पुरून उरेल इतकें, विपुल, अतिशय, फारच, खूप, खूपखूप, वीट येईल एवढें, चंगळ होईल असें, मनमुराद, मनास येईल तेवढें, मुठी भरभरून, उताला गेलें, ब्याल तितकें, म्हणाल तेवढें, इच्छाभोजन, सत्रच, पाणपोयच, मोठा झरा, खाण, ठेसाठेस, वाटेल तितक्या, मन किती कल्पना करील तितकी.

भरभराट : : बढती, चलती, पाऊल अधिक पक्कें होणें, वेल मांडवाला लागली, पैसे हातीं खेळूं लागले, पुढें सरणें, बूड स्थिर होणें, फांद्या फुटून फुलें धरणें.

भवितव्य : : भविष्य, यापुढें, दूरवरचें, दृष्टि पुढें सरकेल तेथपर्यंत, अनंतापर्यंत, अदृष्टांत, पुढील युगायुगांत, आगामी शतकांत होणारें तें, भावी, होऊं घातलेलें, प्राक्तन, दैव, दैवगति.

भ्याला : : धास्तावला, टरकला, गर्भगळित झाला, कांपरें भरलें, त-त्त प-प्प करूं लागला, पोटांत वायगोळा उठला, धडकी भरली, तोंडचें पाणी पळालें, गाळण उडाली, पाहून जागच्या जागीं थिजला, सारें ब्रह्मांड आठवलें, विजार पिवळी झाली–भिजली, वचकला, दबकला, नरमला, वरमला, शेंपूट घातलें, थरकांप झाला, पाय लटलटूं लागले, जीव टांगणीस लागला, कोठें लपूं झालें, नांगीच टाकली, चेहरा पडला, नजर वर करण्याची टाप राहिली नाहीं, चळचळां कापूं लागला, पांचावर धारण बसली, हातांपायांतून शक्ति गेली.

भ्रमनिरास : : भ्रमाचा भोपळा फुटला ! मुलामा जाऊन पितळ दिसलें, जिच्यासाठीं मी जिवाचें पाणी केलें ती एक नकली बाहुली निघाली, भरंवशाचा गुरव ठरला, खरें बाहेर निघालें, वास्तव–सृष्टींत उतरला, आहोंत कुठें तें कळलें, काव्य-कल्पना गेल्या, वास्तव नग्न-दर्शन घडलें, सत्यस्वरूप उघड झालें, खरें काय तें समजलें, पितळ उघडें पडलें, मायावी रूपांतून खरें तें प्रकट झालें, वाटलें पुढारी होता पेंढा भरलेलें बुजगावणें, वाटलें

कवि होता खाटीक, वाटलें पुरुष निघाला षंढ, वाटला मालक निघाला मुनीम, वाटलें देवांगना; होती राक्षसीण.

भाग : : पर्व, खांड, खंड, चॅप्टर, धडा, काण्ड, सर्ग, प्रकरण, विभाग, तुकडा, वॉर्ड, दालन, क्षेत्र, कक्षा, टप्पा, मळा.

भाग्य : : सुदैव, अनुकूल तारे, यापरतें अधिक भाग्य तें काय ? माझें विशिष्ट अहोभाग्य असें कीं, अकस्मात् त्याच्या कपाळाची रेषा उघडली, नशीब शिकंदर म्हणायचें, अनुकूल दैवानें त्यांना नेहमींच हात दिलेला होता.

भागीदारी : : मिश्र हितसंबंध, पाती, पार्टनरशिप, दोघांचा मिळून व्यवहार, जोडीनें काम, संयुक्त व्यवहार, सम जबाबदारींत धंदा, फायदा वांटून घेतात, दोहोंची सांगड आहे, एकच जूं–दोहोंच्या मानेवर आहे व एकच गाडा दोघे ओढतात, अर्धेलीच्या तत्त्वावर कसतात, दोघांच्या सक्रिय सहकार्यानें काम चालतें, दोघेही बॉस आहेत; लभ्यांश दोघांनाही आहे, हें दुकान एकत्र कुटुंबपद्धतीवर चालतें; प्रत्येकाचा यांत हिस्सा आहे, येथला प्रत्येक अंशतः मालक आहे, याचें सोयरसुतक दर एकाला आहे, भलेबुऱ्यांत दोघेही सारखेच गुंतलेले ! यांत सर्वांचा हात आहे, हा मालक हा नोकर असें येथें नाहीं.

भाडोत्री : : उपरा, बाजारू, विकतचा, उसनवार आणलेला, दिल्या मोलाचा, केवळ पैसा ओळखणारा, तात्पुरता, पोटभरू, करारमदारी, मोलावरी काम करणारा, पोटतिडीक नसलेला, ' मोलें घेतलें रडाया '– पैकीं, दिल्या दामाप्रमाणें काम करणारा.

भारली : : हरखली, भारली गेली, जादूसारखा परिणाम झाला, भुलली, मंत्रमुग्ध, हृदय हरली, मोहविली, मोहनिद्रा आली, मांत्रिकानें भारल्याप्रमाणें, जादूटोणा केल्यागत, मोहवश, मंत्रविद्ध झाली.

भावनाप्रधान : : भावुक, पटकन द्रवणारा, हळवा, चटकन मनाला लावून घेणारा, कोमल मनाचा, भावनाविवश होणारा, नरम हृदयाचा, नाजुक प्रकृतीचा, अंतरंगांत मृदुल, मृदुल-प्रकृति, भावविश्वांत रममाण होणारा, तेव्हांच चेतावणारा, कविहृदयाचा.

भावनाविष्कार (काव्यांतील) : : कोमल जाणिवांचें सुभग चित्रण, भग्न हृदयाच्या तंतू तंतूंतून चिवट दोर काढून त्याचा गोफ वळला आहे, कारुण्यादि रसांची पाणपोई, भावनोद्रेकाची खळाळी दृग्गोचर होते.

भावनाशून्य : : विकारहीन, भावनाहीन, केवळ फत्तर, शिळाच ! पाषाण, प्रेक्षकासारखा तटस्थ वृत्तीनें वागे, कळसूत्री यांत्रिक बाहुलीच, गांवीं सुद्धां हें सर्व नसायचें, निर्लेप अलिप्ततेनें पाही, या कशाशींच कर्तव्य नसायचें, जसें कांहीं कांहीं घडलेंच नाहीं, रामा, शिवा गोविंदा ! त्याच्या लेखीं झालें तें सर्व शून्य होतें, दगडाचें मन, विकारहीन हृदय, दुसऱ्याच्या सरणावर हात शेकून घेईल, दगडाहून दगड, दगडी मनाचा अतिपुरुष, दया-क्षमा हे शब्द त्याच्या कोशांत नव्हते, ध्येयाविषयीं उदासीन, आस्थाशून्य.

भावस्पर्शी (लेखन) : : मनोवेधक वाटल्यावांचून राहणार नाहींत, भारून टाकण्याइतक्या प्रभावीपणानें लिहिल्या गेल्या आहेत, वाचक मंत्रमुग्ध होऊन जातो, वाचक वारंवार वाचतील इतका हा लेख हृदयस्पर्शी आहे, मिटक्या मारीत वाचतील, वाचतांना मनुष्य स्वतःला विसरतो, लेखक प्रेक्षकाची तबियेत गारीगार करून सोडतात, हृदयद्रावक, घटकाभर करमणूक करील, हंसवील व रिझवील असेंच.

भांडखोर : : नुसतें कुत्रें, वाऱ्याशीं भांडेल, त्रागेखोर, खरखरमुंडा, भांडकुदळ, कटकट्या, वावदूक, तक्रारखोर, तंटेखोर, चर्चाबाज, तर्कटी, कोर्ट-कैफी, एखादें कार्य हटकून बिघडवावयाचें असेल तेथें योजना करण्यासारखा ! दुसऱ्याच्या नाकांत काड्या घालणारा, तोंडाचा तोफखाना—पट्टा सुरू होई, वाऱ्याशीं तंडणारा, कुभांडखोर, कांगावखोर, रोख ठोक उत्तर देतो, तुकडा तोडतो, निकाल लावतो, एक घाव दोन तुकडे करतो, वादाची खुमखुमी मोठी.

भांडण : : खटका, बखेडा, तंटा, तिढें होतें, वाकडें, वितुष्ट, घर्षण, झंझट, झक्कड, बेबनाव, झगडा, कटकट, तंटाबखेडा, झकाझकी, कलह, भाऊबंदकी, जमत नव्हतें, सूत नव्हतें, भांडीं आपटत, जुळत नसे, वांधा निघे, बिनसे, परस्परांचें ठीक नसे, ३६ चा आंकडा, बरें नसे, बनलें

नाहीं, फाटलें, एकमेकांवर बिघडले, खटके उडत, घोळ पडला, मैत्रींत मिठाचा खडा पडला, असा प्रकार घडला, सास्वासुनांचें बराच वेळ चाललें होतें, भांड्याला भांडें लागतेंच, गृहकलह, अहिनकुलवत् मैत्री, एकाचें तोंड पूर्वेला तर एकाचें पश्चिमेला, पाण्यांत पाहतात, एकोपा गेला, परस्परांवर तापत, वाकड्यांत शिरला, संबंध बिघडले, स्नेह नासावला, वैरभाव उद्भवला.

भांडण (तोंडी) : : तोंड वाजलें, तोंडातोंडी झाली, शब्दावरून शब्द वाढले, शब्दाशब्दी, वर्दळीवर आले, एकमेकांवर उखडले, उत्तरें-प्रत्युत्तरें झालीं, बरीच शब्दफेक झाल्यावर, आईमाई उद्धरल्यान् ! परस्परांच्या पितरांचे उद्धार झाल्यावर, वादंग माजला, आरडा-ओरडा, दोघेही कडाकडा भांडली, गडबड गोंधळ व गदारोळ, शब्दच्छल, हमरीतुमरीवर आले, दोघांची बोलाचाली सुरू झाली, मी तूं वर आले, कुरबूर सुरू झाली, उत्तरा उत्तरी झाली.

भांडण (लावणें) : : कोलीत लावले, कळ लावली, वर्गकलह पेटवून दिला, आगींत तेल ओतलें, लढा चिघळविला, कलागत निर्माण केली, कळीचा नारद, कलागत्या, कण्या टाकून कोंबडीं झुंजविण्याचा याचा उद्योग, फोडा व झोडा हें धोरण, दुसऱ्याच्या नाकांत काड्या घालणारे, त्याला इरेस घातला, हीं जुनीं मढीं उकरून काढूं नका.

भांबावला : : उलट सुलट विचारांची गर्दी, गडबडला, काय करूं तें कळेना, मनाचें होकायंत्र दिशाच देईना ! दिङ्मूढ झाला, चक्रावला, हतबुद्ध झाला, दिशाज्ञान गमावलें, बावरला, भ्रमल्यासारखें झालें.

भिकारी : : याचक, भिक्षुक, भीकमंगा, भणंग भिकारी, कफल्लक, भडभुंजा, दरिद्री-नारायण, अल्लक अल्लक, निष्कांचन, शिताकरितां जेवणाराच्या तोंडाकडे पाहणारा भुकेकंगाल, दळभद्री, धनहीन, वैभवहीन, लक्ष्मीचा कोप झालेले, झोळीवाले, ऐश्वर्यहीन, द्रव्यहीन, अकिंचन, हातीं नरोटी असलेला, गरीब, दुसऱ्यांचे देणेदार, कर्जबाजारी, भिकेस लागलेले, सर्वांत खालच्या जीवन-स्तरांतील प्रजा.

भिस्त : : मदार, विश्वास, भर, आधार, वर अवलंबून असणें, तुमच्या खांद्यावर हात देऊन आहें, माझी कुबडी तुम्ही, तुमच्या टेकूवर मी विसंबतों.

भीड : : मुरवत, संकोच, शरम, भीड भिकेची बहीण, लाजलज्जा, भीड-मर्यादा, शब्द मोडवत नाहीं, नाहीं म्हणणें जिवावर येतें.

भुताटकी : : अंगांत येणें, संचार होणें, भूतबाधा, पिशाच्चबाधा, झपाटलें जाणें, झाड धरणें, बाहेरची बाधा, बाहेरवा.

भूत : : सैतान, हडळ, ब्रह्मसमंध, समंध, मुंजा, राक्षस, पिशाच्च, भूतप्रेत, जीवात्मा, पिशाच्च-योनी, वेताळ, आग्या वेताळ, लांवसट, हैवान, आत्मा, प्रेतात्मा.

भूषविणें : : अलंकृत करणें, शोभा आणणें, सजविणें, सजून धजून सुशोभित करणें, अलंकार चढविणें, रंगकाम–रंगरंगोटी करणें, नक्षी काढणें, साजशृंगार करणें.

भेकड : : भ्याड, पळपुटा, स्त्रैण, भित्रा, भागूबाई, डरपोंक, बुजरी बाईल, नादान, नामर्द, पुळपुळीत, कचखाऊ, बायक्या, मुर्दाड, कमकुवत दिलाचा, दिवाभीत, धाडस त्याला उभ्या जीवनांत शिवलें नाहीं, सारखा भिऊन भिऊन वागतो, मेल्या आईचें दूध प्यालेला, याची फक्त जागच्या जागीं चुळबूळ ! आणीबाणीच्या वेळीं हातपाय गाळील, पुल्लिंगी आहे एवढेंच !

भोगवाद : : सुखवाद, या रोख सुखाऐवजीं उधार सुखाच्या मागें कां लागतां ? चार्वाक्-पंथ, इंद्रिय-सुखामागें असणें, चैनबाजी, विषयी वृत्ति, उपभोग हेंच दैवत ! त्वचा नेत्र व रसना यांना भासेल व रुचेल तेवढेंच पसंत व मान्य.

भोळा : : दुधखुळा, भोळा सांब, सांबापुढला, नंदी बैल, भोळा भाबडा, प्रांजळ, आंतबाहेर कांहीं नाहीं, धोपटमार्गी, भोळसट, छक्केपंजे माहीत नाहींत, भोळी भावना यांची; भुलविलें भुलले ठकविलें ठकले, धर्मराजाचे अवतार, कपटी लोकांचा आदर्श मित्र, कसल्या डावपेंचांची तोंडओळख सुद्धां नाहीं, सहज झुकेल व बनेल, त्याला कोणीहि बनवावें, बोळ्यानें दूध पितोय, परप्रत्ययनेयबुद्धि, मानेवर भाबडें डोकें आहे, वस्तूंच्या दर्शनी भागावर खूष, अविश्वासाचें यांना वावडें, वचनें मोडण्यासाठीं असतात हें याचे गांवींहि नाहीं, सगळा सरळसोट कारभार !

भोंदूपणा : : बहिस्त्यागी अंतःसंगी, वरून गोरा पण आंत काळा, बगलेंत सुरा मुखीं रामनाम, वचस्येकं मनस्येकं, शेंदूर फासलेले दगड, पायघोळ संतपणा, बोकेसंन्यासी, दिवा न भुंक्ते, पुराणांतलीं वांगीं पुराणांत, केवळ गिलीट, खोटें नाणें, मोठ्ठा बुडबुडा, बेगडी धार्मिकता, मायावी रूप, बोलण्यांत मिठास, पोटांत एक नी ओठांत एक, नुसती दाढी; आंत ऋषीच नाहीं ! दिसायला भोळा नी मुदलावर डोळा, आंत एक बाहेर एक असे, गळ्यांत माळ नी गरिबांचा काळ.

मऊ : : मृदु, मऊमऊ, मृदुल, कोमल, नाजूक, गुलगुलीत लुसलुशीत, सौम्य, लवचिक, हळुवार, सैलसैल, भुसभुशीत, प्रतिकारशून्य, मुलायम, पुष्पवत्, परागाप्रमाणें, बिसतंतुवत्, नरम, मोरपंखी, हलकें फुलकें, नवनीता-समान, लोण्यासारखें, शिवरीच्या कापसाप्रमाणें, विरोधहीन, मेणासारखें, परांसारखें, मऊ पिसासारखें, मखमलीसारखे, पुष्पराशीप्रमाणें, शिरीष कुसुमाप्रमाणें, काठिण्याचा पूर्ण अभाव, पिसाच्या गिरदीप्रमाणें, कापूसच जणूं! पल्लवासारखें, पाय टाकला तर दबेल, रबरासारखें, कठीणपणा कसा तो नाहीं, गुलाबाच्या पाकळ्या जणू! दबत जातें, घर्षण किंवा प्रतिरोध नाहींच, ताठरपणा गांवींहि नाहीं.

मठ्ठ : : मद्दड, ठोंब्या, बुध्दू, बद्दड, ढ, जड, रद्दड, मंदमति, अप्रगल्भ, बिनडोक, बथ्थड, निर्बुद्ध, ढूस, ढब्बू, दगड, टोणगा, टोणपा, बोथट मेंदूचा, पोकळ-डोक्या, मेंग्या, अपक्व, अडाणी, बैलोबा, बुद्धिहीन, मंद बुद्धीचा, रेम्याडोक्या, नासमझ, बुद्धिहीन, डोक्यानें आउट, अशिक्षित, निरक्षर, अजागळ, अनभिज्ञ, गांवढा, गांवढळ, खेडवळ, गांवामधला ढ, तो बुध्दू आणि ही कल्लूकी मा, देवानें कमी दिली आहे, बौद्धिक दारिद्र्य आहे, अकलेच्या नांवानें हाकाहाक, इकडे बुद्धीची जरा चणचण आहे.

वैचारिक भुकेकंगाल, टणक कवचीचा, जड मेंदूचा, बुद्धींत खुजा, बुद्धीला बराच गंज, बौद्धिक उंचीच कमी, त्यांत याला काय गम्य ! मगज नाहीं, भेजा नाहीं, हेड ऑफिस रितें, घट्ट व मठ्ठ, डोकें नव्हे खोकें आहे, मेंदूंत विचार झिरपायला पुष्कळ वेळ लागतो, ग्रहणशक्ति पिंजलेली व विरळ, टाळकेंच ढिलें, पुढें पाठ मागें सपाट, डुक्करमान्या तसाच डुक्करडोक्या.

आईला म्हणेल आई मला बाळंत व्हायच्या वेळेला जागें कर, इतकें करावें तेव्हां काय तो डोक्यांत उजेड पडावयाचा ! डोक्यांत कांदे-बटाटे भरले आहेत, हा घोटीव दगड, नर्मदेंतला गोटा.

मदत : : टेकू, आधार, दान, हातभार, कृपादृष्टि, सहाय्य, देणगी, बक्षीस, धर्म, मदतीचा हात, उदार आश्रय, पाठिंबा, वर्गणी, दानधर्म.

मदत (कंजूषपणाची) : : चोराच्या हातची लंगोटी, एवढ्यावर त्याची बोळवण केली, पै-पैसा देतात, जें दिलें जातं तें कमी आणि तेंहि ताबडतोब दिलें जात नाहीं, तुटपुंजी मदत, आडखर्चाला कांहीं पैसे, हातावर एक रुपया टिकविला, टाचक्या अंदाजपत्रकांत बसेल तेवढी, मदतीचा हात आंखडता घेतला, केव्हां तरी झोळींत मूठभर दाणे पडायचे ! तो कसला तनसडीही द्यावयाचा नाहीं, देईल ते शंभर तक्रारी करून, जरा हात ओला केला एवढंच, काकबळी टाकायचा तसें त्याचें देणें.

मदत (निंदा) : : आइजीच्या जिवावर बाइजी उदार, न देवाय न धर्माय, उष्टें खावें तर तें तुपासाठीं, गंगेचें पाणी घेऊन गंगेलाच अर्घ्य प्रदान करण्याचा प्रकार, भीक नको पण कुत्रा आवर, पैसा दक्षिणा अन् लक्ष प्रदक्षिणा ! वाळूंत कशाला ओतायचें पाणी ? घर भरलें, मागल्या दारानें दिलें, अनाठायीं दान, चुकलेल्या शेळ्या खंडोबाला वाहिल्या.

मदत (सढळ) : : मदतीचा हात सदैव पुढें, इतरांसाठीं इतकें करतो, हातांवर लाखाचें उदक सोडील, पदरमोड करून देईल, कर्णाचा अवतारच, भारंभार सोनें द्यायला तयार, मोकळ्या मुठीनें मदत, द्रव्याच्या थैल्या मोकळ्या केल्या, सढळ हातानें–घसघशीत–वाटेल ती घस–झीज सोसून–पदरास खार लावून मदत, परोपरीचें सहाय्य, दातृत्वाचा ओघ वळविला, दे दे दिलें, कर्णाच्या दातृत्वानें दिलें, आंधळा मागतो एक डोळा तर देव देतो दोन डोळे, ददात नाहींशी केली, देणग्यांचा वर्षाव.

मदतीनें : : त्याकरवीं केलें, मार्फत मिळालें, मध्यस्थीनें समझौता, पूर्वेकडून मदत, समुद्रमार्गें, सहकाऱ्यांच्या मदतीनें, सर्वांच्या सहकार्यानें, पावसामुळें, गुरु-वर्यांच्या प्रेरणेनें, थंडीच्या कारणानें, श्रीमंतांच्या मेहेरबानीनें, लेखकाच्या सौजन्यानें, गरज आहे म्हणून, अडत्यांच्या औदार्यानें, बुद्धीचा वापर करून, मोराला वाहन करून, कल्पनेचे पंख लावून.

मध्यम (प्रतीचा) : : असा तसाच, यथातथा, कसा तरी, सुमार, आहे झालें, दुय्यम दर्जाचा, चार चौघांसारखा, अव्वल कांहीं नव्हे, सो सो, ए वन् नाहीं; टाकाऊंत जमा होणार नाहीं, वैशिष्ट्य असें नाहीं.

मनमोकळा : : पारदर्शक स्वभावाचा – जीवन, आंत बाहेर नाहीं, खुल्या दिलाचा, आरशासारखें स्वच्छ मन, खुला, मनांत गांठ – पेंच–गुंता नाहीं, रुंद तोंडाचें भांडें आहे, दिलखुलास, सर्व व्यवहार खुल्लम खुल्ला.

मनमोकळेपणा : : लांबलचक अंधाऱ्या बोगद्याच्या तोंडाशीं आलें म्हणजे सूर्य-प्रकाश दिसूं लागतो; माझ्या मनाला तसा मोकळेपणा मिळाला, संकोच लोपला, अढी संपली, कुढेपणा निमाला, वातावरण दिलखुलास झालें, पाहुण्याप्रमाणें वाटेनासें झालें, कशाची दिक्कत वाटत नसे, करूं का नको का हें विचारण्याची जरूरी वाटत नाहीं, मनांतलें सांगतात, कसलाहि लपडाव नाहीं.

मनोनिग्रह : : दगडाचें मन करून, मन खंबीर–घट्ट करून, मन आवरून, मनोवारूला लगाम चढवून, चांचल्याला तेव्हांच गवसणी चढविली, मनोजय केला, नाहीं म्हणजे नाहीं, आदर्श भीष्माचा.

मनोराज्य : : मनकल्पना, हवेंतले किल्ले, शेखमहंमदी, स्वप्नरंजितें, दिवास्वप्नें, मनांतले मांडे, मनीषा-सृष्टि, भाव-विश्व, वांछांचें मृगजल, स्वप्नाळू वासना, मनकामनांची मरुभूमि, आशा-सिंचित विश्व, अंतर्यामींचीं उंच उंच ध्येयें, हवाई इमले, भव्य इच्छितें–उद्दिष्टें, मनांत उभारलेल्या सुंदर इमारती, कल्पना-वारू वरून केलेलें उड्डाण, कविकल्पना, अंतर्यामींचीं ईप्सितें, अंतरंगांतील हें करूं–तें करूं वगैरे, ध्येयवादांतील सर्वे सुखिनः संतु या मंत्राचा मनोमन पाठलाग, स्वप्निल स्वर्ग.

मनःसंयम : : मनावर ताबा, मन स्वैर न सोडणें, विकारांवर विचारांचें नियंत्रण, तोंडांतून अगर डोळ्यांतून आठवण बाहेर येऊं दिली नाहीं, अशा सुरेख वस्तू पाहून वाटे काय घेऊं आणि काय नाहीं; पण मन आवरलें, याचा विचार मी वेगवेगळ्या दिशेनें करून पाहिला व आहे तेथेंच राहिलों ! मी रडत नाहीं हा मनःसंयम नांवाचाच; कारण मी नशिबाचे फटके इतके खाल्ले आहेत कीं माझ्या डोळ्यांतील पाण्याचा नळ गंजून गेला आहे

तो उघडतच नाहीं, मनःसंयम कसला ! जरा धिमेपणानें घेऊन दुसऱ्या मजल्यावरील स्वार्थ साधला.

मर्यादा : : मजल, आटोका, आवांका, टप्पा, सीमा, सरहद्द, टोंक, कड, इयत्ता, मुदत, पल्ला, प्रमाण, माप, हद्द, अक्कलेची मजल, आटोक्यांत आलें, समजशक्तीच्या आवांक्याबाहेर, नजरेचा टप्पा, देशाच्या सीमा, दोन प्रांतांमधील सरहद्द, मळीचें टोंक, दरीची कड, मर्यादेची इयत्ता, कराराची मुदत, औषधाचें प्रमाण, धान्याचें माप, माणुसकीची हद्द.

मर्यादातिक्रम : : अगदीं बाउन्डरी ठोकली, हद्द झाली तिच्यापुढें ! इयत्ता ओलांडली, इथें माणसानें काय बोलायचें ? सीमा झाली, यांची कोठ-पर्यंतहि जायची तयारी आहे, हे याच्याहि पुढें गेले आहेत, विनयाचे सर्व बंध तोडले, हे आपली पायरी ओळखीत नाहींत, धट्ट वर्तन, कांहीं लहान नाहीं मोठे नाहीं, धृष्टपणा, लाज कोळून प्यालेत, वागण्याला सुमार नाहीं.

मर्यादित : : बेतबात, त्रोटक, सरड्याची धांव कुंपणापर्यंतच, आटप-शीर, यावच्छक्य, होईल तसें, जमेल त्याप्रमाणें, आपापल्या परीनें–कुवती–मगदुराप्रमाणें, बेतबात जेवण, त्रोटक वृत्तान्त, आटपशीर संसार, यावत्–शक्य मदत, मगदुराप्रमाणें वर्गणी.

महत्त्वाचें : : निकडीचें, मुद्द्याचें, सर्वांचें नाकच जणूं, किल्लीचा दगड, त्यावांचून अडेल, वगळून चालणारें नाहीं, यांचें स्थान प्रथम, सर्वांच्या लक्षाचें केंद्र झालेलें, मोठें व सरस, अधिक जरुरीचें.

मळणें : : कुटणें, वाटणें, घाटणें, दळणें, खलणें, ठेचणें, चुरडणें, मोडणें, चुरणें, लाटणें, चेचणें, कुट्टा करणें, भरडणें, कालवणें, घुसळणें, तिंबणें, कुस्करणें, कुवळणें, दडपणें, थोपटणें, चोळणें, कुरवाळणें, रगडणें, मर्दणें, चंपी करणें.

म्हातारपण : : वार्धक्य, जरा, वृद्धापकाळ, वृद्धत्व, बुढापन, बुढेपण, जर्जरावस्था, थेरडेपण, दहा गेले पांच उरले, पिकलें पान केव्हां गळेल याचा नेम नाहीं, मावळतें आयुष्य, जीवनाची उतरण, जीवनाची संध्याकाळ, वय झालें, काळ्याचे पांढरे झाले, इतिश्रीची वेळ, शरिराची खोळ जीर्ण झाली, तारुण्य संपलें, काळाचीं पावलें शरिरावर उमटूं लागलीं.

मृत्यूच्या सावलींतलें वय, जीवनाचें टोंक, गाडी व्ही. टी. जवळ आली, गोंवऱ्या ओंकारेश्वरास पोंचल्या, परलोकीं डोळे लागले, परतीरीं दृष्टि लागली, जीवनयात्रेचा अखेरचा टप्पा सुरू झाला, यमाच्या चिठ्ठीस तयार राहण्याचें वय झालें, आपल्या हातानें मांडलेला पसारा आपल्याच हातानें आंवरावा अशी वेळ येत चालली, या दिव्यांतलें तेल संपत आलें आहे.

म्हातारपण (मनाचें) : : म्हातारपणाचे चोरटे थेर, म्हातारचळ, साठी बुद्धि नाठी, अकालीं वार्धक्य, खप्पी म्हातारी, माझें स्वतःचें काय उरलें आहे तें म्हणजे वार्धक्य आणि जुन्या मधुर स्मृति, वाटतें या देहाला आतां चांगल्या कपड्यांची शाकारणी कशाला ? त्या सरणाऱ्या तारुण्याचे जास्तींत जास्त लाड पुरवीत, वाटे वठूं लागलेल्या वृक्षाला खतपाणी कशाला द्यायचें ? या वयाचीं माणसें भिजलेल्या टिपकागदासारखीं असतात; आतां तीं नवीन कांहीं शोषून घेऊं शकत नाहींत, मानसिक शक्ति विगलित होतात, जीवन क्षणभर मागें पहात त्यांच्याकरितां थांबलें आणि पुढें निघून गेलें.

म्हातारपण (शरिराचें) : : केसाची जागा टक्कलानें घेतली, हें फळ पिकून देठापासून अलग होऊं लागलें, अंगें गलितं पलितं मुंडं अशी अवस्था, केस पांढरे, मधुघट रिकामे अशी स्थिति, कृतांतकटकामलध्वज-जरा दिसों लागली, केस पांढरे झाले, लहान लहान मुली आजोबा म्हणून हांका मारूं लागल्या, पेजे डोळे, खारकेसारखी वाळलेली कातडी, पाठीची धनुकली, गाल सुरकुतलेल्या टोमॅटोसारखे, वाकला थकला अस्थिपंजर देह, गात्रें शिथिल झालीं, खंगलेलें शरीर, अंगांत त्राण नाहीं, तोंडांत दांत नाहींत.

पांढऱ्या शुभ्र केसांच्या तुरळक झुपक्यांनीं त्याच्या डोक्याचा बर्फाळ प्रदेश करून सोडला होता.

माघार : : पीछेहाट, उलट दौड, परतणें, पीछे–फलांग, पुच्छगति, पलट खाणें, हरणें, यशस्वी माघार, परागति, पाऊल मागें घेणें, मागें सरकणें, पलायन, तळाकडे परत, पूर्वस्थितीवर येणें, उलट गति.

मानी : : मानधन, अभिमानी, मानी मनाचा, ताठर वृत्तीचा, मोडेल पण वाकणार नाहीं, कोणापुढेंहि मान न वाकवतां, अनिष्ट शक्तींपुढे हां–जी

न म्हणतां ना–जी म्हणणारे, ताठ कण्याचा व ताठ मानेचा, कांहींसा कुर्रेबाज, मानिनी, मानसर्वस्व.

माफी मागणें : : क्षमायाचना, क्षमा मागणें, शब्द मागें घेणें, चुंबीत येणें, माफ करना भाई, आमचेंच चुकलें, चूक पदरांत घ्या, चुकणें भूषण आम्हां, क्षमा देवाचें लेणें, शब्द माघारीं घेतों, झालें गेलें विसरून जा, पाय धरतों, दोष आमचा तुम्ही पांघरूण घाला, आपलें लेकरूं मांडीवर हागलें म्हणून काय मांडी तोडायची ? चुकीला बुक्की असें करून कसें निभायचें ?

मारणें : : ठार करणे, मुडदा पाडणें, खून करणें, शिरच्छेद–शिरकाण करणें, यमसदनास–यमदरबारीं पाठविणें, डोकें उडवणें, जीवनयात्रा संपविणें, जगांतून नाहींसा करणें, जीव–प्राण घेणें, देह व आत्मा यांची ताटातूट करणें, स्वर्गांत पाठविणें, फांसावर चढविणें.

मारपीट : : घे घे म्हणून आणखी चार लगावले, पाण्यासारखा पातळ केला, फें फें उडवली, बडवला, चार लफ्फे लगावले, तोंडांत दिल्या, गालफडें रंगवलीं, श्रीमुखांत दिली, बडव बडव बडविलें, बुकललें.

मारामारी : : ठोकाठोकी, झोंबाझोंबी, लठ्ठालठ्ठी, दोन हात करणें, झोंबी, लढत, झेंगट, गुद्दागुद्दी, केशाकेशी, धक्काबुक्की, परस्परांचे चार हात झाले, झोंबट झालें.

मालक : : धनी, बॉस, साहेब, श्रीमंत, शेठ, मालिक, नाथ, पति, प्रमुख रक्षणकर्ता, वरिष्ठ, यजमान, अधिपति, खाशा स्वाऱ्या, अन्नदाते, त्यांचे हे ' इकडे ', ' नवरे ', सावकार, ' चवली ' बोलविणारे, शेठजी, चेंबरमधील व्यक्ति, देहाचे सत्ताधीश, खाविंद.

माहीत असणें : : ज्ञात–परिचित–अवगत–श्रुत झालें, समजलें, पत्ता लागला, कानापर्यंत पोहोंचलें, अंदाज मिळाला, तर्क झाला, कळून चुकलें, बित्तंबात माहिती मिळाली, मागोसा लागला, कर्ण-संपुटीं आलें, कोठें तरी वास लागला.

मिटणें : : थांबणें, अडसर लागणें, चोंदणें, दार बंद होणें, अडथळा येणें, बंद पडणें, निर्गत आटणें, दाटणें, मर्यादा पडणें, विराम पडणें, आवळत आणलें जाणें, संकोचणें, बंधन घातलें जाणें, मग सर्वच

कारभार आटोपला ! वाटा अडल्या, मार्ग खुंटला, सुटका राहिली नाहीं, संपुष्टांत आलें, हालचाली संपल्या.

मितपणा : : थोडक्यांत गोडी फारांत लबाडी, अति तेथें माती, टुकीनें वागणें, संयम–बोलण्यांत खर्चांत–वागण्यांत–सद्‌गुणांतहि माफकपणा, टोकास कधीं जायचें नाहीं, नेहमीं सुवर्णमध्यांत वृत्ति स्थिर, शब्द जोखून बोलणें, पैसा राखून खर्चणें, भूक ठेवून जेवण संपविणें, अतिरेक टाळून प्रेम करणें, आळस न जडेल इतकें झोपणें, भांड्यांत शिल्लक ठेवून देणें, पचेल व झेपेल इतकेंच वाचन व मनन करणें.

मित्र : : सुहृद्, स्नेही, दोस्त, अनुबंधी, संबंधित व्यक्ति, प्रभावळ, भाई भाई, पुठ्यांतले, बगलबच्चे, सखा, हस्तक, परिचयाचे लोक, जोडलेले लोक, आपुलकीचीं माणसें, आपल्याशीं मिळते-जुळते लोक.

मित्र (चांगला) : : तंतोतंत जमतें, कैवार घेतो, अगत्य आहे, त्यालाच उचलून धरतो, दुजोरा देतो, पाठपुरावा करतो, जिवास जीव देतो, हांकेला ओ तोच देईल ! अंतर देणार नाहीं, जीवश्च कंठश्च परम मित्र, जवळीक वाटते, सुपारीचें खांड ते दोघे मिळून खात होते, दोन शरिरें पण मन एक, भावाभावासारखे, जणूं राम-लक्ष्मणांची जोडी, सुईमागें दोरा तसे हे, त्याच्याशिवाय पान हालत नाहीं.

मित्र (वाईट) : : वाऽरे मित्र ! असल्यास दाटी नसल्यास खोळंबा, बादरायण संबंध जोडून, उसनवारीपुरता शेजारधर्म जाणणारे, लवचिक मैत्री, दोस्त–फांटा, कुटाळ कंपू, टवाळ टोळी, चंगीभंगी दोस्त, एका माळेचे मणी, हा तीर्थावरचा पंड्या, मित्र ही गंपलासाच्या पट्टीसारखी चिकट जात आहे ! हात ओला तर मित्र भला, गप्पाड्या मित्र, गळेपडू, असेहि लोक बाईच्या पुठ्यांत असावयाचे, ‘ हो ’ म्हणून मोकळे, हो ला हो ठेवून देणारे, बगलबच्चे, गिळायला मेले हजर, श्रीमंत पोरांना चिकटणाऱ्या गोमाशांपैकीं हा एक होता.

मित्रभाव : : दोघांमध्यें रहस्य आहे, आपपर भाव नाहीं, परस्परांचें मेतकूट जमलें, एकमेकांत मोठी दिलचस्पी–सलगी आहे, गळ्यांत गळे घालताहेत, एकमेकांशिवाय गमत नाहीं, त्यांची यांची रोजची बैठक

आहे, स्नेहरज्जूनें बांधले आहेत, अर्धी भाकर मोडून खातील, तो व मी दोन नाहींत, रक्तापेक्षांहि मोठा संबंध आहे दोस्तीचा, एकाला टोचलें तर दुसऱ्याच्या डोळ्यांना पाणी येईल.

मिळालें : : प्राप्त–आपलें झालें, मारलें, लाभलें, लाधलें, हातीं आलें, गवसलें, सांठवलें, जमविलें, साधलें, पदरांत–पेटींत–पडलें, नशीब फळफळलें, मुठींत आलें, आत्मसात्–हस्तगत–जवळ केलें, घेतां आलें, अवचित भेटलें, मागें टाकलें, जिंकून घेतलें, नशिबांत होतें, बाजूस ठेवलें.

मुकणें : : न मिळणें, त्याला आंचवणें, गमावणें, हातचें जाणें, तेल गेलें तूप गेलें हातीं आलें धुपाटणें ! हातचें गेलें, पंजांतून निसटलें, पाझरून गेलें, हरवून बसलों, कोठें तरी उडालें तें गवसेना, जवळ राहिलें नाहीं हें खरें, सहवास सुटला, कीर्तीनें पाठ फिरविली, मित्र गमावला, संधी हुकली, धनलाभ झाला नाहीं.

मुक्त : : बंधनरहित, स्वतंत्र, बेछूट, मोकळा, निर्बंधरहित, उच्छृंखल, शृंखलाहीन, बंधमुक्त, मनचाहा, खुला, बंधहीन, बेबंद, अडसर काढलेला, चार भिंतींच्या पलीकडे, बेड्या काढलेला, कोठेंहि संचार करण्यास मोकळा सोडलेला, पिंजऱ्याबाहेर, दावें तोडलेला, पाशरहित, पाशविहीन, कोठें अटकाव नाहीं, बंधनापलीकडे, कुंपणाबाहेर सोडणें.

मुग्धा : : कोणाकडे डोळा उचलून बघायची नाहीं, अव्याजमनोहर मुग्ध सुंदरी, आश्रम–हरिणी, कोमल–किशोरी, पानाआडची कळी, लाजाळूचें झाड.

मूर्ख : : बेअक्कल, बिल्कूल गाढव, गधडा, लांबकान्या, लंबकर्ण, मूर्ख–शिरोमणि, अक्कलशून्य, अकलेच्या नांवानें शून्य, असमंजस, दीड शहाणा, अकलेचा खंदक–कांदा, उंटावरचा शहाणा, सर्व टंचाईत अकलेची टंचाई पण भासत आहे, याची शहाणपणाशीं नेहमींच फारकत, यांचा गाळीव मूर्खपणा वर्णावा किती ! तिसरा मजला रिकामा असलेला माणूस, अति शहाण्याचा बैल रिकामा, धुराला भिऊन आगींत उडी घेण्याचा हा यांचा प्रकार दिसतो, अकलेचा तोटा, मूर्खांचा मुकुटमणि, बाईलबुद्ध्या तसाच बैलबुद्ध्या, पिसाट तसाच मूर्ख, विळा माडून खिळा करणारे, तारतम्यरहित;

बेअकली माणसांची परंपरा चालवीत आहेत, अकलेची अजब पाणपोई घातली आहे.

मूल्यवान : : असूल्य किंमतीचे, भारी, उंची, अमोल, मोलाचें, किमती, बहुमूल्य, बहुमोल, चढ्या दराचें, महागाईचें, भारंभार सोनें द्यावें असें, हिरेमाणकांच्या तोलाचें, कुबेरालाहि न परवडेल असें, याचा भाव ठरवितांच येत नाहीं, इतकें अमोल कीं तें विकलें जाणार नाहीं, माणिक-मोतीं ओवाळून टाकावींत यावर ! किंमत कांहीं लाखांत जाईल, किंमतच करतां येत नाहीं, यांचें मूल्य रुपया-आण्यांत सांगताच येणारें नाहीं, लाख किमतीचा, जिवाचें मोल द्यावें असा, मौलिक, लाखाची गोष्ट, पृथ्वीमोलाचें, दिसतें लहान पण यांचें मोल रुक्मिणीच्या तुळशीपत्राचें आहे, याची पैशांत किंमत होणार नाहीं.

मृत्यु : : मरण, मौत, देहान्त, राम म्हणणें, दिवंगत होणें, प्राण जाणें, ब्रह्मीभूत होणें, पैगंबरवासी होणें, कैलासवासी होणें, यमाच्या दरबारीं जाणें, महाप्रयाण, शेवट, अंत, परलोकीं-देवलोकीं प्रयाण, पंचत्वास मिळणें, देवाघरीं गेला, स्वर्गवासी झाला, अल्लाघरीं गेला, ब्रह्मपदीं विलीन झाला, आयुष्य संपलें, इतिश्री झाली, जीवनज्योत अनंतांत विलीन झाली, अखेर झाली, जीवन संपलें, रामपदीं विलीन झाले, समाधिस्थ झाले, मृत्यूनें कवेंत घेतलें, शेवटचा श्वास घेतला, प्राण कुडीस सोडून गेले, गच्छन्ति झाली, निर्याण केलें, शेवटची उचकी घेतली, कालवश झाला.

मृत्युहानि : : कार्यकर्त्यांचें एक स्फूर्तिस्थान अंतर्धान पावलें, भरल्या संसारांतून उठून गेली, तो एका सुहृदास पारखा झाला, ती जन्माला आली ती घाईंत स्वर्गाचें दार उघडें ठेवून आली; तें लावून घ्यायला आई त्याच वेळीं माघारीं गेली, जन पळ भरि म्हणतिल हाय हाय, मृत्यू-नंतर चार मोठ्या मोठ्या शब्दांचे बुडबुडे फुटतील, हा दीप विझला, स्तंभ पडला.

मेणचट : : टेस्टलेस् ओडर्लेस् वायूसारखा, निर्गुण निराकार स्वभाव, नैनं छिंदन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः असा कशानेंहि न चिडणार न संतापणारा, गुळगुळीत, पिळपिळीत, मिळमिळीत, गिळगिळीत, पुळपुळीत,

पिशपिशीत, मिशमिशीत, विशविशीत कवकवीत, थुलथुलीत, ढिल्ला, निकम्मा, लोचट, पांचट, बेचव, बेरंग, पेद्रू पापड, अळणी, गुळमट, पायांत पोतेरें होऊन राहील, शेळीसारखें शेळपट जीवन जगतो, हें कानेकोपरे नसलेलें आकारहीन रंगरूपहीन अस्तित्व.

मैत्री : : ओळख, मित्रभाव, जानपछान, सलोखा, दोस्ती, सौहार्द, स्नेह, गट्टी, मित्रत्व, घसट, तोंड-ओळख, स्नेहाळूपणा, स्नेहार्द्रता, घरोबा, जवळीक, सलगीचें नातें, मैत्रीचे गाढ–दृढ संबंध, अथांग आपुलकी, जा-ये आहे, घनिष्ठ परिचय, लागेबांधे, जानी दोस्ती, एक सिगारेट दोघे अर्धी अर्धी ओढतील, निकटचा संबंध, एका ताटांत जेवतात, एका खुराड्यांतले पक्षी.

मैत्रीभंग : : वीस वर्षांचे ऋणानुबंध क्षणांत उधळले गेले, सगळ्या जगांतला जिव्हाळा वाळून गेलेल्या गवतासारखा शुष्क झाला, आमच्या जाण्यानें त्यांना विशेषसें वाईट वाटण्याचा संभव नाहीं, जीर्ण पर्णाप्रमाणें जुने ऋणानुबंध तिच्या जीवनवृक्षावरून गळले होते, बोलायलाहि आतां कोणी राजी नाहीं, संबंध दुरावले–तुटले, यापुढें देणें नास्ति घेणें नास्ति, आपल्या सावलीला सुद्धां उभे राहूं देत नाहींत, ओळख दाखवायलाहि तयार असेल तर शपथ, जुन्या ऋणानुबंधाची ओळखहि राहिली नाहीं.

मोटारी (धांवत्या) : : एक बादशाही चंदेरी कार चम्चम् करीत नजरेसमोरून कोठें तरी दूर निघून गेली, सटक् सटक् करून बंदुकीच्या गोळ्यांसारख्या निसटणाऱ्या मोटारी पहात राहिलों, पिवळ्या काळ्या बुटकुल्या टॅक्सीज कोपऱ्यावरून वळत होत्या, धडधडत्या छातीची बस् येऊन उभी राहिली, मागून घरघरणाऱ्या बसेस्‌ना वाट देत पुढें निघालों.

मोबदला : : श्रममूल्य, वेतन, पगार, तनखा, रोजमुरा, मुशाहिरा, शुल्क, मानधन, मेहेनताना, किंमत, भरपाई, दान, प्रदान, पुरस्कार, स्टाइपेंड, परत-फेड, फेड, ऋण-विमोचन, पैशांत किंमत, नुकसान-भरपाई, दिलेलें हस्तें परहस्तें परत करणें, उतराई होण्यासाठीं दिलेलें, या नाहीं त्या रीतीनें घेतलेले दाम चुकते करणें, डी. ए., टी. ए. इत्यादि.

मोह : : लोभ, लालच, भुरळ, हव्यास, मोहविवशता, विषयाकुलता,

मनाची सैराट ओढ, भारलें जाणें, जाज्वल्य आस, मोहपाश, लालच गोचिडीसारखी चिकटली, भूल पडली, अभ्यंतरांत व्यामोह पेटला, क्षणांत वर्षांचें व्रत मोडलें, जणूं त्याविना खोळंबलेंच होतें ! मन चळलें, अभिलाषेनें घेरलें, लाज सुटली, मनानें गुंतला, हांव सुटली, उंदीर हुरळून सांपळ्यांत गेला, बुद्धि अधीर झाली.

मोहित : : भाळला, मोहविवश, मन विरघळलें, तोंडाला पाणी सुटलें, अंत:करणाची तटबंदी ढासळली, सदसद्विवेकबुद्धि लोपली, भुरळ पडली, लालसा निर्माण झाली, हवें हवेंसें वाटूं लागलें, अंगांतला आसुरी अंश बळावला, संयमाच्या लक्ष्मणरेषेच्या आंत राहणें, अवघड वाटूं लागलें, सदसद्विवेकबुद्धीवर मोहाचा थर सांचला, मन गेलें, तोच तोच विचार मनांत ठाण मांडून बसूं लागला.

मौन : : पण त्याच्या तोंडून एक नाहीं दोन नाहीं, ते तस्से उभे होते, तो बोलणार पण मी त्यास दाबलें, मुक्याचें व्रत, तिचें हृदय घशाशीं घुटमळलें, त्याच्या तोंडांतून चकार शब्द उमटेना, दांतखिळीच बसली, बोबडी वळली, आतां कां वाचा बसली ! तोंडाला कुलूप घातलें, तोंडाला थोडी खीळ पडल्यासारखें होई, पितापुत्रांचें एक अवाक्षरानें संभाषण झालें नाहीं, तोंड दाबून बुक्क्यांचा मार, ओठांवरचे शब्द ओठावर जिरले, पुतळ्यासारखा स्वस्थ बसला.

मंजुळ : : कर्णमधुर, सुस्वर, कानास गोड लागणारे, मनमोहक, कोकिळकूजितासमान, पट्टीचें ढंगदार, आवाजांत अलोट गोडवा, कोकिळ–कंठी, झारदार, मिठ्ठास, मुलायम, गुळगुळीत, सुरेल, तानसेनाशीं स्पर्धा करील, गोड गोड अमृतासमान, सुमधुर, कर्णास सुखद, ऐकावेसें वाटणारें, रुचकर पेयाप्रमाणें, प्रफुल्ल किलबिल, क्लॅरिओनेटच्या आवाजाप्रमाणें, खडा धारदार व गोड.

मंदपणें : : गोगलगाईच्या गतीनें, मंद मंद, कांसवगतीनें, हळूहळू, थांबत थांबत, रमत–गमत, धिमेपणानें, कधींचा येतोय, हंसगतीनें, डुलत डोलत, मुंगीच्या पावलानें, इतर सेकंद-कांट्यांच्या मानानें हा अवर-कांटा, मालगाडी आहे ही, नुसती ढकल-गाडी, ताशीं सहा मैल गाडी दौडत आहे.

यश (मिळविलें) : : तपश्चर्या फळाला आली, पाऊल पुढें पडलें, फळ मिळालें, विजयश्रीनें माळ घातली, प्राप्तव्य प्राप्त झालें, फितेला छातीं लागली, पास झाला, घेतलेलें तडीस गेलें, मोठ्यांच्या रांगेंत बसूं लागला, अव्वलांपैकीं एक म्हणून गणना होऊं लागली, विरोधकांना साफ करूं शकला, कीर्ति मिळवली, कसबांत इतरांस मागें टाकलें, समृद्ध जीवन जगला, या रोग्याला उठविलें, शेवटच्या राउंडमध्यें आला, आलेला प्रत्येक झेल झेलला, विरुद्ध पक्षाचा प्रत्येक चेंडू परतविला, प्रतिपक्षावर रबर केला, टॉप गाठला, जम बसविला, प्रतिज्ञा पूर्ण केली, सर्वांकडून वाहवा घेतली, नांव केलें, तारुण्यांतील ब्लू-प्रिंटप्रमाणें जीवनाचा मनोरा उठविला.

युक्ति : : किल्ली, गुरुकिल्ली, मार्ग, जुक्ति, मख्खी, रहस्य, साधन, हत्यार, क्लृप्ति, शक्कल, बूट, याची चावी, तरीका, कसें करायचें तें, कृति-मर्म, सरणी, मोडणी, मार्ग, हें गणित कसें सुटतें तें.

युद्धखोर : : रणेच्छु, युद्ध-पिपासु, युद्ध-प्रचारक, यमाचे जानी दोस्त, शांतीचे द्वेष्टे, युद्ध-सिद्धांतच्या भेरी बडवितात, कापूर-उदकाडी घेऊन दारूच्या कोठारांत शिरतात, छोट्या छोट्या हत्याकांडांचीं आचमनें घेऊन मोठ्या युद्धाचा होम पेटवूं इच्छितात, लढाईची व बढाईची भाषा बोलून बोलून लढाई ओढवून घेतात, हत्येचीं यांना स्वप्नें पडतात, रक्तपातांत आनंदतात, झगडा व लढा चेतविणें हा त्यांचा धंदाच ! मानवी रक्ताची यांना खा खा सुटली आहे.

युवती (वर्णन) : : हांसरी, लाजरी बावरी चर्या, हें लोणकढें तूप, हा नाजूक खवा, वाढाळू मुलगी, मुग्ध किशोरी, उत्साहानें डंवरलेली, महा खोडील चुस्त मुलगी, मुलगी माल आहे, लाजते काय मुरकते काय हरखते काय, चटक-मटक चालणारी, लचकत-मुरकत जाणारी पुरंध्री, ओठांतून रस गळतो आहे इतकें गोड बोलणें, धक्के खाण्याची धमक असलेली ही मुलगी, अर्थपूर्ण नजर, भिरभिरते डोळे, शेपटे उडवीत चालणें, देहलतेच्या रम्य हालचाली, यौवनांतल्या असंख्य अमूर्त स्वप्नांनीं भारून गेलेली, सौंदर्यखनी, धनाढ्य व रूपाढ्य, सौंदर्य-पुतळी, मदन-बाहुली, प्रीति-चंद्रिका, चटक-चांदणी, चारुगात्री, कमनीय कामिनी.

योग्य : : त्याला लायक, शोभणारे, अनुरूप, जमणारे, बरोबर, युक्त, उठून दिसेल, सम-समां संयोग कीं जाहला, जोडी जमते, बरें वाटतें, न्याय्य, बुद्धीला पटणारें, त्यांचें गोत्र पटतें, रत्नाला सोन्याचें कोंदण, हाडपेराला जमणारें.

योगायोगानें : : कर्मधर्मसंयोगानें, बोलाफुलाला गांठ पडली, यदृच्छया, काकतालीय न्यायानें, कावळा बसायला आणि फांदी मोडायला एक गांठ, केवळ ईश्वरेच्छेनें, म्हटलें आणि झालें इतकेंच.

यःकश्चित् : : कुठल्या झाडाचा पाला ? असा तसाच, प्रभु रामचंद्राप्रमाणें याला एकवचनींच संबोधतात, निर्माल्यवत्, पृथ्वीला भारभूत, कीटश्च कोटायते, टिटवी काय समुद्र आटविणार, कुच किंमतीचा, कस्पटासमान, क्षुद्र, क्षुल्लक, लुंगासुंगा, मुंगीला मुताचा पूर, कःपदार्थ, हें एक लहानसें डबकें आहे, शामभट्टाची तट्टाणीच, सामान्य प्रतीचा, त्याची काय कथा ? ही जीर्ण चिंध्याची गोधडी, सपाट आयुष्याचा एक जीव.

रडणें : : विलाप, आक्रोश, रुदन, रडूं, आंसू ढाळणें, दाटून येणें, अश्रुपात, मुसमुसणें, स्फुंदणें, हुंदके देणें, अश्रूंचा अभिषेक, गंगा-यमुना डोळयांवाटे वाहूं लागणें, टिपें गाळणें.

रडली : : कोपरे दुमडून तळवे तोंडावर ठेवून ती ओक्साबोक्शीं रडूं लागली, धो धो रडली, पापण्या पाणावल्या, विलाप केला, दोघींहि पंचम स्वर काढण्याच्या बेतांत होत्या, तिच्या डोळ्यांत गरगरून अश्रू जमायला लागले, अश्रुसिक्त गालांवर, तिनें सात–पदरी गळा काढला.

रसदार : : हृदयंगम व मनोज्ञ, चवदार, रुचकर, रसरसलेली, हृद्य, रमणीय, सरस, लज्जतदार, लाजवाब, रसरंगीली, रसीली.

रस्ता : : वाट, मार्ग, पथ, सडक, घाटी, घाट, पदपथ, गल्ली, आळी, बोळ, रूट, रोड, स्ट्रीट, वे, हायवे ड्राइव्ह, रेल्–रोड, लोहमार्ग, राजमार्ग–रस्ता, पायवाट, आडवाट, थेट वाट, मळलेली वाट, क्षुण्ण मार्ग, हमरस्ता, पायाखालचा रस्ता, निरुंद–चिवचिवणारी वाट, नागमोडी–अरुंद–मुकी गल्ली, आडवातिडवा मार्ग, कावळ्याच्या वाटेनें, रस्त्याच्या बरगड्या दिसत होत्या, रस्ते मुंबईसारखे डांबरानें घोटलेले दिसतात,

ठिकठिकाणीं गाबळ्या दिलले व रफू केलेले रस्ते, एखादी बाई अडली तर टांग्यांत बसवून या रस्त्यावरून न्यावी कीं तिची सुटका होईल!

रसिक : : कलाभिज्ञ, मर्मग्राही, गुणग्राहक, गुणवेत्ते, गुणज्ञ, रसज्ञ, रस घेणारे, अभिज्ञ, ज्ञाते, जाणकार, रसवेत्ते, मर्मज्ञ, खोच समजणारे, मार्मिक वाचक, पारख असणारे, त्यांत गम्य आहे असे, अभिरुचि असणारे, कलाप्रेमी, काव्यभक्त, त्या पंथांतले, त्याची दृष्टि–कान–असलेले, आवड असणारे.

राग : : घुस्सा, चीड, द्वेष, तिडीक, संताप, चडफडाट, इतराजी, कोप, क्रोध, त्वेष, आवेश, रुसवा, त्रागा, तळतळाट, धुसफूस, रुसणें, चिरड, खप्पा मर्जी, सक्रोध आश्चर्य, निःशब्द त्वेष, जिवाचा संताप होतो, राग आणि अनुराग जवळ जवळ असतात, एवढे डोळे वटारतोस कशाला? एवढा घुस्सा कां? दोन दिवसांनीं हा उन्हाळा पुन्हां सुरू झाला.

राग (निंदा) **: :** अति रागा भीक मागा त्याहून रागा देश त्यागा, रागें रागें खाई कुत्र्याचीं हाडें, शेषं कोपेन पूरयेत, व्याप तितका संताप, तापतें लवकर तें निवतेंहि लवकर, आपला कमीपणा रागानें भरून काढतो.

रागीट : : दुर्वास, चिडचिडा, शीघ्रकोपी, क्रोधी, संतापी, पित्त-प्रकृतीचा, त्रागेखोर, भांडखोर, नुसती आग, राघोबाचे दास, चटकन कानशिलें तापतात, बिथरला कीं तुकडा मोडून मोकळा; मग कुणाचीहि मुलाहिजा नाहीं अन् भाळला तर शंभुदेव, तिच्या नाकावर राग आहे, तो एवढ्या तेवढ्यावरून भडकतो, ज्यावर त्यावर राग काढतो, रडत कढत चिडत चरफडत धुसफुसत रागावत, जणूं चवताळलेली वाघीणच! आपल्याशींच धुमसत राहिली, धुसफुसायचें आणि उणेंदुणें काढायचें, कळलें तर मला कच्चाच खाईल! तब्येत म्हणजे नेहमीं तापलेला तवा, नाकाचा शेंडा सदा लाल, लाल मिरची आहे नुसती! ही तिखट मिरपूड.

रागें भरणें : : रागावणें, झाडणें, बोलणें, निखंदणें, बोल लावणें, जामणें, धारेवर धरणें, डाफरणें, फाइलावर घेणें, वर घसरणें, दोषी धरणें, धमकावणें, टरकावणें, उलटी-सुलटी–बिनपाण्यानें हजामत करणें, तासंपट्टी–खरड काढणें, झाडून टाकणें, कांहीं शिल्लक न ठेवणें, कानउघाडणी करणें, बोलून घेणें, शिल्लक–बाकी न ठेवणें.

रात्र : : निशा, रजनी, रात, रात्रीवर काळोखाची पुटें चढत होतीं, रात्र भरगच्च झाली होती, ऐन मध्यरात्रीं, रात्री बेरात्रीं, रात्रीचे, रात्र चढत चालली, रात्रीला आतां काय शिंगें आहेत ? नील नभाचा शालू नेसून संध्येच्या परडीमधलीं नवरंगांचीं फुलें माळून रजनी मोहिनी घालीत आली, थोड्या वेळानें मांजराच्या पायाने रात्र झाली.

रान : : जंगल, वन, अरण्य, विपिन, कानन, गहन, अटवी, झाडी, झाड-झुडपें, घनदाट झाडें, घोर वन, रम्य उपवन, दाट राई, माजलेलें रानगवत, हिरवी झाडेंझुडपें, वृक्षांची दाटी, दुतर्फा झाडेंच झाडें, किर्र जंगल.

राहणें : : जानोसा, वास्तव्य, वस्तीस असणें, तंबू ठोकणें, ठिय्या देणें, निवास करणें, घर करणें, बिऱ्हाड ठवणें, तेथें दिवस घालविणें, मुक्काम केला, बाडबिस्तरा ठेवला, रहावयास आलों, तळ ठोकला, तीन धोंड्यांना जागा झाली, जेथें दिवस नी रात्री घालविल्या, तेथें लहानाचे मोठे झालों, तेथें खोली घेतली.

राक्षसी : : सैतानी, आसुरी, दानवी, रावणी, दैत्यासमान, खवीसच, अमानुष, पशुतुल्य, अति क्रूर, अक्राळविक्राळ, अति भयानक, अचाट, दयाहीन, बळजबरीचा, अति प्रचंड, अति ताकदवान, अत्याचारयुक्त, कोमलतेस पारखे, सर्वग्रासी, प्रति रावण, महाबलिष्ठ, केवढेच्या केवढे.

रिकामपण : : फुरसत, व्यवसाय-लोप, कराय सवरायला कांहींच नाहीं, इकडची काडी तिकडे करावी लागत नाहीं, पाटावरून ताटावर, माशा मारीत राहणें, सर्वच फावला वेळ !

रीति : : पायंडा, प्रघात, रिवाज, पद्धति, मोड, मांडणी, तरीका, वहिवाट, परंपरा, जनरीत, नेहमींची चाल, पूर्वापार संकेत.

रुदन : : त्याच्या नेत्रांत शोकनद्या वाहल्या, हमसाहमसी स्फुंदून स्फुंदून रडूं लागला, दु:ख तिच्या श्वासावाटे बाहेर पडत असे, हुंदके आवरेनात, प्रयासानें दाबून धरलेला हुंदका बाहेर फुटेल अशी तिला भीति वाटली, दु:खाचा कढ दाबीत ती गप्प राहिली, विव्हळून मट्कन खालीं बसला, डोळ्यानें पाणी काढलें, रडून रडून मुठीएवढे डोळे केले, डोळे पाझरायच्या आंतच पदरानें टिपले, डोळ्यांत पाणी तरळलें, नेत्रांत टचकन् आंसू आले.

पाणावलेल्या डोळ्यांनीं, डोळे पाण्यानें डंवरले, नयनांवाटे अश्रूंचे लोट वाहूं लागले.

रुसवा : : लटका राग, गाल फुगवले, सर्जी खप्पा झाली, कळी खुलेना, ' आम्ही नाहीं जा ' झालें, ' अदया कठोरा ' अशीं संबोधनें मिळालीं, तळपायाची आग गालांपर्यंत गेली, फुरंगटली, फणकाऱ्यानें म्हणाली, एकेक डोळा एवढाला केला, अकारण घुस्सा केला, समजूत काढतां नाकीं-नऊ आले, नाजूक फसवा रुसवा, रुसवाफुगवा. कृतक कोप, खोट्टं खोट्टं रागावणें, रुसूं बाई रुसूं कोपऱ्यात बसूं; तिकडून आला नवरा फुसकन हंसूं त्यांतला प्रकार ! पारदर्शक राग, रागाचा केवळ आविर्भाव, प्रेमकलह, रागाचा कढतपणा कायम होता.

रूढि (वाईट) : : कोळपलेला जमाना, जुनी शिळी घडी, जुन्या समजुतींची मगरमिठी, बुरसटलेल्या रीतिपद्धति, संकेतांच्या शृंखला, समाजांतील कुप्रथा, नासके ठरीव संकेत, हाडींमांशीं खिळलेल्या प्रथा, रक्तांत बाणलेल्या सनातनी समजुती, आंधळेपणानें शिरोधार्य मानलेल्या प्रथा, बाबावाक्यं प्रमाणं ही मनाची घडण, महाजन जातील त्या रस्त्यानें जावें असें ठोकताळे, परंपरेच्या दास्य-शृंखला.

रूपकें : : जगाची रंगभूमि, पैशाचें सोंग, मनाचा तळ, राजकारणाची धुरा, न्यायदानाचा तराजू, विचाराचे तरंग, यशाची किल्ली, शरिराची खोळ, जीवनाची संध्याकाळ, रूढींचा कचरा, परसत्तेचें जोखड, मृत्यूची दाढ, म्हाताऱ्याची काठी, प्रयत्नांचें शीड, सान्त्वनाचा पंखा, डोंगराचा माथा, स्पर्शाचा अजगर, कर्तव्याचा बोजा, टॉवरचें मस्तक, स्वार्थाचें अस्तर, चित्राचें तोंड, राजसत्तेची घडी, मनाचा कोपरा, काव्याची सरिता, दुःखाची करवत, विचारांची चाकोरी, चिंतनाची पातळी, काव्याची रसोई, कुविचारांचा उकिरडा, दुःखाचा डोंगर, सौंदर्याची लूट, विपत्तीची कृष्ण छाया.

रूपकें (चमत्कृतिजनक) : : समोरच्या मोटारीनें डोळा घातला तेव्हां आमची पुढें निघाली, सूर्याची गुड्-बाय करायची वेळ होती, म्हशींना आज डिनर पार्टी होती; आंबोणांत पेंड होती, दिवसाला ज्वर चढला, आंदण

आलेल्या कल्पना, गादीला लाटा पडल्या आहेत, अनुभवाच्या लिपीनेंच जीवन-ग्रंथ उलगडतो, तोंडाला कुलूप पडलें, क्यूचें तोंड कुठें आहे ?

लग्न : : विवाह, पाणिग्रहण, शादी, परिणय, बोहल्यावर चढली, डोक्यावर अक्षता पडल्या, कु० ची सौ० झाली, चतुर्भुज झाला, मुलगी उजविली, संसारसोपान एकत्र चढलीं, दोहोंचे चार हात केले, विवाहबद्ध झालीं, संसारांत पदार्पण, गृहस्थाश्रम स्वीकारला, लग्नाचा बार उडवून दिला, बाळ्याला बाळी पाहिली, अखेर त्यांचा नांदा सौख्यभरें झाला, शुभमंगल करून टाकलें, वाढाळू मुलामुलींची समस्या लग्नानेंच सुटते, गळ्यांत बांधला मणी नी जिवाला झाला धणी.

लग्न (निंदा) : : लग्नाची लोखंडी बेडी–धोंड, सोनेरी पिंजऱ्यांत पक्षी अडकला, दुसरें लग्न म्हणजे आशेनें अनुभवावर मिळवलेला विजय होय, कुंकवाला धनी आणणें इतकेंच, हॅपिली मॅरिड पैकीं दिसतात एक, विवाह हा एक जुगार आहे, क्षणिक मोहासाठीं कायमची गुलामगिरी, आंतबट्ट्याचा व्यापार, दरडोई एक पति किंवा एक पत्नी ही पद्धत चालू आहे म्हणून ठाक तऱ्हेनें हीं लग्नें उरकतात.

लगेच : : तेव्हांच, तांतडीनें, अविलंबेंकरून, पुरती उभी राहिली नसेल तोंच, तात्काळ, लगोलग, तत्क्षणीं, त्या मागोमाग, वेळ न दवडतां, तेव्हांच्या तेव्हां, बसल्या जागीं, तेथल्या तथें.

लघूक्ति (व व्याजोक्ति) : : तुमच्या कैवाराची तितकीशी जरूरी नाहीं, झाला हा प्रकार चांगला का ? प्रेम असेल पण तें जाणवत नाहीं, दहा लाखाची इस्टेट तेव्हां त्यांना विशेष असें कांहीं कमी पडत नव्हतें, त्यांनीं केलेला हा गौरव सत्यापेक्षां मुत्सद्देगिरीचा वाटला, ही गोष्ट कांहीं त्याच्या कार्यक्षमतेचें प्रशस्तिपत्र नव्हे, चुकलों–त्रिवार चुकलों, सौंदर्याबाबत तंग परिस्थिति आहे.

लज्जास्पदता : : धरणी दुभंगेल तर बरें असें वाटलें, बेशर्मीला शरण गेलों, काय सांगू कपाळ ? लज्जेनें चूर चूर, खेटरें खाल्ल्यासारखा चेहरा करून परतलों, लाजिरवाणा प्रसंग, शरमलेल्या तोंडानें, चार माणसांत तोंड दाखविण्याची सोय उरली नाहीं, खालच्या मानेनें आलों, वसुंधरे देहि मे

विवरं असं झालंय, त्याला अपराध्यासारखें झालें, मी आणखीच एवढीशी होऊन गेलें, चिमणीसारखें तोंड केलें, अगदीं मेल्याहून मेल्यासारखें झालें, यापेक्षां मरण बरें.

लज्जित (युवती) : : नववधूसारखी ती प्रौढा चक्क लाजली, लाजून चूर झाली, घाबरून चीत्कार केला, लाजेनें अर्धमेली झाली, शरमून थिजून गेली, ते धाष्टर्य तिच्यानें होईना, संस्कारांच्या लगामांनीं तिची जीभ खेचून निर्जीव केली, घुटमळूं लागली, उगीचच लाजली, शरमेनें चूरमार होऊन गेली, सांगतांना अशी लाजलीय् अशी लाजलीय्! वरमल्यासारखी खालीं बघूं लागली; आणि दुसऱ्याच क्षणीं दोन करपल्लवांनीं मुखकमल झाकलें गेलें, ओशाळगत होऊन म्हणाली, प्रेमलज्जेनें लालीलाल झालेला चेहरा, लाजेंत न्हाऊन निघालेला गोरापान सुंदर चेहरा, तिची नजर घरंगळत खालीं आली.

लज्जेनें अधोमुख वदन, तिनें हें सर्व ओझरत्या नजरेनें टिपलें, चोरटी नजर टाकली, लज्जेनें धमकावल्यामुळें जीभ हालेना, अपराधी चेहऱ्यानें ती बाहेर पडली, कित्येकदां पाऊल उचलण्यापेक्षां नजर उचलणेंच कठीण असतें; तिला तो अनुभव घडला.

चेहऱ्यावरील हास्यांत लज्जेचा रंग खुलत होता, तिचे डोळे तिला दगा देत होते, कासवीसारखे सर्व अवयव विनयाच्या अवगुंठनांत लपवून ही फिरते असें वाटतें, लज्जेचा मोहक रक्तिमा मुख-मंडलावर पसरला, आरक्त मुखानें निघाली, लज्जेनें जमीनदोस्त झालेली नजर, हाताच्या ओंजळींत चेहरा लपवीत ती उद्गारली, भुरक्यावांचून जेवण नाहीं भुरक्यावांचून बाई नाहीं!

लठ्ठ (पुरुष) : : हा भोपळा, हा टोमॅटो, हा कॉली फ्लॉवरचा गड्डा, हा बटाट्या, हा वाटाण्या, टोणगा, फणशा, जड-जंबाल, हत्तीचें पिल्लूं, हा रणगाडा, हा वरवंटा, हा लाटण्या, लठ्ठेश्वर, रोलर, चुरमुऱ्याचें पोतें, कापडाची गासडी, फुगलेला फुगा, कापसाचा गठ्ठा, जाडा हिप्पो, बेडक्या, तांदळाचें पोतें, आडव्या अंगाचा, बाळसेदार, गोटीदार, नुसतें वर्तुळ, अकरा दगड सात पौंड वजन आहे बाळ्याचें! असा फुगलास काय; शरिरांत हवाबिवा भरून घेतलीस काय?

लठ्ठ (स्त्री) : : नुसतें पिंप, पोटाचा रांजण, लांड्या तंग फ्रॉकमध्यें तिचा देह पाहिल्यावर असा संभ्रम पडला कीं या बाईचा देह तिच्या वस्त्रांतून बाहेर पडूं पाहतोय कीं बाहेरून आंत लपूं पाहतोय ? अवजड प्रकरण, गुबगुबीत अंगाबांध्याची, अगदीं पेढेघाटी आहे, चांगलीच दुध्या भोपळ्यासारखी सुटली आहे, अंगापिंडानें भरलेली, बाई भलतीच धिप्पाड ! तिचा पसारा वाढला आहे, तिनें बाळसें धरलें आहे, इकडे कापूस स्वस्त झाला आहे, या कंपनीनें एकदोन वर्षांत गरगरीत बोनस जाहीर केला आहेसें दिसतें.

लढा : : झगडा, झंझट, लढाई, झोंबट, झुंज, तंटा, भांडण, लढत, संघर्ष, बखेडा, शब्दाशब्दी, गुद्दागुद्दी, युद्ध, चकमक, सामना, टक्कर, साठमारी, हातघाई, स्वारी, चढाई, मारामारी, काटाकाटी, परस्परांची जुंपली, झक्कड, एकमेकांवर घसरले, चार हात झाले.

लबाड : : कारस्थानी, लुच्चा, कांगावखोर, कपटी, शठ, फसव्या, आंतून वेगळा, दिसतो तसा नाहीं, वाममार्गी, कुटिल, आंतल्या गांठीचा, धूर्त, कावेबाज, उलट्या चालीचा, वक्रगति, नागमोडी, धोकेबाज.

लबाडी : : ठकबाजी, लफंगेगिरी, लांडीलबाडी, फसवाफसवी, हातचलाखी, गारूड, लुच्चेगिरी, खटपटी-लटपटी, चकवाचकवी, डोळ्यांत धूळफेक, टोपी घालण्याचे उद्योग, या बोटावरची थुंकी त्या बोटावर करणें, गुळचट थापा, आंवळा देऊन कोहळा काढणें, कांहीं बनविंगचा प्रकार दिसतोय्, अप्रामाणिकपणा व विश्वासघात, चाळवण्या दाखविण्यास सुरुवात केली, परस्परांचा सिद्धसाधकपणा, तोंडाला पानें पुसलीं.

लहान : : छोटें, अल्प, इटकुली मिटकुली, लहानशा आगपेटीएवढी दिसत होतीं, टीचभर छातीचे काडी-पेहेलवान, अंधार चिमूटभर ठरणार नाहीं, खेळण्यांतल्या इमल्याप्रमाणें घरें, डोळे ताणावे तेव्हां दिसायचें.

लाचार : : दीनवाणा, मिंधा, बांधलेला, अर्थाचा दास, आश्रित वृत्तीचा, जन्मोजन्मींचा ऋणी, मेलेली भाकर खाल्लेला, म्हणतो त्यांच्या पोटांत आमचें पोट चालतें, तोंड चुकवतो, आतां कोणत्या तोंडानें मागूं ? दरिद्याच्या मनांत बारा वाटांनीं दौर्बल्य आंत शिरतें, झकत करावें लागतें, दुसऱ्याच्या

ओंजळीनें पाणी पिणें हें आलेंच, गरजवंतां अक्कल नसते, जळून गेलेल्या रबराचा वास मागें उरावा तशी लाचारीची जाणीव त्याच्या मुद्रेवर राहिलीच.

लाचारी : : अजीजी करण्याची वेळ आली, अनाथ व अनन्यगतिक, सदाची ओशाळगत, मनानें बांधला गेलेला, मोठ्या काकुळतीनें याचना करूं लागे, मानी माणसाच्या लाचारीइतकें दुसरें कोठलेंच दृश्य दुःखकारक नसेल.

लाजवंती : : लाजाळूचें झाड, अधोमुख, बुजरी, पानाआडून डोकावून पाहणाऱ्या अर्धस्फुट कळीसारखी, शरमिंदी, बावरी चर्या, मुग्धमधुर कातर डोळे, लाजरी खारच ! तेव्हांच भांबावते–वरमते, तिची गंमतीची धांदल उडे, इतकी लाजते इतकी लाजते, नजरेंत भिरभिरती चमक, लाजेनें न्हाऊन निघालेला तिचा चेहरा, शरमेनें चूरमार.

लाभ : : हित, नफा, लभ्यांश, घबाड, फायदा उठविला, अचानक दैव फळफळलें, नागवें कोल्हें भेटलें, लग्गा साधला, दाणापाण्याची सोय झाली, फायदमंद ठरलें, किफायत झाली, लॉटरींत तिकिट निघालें, मिळकत केली.

लाभदायक : : फायदेशीर–मंद, नफेशीर, किफायतीचें, बोनसदार, कल्पतरु, जादूचा दिवा, ईप्सित तें देणारा ताईत, कामधेनु, पैशाचा झरा, द्रौपदीची थाळी, दुसरा परीस, उखळ पांढरें करील, मनकामना पूर्ण करणारा, दाम चौपट परत देईल, लभ्यांश बराच, चक्रवाढीनें परत करील, आहे त्यांत भर घालील, या नाहीं त्या तऱ्हेनें देईल, उपसा कराल तितके भरीत राहिला, सुना परत दवडणार नाहीं, हात ओला करीलच, फायद्यांत पडेल, गरगरीत नफा पदरांत टाकील, शंभरपट परतफेड देईल, सोन्याच्या पावलानें येईल.

लाळघोट्या : : गोंडा घोळणारा, तोंडपुजा, जिभल्या चाटणारा, आशाळू, आशाळभूत, लांगूलचालन हाच धर्म, ताटाखालचें मांजर, थुंकी झेलणारा, पुढें पुढें करतो, मर्जीवर नाचतो.

लांच : : पानसुपारी, चहापाणी, बक्षिशी, कागदपत्र उडूं नयेत म्हणून वर टाकलेलें वजन, रिश्वत, ब्राइब, चिरीमिरी, टिप, मुखलेप, ब्लॅक् मनी, पैसे खाणें, तोंडावरचें हें पलिस्तर, तोंड मिटवावयाचे हे पैसे, हात-मिळवणीचे दाम, काळा पैसा, गाड्यास वंगण, हरामाचा पैसा, वरखालीं मिळकत, अवांतर प्राप्ति, खाबूपणा, घूसखोरी, सुवर्णमात्रेनें बधणार नाहीं असा नाठाळ कोण आहे ? हात ओला केला, पैसे देऊन तोंड बंद केलें, पानसुपारी दिली, चहापाणी द्यावें लागलें, हाताला वंगण द्यायला हवें, जरा गुळखोबरें द्या कीं जमेल सर्व ! त्याच्यावर रौप्य नाणकांचा प्रयोग केला.

लांचलुचपत : : मागल्या दारानें आलेला पैसा, मागें किंवा टेबला-खालीं हात करून घेतलेले पैसे, भ्रष्टतेची ही सर्वभक्षक कीड, वाममार्गानें पचवलेला पैसा, येथें दररोज चवल्या-पावल्यांचीं आचमनें चालतात, डोळे मिटून घेतले कीं आपोआप खिसे जड होतात.

लाचलुचपत (सामर्थ्य) : : द्रव्यानें सर्व वश होतात, सोनेरी किल्लीनें सर्व दारें उघडतात, कायदाहि ठिसूळ असतो; सोन्याच्या वजनानें तो बदलतो–मोडतो–वाकतो, मूठ दाबली कीं काम होतें, कागदावर वजन पडलें कीं तो पुढें सरकतो; एरवीं प्रकरणें भिजत पडतात.

दाम करी काम, लांचखाऊंचे धागेदोरे वरपर्यंत पोहोंचलेले असतात, हीं भुतें शांत करावींत तेव्हां अडसर निघतात, नाण्यांच्या आवाजानें कामें होतात, भरपूर वंगण सोडलें कीं चाकांची कुरकूर होत नाहीं, पैशाचा आवाज काढला कीं कोणाचेंहि काम करून देणारे आढळतात, चिरीमिरी दिली कीं सर्व खूष !

लुडबूड : : लांडे कारभार, ढवळाढवळ, अधिक प्रसंग, विकत श्राद्ध, ज्यांत त्यांत हा आहेच ! प्रत्येक कामांत गांवच्या भाकऱ्या भाजायची संवय, कुडाला तुमड्या लावण्याचे उद्योग, उठाठेव, गाढवाच्या शेपटीशीं खेळ-कां; अन् दांत पडले म्हणून ओरडा कां !

लुप्त : : नष्ट, नाहींसें झालेलें, दिवंगत, रद्द, खलास, संपलें, उरलें नाहीं, गेलें, बाद झालें, नामो-निशाण उरलें नाहीं, शिल्लक नाहीं, टोंक तेवढें उरलें, नष्टप्राय, उडून गेलें, जळून गेलें, त्याची वाफ झाली, वापरून

संपलें, आजकाल दिसत नाहीं, भूमिगत इतिहास-जमा झालें, आतां म्यूझिअममध्यें सांपडलें तर सांपडेल, व्यवहारांतून गेलें, ग्रंथ आटोपला ! अदृश्य झालें, मागें खूणहि राहिली नाहीं, पसार झालें, खाणाखुणाहि उरल्या नाहींत, निशाणीहि उरली नाहीं, त्याची धूळ झाली, दहा ठिकाणीं झाली, तें त्रेतायुगांतच धुंडाळावें लागेल.

लेख (वाईट) : : आत्मश्लाघेनें बरबटलेला, अव्यवस्थित जोडणी जुळणी व मांडणीचा, वडाची साल पिंपळाला, अप्रयोजकतेची कमाल सीमा गांठली आहे, जनमताला अनिष्ट वळण लावणारा.

लेखक (आदर्शवादी) : : उपदेशक नाहीं उपासक, समाजांतील अनंत दुःखांची आणि दैन्यांची जाणीव असलेला, जखमांवर लेखणीची फुंकर घालणारा, रंजल्या गांजल्यांचा कैवारी, जगांतील म्लान वदनें प्रफुल्लित कशीं होतील याचीच चिंता, सज्जनांच्या निंदेचें पाप कधीं करणार नाहीं, लोकगंगेचें जीवन गढूळ करण्याचें दुष्कर्म कधीं केलें नाहीं, गुणांचा पूजक, सद्गुणांच्या बाबत माधुकरी, चांगल्या गोष्टींची उपजत आवड.

जीवनाबाबत जागृत जिज्ञासा, त्यांना जीवन म्हणजे प्रचंड मौज वाटे, जीवनाचा लोभ नाहीं ओढ आहे, जीवनांतील घटनांच्या मार्मिक प्रेक्षकाचें व निवेदकाचें नातें संभाळून लिहीत, लोक काय म्हणतील याची पर्वा केली नाहीं, रूढ संकेतांविरुद्ध बंड, त्यांच्या शब्दकोशांत भय हा शब्द नाहीं.

लेखक (चांगला) : : सर्वंकष बुद्धि, खंदा लेखक, शरिराप्रमाणेंच रसिकताहि उंच नि धिप्पाड आहे, प्रसिद्धीच्या नि आत्मगौरवाच्या या युगांत विनयी व प्रसिद्धि-विन्मुख, अधिकारी साहित्यिक, साहित्य-सागरांतला हा देवमासा, प्रथम श्रेणीचा व जीवनांत मुरलेला, लेखणी-बहाद्दर.

लेखक (वाईट) : : वर्तमानपत्रांत लेखणी-ढकल्याचें काम करणारा, फाटका लेखक, मामुली कथाकार, करंटा कविब्रुव, सुचेल तें टोका असा यांचा प्रकार ! दिसामाजिं कांहीं तरी तें लिहावें, वाङ्मयीन वीण बरीच, घरटीं किमान एक लेखक आज सांपडतोच; त्यांतलेच हे एक, पुस्तक लिहिण्याची ही लेखिकेची दुसरी खेप आहे, वाङ्मयप्रांतात पहिलटकरीण आहेत, यांची वाङ्मयाभिरुचि प्राथमिक स्वरूपांत आढळते, पेन-ढकल्या, लेखणीकुस्या.

लेखन (ओंगळ) : : काळतोंडी लेखणी, निंदेची जपमाळ, नुसत्या शिव्या घातल्या आहेत, ग्रांट रोड-छाप हमरी-तुमरीवर आले आहेत, टीका कसली आई माईचा उद्धार करतात, शिमगा साजरा केला आहे, टीकेची चिखल-फेक व चाकू-हल्ला, व्यक्तीवर घसरले आहेत, अप्रयोजकपणाची व औचित्यहीनतेचा कमाल मर्यादा गांठली आहे! गटारें उपसलीं व वाहवलीं, घाणीचा सर्वांना चिमूट चिमूट–पसा पसा प्रसाद दिला आहे, मनास येईल तें भडाभडा ओकले आहेत, जें जें अवाच्य–अभद्र–अमंगळ व असत्य आहे तें तें सर्व इथें आहे, गटार-उपशीचा डाव सातत्यानें खेळला आहे.

लेखन (वाईट) : : भिकारडें काव्य, धाड् धाड् कवन, विटाळी कविता, खरडलेले लेख, पुस्तकांचा धबधबा, त्वरित स्रवणारीं काव्यें, सैराट मतें व अतिरंजित वर्णनें यांनीं लडबडलेले चेंगट निबंध, लेखांची धुमश्चक्री, सुसाट प्रचार, तरणी तगडी लेखणी कुमार्गाला लागलेली दिसते, गबाळ रचना, रटाळ कविता, परोपदेशे पांडित्य करण्यांत पटाईत, तर्र–बेशरम–कुटाळ–विवस्त्र लेखणी, बेलगाम हल्ला, चंद्रमौळी लेख, लेखणीचा खराटा, प्रकाशकानें लेखकाला उजवला दिसतोय.

बेछूट विचारांचा अफाट उच्चार, उपदेश भरवताहेत, विस्कळित मांडणी, कुविचारांची बाजारपेठ, टीकेचा, रोलर, नवविचारांचें लोणचें घातलें आहे, पखाल भरून उपदेश, लेखनाचीं औजारेंच ओबडधोबड; मग नांगरट कशी चांगली होणार! आग पाखडली आहे, लेखणीचा कटिशूळ मोठा, खाडकन् लिहिलेले लेख, लेखणीची मळमळ ओकली आहे.

लोकप्रियता : : जनतेकडून वाहवा, जनमान्यता, लोकांकडून मान्यतेचा शिक्कामोर्तब, यांच्या लोकप्रियतेची उंची व व्याप्ति मोठी, चार लोक बरें म्हणतात, सर्वांकडून वाहवा होते, कोठेंहि स्वागत आहे यांचें, यांना या या आहे जा जा नाहीं, सर्वांचे आवडते, सर्वांच्या मनाचे धागे यांच्याकडे गुंफलेले, हवे हवेसे आहेत.

लोकभ्रम : : मनाचीं कोळिष्टकें, बुद्धीचा गंज, भ्रामक कल्पना, विचारशून्य विश्वास, सारासारहीन श्रद्धा.

लोकशाही : : जनतेचें राज्य, लोकनियंत्रित कारभार, बहुजनराज्य, लोकराज्य, जनताजनार्दनाची हुकमत जेथें चालते, प्रजा बोले व दळ किंवा सैन्य हाले अशी स्थिति, एक प्रकारचा पंचांचा कारभार, लोक हेच ईश्वर, चार चौघांच्या मताप्रमाणें कारभार, लोकमतानुवर्तित्व हें त्याचें व्यवच्छेदक लक्षण, जनमताच्या दाबावर सत्तेंत बदल, जेथें लोक हेंच परमोच्च न्यायालय, सत्तेचें जास्तींत जास्त विकेंद्रीकरण.

वक्तृत्व (चांगलें) : : पल्लेदार मिशा व तसेंच वक्तृत्वहि, कशावर तरी चांगलीच झोड उठवून द्यायचे, कितीहि झुकले तरी बोलण्याची गाडी मूळ-पदावर यायचीच, सांगायचें काय तें भराभर सांगायचें; कीं मग गप्प.

वक्रोक्ति : : चित्रकलेची वाढ करण्यास निघालेला हा विद्यार्थी दाढी-पलीकडे कांहीं वाढवूं शकला नव्हता, जिभेला शृंगाराचें उधाण आलें, ही सर्वांगकवच निर्लज्जता, बळकट अपसमज, जलेबी हास्य करीत, भाबडा गैरसमज, कारखान्यांत नोकरी करण्यापेक्षां नवीन पिढी घडविणें त्याला अधिक पसंत पडलें, चोरींत मनोभावानें सामील झाला, पुनः पुनः नापास होण्यानें अभ्यासहि चांगले घटले होते.

सभेंतल्या गोंधळांत या बाळाचा हिस्सा असावा, जन्मदात्या प्रश्नाकडे लक्ष न देतां आपल्याच मार्गानें जाणारें उत्तर मिळतें, तेव्हां तर तो अस्सा डोले तस्सा डोले, मुलगी लवकरच घर कसें भरून काढील हं ! सत्याची काटकसर करते, समाजाच्या भलाईकरितां झुरणारे हे पुढारी, हा स्वतः-विषयीं हजारों गैरसमजांचा दोन पाय फुटलेला एक होल्डॉल आहे.

वकील : : ज्याचें अंतःकरण कातळासारखें थंड बैठक घोरपडी-सारखी मजबूत आणि नजर घारीसारखी तीक्ष्ण किंवा चंचल तो शंभर टक्के वकील समजायला हरकत नाहीं ! अम्बॅसॅडर, बॅरिस्टर, विधिज्ञ, कायदे-पंडित, कायद्याचा सल्लागार, बालिष्टर, बाजू मांडणारा, तर्फे उभा.

वजनदारपणा : : जड बूड, प्रस्थ, बडें धेंड आहे, म्हणतील तसेंच होईल, शब्दाला मान आहे, चार लोक हातांत आहेत, शब्द खालीं पडणार नाहीं, महंमदाला टेकडीकडे जावें लागेल, दबदबा, दबाव, लोक मानतात, शिसवी लांकूड आहे, शिशाचें बूड यांचें.

वटवट : : खूप बोलणें, गप्पांना ऊत, शिळोप्याच्या गप्पा, ऐसपैस आडव्या तिडव्या गप्पा, चकाट्या पिटणें, तोंडाचा पट्टा–टकळी–गुऱ्हाळ, तोंडाचें यंत्र सारखें चालूंच, तिच्या जिभेवर अगदीं नक्षत्र पडलें आहे, बराच उपदेश पाजला, वाग्गंगा दुथडीं वाहूं लागली ! तिचें तेंच पालुपद चालूं झालें, तों त्याच्या बोलण्याची गाडी सुटलीच ! तो म्हणजे चालतें बोलतें वर्तमानपत्रच आहे, बारा गाड्यांची खडखड आणि दोन बायांची बडबड.

वयांत येणें (स्त्री) : : न्हाती-धुती झाली, ऋतु आला, पदर आला, बसूं लागली, ऋतुस्नात होऊं लागली, बाईपण आलें, विटाळशी होऊं लागली.

वरचढ : . वरचष्मा, अधिराज्य, चढेलपणा, वरपगडा, वर नाक, दबाव, दडपण, तेरे उप्पर मेरी, चार आंगळें वरच ! वरजाऊपणा.

वरपांगी : : वरवर, बाह्य स्वरूपांत, बाहेरून, दिसायला, हस्तिदंती दाखवण्यापुरतें, वरच्या थरांतच, कातडीपुरतें, खोलांत नाहीं.

वर्गीकरण : : पृथक्करण, घटक द्रव्यें काढणें, मूलद्रव्यें हुडकणें, तुकडे पाडणें, विघटन, प्रकार पाडणें–हुडकणें, भाग भाग करणें, घटकांचें विभंजन व गट पाडणें.

वल्गना : : बढाई, नुसत्या गप्पा, बडी बडी बातें, आत्मप्रौढी, एक हात लांकडाची सव्वा हात ढलपी, फुशारकी सांगणें, उगाच मिशीवर ताव, फक्त बोलण्यांतली मिजास पाहून घ्यावी, वचने किं दरिद्रता ? केवळ डरॉंव डरॉंव, गर्जेल तो पडेल काय ! उथळ पाण्याची खळखळ, पोकळ ढोल मोठ्यानें वाजतो, वाचि-वीर, उत्तर स्त्रियांत बडबडला अशी स्थिति, लंब्या चौड्या थापा, आम्हीं हें केलें तें केलें, यँव करावें त्यँव करावें, नुसतें मुखपांडित्य, जिभेचें दातृत्व मोठें, फुकाची फुशारकी मारतात, त्यांना काय लागतें आहे म्हणायला ?

वशिला : : कोणाच्या तरी मोहब्बतीचा प्रभाव, आड-प्रवेश, दबाव आणून नेमणूक, कोणाचा पुष्ठा पकडला, वाम मार्गानें प्रवेश, चिठ्ठी-चपाटी, मागील दारचें वजन, बाजूनें चार शब्द, वशिल्याचें तट्टू, ओळख आणली.

कोणी गॉड-फादर पाहिजे, ओळखीवर चढले, आपला माणूस म्हणून घेतलेला, सुशिला हाच वशिला, वशिल्याचा शिलाप्रवंग घेऊन बळकट झालेले, वशिल्याला सर्व वश, शीलापेक्षां वशिल्याला अधिक महत्त्व ! वजनदाराचें प्रशस्ति-पत्रक आणून घुसले.

व्यक्तिमत्त्व-विकास : : त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा घडीचा पंखा येथें हळूहळू उघडला जात होता, व्यक्तित्वाला कोंब फुटले, व्यक्तित्व आकारास आलें, स्वभाव-वैशिष्ट्य भरत चाललें, शरिराला तसाच मनाला घाट आला, माझ्या स्वभावाची टाळू भरली ती इथेंच.

व्यभिचार : : गैरव्यवहार, स्खलन, जारकर्म, वाममार्गाला जाणें, पापाचरण, चारित्र्यस्खलन, पापांत पडणें, भ्रष्ट जीवन, कुकर्म, अनीतीचा कर्दम, स्वैरता, निरर्गल जीवन, स्वैराचार, नीति उल्लंघिली, भानगड केली, बेताल वर्तन, स्वच्छंद स्वेच्छाचार.

व्यर्थता : : तो याबाबत उगीचच मरत होता ! हातीं कांहीं आलें नाहीं, अरण्य-रुदन ठरलें, प्रयत्न वांझोटे झाले, हात चोळीत बसावें लागलें, सर्वच मुसळ केरांत गेलें.

व्यवसाय (गुण) : : धंद्यांत तीन टी पाहिजेत; हातोटी चिकाटी व सचोटी, दोन रेंगे हवेत; करेंगे या मरेंगे.

व्यवहारी (अति) : : शेवटल्या वस्तूंची खरेदी करतांना देखील घासाघीस करून हातांतल्या आंगठीनें मडकें वाजवून घेणारा हा महाभाग.

व्यसन : : चट, चटक, तल्लफ, हुक्की, घाणेरडी संवय, गलिच्छ खोडा, अनावश्यक आवश्यकता, पाहिजेच अशी वस्तु; न मिळाली तर माथें फिरेल असें झालेंय, एक वेळ जेवणावांचून अडणार नाहीं पण यावांचून अडेल.

व्यसनी : : चंगीभंगी, रंगेल, छंदीफंदी, व्यसनांत डुबलेला, ओंगळ संवयीचा, बाटलीबाज, दारूतला किडा, सर्व नाद असलेला, बऱ्याच बाजी आहेत, सर्व तऱ्हेनें चिखलांत बरबटलेला.

व्याख्यान (गप्पीदास) : : त्यांना एकपात्री व्याख्यान ठोकण्याचा झटका आला, श्रोत्यांचा व्याख्यानाखालीं चेंदामेंदा झाला ! व्याख्यानें पाजलीं.

व्याख्यान (चांगलें) : : टाळ्यांच्या कडकडाटांत संपलें, उद्बोधक, प्रसंगानुरूप, सभा चित्रासारखी बसली होती, कल्पनांचें सहर्ष स्वागत झालें, कोणी कोठें हूं का चूं केलें नाहीं, व्याख्यान उच्च पातळीवरून झालें, क्रांति-सिंहाची गर्जनाच ती ! रोखठोक सवाल, लढाऊ संदेश, मार्मिक चर्चा, कित्येक वाक्यांना टाळ्या घेतल्या, झंझावाती प्रचार, प्रतिपक्षाच्या प्रस्तावाच्या अगदीं चिंधोड्या करून टाकल्या, अथांग जनसागर उसळला, झुंडीच्या झुंडी उत्सुकतेनें ऐकत, सूर्योदय होतांच धुकें मावळून जातें त्याप्रमाणें विरोधकांचा विरोध मावळत गेला.

व्याख्यान (वाईट) : : विटाळी वक्तृत्वाचें प्रदर्शन, फुकटचें पल्लेदार वक्तृत्व, रिकामा आवेश, बोलण्याचा उगीचच राणा भीमदेवी थाट, व्यर्थ हाकाटी, उगाच तत्त्वांची राळ उडविली, सारी बंडखोरी बडबडींत आहे, भाषण ठोकलें आहे झालें ! मध्यें कांहीं टाळ्यांचीं वाक्यें घातलीं होतीं, वातावरण निष्कारण तापविलें, उत्तरें देतांना रेवडी उडाली, प्रदीर्घ प्रवचना-सारखीं वाटणारीं एकेकाचीं भाषणें, वर घोळून घोळून सांगत, गाडाभर आभार मानले, लांबलेलें भाषण अखेर संपलें तेव्हां सर्वांनीं सुटकेचा उसासा टाकला.

व्याजोक्तिपूर्ण (लेखन) : : हेटाळणी, व्यंजना, विडंबन, टवाळी, वक्रोक्तिपूर्ण, टर, टेर, बोचक लागट लेखन, वरवर स्तुति पर्यवसान निंदेंत, व्याजस्तुति, गर्भित निंदा, जोडे मारले, शालजोडींतले दिले, गालिप्रदान, चिमटे काढून विटंबना, उपरोध, उपहास, दोषदर्शन, तिर्यक् लेखन, आडून गोळीबार, वरवरच सोज्वळ, निर्भर्त्सना, माकडचेष्टा, मुद्दाम भ्रष्ट नक्कल, तिरकस टीका, आडवें घेतलेंय, शर्करावगुंठित कोयनेल

वाईट : : खराब, बिघडलेलें, ढूस, फडतूस, शिळेंपाकें, बद्द, हीन, नालायक, बेकार, निकामी, कुचकें नासकें, अशुद्ध, नाकामयाब, निकम्में, खिळखिळें, कामांतून गेलेलें, फुकट, चाळणी झालेलें, फालतू, भेसळीचें, डागाळलेलें, बेडौल, बेढब, कुरूप, वेडावांकडा, प्रमाणहीन, विशोभित, खरबरीत, कांहीं तरीच ! लठ्ठ, मठ्ठ व ठेंगू, नकटें-चिपटें, भसभोंगळ, कलाहीन, नेभळट, सेकंड-हँड, तिय्यम दर्जाचें, कमअस्सल, साधारण प्रतीचें, बाजारी, निकृष्ट, थर्ड-रेट्, बनावट, जुनाट, बुरसट, वापरलेलें.

घाणेरडें, गलिच्छ, मळकट, कळकट, ओंगळ, उष्टें, ओशट, गढूळ, घृणास्पद, ग्राम्य, अस्पष्ट, किरटें, भरड, भडकफडक, प्रेतवत्, कर्कश, कर्णकटु, रासवट, तेंच तेंच, ठराविक, नेहमींचेंच, विटाळी, निषिद्ध, लज्जास्पद, निंद्य, संशयित चालीचें, आसुरी, हीन, हलकट, नीच, भुक्कड, दीड दमडीचें, भिक्कार, सवंग, सामान्य, सस्तें, पैशास पांसरी, कसलें काय नी फाटक्यांत पाय ! बेछूट, निरर्गल, तिखट, चढेल, कडवट, झोंबरें, बोंचरें.

दुटप्पी, दुहेरी, भाडोत्री, ढोंगी, कपटी, स्वार्थी, चोरटें, निर्लज्ज, निलाजरें, खारट-तुरट, गैरवक्तशीर, आळशी, कच्चें, अर्धवट, अपुरें, अपक्व, बिनबुडाचें, गद्यात्मक, निराशाजनक, गैरभरंवशाचा, दुबळा, पोकळ, तकलादू, विशविशीत.

वागवणूक (वाईट) : : दर्जानें जितका भारी तितका वागायला हलका, नाडून अधिक काम घेतो, हें तत्त्व; पायींची वहाण पायांत बरी, तेथें घड्याळाच्या कांट्यावर कामें चालतात, सर्वांना बोलणीं खावीं लागतात, मिजास बादशहाची; नांदणूक कैकाड्याची, बिगारीचें घोडें आणि तरवडाचा फोक, दुभत्या गाईच्या लाथा गोड मानावयाच्या इतकेंच !

नोकरांवर उगीचच तोंड टाकण्याची खोड आहे, उठतां लाथ बसतां बुक्की, म्हणे नोकर नीट झाडीत नाहीं; म्हणून त्याला झाडला आहे; नोकरांवर वसावसा करायची संवयच आहे, हिडीस-फिडीस करतात, हाताखालच्या नोकरांना तापल्या तव्यावर धरण्याची मुजोर वृत्ति, वचक बसविण्यासाठीं माजोर शिक्षा करीत, हेड-क्लार्कनें दट्ट्या लावला नाहीं असें झालें नाहीं.

वाढ : : प्रसरण, विकास, फैलाव, पाय पसरले, देशव्यापी झालें, जगड्व्याळ स्वरूप प्राप्त झालें, महापूर आला, यास पुढें खूपच पारंब्या फुटल्या, बेसुमार संख्यावाढ, पराकोटीला गेलें, याचा वट-वृक्ष झाला, पसारा वाढला, भारी झालेत, अणूपासून हें ब्रह्मांड झालें, जागोजाग झालेत, मुलांचें गोकुळ बनलें, देशाच्या कानाकोपऱ्यांत भिडलें, गणित-श्रेणीनें वाढतच गेलें, या वृक्षाला फळें-फुलें आलीं, आवृत्त्यावर आवृत्त्या निघाल्या, चढत्या क्रमानें—श्रेणीनें—भांजणीनें विस्तारलें, कार्य-व्याप रुंदावला.

वाढणारा : : वर्धिष्णु, वाढता, विकासक्षम, बुद्धिमान, विकासमान, प्रसरणशील, फुगतो आहे, दिन दुना रात चौगुना, कालच्यापेक्षां आज पुढें, प्रगतिशील, वयांत येत आहे, चंद्रकोरेप्रमाणें दर दिवशीं आकार मोठा होत आहे, भरती येण्याचा समय आहे हा ! चढत्या श्रेणीनें वाढ, गरगरीत होतोय, आकारमानांत वाढ आहे, पुढें चालला, याला मोजायला जुनीं मापें कमीं पडतात, लवकरच शिखर गांठील, वेल मांडवाला लागला आहे, फुलतो आहे, घेर वाढतो आहे, तरारून वर येतो आहे.

वाढणें : : विस्तारणें, फुगणें, वृद्धिंगत होणें, रुंदावणें, उंचावणें, सुजणें, प्रसृत होणें, फैलावणें, लांबणें, लांब होणें, जोर करणें, फुगोट्याचें टेकाड झालें, नराचा नारायण, बीचा वृक्ष, अणूची सृष्टि घडली. ओहोळाचा नद, सरोवराचा सागर, पिल्लाचा पक्षी, कारकुनाचा हेडक्लार्क, ग्रामसेवकाचा मंत्री, झोपडीचा राजवाडा, पायवाटेचा राजमार्ग, बाकड्याच्या जागीं कोचें आलीं, मुंगीचा हत्ती, सरड्याचा मगर, बोंबिलाचा देवमासा, झुळुकीची वावटळ.

वाढ-विकास (मुलांचा) : : या पक्ष्याला पंख फुटले आहेत, याला दाबून टोपली खालीं ठेवण्यात अर्थ नाहीं, मुलें मोठीं झालीं कीं त्यांच्या आयुष्याचीं स्वतंत्र वर्तुळें बनूं लागतात.

वाताहात : : दुर्दशा, सर्वनाश, उच्छेद, विनाश, दाणादाण, मृत्युवश झाले, दहा दाहीकडे गेले, कोणी उरलें नाहीं, सर्व मातीस मिळालें, ठिकऱ्या उडाल्या, रसातळाला गेले, मोडींत गेले, नामशेष झाले, कालप्रवाहांत लोपले, भुईसपाट झाले, नांवनिशी राहिली नाहीं, कालोदरांत गडप झालें, तीन तेरा उडाले, दैवाधीन–कालवश झाले, गाडले गेले, धड कोणी परतला नाहीं, समूळ उपटले गेले, मोठी नुकसानी पोंचली, धुळीस मिळाले, घरांवर गाढवाचा नांगर फिरला, होते कीं नव्हते असें झालें.

वाद (चांगला) : : गरमागरम, अत्यंत हृदयंगम बोधप्रद चर्चा, समंजसपणाच्या पातळीवर केलेला वाद, जोराची वादळी चर्चा, निष्कारण कुट्टा केला नाहीं, नुसतें भूस पाडलें नाहीं, तत्त्वबोध अखेरीला होईल असा वाद.

वाद (वृथा) : : घसाफोडीची चर्चा, वादे वादे जायते कंठशोषः, वांझोटा फुकाचा वाद, उगाच काथ्याकूट, केवळ शिळोप्याच्या गप्पा, शुष्क कंठशोष, घटपटादि नसती खटपट, वादे वादे जायते शीर्षभेदः असा प्रकार, पर्यंक-पंडिती चर्चा, शब्दांवरची कसरत, फुकट उठाठेव, पोकळ चर्चा, ही पोकळ व नादान वादसभा ठरली ! दोघांत हाच विषय दोन घंटे चालला होता, व्यर्थ शाब्दिक घोळ, केवळ तत्त्वचर्चा होत राहिली.

वामाचार : : बाहेरचा नाद, भ्रष्टाचार, बाहेरख्यालीपणा, वाकडें पाऊल, नीतिबाह्य वर्तन, अनैतिक संबंध, नैतिक भ्रष्टता, दुराचाराच्या गर्तेत पडणें, पाय घसरणें, पापाचरण, वाकड्या वाटेला जाणें, निषिद्ध आचार, वाट चुकणें, गैरवाजवी वर्तन.

वारा : : वायु, पवन, अनिल, वारं, झुळूक, हालती हवा, फुंकर, वायुलहरी, हवेची हलचल.

वारंवार : : उठल्या-सुटल्या, उठल्या-बसल्या, क्षणोक्षणीं, सदा सर्वदा, जेव्हां पहावें तेव्हां, हरघडीला, पावलोंपावलीं.

वावटळ : : वादळ, तुफान, झंझावात, आंधी, लू, वातचक्र, चक्री वादळ, वायुनदी, हवेचा झोका, सुसाट–झपाट्याचा–झोंबरा–बेफाट–जोराचा–डोंगरी–जलगरोदर–जलगर्भ–वारा, वायूचें तांडव–लोट–आगे कूच, वाऱ्याचा सोसाटा–झपाटा–तडाखा–तीव्र ओघ, हवेच्या जाचक हालचाली, हवेंत गडबड, हवेला पूर येतो, वातावरणांतील खळबळ, वारा फोंफावला–घोंघावत होता, वाऱ्याचें थैमान, वाऱ्याचा जोर प्रचंड होता, वाऱ्याचें घोडदळ पिटाळीत वरुण स्वारी करीत होता, छत्र्या हातांत टिकत नव्हत्या, वारा भकाभका आंत शिरत होता.

वास्तवता (कथेंतली) : : वस्तुनिष्ठ विश्लेषण, घटनांची इत्थंभूत हकिकत दिली आहे, प्रखर वास्तविकता, नग्न सत्याचें दर्शन, झोंबरें चावरें सत्य दाखवून दिलें आहे, जीवनाचें हुबेहूब प्रतिबिंब, जगाची यथातथ्य कल्पना मिळते, प्रत्यक्ष जीवनाचे कवडसे, वस्तुस्थितीवर झगझगीत प्रकाश, जीवनाशीं निगडित, प्रत्ययकारी समाजदर्शन, जीवनाच्या अनेक अंगांचा परिचय, कांहींहि अतिरंजित नाहीं, जीवनाला स्पर्श करणारें लेखन,

समस्येची सोडवणूक वास्तव आहे, या कथांतून आकाराला आलेल्या व्यक्ति मानवी जगांतल्या आहेत, कथेला सत्यसृष्टींतील घटनांची बैठक आहे.

वास्तविक : : खरेंखुरें, हुबहू, यथावस्तु, आहे तसें, मुळाबरहुकूम, हुबेहूब, चेहरा तसाच चेहऱ्यावरील डागहि दाखवला आहे, दिवाणखाना व पायखाना चहूंकडे हिंडवलें आहे, जसें दिसलें तसें लिहिलें, येथें कसली वगळ नाहीं, आदर्शवादाला पुरी बगल दिली आहे, कॅमरा-जातीचें चित्रण, यांत तिळमात्र अतिशयोक्ति नाहीं, यथास्थित चित्रण, जें आहे तें यांत दिसतें, काळा रंग काळाच दिसतो; यांत पिवळा दिसत नाहीं, हुबेहूब प्रतिबिंब, हुबेहूब रेखाटन.

वांकडा : : वक्रगति, वक्र, तिढा, तिरपा, तिर्यक्, वक्राकार, वेडावांकडा, सर्पगति, नागमोडी, चक्राकार, वरखालीं, वाकलेला, आडमार्गी, वाममार्गी, तिरळा, तिरपगडा, तिरकस, खेकड्याच्या चालीचा, बुद्धिबळांतील घोड्याप्रमाणें जाणारा.

वांझ : : वंध्या, वांझोटी, निपुत्रिक, वैराण, नापीक, उजाड, निष्फल, निष्पत्तिहीन, अंगाखांद्यावर कसें कांहींच नाहीं ? सडीफटिंग, मूल ना बाळ, संसाराचा रिकामा देव्हारा.

विकार : : कामना, भावना, सहजप्रेरणा, पंचेंद्रियांची भूक, विषयेच्छा, इच्छा, मन-कामना, काम-क्रोधादि, इंद्रियेप्सा, विषय-लालसा, विकारांची तीट लागल्याशिवाय विचारांना शोभा नाहीं.

विकास : : वाढ, प्रसार, विस्तार, घडी बसणें, स्थैर्य येणें, उत्क्रान्ति, अंगापिंडानें भरणें, बाळसें धरणें, लागीं लागणें, वाल्याचा वाल्मीकि कसा झाला, न ओळखेल इतका बदल, प्रगतीच्या दिशेनें घोडदौड, कळीचें फूल होणें, बींचा वृक्ष वाढणें.

विघ्न : : अडथळा, प्रत्यवाय, अडसर, मध्यें आड आला, मध्यें लडबडला, बिब्बा घातला, मार्गांतली अडचण, नकटीच्या लग्नाला म्हणतात ना तशांतली गत.

विघ्नसंतोषी : : दुसऱ्याचें वांकडें पाहणारा, चालत्या गाड्याला खीळ घालणारा, दुधांत मिठाचा खडा, पायांत पाय घालणारा, दुसऱ्याचें वाईट

झालें कीं यांना बरें वाटतें, दुसऱ्यांच्या बुराईत यांची भलाई, नाऱ्या शुभ बोल तर म्हणे मांडवाला आग लागली, भरल्या पानावरून उठविणारा, दुसऱ्याच्या अन्नांत माती कालवील, दुसऱ्याच्या कामांत बिब्बा घालणारा, आपलें नाक कापून अपशकुन करणारा.

विचार : : मनन, चिंतन, कल्पना, तर्क, बुद्धीचे व्यापार, मनांत आलें, विचारांचा गाथा, विचारांची शृंखला–गुंफण प्रगल्भता, विचारांत गढलेला, गर्क, हें कार्य मेंदूच्या कुठल्या तरी कप्प्यांत चालू असतें, अंतर्मनाच्या कटाहामध्यें अनेक महत्त्वाचे विषय फुटाण्याप्रमाणें भाजले जात असतात.

विचारप्रवर्तक (लेख) : : आंधळ्या निष्ठेला तिलांजलि देईल, डोळ्यांत अंजन घालील, उद्बोधक वाटल्यावांचून राहणार नाहीं, दृष्टि फाकण्यास मदत होते, विद्यार्थ्यांमध्यें सुविचाराचें लोण पोंचवील, मनाला हंसवितो व अंतर्मुख करतो, उद्बोधक परिसंवादच! विचारांस खाद्य पुरवील, विविध माहितीनें नटलेला आणि बुद्धीची भूक भागविणारा, विविध विचार चमत्कारांचें नृत्यांगण बनलेल्या मेंदूतून उतरलेला, विचारसरणी आंखीव रेखीव व सूत्रबद्ध आहे, बौद्धिक खुराक दिला आहे, अशा लोखंडी विचारांचें चिलखत घालून लेखणी चालविली आहे.

विचारी : : चिंतनशील वृत्तीचा, विचारांचा पक्का, भावनात्मक तशीच विचारात्मक क्षुधा मोठी, बुद्धी चालवितो.

विजय : : जय मिळविणें, वरपगडा बसविणें, अजिंक्यपद मिळविणें, हार मानायला लावणें, विजयश्री पटकावणें, पादाक्रांत करणें, पायांखालीं तुडविणें, वर मान करणें, वर शेर होणें, आवर घालणें, सांखळींत ओढणें, मानेवर जू टाकणें, सर्व बाजूंनीं वाटा अडविणें.

विटाळसपण : : ऋतु आला, रजोदर्शन झालें, मुका मुलगा झाला, पाळी आली, मासिक ऋतुदर्शन, बाहेरची झाली, तांब्या उपडा झाला, मासिक पाळी, 'बैठा' सत्याग्रह, हक्काची सुट्टी, अस्पर्श झाली, बसली, मासिक धर्म, बंधारा फुटला, रजस्वला झाली, धरण फुटलें!

विटंबना : : टवाळी, हेटाळणी, फजा, अवहेलना, टेर, विडंबन, पाणउतारा, लाज निघाली, रस्त्यांतच धोतर ओढलें, वस्त्रहरण, लज्जाहरण, शोभा झाली, पावित्र्यास काळिमा आणला, सर्वांसमक्ष नागवणूक.

वितुष्ट : : तेढीचे संबंध, पटत नसे, परस्परांत वांकडें असे, एकमेकांस बरें पहात नसत, शत्रुत्व नसलें तरी वागण्यांत प्रेमळपणापेक्षां तुसडेपणाच, गोड गोष्टींचें वावडें, तुटक वर्तन, माझें नांव टाकलें, त्यांचे अतःपर आपण कोणी नव्हतच, त्याचें सुखदुःख आम्हांला कांहीं नाहीं.

विद्यार्थी (मंद) : : शिक्षकांना त्यांच्या मंद बुद्धीपुढें हार खावी लागली, शिकतो असा बोभाटा होण्यापुरती खांसाहेबांची गाण्याची शिकवणी, चार अक्षरें शिकण्याचा प्रयत्न करी, स्वोदर भरण्यास समर्थता यावी एवढ्याच हेतूनें, न झेपणारा अभ्यासक्रम त्याच्या डोक्यावरून जाई, त्याचा व गणिताचा छत्तिसाचा आंकडा, र ट फ करीत वाची, सामूहिक ज्ञान-वितरणांत भागीदारी करी इतकेंच, परीक्षकांशीं मतभेदाचे अनेकदां प्रसंग येत.

विद्यार्थी (वाह्यात) : : मास्तरांना किंवा प्राध्यापकांना भीक घालीत नाहींत, नतद्रष्ट मुलें, छडी लागे छम् छम् विद्या येई घम् घम् हाच नियम यांना लागू, नाठाळपणानें शिक्षेची धार बोथट बनवून टाकली, वाह्यात कार्टीं, टारगट पोरें, यापेक्षां ढोरें बरीं.

विद्वान् : : पंडित, ज्ञानी, विदुषी, बृहस्पति, अभ्यासक, विद्यापति, ज्ञानसिंधु, जाणकार, जाणते, ज्ञानसागर, ज्ञानोदधि, विद्याधन, बहुश्रुत, सर्वज्ञ, विदग्ध, ग्रंथमित्र, ज्ञानसम्राट्, वेदाभ्यासजड, विद्यावान्, वैदिक, सरस्वतीचे लाडके, दशग्रंथी पढिक, विद्यालंकृत, विद्याव्यासंगी, ज्ञानेश्वर, पाश्चात्त्य विद्यापारंगत, विद्यामृतानें अमर झालेले, ज्ञानोदधींत अवगाहन केलेले, विद्या घरीं पाणी भरते आहे, विद्या करतलामलवत् ज्यांच्याकडे आहे, सरस्वतीचा वरदहस्त, उच्चविद्याविभूषित, पढिक विद्वान.

ज्ञान-कुबेर, विज्ञान-महर्षि, विद्वत्-मेरुमणि, विशेषज्ञ, तज्ज्ञ, ज्ञाता, निष्णात, कसबी, कलानिधि, विद्यारत्न, माहीतगार, विद्वत्-शिरोमणि, विद्वद्रत्न, सुविद्य, प्रकाण्ड पंडित, ज्ञानोपासक, विद्यावाचस्पति, साक्षात् ब्रह्मदेवच, सरस्वतीपुत्र, ज्ञान-लोभी, ज्ञानदीप, विद्वत्कुलावतंस, विद्याभास्कर, चौदा विद्या चौसष्ट कलांत पारंगत, इंगित ओळखणारे, सरस्वतीचे निःसीम भक्त, विद्याचूडामणि, तंत्रकुशल, मर्मज्ञ, सभापंडित, राजपंडित, विद्यामहोदधि, विद्यालंकार, विद्या-विभूषण.

सर्व बारकावे जाणणारे, ज्ञानसिंधूंत मनसोक्त अवगाहन केलेले, पदवीनें विभूषित, सुसंस्कृत व बहुश्रुत, अनेक भाषा आत्मसात् केल्या, त्या विषयांतले प्रोफेसरच म्हणा ना ! अनेक विषयांत मज्जन केलेले, नाणावलेले शास्त्रज्ञ, अनेक तऱ्हेच्या सुरस चमत्कारिक माहितीचें पोतडें यांच्याकडे सदैव भरलेलें !

विद्वान् (निंदा) : : पर्यंकपडित, पंडितंमन्य, अरे तुझें हें सारें बोलणें चार फूट डोक्यावरून जातें आहे, पुस्तकी विद्या, युनिव्हर्सिटीचा × × वर शिक्का बसलेला मनुष्य, चुळकाभर ज्ञान मिळविलेले, बडे अरण्यपंडित, वेदाभ्यासजड, प्रत्येक विषयाचें चमचा चमचा ज्ञान, सर्व विषयांत खोली गुडघाभर, आकाशांतले तारे मोजणारे; यांना भुईवर काय चाललें आहे तें कसें कळणार ? पुढें पाठ मागें सपाट, पुस्तकांतला किडा, भाडोत्री विद्वान्, पोटाला चिमटा घेऊन ज्ञानाच्या कोरड्या ढेकरा देण्याचें व्रत घेतलेल्यांपैकीं एक, पोथी-भास्कर, विशी विद्या तिशी धन; दोन्ही सुमार.

विदुषी (निंदा) : : खंडीभर पुस्तकें वाचणारी, कॉलेजांत ज्ञानामृताचा रतीब घेणारी, बारीक ठशाचीं जाड जाड पुस्तकें वाचणारी, पट्टीची दशग्रंथी म्हणजे दहाच पुस्तकें वाचलेली ग्रॅज्युएट मुलगी.

विधवा : : गतधवा, बोडकी, पांढऱ्या कपाळाची, मागें आलेली, रंडकी, नवरा खाल्लेली, सौभाग्यहीना, अभागी स्त्री, बेवारशी माल, वाईट पायगुणाची स्त्री, कुंकू पुसलेली, पांढऱ्या पायाची सटवी.

विनयवृत्ति : : माझ्या अल्प बुद्धीला वाटतें, फोडिलें भांडार धन्याचा हा माल मी तो हमाल भारवाही, संतांचीं उच्छिष्टें बोलतों, समर्थांचा मी केवळ सेवक, एक अंक तो; आम्ही वरील शून्यें ! कोठें ते कोठें आम्ही ? कसचें काय कसचें काय, गरिबाघरची ही मीठभाकर, दासदासानुदास मी.

विनवणी : : आर्जवें, आवर्जून सांगतो, कळकळीची विनंति, दाढीला हात लावून विचारलें, टाहो फोडून उपदेश, हात जोडून विनंति, जीव तोडून दांताच्या कण्या करून सांगितलें, आर्जवी नम्र सुरांत सुचविलें, दादा-बाबा केलें.

विनायास : : सहजासहजीं, आयास न पडतां, आपोआप, कळीचें

सहज फूल व्हावें त्याप्रमाणें, फुकटच्या फाकट, गाड्याबरोबर नळ्याची यात्रा, विशेष श्रम न करतां, अनायासें, इकडचें तिकडे न व्हावें लागतां, पोटांतलें पाणी हालावें लागलें नाहीं, पायपीट न करतां, स्वतःला घाम गाळावा लागला नाहीं, हें फळ खुडतांना हातहि उंचवावा लागला नाहीं, बोला फुलाला गांठ पडावी तसें झालें.

विनाश : : चुराडा, विध्वंस, चुथडा, बींमोड, फडशा, गच्छन्ति, मातेरें, उच्छेद, सत्यनाश, निर्दाळण, घात, कंबक्ती, दामटी, वाटोळें, नायनाट, धूळधाण, इतिश्री, लोप, तुकडे होणें, भंग, सारेंच बोंबललेलें दिसलें, त्या त्या गोष्टींचा फडशा उडाला, दाणादाण झाली, चंदन उडालें, अनर्थ झाला, अपरिमित नुकसान पोहोंचलें, चिंधड्या उडाल्या, रसातळाला गेले, सत्यनाश झाला, वाटोळें झालें, कार्यांत बिघाड, समूळ नष्ट, समूळ उच्छेद, बारशाऐवजीं बारावें करण्याची वेळ आली, राख-रांगोळी झाली, चुथडा झाला, राव रंक एक झाले, नियतीनें सूड घेतला, कुत्र्याच्या मरणानें मेले, पापाचा घडा भरला, आसन डळमळलें, पाळेंमुळें खणून काढलीं गेलीं, सर्वच आटोपलें.

विनाश (केला) : : तुकडे तुकडे केले, एकच घांस केला, शतशः विदीर्ण केलें, चूर्ण केलें, फोडून तोडून टाकलें, चुराडा केला, फोडलें तोडलें भग्न केलें, भंगविलें, तडकविलें, राईएवढे तुकडे केले, तिळाएवढे भाग केले, भूस पाडलें, भुगा केला, फाडून चिंध्या केल्या, चिंधोट्या केल्या, खांडें केलीं, चिरफाड केली, रेवडी उडवली, तीन-तेरा केले.

कच्चूमर केलें, भरीत केलें, कांडांत काढलें, गिद्दी-गोळा केला, पीठ केलें, भरडलें, भाग भाग केले, होतें कीं नव्हतें करून टाकलें, खिळखिळें केलें, धांदोट्या उडवल्या, कपटे कपटे केले, मोडलें, चिरलें, कापाकापी केली, राख केली, समूळ नष्ट केलें, उखडलें, जमीनदोस्त केलें, खडे चारले, जमिनींत गाडलें, गाढवाचा नांगर फिरवला, चुरडलें, ठोकून काढलें, बडवलें.

पिंजलें, पिचलें, ठिकऱ्या उडवल्या, टरकावले, त्याची महायात्रा काढली, ठार केलें, स्वर्ग दाखविला, फुगवून फट्ट केलें, मार दिला, फोडून काढलें.

कुटलें, चेचलें, कढी पातळ केली, दे माय धरणी ठाय केलें, दळून काढलें, भाजून काढलें, वितळवलें, ठेंचलें, फोडून खापऱ्या केल्या, धिरडें केलें, पीठ पाडलें, खग्रास केलें, पायदळीं तुडविलें, आटवलें, मातीमोल केलें.

विनोद (चांगला) : : वाचीत असतां तोंडाचा सुरकुती मोडेल असें लिखाण, खमंग चुरचुरीत खुसखुशीत विनोद, विनोदाची रम्य आतषबाजी, लेखाला नर्म विनोदाची झालर लावली आहे, दिलखेचक रोचक थट्टा, विनोदाची पखरण, कडू चेहऱ्यांना विनोदाची बाळगोळी दिली आहे, हास्य-रसाची मेजवानी, मूर्तिमंत गंभीरतेला हंसविणारा विनोद, कोटीबाजपणा व विनोद याचा चमचमीत मसाला दाटून भरला आहे, मधाळ रसाळ व खट्याळ लेख, येथून तेथून श्लेषयुक्त व मार्मिक विनोदयुक्त, हास्यकारक घटनांनीं ओथंबलेली कथा, विनोदाचा झेप व पल्ला मोठा, यांची थट्टा हें दुःख झाकणारें वस्त्र आहे, जीवनांतील झोंबणारी विसंगति उघड करतात.

विनोद (वाईट) : : बेफाट बोचक इन्योद, यांत केवळ नक्कल विडंबन वांकुल्या टवाळी व टर आहे, तिखट खारट विनोद, हा विनोदी लेख वाचतांना माझ्या जुन्या फूटपट्टया कसोट्या आणि मोजमापें मला भिरकावून द्यावीं लागलीं, विनोदाच्या ठेकेदारांचा ही नवी कृति, विनोदाची वैतरणा वाहवली आहे, हें थट्टा-काव्य अश्लीलतेच्या सरहद्दीवर वारंवार फेरफटका करतें, शिमगा जाऊन उरलेलें हें कवित्व आहे.

खसखस पिकवणारें साहित्य, बोलून चालून हंसविण्यासाठीं लिहिलेलें, विनोदाचीं कारंजीं उभारलीं आहेत, शुद्ध हलकटपणा आहे; दुसरें काय ? हा विनोद वाचून तोंड कडू होतें, पोटफोड्या कोट्या, गटारगप्पा आणि कुचेष्टा यांच्या मिश्रणानें गढूळ झालेला हा विनोद वस्त्रगाळ करून घेतां घेतां नाकीं नव येतात.

विमनस्कता : : हें तिच्या गांवींहि नव्हतें, शून्यमनस्क बसलों, तिकडचें माझें लक्ष ढासळलें, मनाच्या पोकळींत पाकोळ्या उडूं लागल्या, भ्रमिष्टपणा जडला, मन ठिकाणावर नव्हतें, लोकांत वावरून त्यांच्यांत तो नसे, विषण्णता, चित्त सदाचें भरकटलेलें, अंतर्यामीं एक प्रकारचें रितेपण आलें.

विरस : : मन खट्टू झालें, रंगांत भंग, मजा गेली, रसभंग, दुधांत मिठाचा खडा पडला, अपशकुन झाला, आनंदावर विरजण पडलें, गम्मत गेली, उल्हासाला तडा गेला, हर्ष कोळपला, रंगाचा बेरंग झाला, स्वारस्य संपलें, त्यानें सर्व घाण केली, हिरमोड, उत्साहभंग.

विरह : : विना राहण्याचा प्रसंग, ताटातूट, नातें असून दूर दूर राहण्याची वेळ, गांठभेट नसल्यानें हुरहूर, पत्नीविरह–मासिक माहेरीं गेली असतां रागावून अबोला धरते तेव्हां व देवाघरीं जाते तेव्हां, क्वचित् देवळांत जाते तेव्हांचाहि–ईषत् दीर्घ प्रदीर्घ व कायमचा, लग्न व्हायच्या आधीं ब्रह्मचाऱ्याला विरह घडतो तो भावी पत्नीचा.

विरळा : : दुर्मिळ, फार करून नाहींच, बहुंशीं न मिळणारें, कुठें कुठें आणि केव्हां केव्हां लाभणारें, हुडकायलाच पाहिजे, उंबरांतलें फूल, हजारांत एक, कुठें तरी दिसेल इतकेंच, औषधाला मिळालें तर, क्वचित् आढळणारें, भांगेंत तुळस, अलम दुनियेंत साऱ्या जगांत हाताच्या बोटांवर मोजण्याइतकें, सटीसामाशीं यांचें दर्शन.

विरागी : : पंचविशींतहि विलासाचीं भरलीं ताटें उधळून देणारें मन, समाजविन्मुख व एकान्तप्रिय, निरभिलाष, संन्यस्त, सर्वसंगपरित्यागी, नि:संग, विषयास विटलेला, भोगविन्मुख, हव्यास संपले.

विरुद्ध टोकें : : एकाला हात दुसऱ्याला लाथ, आपला तो बाब्या दुसऱ्याचा तो कार्टा, नेसीन तर पैठणी नाहीं तर नागवी, उच्च वर्ग व क्षुद्र वर्ग, पुंजीपति व लंगोटीपति, एकाला मीठ-भाकर तर दुसऱ्याला श्रीखंडपुरी, हे स्वर्गांत ते नरकांत, याच्या हातीं सुवर्णपात्र त्याचे हातीं नरोटी, काया कोमल कर्म कठीण, खालीं मुंडी पाताळ धुंडी, उच्च आणि हुच्च लोक, पुंजीपति व झोळीवाले, सज्जन व दुर्जन, मजूर ते महाराजापर्यंत, शाळामास्तरांपासून गिरणीमालकांपर्यंत, कंगालापासून कुबेरापर्यंत, अवनति वा उन्नति, प्रगति कीं पुच्छगति, ते पुष्ट तर हे कृश, ते तुष्ट तर हे रुष्ट, रामराज्य कीं रावणराज्य.

विरोधून : : तरी पण, तसें असूनहि, तथापि, न जुमानतां, पर्वा न

करतां, ओलांडून, बाजूला ठेवून, दिक्कत न करतां, विरोधास न मानतां, मुलाहिजा न ठेवतां.

विलक्षण : : अपूर्व, आगळें, बिनतोड, अप्रतिम, नवीन, अभूतपूर्व, अनोखें, नेहमींच्या पेक्षां वेगळें, नव्याच घडीचें, अनुभवाच्या बाहेरचें, अतुल, अजोड, भिन्न चालीचें, फारच ! यासारखें हेंच, असा नमुना इतरत्र नाहीं, एकमेव, अपवादात्मक, नेहमींच्या मार्गांतला नव्हे, असाधारण, विशेष, लोकोत्तर, लोकविरुद्ध, आडमाप, स्वतंत्र, ना शेंडा ना बुडखा.

परदेशी तऱ्हा, हा रूढ प्रकार नव्हे, मुलुखावेगळा, विक्षिप्त, जगावेगळें, याची तऱ्हा वेगळीच, मुरारेः तृतीयः पंथः, वेगळ्याच छापाचें, पाहूं म्हणतां असें दुसरें सांपडायचें नाहीं, अति विचित्र, भलतेंच कांहीं, नाहीं तेंच, ठराविकाच्या बाहेर, लोकविलक्षण, दुर्लभ, अतर्क्य, अफाट, एक चूषच, पिंडच निराळा, पण तें पाणी वेगळेंच आहे, काय माणसें एक एक असतात !

विलासी : : दिलदार अंतःकरणाचा, चैनी, ऐषआरामी, आनंदी, उत्साही, रंगेल व रगेल, थट्टेखोर, गंमतीबाज, त्यागी नव्हे भोगी, रुद्राक्ष-संस्कृतीचा नव्हे द्राक्षसंस्कृतीचा, छानछोकी, शोकीन, थोडा चंगीभंगीच, सर्व भौतिक सुखें घेऊं इच्छिणारा, झकास बाबूराव.

विवाह : : लग्न-पाट लावला, वरलें, बोहल्यावर चढले, म्होतूर, पुनर्विवाह, आयुष्याचा जोडीदार निवडला, हातांत हात दिला, सप्तपदी झाली, गळ्यांत माळा घातल्या, लाडू खाऊं घातले, लग्न करून संसारी झाली, तिच्या कौमार्याचा स्टालिनग्रॅड अखेर पडला, परिणीत झाली, देवाब्राह्मणांच्या साक्षीनें वरली, एकदांची टाळी वाजली.

विविध : : विभिन्न, पृथक्, अनेक प्रकाराचें, हरतऱ्हांचें, नानाविध, भिन्न भिन्न, बहुरंगी, रंगीबेरंगी, वेगवेगळें, बहुविध, नाना, तऱ्हातऱ्हांचें, अनेकविध, वैविध्य, तऱ्हेवाईक, रीतिरीतींचे, चित्रविचित्र, बारा घरचीं बारा ! हजार तऱ्हांचे, नाना छापांचे—प्रकारचे, बहुरत्ना वसुंधरा, नाना रूपांची, वेगवेगळ्या धाटणीची, भिन्नभिन्न जातीचें, विविध प्रकारचे, अठरा धान्यांचें कडबोळें, नाना पंथ नाना मतें, भिन्नरुचिर्हि लोकः, पिंडेपिंडे मतिर्भिन्ना, व्यक्ति तितक्या प्रकृति याचा येथें अनुभव येतो,

प्रत्येकाची रीत–तऱ्हा–रंगछटा–मनोभूमि कांहीं वेगळीच, दर एकाचा ढंग अनोखा, भिन्न भिन्न स्वरूपाचीं, त्यांच्या तऱ्हा तऱ्हा किती म्हणून सांगूं ?

विवेचन (चांगलें) : : रोचक विवरण, प्रसंगोचित व समर्पक, लेखणीचें सव्यसाचित्व दिसतें, अभ्यासाला उपकारक, साधार व सप्रमाण चिकित्सा, मुद्द्यांची सांखळी कुशलतेनें जोडली आहे, स्वमताचें पद्धतशीर मंडन, साधक-बाधक मुद्द्यांचें विवरण, मुद्द्याला हात घातला, या गोष्टी परोपरीचे दाखले देऊन पटवून दिल्या, समस्यांची उकल, धांवता परिचय, सखोल विश्लेषण, तत्त्वमंडनांत कसूर नाहीं, ठाम प्रतिपादन, रेषाबंद व्याख्या केल्या आहेत.

आढावा घेतला आहे, दोन्ही मतांचा समन्वय, मौलिक माहिती, अनावश्यक तपशिलाचें भारूड नाहीं, अनवधानाच्या चुका नाहींत, मतें असंदिग्ध रीतीनें मांडलीं आहेत, तत्त्वांचा ऊहापोह अनदीं सुगम आणि संभाषणात्मक पद्धतीनें केला आहे, परिस्थिति विशाल व सूक्ष्म दृष्टीनें पाहून या विषयाचें ओझरतें दर्शन घडविलें आहे, मोजक्याच पण मार्मिक शब्दांत नीरस विषय मनोरंजक रीतीनें लिहिला आहे, सडेतोडपणें तितक्याच सहृदयतेनें, यानें टीकाकारांचीं तोंडें बंद होतील.

विश्वासघात : : तोंडघशीं पाडलें, फंदफितुरी व घात, आयत्या वेळीं माघार, दाखवावयाचे दांत वेगळे खायचे दांत वेगळे, विश्वास पानिपतमध्यें गारद झाला ! अचानक रंग बदलला, नूर फिरला, पायांत पाय घातला, परपक्षाला मिळाला, टोपी फिरविली, पगडी फिरविली, हा साप उलटला, साक्षींत फिरला, विश्वास दाखवून घोळविलें व अखेर फशीं पाडलें.

टांग मारली, मंडपांतून माघार घेतली, पडद्याआडून सुरुंग लावला, जेवायला बोलावून विष घातलें, भाषा मैत्रीची कृति शत्रूची, केसानें गळा कापला, आंतून फितला, शत्रूशीं संगनमत मित्राशीं द्रोह, आंतून वैऱ्याशीं सूत जमविलें; इकडे सर्वांना झुलत ठेवलें, हंसतां हंसतां दांत पाडले.

विशाल : : वितान, विस्तृत, जगड्व्याळ, उंचच उंच, नजर न पोहोंचेल एवढा, हत्तीएवढा, भीमकाय, राक्षसी, डोंगराएवढा, अजगरासमान, गाढा, जाडा, जाडजूड, लठ्ठंभारती, आडमाप, आकाशाला भिडणारा,

गगनचुंबी, डेरेदार, फोडला तर दोन होतील एवढा भलाभक्कम ! हातांत न मावेल एवढा, वेंगेंत राहणार नाहीं, गगनाला गवसणी घालणरा, हत्तीच्या सोंडेसारखा, लंबाचौडा, अति विशाल, अजस्र, महाकाय, भव्य, उत्तुंग, थोराड.

विशेषणांचा थारेपालट : : व्यवस्थित खोटें, चंद्रमौळी ज्ञान, खारट सल्ला, तुरट अनुभव, ढळढळीत लपवालपवी, बैलासारखी माजलेली बुद्धि, वांझोट्या सूचना, पांढरें असत्य, गोड नाचक्की, आंखूड-शिंगी सूचना.

लुसलुशीत तान, इवलेंसें बोलणें, जाडजूड मत, वाचाळ श्रोते, तोंडाळ व्याख्यान, गैर-टापटिपीचें वक्तृत्व, थुईथुई संगीत, घोषणांचे फूत्कार, लयबद्ध बोंबा, थाड थाड व्याख्यान, तोफांची बडबड, सुंसाट द्रव्ययाचना, घष्टपुष्ट दर, आकंठ धनलाभ, कोमट प्रकृतीचा, ईशभक्तीचें लचांड, अनुपम ओंगळपणा, भूमिगत भलेपणा, कीर्तीचें देहावसान, हेंगाडें सौंदर्य, गोंधळ-गात्री स्त्री, घसघशीत हास्य, मखमाली प्रेम, शुभ्र वचनें, निरभ्र गात्रें, शरिराचा तलम लोभसपणा, पुष्ट आणाभाका, तरणा तगडा उत्साह.

तडाखेबंद प्रेम, लालबुंद नखरा, घष्टपुष्ट धोका, चौदा कॅरट प्रेम, रवाळ स्मित, चिरकी ऐट, नखाएवढ्या कारकुनिणी, नवीन डिझाइनचा प्रियकर, लंबेचौडें हास्य, सौंदर्याची टंचाई, मंजुळ दृश्य, अवाच्या सवा प्रेम, भारी दराचें बोलणें, तांबारलेली लग्नाळू मुलगी, प्रेयसीचा फैसल्ला, तरुणींची कावकाव, मुळूमुळू हंसत, लाजण्या-मुरकण्याची चिखलफेक सुरू झाली, सोपी मुलगी, हेकेखोर गाडी, शान्त दान्त कोल्हे, आरोग्य-संपन्न झाडें, ठणठणीत प्रकृतीचे डोंगर, सह्याद्रीची उत्कृष्ट शरीरसंपदा, गुडुप्प सौंदर्य, सडाफटिंग डोंगर, बावनकशी ब्राह्मण, पुसट पुसट धुकें, क्षणभंगुर ग्लासें, अठरापगड खुर्च्या, रंगांची उधळमाधळ, जुनाट वळणाची गाडी, दिवाणखान्याची चट्टीपट्टी, पद्धतशीर अव्यवस्था, रूढिप्रिय कुत्रा, थोराड मोर्ती, उत्तंग नाक.

आकाशाला टाचलेला काळोख, तोटका पावसाळा, वारेमाप अन्न, धट्टीकट्टी भिंत, मूठमातीच काय ओंजळभर माती, लाल मागण्या, मऊ मऊ प्रकाश, निर्झरांच्या मंजुळ उड्या, परीटघडी सूर्योदय,

थट्टेखोर खिसेकापू, तेजःपुंज बोकड, नखरेबाज संत, बोलका रुपया, मंजुळ चेक, एकत्र शिवलेलीं विशेषणें, दर्जेदार शिव्या, चुळकाभर ज्ञान, अभिजात ओंगळपणा, गच्च विनोद, चकणा पक्षपात, बुरसटलेला विषय, परंपरेंत शिजलेली लेखणी, मेंदूंतील भगदाड, पावशेर अटी व शर्ती.

गढूळ चर्चा, भीमकाय लेखणी, तांबारलेली कोटी, मातट आनंद, शिव्या गुंफल्या, तिरकस टोका, उपमांचा बुजबुजाट, अखंड सौभाग्यवती लेखणी, नवकथांचे घड, अजस्र कौतुक, दाणेपार उद्गार, अष्टवक्र लेखन, गगनचुंबी अज्ञान, किडका सिद्धान्त, शरमाळू लेखणी, झिरझिरीत सत्य, फुटकळ यश, ठणठणीत आदरभाव, अनान्वित लिखाण केलें, धट्टेकट्टे विचार व दाणगट पेन.

विषम : : कमीअधिक, कांहीं लहान कांहीं मोठे, सरमिसळ, प्रत्येकाची तऱ्हा कांहीं वेगळी, विजोड, विषम-प्रकृति, हाताचीं सर्व बोटें कांहीं सारखीं नसतात, उजवें डावें राहायचेंच समाजांत, असम आहेत.

विषमता : : एक वर दुसरा खालीं, कांहीं हक्कधारी दुसरे गुलाम, उच्च वर्ण व हीन वर्ण, समाजांत कांहींना उच्च स्थान तर कांहीं पायदळीं, एकीकडे डोंगर नद्या व हिमाच्छादित डोंगरशिखरें तर दुसरीकडे गरम वाळवंटें व खोल दऱ्या, इकडे संपत्तीचा धूर तर तिकडे अन्नान्नता, लक्षाधीश व भिक्षाधीश, संपूर्ण कपडलेले टाय-टोपीसह कांहीं तर कांहीं उघडेनागडे, पुंजीपति व भिक्षापति, एका बाजूस, बेफाट श्रीमंती तर दुसऱ्या बाजूस केविलवाणें दारिद्र्य ! थोडा शिक्षित विभाग व मोठा अशिक्षित बहुजन-समाज, थोडे उच्चविद्याविभूषित तर आसपास सर्व निरक्षर, एका अंगाला संस्कृतीचा घाटमाथा तर दुसरीकडे अडाणीपणाची खोल दरी, सुष्ट व दुष्ट यांची सरमिसळ, धार्मिकांचा एक छोटा भाग तर बहुतेरा भाग पुंडांचा.

विस्तार : : प्रसार, प्रसरण, वाढ, वृद्धि, क्षेत्र रुंदावणें, भरदार होणें, फांद्या पसरणें, क्षेत्रफळवृद्धि, आकारमान वाढणें, लांबी-रुंदी मोठी होणें, वंशवृद्धि, विखरणें, हातपाय पसरणें, दशदिशा व्यापणें, भरती येणें.

विस्तारशः : : फुलवून, तपशीलवार, प्रदीर्घपणें, खुलवून, वाढवून, विशद करून, प्रशस्तपणें, चौरसपणें, सर्व बारकावे हेरून, खडान् खडा

विवरण करून, लांबण लावून, दीर्घसूत्रीपणानें, एकेकावर ग्रंथ केला! एकेक कृतीचा स्वतंत्र समाचार घेत, सर्व अंगोपांगें हिशेबांत घेऊन.

विस्तृत : : मोठा, व्यापक, प्रशस्त, विस्तीर्ण, ऐसपैस, चौफेर, चौरस, मोठ्या प्रमाणावर, विशाल, लांबरुंद, वाण मोठें, पसरलेला, हा मोठा! खूपखूप रुंद, क्षितिजापर्यंत जाणारा, प्रदीर्घ, लांबलचक, आडवातिडवा, नजर पोहोंचणार नाहीं इतका, रुंद बैठकीचा, वेंघेंत न मावेल इतका, वडासारखा, अचाट लांब, रुंदच रुंद, लांबच लांब, ज्यावर सूर्य कधींच मावळत नाहीं, मध्यें मैल अंतर पडेल, येथें चार पंक्ती उठतील, दोन हजारांची सभा भरेल, दोन लग्नकार्यें उरकतील, चार बंगले सहज उठावेत, प्रदक्षिणा करायला मैलभर चालावें लागेल, कोठें शेवट होतो तेंच कळत नाहीं, कुठल्या कुठें रुंद.

विस्मरण : : विस्मरणाची माती सुखदुःखाचा किती ओलावा जिरवील त्याला खरोखर मर्यादा नाहीं, लक्षांत म्हणून रहात नसे, आठवण बुजाली, हा बुद्धिसंचय हरवला, ध्यानांत राहीना, मनांतून गेलें, दुःखावर विस्मरण हाच तोडगा, येथें स्मृतिशृंखला तुटली, या गोष्टी विस्मृतिपंथास लागल्या आहेत, तीं रत्नजडित स्वप्नें त्या आठवणी एका खणांत कोंबून तिनें चावी फिरविली होती, स्मृतीचें रबर खूप ताणलें तरी या गोष्टी मनापुढें येईनात, हे विचार विस्मरणाच्या अडगळींत फेंकून दिले.

विक्षिप्त : : चक्कर, डोकेफिरू, तऱ्हेवाईक, लहरी, सनकी, तिरपाकडा, तिरकस, चक्रम, विलक्षण, उलट्या कवटीचा, चक्करछाप, विचित्र, कांहींच्या बाहीच वागणें.

वृत्तपत्र (वाईट) : : पानेंच्या पानें भाराभर जाहिरातींत अग्रलेखाची छोटी लंगोटी लावून मिरवणारे किंवा वेळप्रसंगीं तीही काढून ठेवणारे वृत्तपत्रलेखक हे साहित्यिकांच्या पंक्तींत केव्हां येऊन बसले ? हे छापावाले, कुडमुड्या वृत्तलेखकांनीं भाषा गुधडली, या वाङ्मयीन उचलेगिरीला काय म्हणावें ? मुद्रणस्वातंत्र्यावर घाला आला अशी फुकट ओरड, अंक ओढून काढला आहे, रांगडें लिखाण व त्रांगडे विचार भरलेले स्तंभ.

वेडसर : : अर्धवट, वेडापीर, खुळा, खुळचट, भ्रमिष्ट, चळ लागलेला, चळलेला, अर्धवेडा, वेडा, बुद्धिभ्रष्ट, ढिल्या स्क्रूचा, सदा शून्यमनस्क, डोक्यांतला स्क्रू निखळला आहे, सध्यां दगड मारूं लागला आहे, माथें फिरलेला, समजुतीच्या जगांत फारसा वावरत नाहीं, त्याच्या डोक्यांत एवढें ठसलें; बाकी सारा अंधार.

वेडेपणा : : जीर्ण चिंध्यांच्या गोधडीवर इस्त्री करण्याचा वेडेपणा कोण करील ? उंबराला जायफळ कां नाहीं हें विचारण्यासारखें.

वेश्या : : रखेली, राख, ठेवलेली बाई, अंगवस्त्र, पात्र, रक्षा, उपस्त्री, विसांव्याची जागा, रंडी, रांड, बाजारबसवी, वारांगना, पण्यांगना, नाटकशाळा, गणिका, कसबीण, बाजारी माल, वारयोषिता, मुरळी, भोगदासी, सर्वांची इच्छाराणी, अखंड सौभाग्यवती, देहविक्रीचें जीवन कंठणारी, साऱ्या गांवची उतारपेठ, शरिराचा बाजार मांडणारी, सौंदर्य बेचन करणारी.

वैतागणें : : कावणें, चिडणें, त्रासून जाणें, उद्वेग, चीड, नको जीव होणें, निराशेनें बेजार होणें, चिडाचिडें होणें, सहनशक्ति संपुष्टांत येणें, स्वकर्तृत्वावरचा भरंवसा जाणें, वर राग व आंत निराशा यांचा अंमल, पांचजन्य करा आतां ! हें मरण ओढवलें, कसचं काय नी कसचं काय ? येथें काय डोकें फोडून घेणार ? यापेक्षां नदींत जाऊन जीव द्यावा; नाहीं तर कड्यावरून उडी घ्यावी किंवा घ्यायला लावावी, हात टेकले तुमच्यापुढें; व डोकेंहि टेकलें, कर्म आमचें नी काय ! सगळेंच मुसळ केरांत, भस्माचे चार पट्टे ओढून हिमालय गांठावा यापेक्षां.

वैधव्य : : तिचें कुंकू पुसलें, तिच्या डोक्यावर पदर आला, कुंकवाचा धनी गेला, डोक्यावर आकाशींची कुऱ्हाड कोसळली, शेवटीं तिचें कपाळ फुटलें, रंडकी झाली, तिच्या ओठाशीं आलेला सुखाचा पेला खालीं पडला, विधवा झाली, बांगडी फुटली, मागें आली, कपाळ पांढरें झालें, घरीं परत आली.

वैफल्य : : आतां हरि हरि म्हणत बसणें, एवढा आटापिटा व खर्च व्यर्थ गेला, माझा उपाय खुंटला, जें जें होईल तें तें पहावें, निष्फळ धडपड,

कीं बसा हात चोळीत ! तें सर्व चुलींत गेलें, हात जोडून स्वस्थ बसावें, तो मार्ग मिटलाच म्हणायचा, ठेविलें अनंतें तैसेंचि रहावें.

वंश-गुण : : दुधाळ गाढवी कांहीं गाय होत नाहीं, कावळ्याचा शुभ्र माळा चढवून हंस होत नाहीं, माकडाचा आंघोळ गंधटिळा करून ब्राह्मण होत नाहीं, गोमट्या बीजाचींच फळें गोमटीं येतात.

शत्रुत्व : : तेढ, बेबनाव, वैमनस्य, गट्टी-फू, वैर, हाडवैर, वितुष्ट, मनांत आकस, द्वेष व अदावत असणें, न बनणें, दुश्मनी, वैरबुद्धि, विद्वेष, अहिनकुलवत् सख्य, भक्ष्य व भक्षक या दृष्टीनें एकमेकांकडे पाहणारे, गरुडाच्या कुशींत सापानें झोंपावें त्याप्रमाणें, विळ्याभोपळ्याइतकें सूत, विस्तव आणि पाणी यांची जोडी कधीं जमते का ! त्यांच्यांत तेढ आहे, पाण्यांत पाहतात, त्यांचें वांकडें आहे, शत्रू लेखतो, बरें पहात नाहीं, दांत आहे, परस्परांत मुळींच रहस्य नाहीं, माया पातळ झाली, शत्रुत्वाचें विष भिनलें, मनांत अढी धरली.

शत्रू : : द्वेष्टा, विरोधक, प्रतिस्पर्धी, दावेदार, दुष्मन, पाण्यांत पाहणारा, बरें न पाहणारा, अहितास टपलेला, दुष्टावा करणारा, विनाशेच्छू, हाडवैरी, उलट गटांतला, कट्टा–साता जन्मांचा वैरी, प्राणावर उठलेला, हित-शत्रु, खडतर वैरी.

शब्दनाणीं (नवीं) : : ही आमची इच्छा पडली साइडिंगला, धपापणारा ऊर, कॉलेजची रूपराणी, चित्रवाणी, भल्या पहांटे, गिरगांव रस्त्याला खोताची वाडी जराशी टांग मारते तिथें, चौदा कॅरट चहा, बर्फाळ उत्तर, भावनिक महत्त्व असलेली आंगठी, उन्नासिक वृत्तीनें, वाहता रस्ता, परीटघडी आयुष्य, डबाबंद सद्गुण, त्यांत मला रस नव्हता, तिचें मन पांगुळलें, डिट्टो तुझ्यासारखी, भीतीनें तिला मुठींत पकडलें, आडपेठेला मिळेल मिळाल्यास, प्राकृतिक दृश्य, सायकलची चिखलपट्टी, रेडिओची गुंडी हातानें फिरविली, नळाचे कान पिरगळले, ट्रां ट्रां ट्रां करून बेल दाबली, ट्रंक-वळकटीचें डिप्थांग, तत्त्व-शिथिल पुढारी, औंडक-चौंडक पसरलेले पाहुणे, सुट्टी पडली, सभ्य-गंभीर वातावरण, नूतन वर्ष यशंकर ठरो, ठोसदार आवाज, सफेद झूट, बांसी मौज, जिकडे तिकडे शुक झालें, मानडोली ओळख, ओठ-काडी.

शब्दप्रयोग (चांगले) : : सुयोग्य, लालित्यपूर्ण, अर्थवाही शब्द, वाचमर्थोनुधावति अशी स्थिति, मनोहारी शाब्दिक झटपट, शब्दांचा चपखल उपयोग, चपखल व लयबद्ध शब्दांची निवड, मंजुळ शब्दांची उधळण, शब्दांतील मृदुत्व किंवा काठिण्य समजून वापर, बिकट चालींत वेंचक शब्दांची ओवळण करून, रुचिर शब्दांचा वर्षाव, त्यांना सुंदर नखरेल शब्दांचा पेहराव चढवीत, घोटलेल्या शब्दांत महत्त्ववर्णन, शब्द-मौक्तिकांची मुक्तहस्त उधळण, शब्दांची सुडौल जडण-घडण, शब्दांची आशयगर्भता, अर्थगुरु शब्द ओंजळी भरून भरून देतात, अनाकलनीयतेपासून अलिप्त, भाषा-प्रभुत्वाचे द्योतक.

शरणागति : : पायीं लोळण घेणें, दांतीं तृण धरून शरण येणें, पराभव मान्य करणें, तिच्यापुढें मी शरण आहें, साष्टांग नमस्कार घालणें, पायीं पडणें, अभय मागणें, शरणचिठ्ठी दिली, पडतें घेणें, बसलों शंख करीत ! झाली एवढी शोभा बस्स झाली, आजपासून कोपरापासून हात जोडून नमस्कार, त्याच्यापुढें अगदीं हात टेकले, निशाण खालीं ! वठणीवर आली, दयेची भिक्षा मागितली, दंडवत घालून नाक घासावें लागलें.

श्रद्धा (उदाहरणें) : : देवाघरीं झाडा द्यावा लागेल, पाठीराखा परमेश्वर, निर्वाणीचा आधार, अल्ला यार है बेडा पार है, देव मोक्षाचें गांठोडें देईल असा भरंवसा, निर्बलाचें बल राम, निर्वाणीचा एक पांडुरंग, परंतु तेथें भगवन्ताचें अधिष्ठान पाहिजे, अनंत हस्तें कमलावरानें देतां किती घेशिल दो करानें ! केवळ नामस्मरणानें पातक्यांचा उद्धार होतो, जसा भाव तसा देव, देव कौल देईल त्याप्रमाणें वागावें, सत्यसंकल्पाचा दाता भगवान्, पाठीशीं परमेश्वर आहे, ईश्वराच्या सूत्राप्रमाणें ऋणानुबंध जडतात, सुखाची गुरुकिल्ली ईश्वराकडे, करावें तसें भरावें, या हाताचे झाडे त्या हाताला द्यावे लागतात.

श्रम (फुकटचे) : : ही फुकट फौजदारी, मला हा कारणाशिवाय धरमधक्का, मधल्यामधेंच मला निष्कारण तोशीस, रिकामे हेलपाटे, घोडी धांवे कामानें; शिंगरूं उगाच घोडीबरोबर त्यांतला प्रकार, रिकाम्या खटपटी, फुकटाफाकटी दगदग, हे लांडे कारभार ठरले, रिकाम्या उठाठेवी, नसत्या फंदांत पडलों वाटलें.

श्रमसाध्यता : : गातां गळा शिंपतां मळा, फिरे तो चरे, ठोठावल्यानें दार उघडतें, लक्ष्मी प्रयत्नसाध्य आहे, खपेल त्याचें शेत, केल्यानें होत आहे रे, घाम गाळील त्याचें आहे, श्रमगम्य, झिजे त्याला मिळे.

श्रीमंत : : खूप खूप-चिक्कार श्रीमंत, धनवान, पुंजीपति, थैलीशहा, कोट्यधीश, लक्षाधीश, लखपति, नवकोट नारायण, नवलाख्या, मातबर, पैसेवाला, धनी, लक्ष्मीपति, घरंदाज, कुबेर, धनाढ्य, घरचा संपन्न, डबोलेवाला, लक्ष्मीची ज्याच्यावर कृपा आहे, पैशाची ऊब असलेला, गर्भ-श्रीमंत, पैसे बाळगून आहे, ते तोंडांत सोन्याचा चमचा घेऊनच जन्मास आले ! पैसा गांठीला आहे, खल्वाटो निर्धनः क्वचित्.

श्रीमंती : : धनाढ्यता, धनसंपत्तीची विपुलता, ऐश्वर्य, गडगंज मालमत्ता–संपत्ति. गजान्त लक्ष्मी, अलोट धन, पैशाची ऊब, लक्ष्मीचा वरदहस्त, अमाप पैसा, कुबेरासारखी संपत्ति, नेहमींचें बिनघोर उत्पन्न, पैशाचा धूर निघतोय, पाटावरून ताटावर ताटावरून पाटावर अशी स्थिति, धनधान्य–सुखसंपत्ति यांची रेलचेल, उच्च राहणी, जीवनस्तर उंचावला आहे.

श्लेष–कोट्या–अनुप्रास : : बाहेरचे हेर, तडफदार डफ, दलांत बदल, गडावरील दगड, धरणावर रण, पुढले ढिले, गणवेशास प्रवेश, हे कारे फटकारे ? व्यवस्थेची अवस्था, रणांतील मरण, वळ केवळ राहिले, यमाला दुय्यम लेखा, अधिकच कच खातात, टिपटॉप टापटीप, ट्यूटरची टर, हिला पहिला नंबर, शैक्षणिक कार्याचें क्षणिक समाधान, फार फेरफार, एका क्षणाचें शिक्षण, साधनांचें धन, राठीचें मराठी, मत्त मतें, कला शिकला, वरमाय वरमते कसली ? नवरीपेक्षां डावरीच पसंत ! सौंदर्याचा दर्या, हा आनंदी नंदी, सून रुसून गेली.

या रंभेपासून प्रारंभ करा, जूनपणें लाजून, अनावर मनावर, रागावतेस तेव्हां गावतेस, रोगट गटातला, लवूं पण खुलवूं, भारी आभारी, ही काकू चकाकूं लागली, शीलाचा हा तपशील, सांवळा कावळा, लव्हेरियानें पछाडला, लोकमानसशास्त्र कीं कोकमानसशास्त्र, हा नट बाकीचे बोल्ट, भूदानवाला कीं भूदामवाला, सडासंमार्जन कीं ? जात नाहीं ती जात, हित माहीत, आशा ढळत असें आढळतें, ऐतिहासिक सिकनेस, नंतर ही तर, इतपत पत, विकासाची कास, नवी मानवी कृति, चुकून गळलें कीं वगळलें.

श्लेष–कोट्या (नांवावर) : : गुप्ते प्रकट झाला, कद्रुस्करांचा गोडबोले झाला, अमरसिंग मर गये, आनंदा वेड्यासारखा शोक करूं लागला, खेर यांची अखेर, कामतांचें मत, संत वसंत, गणपतीची पत, धनवान साधना, जनी व रजनी, प्रामाणिक माणिक, गुणी सगुणा, जयाचा पराजय, तारेसाठीं तारातारी, मंजिरी कीं मांजरी, नांवाची नाव.

शान्त : : शान्तदान्त, धीरगंभीर, थिल्लरपणाचा अवशेष नाहीं, अविचलित, राग ठाऊक नाहीं, शांतिसागर, कधींच वलवल नाहीं, कधीं न भडकणारा, प्रशान्त सागराप्रमाणें, याला कोणी रागावलेला पाहिला नाही.

शान्तता : : शान्ति, स्तब्धता, निर्विकल्पता, स्वनविहीनता, नि स्तब्धता, नीरवता, निःस्पंदता, नादहीनता, हालचाली बंद, गडबडविरहित जीवन, आरडाओरडा नाहीं, कोणताहि विक्षेप नाहीं, चलबिचल नाहीं, कसलीहि गडबड कटकट नाहीं, आपलाच श्वास आपल्याला ऐकूं येईल ! शान्तता म्हणजे शान्तताच ! स्पंदनहीन जग, निर्निनाद स्थिति. अहो शांतता म्हणून काय विचारावी ? सर्व चिडिचिप्प, कोठें खुट्ट झालें तरी कळेल, सर्व कांहीं एकदम गप्प, कोठें पों पों नाहीं टें टें नाहीं व ख्यँहाँ ख्यँहाँ पण नाहीं.

शांतताप्रिय : : सर्व प्रश्न तापलेल्या डोक्यानें सोडविले पाहिजेत हें मला मान्य नाहीं, जरा डोकें थंड ठेवावें, डोकें भडकूं देत नाहींत, धर्मराजाचे अनुयायी, विश्वशांतीचे उद्गाते, शांतिवीर.

शास्त्रीय दृष्टि : : विषय तात्त्विक मूलग्राही व पद्धतशीर रीतीनें अभ्यासण्याची इच्छा, अभ्यासविषयाची व्याख्या करून गुणधर्म ओळखून व्याप्ति समजून घेऊन सिद्धान्त बनविण्याची तयारी व पुढें संशोधन करून त्यांत फेरफार करण्यास मागेंपुढें न पाहणें, निरपवाद निश्चित नियमांचें ज्ञान करून घेण्याची खटपट, शास्त्रज्ञ व्यक्तिनिरपेक्ष अभ्यासाची पद्धत स्वीकारतो, शास्त्रीय दृष्टींत ज्ञान हा प्रधान हेतु असावा लागतो.

त्रिकालाबाधित सत्यांचे बुद्धिपुरस्सर आकलन करण्याची येथें धडपड असते, शास्त्रदृष्टि विचाराधिष्ठित असते, विकार-विरहित मूल्यशोधन सत्य-शोधन व घटक-शोधन शास्त्रीय दृष्टीचा मनुष्य करीत असतो; शास्त्रज्ञ व कलावन्त यांतील फरक हा असा आहे.

शिकविणें : : मर्म समजावणें, मख्खी उघड करणें, ज्ञानदीप उजळणें, पढविणें, पाठ देणें, ठसविणें, धडे देणें, ज्ञान देणें, तालीम घेणें, विद्यादान, शिक्षण देणें, विशद करून सांगणें, मार्ग दाखविणें, कुतूहल शमविणें, माहिती पुरविणें, कसें करावें तें सांगणें, ज्ञानभांडार खुलें करणें, श्रीगणेशा करून देणें, विद्येचीं दालनें खुलीं करणें, जिज्ञासा शमवणें, ज्ञानपिपासा मिटविणें, तपशील पुरविणें, विद्याप्रांतांत प्रवेश देणें.

शिकविणें (निंदा) : : पंतोजीगिरी, मास्तरकी, शेळ्या हांकण्याचा हा उद्योग ! केवळ गुरें ढोलवणें होय, मुलें कसलीं गुरें-ढोरें वळण्यानें काम, सारखें हल्या हल्या करावें लागतें, शिष्ट आले कीं त्या निमित्तानें यांनीं अनाध्याय आचरायचा.

शिकविणें (व्यर्थ) : : व्यर्थ उरस्फोड, कार्नीकपाळीं ओरडणें, उगाच माथेपच्ची व घसेफोड, निरर्थक टाळकेफोड, विषयाचा वासहि विद्यार्थ्यास लागत नाहीं, हा ग्रंथ या मुलांच्या डोक्यांत घालण्याचा मी सारखा प्रयत्न करतों आहें; पण पालथ्या घड्यावरील पाण्याप्रमाणें.

शिकाऊ वय : : ओलें झाड लववावें तसें लवतें, ओल्या मडक्याचा कांठ लववावा तसा लवतो, ८ ते १६ दरम्यानचा काळ, मेंदू कोंवळा पण संस्कारक्षम असतांना, मतें फुटायच्या अगोदर, कान लांब होऊं लागायच्या आधीं, ज्या वयांत बुद्धीला धुमारे फुटत असतात, शाळकरू वय, या वेळीं मन टिपकागदासारखें असतें; बटर पेपर सारखें नसतें, अजून पोंच यावयाचा असतो, समजायचें वय हें; उमजायचें पुढें असतें

शिव्या : : ढोंगी, धर्मच्युत, नतद्रष्ट, करंटा, खुनशी, गांवगुंड, बेरड, कावळा, लांडगा, संधिसाधू, पाजी, हलकट, भोंदू, नीच, हीन, नाटकी, छाकटा, टवाळ, बजरबट्टू, वृद्ध कपि, इरसाल, इब्लिस, लोचट, शेंदऱ्या दगड, स्वार्थी, स्वार्थान्ध, कर्तव्य-पराङ्मुख, अधम, निमकहराम, नाग, बोंथट काळजाचा, उद्दाम, हेकट, अप्पलपोटा, डामरट, सडक्या मेंदूचा, बाजारू, दुर्वृत्त, सभाबाज, चांडाळ, रानटी, सोदा.

शिवीगाळ : : अपशब्द, पितर उद्धरले, बेचाळीस पिढ्यांचा उद्धार झाला, आईवडिलांवरून शिव्या दिल्या, पशुसृष्टि व मानवसृष्टि यांचे परस्पर-

संबंध स्पष्ट केले, चार ठेवणींतल्या हासडल्या, लाखोली वाहिली, ग्राम्य–अर्वाच्य शेलक्या शिव्यांचा अहेर केला, आधीं शिव्या मोजतात, त्याच्या तोंडाला कुत्रें बांधलेलें आहे.

शिस्त : : सर्व कांहीं टीपेंत व रेषेंत, लष्करी थाटांत संचलन व ऊठबसहि, लयबद्ध हालचाल, पद्धतशीर वागणूक, सुतासारखे सरळ, वागण्यांत शिस्तवार, कोठें हूं कीं चूं नाहीं, यंत्रवत् ये–जा.

शिळेपणा : : नव्या काव्य-कल्पनांना जुन्या उपमा उत्प्रेक्षांची ही जुनी मेघडंबरी, बासी मौज, नवेपण उडालेलें, कालच्या बटाट्याच्या भाजीचा शेष तो आजचा बटाटेवडा हाच प्रकार, ताजगी गेलेली.

शिक्षक : : गुरुजी, ट्रेनर, मास्तर, तयारी करून घेणारा, रिंग-मास्तर, कोच, प्रेषित, धर्मगुरु, तात्यापंतोजी, पाठ–धडे देणारा, दीक्षा देणारा, कित्ता ठेवणारा, मार्गदर्शक, ओनामा शिकविणारा, वस्ताद, गुरु, कसब पढविणारा, विद्यादाता, बुद्धीला वळण लावणारा, परात्परगुरु, अध्यापक, प्राध्यापक, गुरुवर्य, मर्म सांगणारा.

शिक्षक (स्तुति) : : हातीं आलेलें प्रत्येक पोरटें घासून पुसून जगांत पाठविणारा, ज्ञानदाता, अनेक पणत्या उजळणारा हा नंदादीप, दिव्यानें दिवा लावावा त्याप्रमाणें ज्ञानप्रसार करणारा, आयुष्याला आकार देतो, यांना कच्चें मडकें कोणतें व पक्कें मडकें कोणतें याचा तेव्हांच नेमका अंदाज येई, वाखाणण्यासारखी शिस्त व नेमस्त वागणूक, अवगत असलेली सारी विद्या देण्यास उत्सुक.

शिक्षक (निंदा) : : मारकुट्या मास्तर, यापेक्षां गुरें ढोलवणारा बरा, चार शिकवण्या ठोकतात, विहिरींत नाहीं तर पोहोण्यांत कुठून येणार ? यांचें इंग्रजी तर्खडकरांच्या तिन्ही पुस्तकांना टेकून उभें राहिलेलें, ' मासे मासे तरति इति मास्तरः ' क्लासवाले, विद्यादानाचे ठेकेदार, मास्तरडा.

शिक्षण (फोल) : : पुस्तकी विद्या, पोटभरू शिक्षण, असें शिक्षण काय जाळायचें आहे ? शिकून काय उजेड पाडणार आहांत ? खालावलेला शिक्षण-दर्जा पहा, डिग्रीची बांधली शिदोरी पुरत नाहीं, या शिक्षणानें मनाची फक्त नांगरट होते; बीजारोपण होत नाहीं.

शिक्षित : : ज्ञानवृद्ध, उच्चविद्याविभूषित, विद्यावृद्ध, विद्वान, चार अक्षरें शिकलेले, कांहीं विद्या पढली असे, सुविद्य, शाळा-कॉलेजांतून बाहेर पडलेले, परीक्षेच्या मांडयाखालून आलेले, लिहिणें-वाचणें येणार, जे निरक्षर नव्हत, विद्याव्यासंगी, पुस्तकांची तोंडओळख झालेले, शास्त्रज्ञ, शास्त्रपारंगत, पोथ्या-पुराणें नवी किंवा जुनी वाचलेले, युनिव्हर्सिटीचा शिक्का असलेले.

शिंकला : : ठसाठसा शिंकला, या त्यांच्या विचारांतहि दोन शिंकांनीं विरामचिन्हें टाकलीं, ओछ्छ् केलें, शंका काढली, अपशकुन केला.

शुद्ध : : विशुद्ध, भेसळविरहित, पवित्र, निखालस खरें, अस्सल, बावनकशी, शंभर नंबरी, गाळीव, अकलंकित, सोज्वळ, चोख, साफ, नितळ, साजूक, कोरें, पावन, बिनभेसळीचें, आरोग्यकर, बिनचूक, सदाचारयुक्त.

शुष्क : : कोरडा, रसहीन, सुकलेला, वाळलेला, जलहीन, सुखट, व्यर्थ, निरर्थक, फुकट.

शेवट : : अन्त, अखेर, इतिश्री, निकाल, सोक्षमोक्ष, पूर्णविराम, फलश्रुति, परिणति, टोंक, शेवटलें पान, उपसंहार, अखेरची घटका–पडदा–टप्पा–परिसीमा, टर्मिनस, अंतिम प्रकरण, ज्ञ अखेर पोहोंचलों, शेवटचा रामराम, पडदा पडला, खेळ खलास, वंदे मातरम् झालें, पांचवा अंक संपला, या जन्मांत ही गोष्ट पुन्हां नाहीं.

शैली : : लेखनपद्धति, शब्दरचना, भाषासौष्ठव, विचारव्यक्ति, भाषाभिव्यक्ति, लिहिण्याचा तरीका कल्पनांची मांडणी, लेखनकौशल्य, लेखनलाघव, लेखणीचें चापल्य, रचना-कौशल्य, सहजसुंदर भाषारमणीचे विलास, लेखणीचें शरसंधान–पटुत्व–सव्यसाचित्व, लेखणीचा टोकदारपणा.

शैली (तपशील) : : शब्दांची जुळवणी–गुंफण–आतषबाजी–घडण–जडण–रंगरंगोटी, शब्दसुमनांचा वापर, शब्दमौक्तिकांची उधळण, नाजूक शब्दांची पखरण, शब्दांचा डौल–चपखल–परखड उपयोग–नोकझोक, शाब्दिक कलाकुसर–गोळागोळी–कसरत–टोले, शब्दलालित्य, शब्दांत जोश, वाग्बाणांच्या फैरी, लक्ष्यवेधी वाग्बाण, वाक्प्रयोगांचा सुयोग्य उपयोग

सूचक जरतारीपणा, ध्वन्यर्थवाही प्रयोग, बांधेसूद वाक्यें, वाक्यावाक्यांतील ठसका व हिसका, प्रवाही वाक्यें, बोलवाक्यांचा उपयोग.

अर्थाचा पुष्टपणा, अर्थगर्भता, विशेषणांची अर्थवाहकता, ध्वन्यनुसारी अर्थ व अर्थानुसारी स्वररचना, मांडणींतील अभिनिवेश, छेदकांची घडण, मुद्यांची सांखळी, तर्कशुद्धता, क्लिष्टतेचा अभाव, मांडणींतील चिरेबंदी पक्केपणा, रचनेचा सघनपणा, मुद्देसूद मांडणी, काव्यालंकारजडित वाक्यें, उपमांचा चमकदारपणा, उत्प्रेक्षादिकांचा उपयोग, तलम कल्पना, वैचारिकतेस आव्हान, तर्कशुद्ध विचारसरणी, विचारांची दाटी, तेजःपुंज विचार, विचारांची नाजूक अभिव्यक्ति, बौद्धिक डावपेचांचें प्रदर्शन, व्यक्तिरेखांतील अचूकपणा.

सहजगम्य प्रांजलपणा, प्रतिभेची सृजनशीलता, कसला घोळ नाहीं, विचार व अभिव्यक्ति यांचा तोल व मेळ, रोखठोक सवाल, धोपटमार्गी लेखणी, भावनांचा उद्रेक, भावुकपणाची झांक, स्वानुभवाचा ठसा, कल्पना-चित्रांची रंजकता, गगनविहारी कल्पकता, कल्पनाची भरारी व उंची.

शैली (चांगली) : : सुबोध व अस्सल मराठी लेखनशैली, प्रवाही व प्रभावी आहे, भाषा भरघोस व वाक्यें पल्लेदार असतात, रचनेचें चातुर्य, प्रसन्न शैली, कथा रंगवून सांगतात, सहज-मनोहर शैली, सुलभ व चटकदार भाषा, लिहिण्याची गोड धाटणी, संपन्न शैली, एकटाकी लिखाण, लिहिण्यास खोली तितकीच रुंदी, भाषेची जडण-घडण साधी-सुधी, सरस व सुरस, कमावलेली भाषा, भाषामार्दव व आशयाची सघनता यांचा मुलायम मिलाफ, त्यांत सहजता व निष्कपटता आहे, अनुभविक लेखणी, त्यांचें सर्व कांहीं दर्जेदार असतें, सरळ साधें प्रवाही अर्थवाही लिखाण, चिरेबंद शैली, अजब हातोटी, अभिजात कसब.

शैली (दोष) : : सत्याची पद्धतशीर उपेक्षा, वस्तुस्थितीपासून पराङ्मुखता, भावनात्मक दृष्टिकोण यांत डोकावूं पाहतोय.

टीका : : टीकेचे बोथट बाण अस्थानीं फेकले आहेत, पोकळ तरफदारी, अयोग्य टीका, निष्कारण आग पाखडली आहे, कल्पनांचा धिंगाणा, कल्पनेची शब्दांवर बळजबरी, भिकार परानुकरण, या लिंपालिंपीचा काय उपयोग ? दुसऱ्यावर मतें लादण्याची खोड, प्रचाराचें कंकण हातीं बांधून

लिहिलेलें, स्पष्टोक्तीचा अभाव, आशय शैलींत गुदमरून जातो, लेखन बटबटींत कृत्रिम व उथळ, वृथा काथ्याकूट, बेचव पुनरुक्ति, कंटाळवाणा तोचतोचपणा, शब्द-बंबाळ शैली, हेंगाडी बोजड भाषा, शाब्दिक गारूड, मोडके शब्द किडकी वाक्यें, शब्दांची कसरत, एकावर एक शब्दांच्या उतरंडी रचल्या आहेत, येथें वेठ मारली आहे, ढिसूळ वाक्यें, भाषेचे अनेक खून केले आहेत हेंगाड्या उपमा, आचरट अतिशयोक्ति, रांगडा साजशृंगार, विनोदाची सस्ती पाणपोई, हा विनोदी लेख वाचून हंसावें कीं रडावें कोठें तेंच कळत नाहीं ! हे लेखक बरें-वाईट सर्व कांही सांगत सुटले आहेत, लांबलचक नामावळ्या, जरासें लांबण लावून सांगतात, अप्रासंगिक पाल्हाळ, कांहीं पानांचें भूस पाडावें तेव्हां अर्थाचे किंवा मुद्याचे कांहीं दाणे हातीं लागतात.

शोक : : ती शोकसागरांत गर्क झाली. शोकविव्हल, मनांतल्या विस्कटलेल्या विचारांना विंचरीत बसे, आपल्याच दुःखी अंतःकरणाचे पडसाद बाहेर जगांत दिसत, तब्येत लागत नसे, मनाची ही निरगांठ उकलेना, मनच मेलें, जाणीव बधिरली, दुःख उगाळीत बसे, त्याचा चेहरा खाडकन् उतरला, दुःखमिश्रित गांभीर्याचें जड पटल, जागच्या जागीं खिळल्यासारखा उभा राहिला, अति झालें हंसूं आलें, सुतकी चेहऱ्यानें, विषण्णता मन झाकळून टाकी, मनांतील आनंदाचें खोबरें झालें, रंजीस आले, अलीकडे बरींच वर्षें तिचें बोलणें-हंसणें इतिहासजमा झालें होतें, दुःख हा मनाचा स्थायीभाव होऊन बसला आहे.

शंकनीय : : हीं विधानें शंकेपलीकडचीं आहेत असें नाहीं, ही गोष्ट तपासून पाहण्यासारखी आहे, कांहीं तरी भूमिकेची गल्लत वाटते, या परस्पर-विरोधी गोष्टींचा मेळ घालणें कठीण आहे, हें वाक्य चिंतनीय आहे, विवाद्य विधानें.

सकाळ : : प्रभात, पहांट, सुप्रभात, अरुणोदयाची वेळ, तांबडें फुटलें तेव्हां, झुंजूमुंजू झालें, उजाडलें, कोंबडा आरवला तेव्हां, पानपटीं, दिवस उगवला, सूर्योदयाचे वेळीं, हंसरी पहांट, भल्या पहांटेस, पहांट डोकावूं लागली, पूर्व दिशेस फटफटूं लागलें होतें, दिशा उजळूं लागल्या, नुकतें पूर्व

दिशेस तांबडें फुटलें होतें, उजाडायला आतां कांहीं शिंगें नाहींत, रात्रीचा काळोख निवळत चालला होता, तोंच फटफटीत उजाडेल, उजेड आला, अंधार मावळला, दिशा फाकायच्या आंत.

सच्चरित : : बुद्धिवैभवाला चारित्र्याची जोड, सदाचार, सद्वर्तन, धोपटमार्गानें जाणें, वाममार्गापासून दूर, पापभीरुता, सरळमार्गी, कोणाच्या अध्यांत ना मध्यांत ! चारित्र्य-संपन्नता, शीलवान, चारित्र्य हेंच त्याचें धन, सरळसोट, आडव्यांत न शिरणारा, अपापकृत्, इमानाची मीठभाकर खाणें, कोणाचा घातपात न करणें, मनांतहि वाईट न चिंतणें, धुतल्या तांदळासारखें जीवन, पुण्यकर्मांत जन्म व्यतीत केला, नांव ठेवायला जागा नाहीं, निर्दोष आचार, निष्कलंक आयुष्य, वर्तनांत कोठें बोट ठेवायला जागा नाहीं.

सच्चा : : खरा, खराखुरा, प्रामाणिक, वचनाला जागणारा, दुसरा हरिश्चंद्र किंवा धर्मराजा, खोटें करणार नाहीं, एकवचनी, शब्दाला जागणारा, बनावट नाहीं, खरें नाणें, बनावटपणाचा अंश नाहीं, सत्याचा वाली, सत्यप्रिय, सत्यवादी, सत्यब्रुव, सत्य ब्रीदवाक्य असणारा, वचनाचा धड, आंतबाहेर नाहीं, सार्वजनिक बाबतींत परीटघडीसारखे, शंभर नंबरी सोनें चौदा कॅरट नव्हे, ते विक्षिप्त असतील पण अप्रामाणिक खासच नव्हते, दांभिकपणाची मनस्वी चीड.

सज्जन : : मोठा गोड माणूस, देवमाणूस, लाख माणूस, संत, जणूं गंगाजळ, चांगल्या वळणाचा, सभ्य चालीचा, निकोप चित्तप्रकृतीचा, चारित्र्यसंपन्न, सभ्य, कुलीन, कुलवंत, बाळबोध वळणाचा, सुसंस्कृत, सदाचारी, धर्मात्मा, साक्षात् धर्म, कासोट्याचें तीर्थ घ्यावें असा.

समाईक (हितसंबंध) : : परस्परावलंबित्व, एकमेकांचे गुंतलेले हितसंबंध, याचा जोर त्याला त्याचा याला, साटेंलोटें आहे, एका झाडाच्या या दोन फांद्या खोड एकच, फायद्या-तोट्यांत उभयतांची भागीदारी आहे, याला हवें व इष्ट तेंच त्यालाहि, ताटांत काय वाटींत काय ! वळलेल्या दोन धाग्यांचें हें सूत आहे, दोघांचेंहि हित एकाच गोष्टींत, दोन शेंड्यांचें पण एकच बुडख्याचें हें झाड आहे, तुझें माझें जमेना तुझ्यावांचून चालेना, एकाच नावेंत दोघे, एका आळ्याचीं हीं दोन पाखीं, एकाला हात लावला

तर दुसरें कोलमडेल, त्यांची फिफ्टी फिफ्टी पाती आहे, फायद्याची रक्कम एकाच पेटींत पडते व त्याच्या चाव्या दोघांच्याकडे आहेत, त्याला बुडवून याचें चालणार नाहीं.

सत्तान्तर : : सत्ताप्रदान, राज्यक्रान्ति, अधिकारक्रान्ति, सत्तासंक्रमण, अधिकार देऊन टाकले, लगाम दुसऱ्याच्या हातीं दिले, अधिकारसूत्रें हवालीं केलीं, तिजोरीच्या किल्ल्या हातीं दिल्या, दुसऱ्याचा झेंडा तेथें फडकूं लागला, दारावर दुसऱ्याचा पहारा आला, अधिकार-केंद्र बदललें, नियंत्रणें करणारे व जाब विचारणारे दुसरे आले, मालमत्तेचा ताबा दिला, करणें न करणें वेगळे लोक ठरवूं लागले, घडी बदलली, सह्यांचे कागद दुसऱ्यांकडे जाऊं लागले, शिट्टी वाजवून खेळ थांबविणें किंवा सुरू करणें दुसऱ्याकडे गेलें.

सत्य : : जें आहे तेंच, खरी गोष्ट, वस्तुस्थिति, यांत लपंडाव नाहीं, डोळ्यांनीं पाहिलें तसें, यांत बनवाबनवी नाहीं, हें बेगडी नव्हे, निर्भेळ सोलीव सत्य, शंभर टक्के खरें, अंतिम सत्य, खऱ्याला मरण नाहीं, सत्य त्रिकालाबाधित राहतें, अबाधित सिद्धान्त, सत्यदर्शनाचे भुकेले सत्यदर्शनानेंच निवतात, सत्यान्वेषण हा शास्त्राचा पाया होय.

सत्यापलाप : : हें सांगणें त्यांना गैरसोईचें वाटतें, त्यांना गैरसोईच्या वाटतील अशा पुष्कळच गोष्टी मला प्रकाशांत आणतां येतील, घोटाळ्याचा ब्रह्मघोटाळा केला आहे, तर्क व सुसगति यांना मूठमाती देऊन, हें दाखविण्यासाठीं बरीच सर्कस चालू आहे, मखलाशी केली आहे, खोटी संपादणी, सत्याचें प्रमाण माफक आहे.

सती : : सती-सावित्री, शापभ्रष्ट देवता, गडकऱ्यांची सिंधु, पतिपरायण, सीतामाई, वटसावित्री, पवित्र गंगाजल, आर्य स्त्री, कुलस्त्री, नारीरत्न, कुलभूषण, महान् सती, पतिनिष्ठ, स्वकुलतारक सुता, पतीबरोबर सहगमन करीत नाहीं इतकेंच ! कल्पनेंतहि परपुरुष न इच्छिणारी, जिचा पती हाच आत्मा व दैवत, हिंदू पावित्र्याचा नमुना– आदर्श, रुद्राक्षसंस्कृतीचा अर्क, स्त्रीविशुद्धतेचा परम चरण, तारा मंदोदरी सीता वगैरे पंच स्त्रीरत्नांपैकीं एक, तिला वेगळें मनच नाहीं, नवऱ्याचें हित तेंच तिचें हित, पतीविरुद्ध ब्र काढणार नाहीं मग तो कसा का असेना ! नवऱ्यांत स्वत्व लोप पावलेली, सोज्वळ साध्वी पत्नी.

सनातनी : : कुजट शिळापाका जुन्या छापाचा माणूस, चालूंतून गेलेला, जुनाट वळणाचा, पुराणप्रिय बुजुर्ग, जुनें तें सोनें या परंपरेंत शिजलेला बुरसटलेला पुराणपुरुष, जुन्या कित्याबरहुकूम चालणारा, जुन्या जमान्याचा प्रेमी, जुन्या आचारास चिकटणारा, परंपरेचा आधारस्तंभ, पुराण तें साधु मानणारा, यांना बापजाद्यांचा धर्मच प्रिय, यांना पूर्वींची घडी व पुरातन परंपरा आकर्षिते.

सफाई : : स्वच्छता, टापटीप, नीटनेटकेपणा आणणें, गाळ चिखल घाण गदळ डाग मळ कचरा कोळिष्टकें दगडगोटा शेणमाती धूळ गंज किटण ओशटपणा झटकणें वा काढून टाकणें, गलिच्छपणा दूर करणें, झाडू मारणें, केरसुणी–झटकणी फिरविणें, झाड-सफाई, केरवारा, झाडझूड, घासून स्वच्छ करणें, पॉलिश देणें, विसळणें, घाण खरवडणें, बेणणें, पुसून घेणें, धुणें, निवडणें, पाखडणें, ब्रश मारणें, कुंचलणें.

सभ्यता : : सद्वर्तन, चांगली चालचलणूक, सुविचार व सदाचार, सरळ-वळण, सदाशिव-पेठी, घरंदाज,प्रतिष्ठित कुटुंबवत्सल अशांची जीवनरीति, समाजांत कांहीं एक स्थान आहे अशांची वागणूक, परीटघडी जीवन, धर्माचरण करणाऱ्या लोकांची राहणी व विचारसरणी, एकदम जंटलमन् समाज, चोरी-चहाडी-शिंदळकी यांपासून आलिप्त लोक, डबल-वॉश कपडे वापरणारे व वृत्तपत्र वाचणारे, बोलाय-चालायला गोड व पोषाखी मंडळी, कांहीं लाजलज्जा आहे असे, खोटेंनाटें न करणारे व शब्दाला जागणारे अशांचा जो वर्ग आहे त्यांत ही आढळते.

समचित्तता : : अविचलता, सर्वभूतेषु समदृष्टि, मनोविकारांपासून मुक्त, चित्तशांति, मनाचा समतोल, मनःशांति, विक्षोभरहित चित्तावस्था, पूर्वग्रहाचा अभाव, विकार-रहितता, शुनि चैव श्वपाके च समदर्शिन, चित्त-कल्लोळ न उद्भवणें, समदर्शित्व, हेत्वालिप्तता, निर्विकल्पता, राग-लोभ दुःख यांसारखे षड्रिपु त्यांनीं केव्हांच गिळून टाकले होते, स्थितप्रज्ञाप्रमाणें प्राप्त कर्में करीत, वसुधैव कुटुंबकम् अशी त्यांची वृत्ति होती.

समन्वय : : मेळ, जोड, मिलाफ, एक-जुळण, जोडणी, जोडी जमविणें,

एकसंध करणें, एका दाव्यांत बांधणें, सामावून घेणें, अन्वय जोडणें, एक टोपी सर्वांवर घालणें, सांगड घालणें, दुवे मिळविणें.

समस्या :: कूट प्रश्न, कोडें, उखाणा, जटिल प्रश्न, बिनतोड प्रश्न, नाना प्रश्नांची मालिका, ही समस्या पहाडासारखी उंचावली, प्रश्नचिन्हांची भली मोठी पलटण, प्रश्नाला फांटे फुटले, हा प्रश्न दत्त म्हणून उभा राहिला.

सम-संयोग :: दुधांत साखर, रत्नाला सुवर्णाचें कोंदण, आधीं सोन्याचें त्यांत जडावाचें, सुवर्णाला सुगंध, जणूं राम-लक्ष्मणांची जोडी, चंदनी काठीला चांदीची मूठ, किंमती सुरीला शिसवी मूठ, तलम साडीला जरीचा कांठ, सौंदर्याच्या जोडीला बुद्धि, पैशाबरोबर औदार्य, मर्दांचे पोवाडे मर्दांनीं गावेत, चांभाराच्या देवाला खेटराची पूजा, त्या हिडिंबेला हा खवीस भेटला, लाठी लाठीस भेटीस भेट, आंधळ्याला बहिरा भेटला, मणिकांचन न्याय.

समाज :: रयत, प्रजा, प्रजाजन, बहुजन, जनता, आम लोक, जनता-जनार्दन, लोकसमूह, समष्टि, मानवजात, नागरिक जन, देशबांधव, धर्मबांधव, आपल्या आसपासचे लोक.

समाधान :: तृप्ति, संतोष, संतुष्टता, अधिकाचा हव्यास नाहीं, आत्मसंतुष्टता, आहे त्यांत खूष, इच्छा केली तें पावलों अशी वृत्ति, तुष्टता, हावरेपणाचा अभाव, लोभनिवृत्ति, खा खा संपली, लालसा-नाश, अधिक मागणें आतां नाहीं, मागरेपणा लोपला, चित्तवृत्ति तृप्तावल्या, ठेवियलें हरीनें तैसें रहावें, वासना-लोप, सुखाची ढेकर आली, अधिक उडी नाहीं, संतोषी वृत्तीचा, जिवाची भगभग नाहीं.

समाधि (स्थिति) **::** एकात्मकतेचा प्रत्यय, तत्त्व एक पण आविष्कार वेगळा ही जाणीव, ब्रह्मांत विलीन झाल्याची भावना, जिवाशिवाचें ऐक्य अनुभवणें, सम-आ-धी, स्वत्व विसरून सारें निराळेपण पुसून टाकणें.

समान :: तुल्यबल, समबल, याच्या एवढाच तो, तसाच, तितकाच, तेवढाच, सम, त्याच कोटींतला, समसमान, एकाच माळेंतले मणी, नगास नग, समतोलाचा, समव्यापी, समव्यापक, एका वजनामापाचे, एका तोलामोलाचें, त्याच किंमतीचे, समानाकृति, तत्सम, त्याच हाडापिंडाचे,

सम-प्रकृति आणि सम-विकृति पण, एकूण एकच, एकूण क्षेत्रफळ सारखेंच, गोळाबेरीज एकच, समांतर, बरोबरीचा, एका लांबीरुंदीचे-उंचीचे, सूतभरहि फरक नाहीं, हें त्यापेक्षां बिलकूल उणें नाहीं, रतिभर कमी नाहीं.

समुद्र : : सरितापति, उदधि, सागर, रत्नाकर, महासागर, उपसागर, वडवानळ ज्याच्या पोटांत आहे तो, अमृतकुंभास जन्म देणारा, पृथ्वीची ओढणी.

समूह : : जमाव, झुंड, टोळकें, घोळका, पेंढार, लेंढार, जथा, सैन्य, टोळी, समुदाय, गट, संघ, लोट, रीघ, जनौघ, वरात, चिल्लावळ, गोतावळा, जमात, मंडळ, रांग, दाटी, पथक, कंपू, गर्दी, तुकडी, ताफा, जत्राच, कळप, तांडा, काफिला, मिरवणूक, भेंडोळीं, पुंजका, ढीग, गठ्ठा, रास, माळ, चळत, मालिका, घड, फणा, झुबका, गुच्छ, मोठी संख्या.

नर्तिकांचा तांडा, वेटर्सचा ताफा, विद्यार्थिनींचा घोळका, पोरांचें लेंढार, टवाळांचा कंपू, बॅण्डवाल्यांची तुकडी, टारगटांचें टोळकें, नटींचा संच, भुतांचा जमाव, मोहोरांचा ढीग, दिव्यांच्या माळा, ढीगभर रुपये, पैशांची रास, तारकांचा पुंजका, ढगांची दाटी, वाहनांची रांग, नाण्यांची चळत, थैलाभर पैसे, किल्ल्यांचा जुडगा, तान्यांचा पुंज, काड्यांचा जुडा, आगबोटींचा काफिला, केळ्यांचा फणा, द्राक्षांचा घड, पुष्पांचा गुच्छ, पोपटांचा थवा, गाईचें खिल्लार, मुंग्यांची रांग, डासांचें सैन्य, हरिणांचा कळप, भुंग्यांचा थवा, श्वापदांचा जमाव, अळ्यांचा पुंजका, झाडांची गर्दी.

समृद्धि : : भरभराट, चलती, चंगळ, वैपुल्य, विपुलता, वैभव, लयलूट, ऐश्वर्य, चढती कमान, रेलचेल, सुबत्ता, खाण्यापिण्याची रेलचेल, पुष्टि व सुबत्तेचे दिवस, तुष्टि, दूधदुभत्याची समृद्धि, धनधान्याचा महापूर, घर भरूं लागलें, लक्ष्मी दारांतून आंत डोकावूं लागली, पैसा हातांत खेळूं लागला, खाऊन पिऊन सुखी, कशाची कमतरता नाहीं, नाहीं हा शब्दच नाहीं, मन चाहेल तें तें आहे, कशाचाच तुटवडा नाहीं, श्रीचें हें माहेरघरच ! येथें काय नव्हतें ? चांगलें खातें-पितें घर आहे.

वैभवाची दुदुंभि वाजूं लागली, ऋणकोंचे पैसे चुकते केले गेले, येथें आम्हांला काय कमी आहे ? प्रत्येकाला मोठीं मोठीं उत्पन्नें तोडून दिलेलीं

असतात, कीर्ति आणि पैसा यांची अखंड बरसात अंगावर घेत, सुखाचीं सर्व साधनें समोर हात जोडून तयारच असत, ही रेलचेल ही संपत्ति हें सुख! मनसुराद वस्तु, खच्चून माल, गोदामें ठेचून भरलेलीं, उपभोग्य वस्तूंचा नुसता सडा पडला आहे; मोजशील रे किती! किती किती म्हणून सांगूं! घ्याल तितक्या, ऐश्वर्याची नदी वाहते आहे.

समोर : : सामोरें, सन्मुख, पुढें, पुढ्यांत, सामने, तोंडासमोर, पायाशीं, त्याच्याच विरुद्ध बाजूला, आमने-सामने, उलट दिशेला, उलट रांगेत, अल्याड-पल्याड, पुढच्या बाजूला, तें येथें व हे त्याच्याच पुढें इकडे.

सरस : : अधिक चांगला, दर्जेदार, ए-वन्, वरचढ, जादा रसदार, अधिक किंमतीचा, मूठभर जास्तच, कांकणभर अधिक, इससे जादा.

यांत त्याचा कोण हात धरील? हें पारडें जडच ठरेल, त्याच्या आसपास देखील येण्याची तुझी लायकी नाहीं, लाख पटीनें बरा, त्याच्या पासंगाला पुरणार नाहीं, तो याच्यापुढें निःसंशय फिका पडेल, ही कांकणभर जास्तीच, परंतु हें साम्य येथेंच संपतें.

सर्व : : सारें, धादांत, पूर्णपणें, पार, पूर्ण, सबंध, संपूर्ण, सर्वस्वीं, अज्जी, समूळ, शिल्लक-बाकी न ठेवतां, सोळा आणे, आमूलाग्र, एकूण–एक, निखालस, साफ, कोणी न वगळतां, तुकडे न करतां, सगळ्याच्या सगळ्या, न वर्ज्यतां, असतील तेवढे, बुंद शिल्लक न राखतां, शेवटल्या दमडी-पर्यंत कांहीं वगळ न करतां, यच्चयावत् सर्व, चटसारा, दर भाग, सर्वच्या सर्व, पूर्णांशानें, मुळापासून टोकापर्यंत, नखशिखान्त, सर्वार्थानें, कूस न ठेवतां, कांहीं समास न सोडतां, शेंडा बुडखा सर्व धरून, या टोकापासून त्या टोकापर्यंत.

सर्वत्र : : पावलोपावलीं, पृथ्वीच्या पाठीवर कुठेंहि, केवळ येथेंच नव्हे तर इतर सर्वत्र, ठायींठायीं, एकेकाच्या घरीं पाहतों त्यावरून, सर्रास सर्वत्र, आवतींभोंवतीं सर्व बाजूंनीं, दृष्टि टाकाल तेथें, बुद्धीला आकलन होईल त्या त्या ठिकाणीं, आम जनतेंत, दाही दिशांना, कोठें नाहीं असें नाहीं, हरएक जागीं, जळीं स्थळीं काष्ठीं पाषाणीं, जेथें पहावें तेथें, नाहीं कोठें? सर्रास दिसणारा, आंत-बाहेर चहूंकडे, येथें तेथें पलीकडे, खालीं वर इतस्ततः

सवत : : दुसरी सावली, कुटुंबसुखाला लागलेलें ग्रहण, संसाराच्या परवडीचें कारण, विवाहवृक्षावरील बांडगूळ, स्त्रीपणाची जिवंत विटंबना, घरावर पडलेला निखारा, संसारसुखाला लागलेली कीड, संसाराचा पूर्ण बाजा वाजविणारी वैरिणी, स्त्रीरूपानें आलेलें गतजन्मींचें पाप, संसार उध्वस्त करणारा सुरुंग, सुखाच्या ताटांत टाकलेली माती, प्रेमांत पडलेला बिब्बा, जिच्या आगमनानें घरांतल्या आनंदानें बाहेर पाऊल टाकलें अशी स्त्री.

सवलत : : कांहीं टक्के कमी घेतले, सूट, सवलतीचा दर लावला, आकारणी थोडी कमी केली, कमीवर भागविलें, कमी दरांत दिलें, खालचें तिकिट देऊन वर बसूं दिलें, हप्ते करून दिले, स्वतःचें थोडें सोडलें, धारेवर धरलें नाहीं, कडक अंमलबजावणींतून थोडी पळवाट ठेवली, म्हटलें तेवढ्याची सक्ति केली नाहीं. सर्वच मागितलें नाहीं, कांहीं कारणें बाद केलीं, कांहीं मागण्या मागें घेतल्या, न करून चालूं दिलें.

सहजगत्या : : अनायासें, आपोआप, सहजासहजीं, सहजच, विना-प्रयास, न ठरवितां, आपले असेच, प्रयत्न न करतां, जातां जातां पदराचा फटकारा लागावा त्याप्रमाणें, योजून नव्हे.

सहजलभ्य : : हाताशीं आहे, सुलभ, मोठे प्रयत्न नकोत, हो म्हणण्याचा अवकाश, टप्प्यांतलें, हात लांबविला कीं गवसेल, थोडका प्रयत्न कीं विशांत पडलेंच ! मार्गांतलेंच, महत्प्रयास नकोत, थोडी कळ कीं बस्स, कोणालाही प्राप्त, मध्यें अडथळे नाहींत, जा म्हणजे मिळेल, मागितलें कीं मिळणार, फक्त मागणी नोंदून ठेवा कीं पुरेल, विनवण्या–मनधरणीची जरूरी नाहीं, किल्ली फिरविली कीं ओघळलेंच, या लाभाला तपश्चर्या नकोत, रेडिओवर डायल फिरविलें कीं जितक्या सहज संगीत मिळतें तितकें चटकन्.

सहजीवन : : गुण्या-गोविंदानें रहात, सलोख्याचे संबंध, मिळतें-जुळतें घेण्याची वृत्ती, परस्परांवर न घांसणाऱ्या चाकांप्रमाणें, परस्परांच्या अध्यांत-मध्यांत नाहींत, तेढ्या वृत्तीचा लोप, लिव्ह् ॲण्ड लेट् लिव्ह्चें तत्त्व आचरणें.

सहनशीलता : : साहत रहाणें, विरोध–तंटा–वाद–प्रतिकार प्रत्याघात–उलट टीका–न करणें, तोंडांतून ब्र न काढणें, होईल तें पहावें,

अरेला कां रे म्हणणार नाहीं, दोन गुद्दे दिले तर चार द्या म्हणेल, गरीब गाय आहे कोणीही थाप द्यावी, एका गालावर चापट दिली तर ख्रिस्त–वचनाप्रमाणें दुसरा गाल पुढें करील, हात उचलणार नाही, प्रतिकाराचें नांवच नको, मार-खाऊ मार-देऊ नव्हत.

स्तन : : प्रणय-जासूद, सौंदर्याच्या ढाली, मदनाचे दूत, प्रेमाच्या ठेवी, अनघ उरोज, प्रेमाच्या आघाडीचे गोलंदाज, आनंदाचें घरटें, ही गुब्बा-तोरणें, प्रेमाचे दोन चोर-कंदील, दोन द्रोण ममता, मोहक सुवर्ण-करंडक, सघन कुचयुग्म, कुच-कुंभ, कुच-तट, कुच-मंडल, उरोभाग, सौंदर्यनगरीचे दोन प्रासाद-शृंग, तारुण्याच्या ध्वज-पताका, मदन-कुंभ, अमृताचे पेले, यौवनाची फळबाग, प्रेमाचे अग्रदूत, प्रीतीचें बंद जुगदान, मधु-घट.

स्तुत्य : : स्तवनीय, कौतुकादरास पात्र, आदरणीय, भलें, वंदनीय, तोंड फाटेपर्यंत स्तुति करावी असे, देव्हारे माजविण्यासारखें, स्तुतिसुमनें वर्षावीं असे.

स्तुति : : चहा, गुणांचें स्तवन, तोंडपुजा, तोरण बांधणें, मस्का लावणें, प्रशंसा, कौतुक, वाहवा, स्तुतिसुमनें उधळलीं, स्तुतीचा भाता सारखा चालू ठेवा, तोंडपुजेचा पंखा सारखा झुलतोय, प्रशंसेच्या मलिदा चारला, धो धो स्तुतीचा वर्षाव चालू आहे, मुसळधार कौतुक चाललेंय, गगनचुंबी स्तुति, लाळघोट्या स्तुति-पाठकांनीं पिच्छाच पुरविला, दोषांवर पांघरूण टाकलें, स्तुतीचें अजीर्ण व्हावें असें कौतुक, लगेच स्तुति-लेखांची मोटार पों पों करीत निघाली, हरभऱ्याच्या झाडावर चढविलें.

स्त्रिया : : थोडक्या अक्कलेवर पुष्कळ काम भागविणें स्त्रियांनाच साधतें, अभिरुचि दोन प्रकारची असते– एक चांगली व एक बायकांची, बायकांची बुद्धि चुलीपुरती, रांधा वाढा उष्टीं काढा हेंच त्यांचें ध्येय व साध्य, बायका फार बोलतात; साहजिकच आहे जीभ हा शब्दच स्त्रीलिंगी आहे ! स्त्रिया शक्य तेव्हां हंसतात आणि वाटेल तेव्हां रडतात, चूल व मूल यांत गर्क प्राणिजात, पुरुषाचा उभा जन्म एका स्त्रीच्या सेवेंत जातो आणि ती स्त्री त्याला हाताच्या बोटावर खेळविते, चराचर जग ज्या प्रकृतींत साठविलें आहे ती.

स्त्री (कुचेष्टा : : स्त्री अबला असते हा भ्रान्ति अलंकार आहे, संसारांत सर्व गोष्टी एक-मतानें चालतात म्हणजे बायकोच्या एका मतानें, नवरा आंतल्या आवाजामुळें कांहीं सांगूं लागला कीं समजावें तो आवाज स्वयंपाकघराच्या दिशेनें येणारा आवाज असतो, ही पापाची हंडी, कपाळभर कुंकू आणि हातभर बांगड्या यानेंच खूष !

स्त्री (निंदा) : : हा एक चिखल आहे, पापाची व मोहाची खाण, मोहाचें जाळें, पुरुषाच्या कामवासनेचें खेळणें, चांचल्याची मूर्ति, न उलगडणारें कोडें, मधाचें पोळें, दुफळीचें कारण, प्रमादांची दरी, सर्वांत बिकट गड, संसाराचें दोन अंकी नाटक, उग्रमधुर पाप, पातकांचा घडा, चांचल्याची मूर्ति, सुरी व सुंदरी यांना हाताळणें धोक्याचें असतें.

स्त्री (प्रकार) : : नारी, अबला, युवती, प्रौढा, अंगना, बाला, ललना, गर्विता, मानिनी, प्रणयिनी, अभिसारिका, प्राप्तयौवना, चतुरा, सुहासिनी, सुगात्री, चारुनयना, किशोरी, वृद्धा, नितंबिनी, नवयौवना, तन्वी, श्यामा, शिखरिदर्शना, पक्वबिंबाधरोष्ठी, चारुगात्री, रंभा, रंभोरु, पृथुनितंबा, सिंहकटी, चंद्रानना, बिंबाधरा, कमलनयना, पद्मिनी, भामा, कामिनी, वामा, भामिनी, रमणी.

स्त्री (महत्त्व) : : स्त्री हाच एवढा महत्त्वाचा विषय आहे कीं शेकडों प्राध्यापकांना तिच्या भिन्न भिन्न अंगोपांगांवर प्रबंध लिहतां यावेत, संसार-रथाचें दुसरें चाक, प्रीति शक्ति व कृति हे सर्व स्त्रीलिंगी शब्द आहेत यांत सर्व आलें, जीविताची प्रेरणा, जिच्याशीं जमत नाहीं व जिच्याशिवाय चालत नाहीं.

स्त्री (लज्जाहरण) : : अब्रूचें दूध एक दिवस सांडलें, लाजिरवाणा प्रसंग आला, केसानें गळा कापला, विश्वासघात केलान, तिची सोन्याची द्वारका लुटली गेली, त्याच्या काम-मगरमिठींत पडली, माशानें हें माणिक गिळलें, तिच्या अब्रूचें भांडें फुटलें, एक दिवस ती संपूर्ण गटली गेली, कुळास लांछन आणलेन, तिनें मिळविलेल्या पुण्यराशीवर पापाची ठिणगी टाकून गेला, त्या दिवसापासून तिची पाऊलवाट बदलली, कौमार्य-भंग

झाला, कुकर्म केलें गेलें, तिच्या मर्यादेचीं वस्त्रें लौकरच विरल झालीं, घराण्याला काळोखी लावली, तो तिच्या अब्रूवर उठला.

स्त्री (स्तुति) : : गरगरीत आनंद, गोड लांच, साक्षात प्रेमपंढरी, विश्वांतील सुंदरतेचें कोरीव-लेणें, लावण्याचा खजिना.

स्त्रीसौंदर्य (धोके) : : सौंदर्याला मुंगळे चिकटायचेच, एक कमळ नी भुंगे पुष्कळ ! भार्या सौंदर्यवती शत्रु, सुरी आणि सुंदरी यांना हाताळणें धोक्याचें असतें, स्त्री-सौंदर्य हा ज्वालाग्राही पदार्थ आहे, सुंदर स्त्रीशीं संपर्क म्हणजे विस्तवाशीं खेळ, रुचकर मिठाई बंदिस्त न ठेवून भागत नाहीं. सुंदर स्त्रियांबाबत तोच प्रकार घडतो, विकारांचें मोहोळ उठवून अविचार करायला भाग पाडणारें प्राचीन साधन म्हणजे सुंदरीचें सौंदर्य, ही ठिणगी मिळाल्यावर वाळलेल्या रानांत वणवा पेटायला कितीसा उशीर ? सुंदोपसुंदी स्त्री-सौंदर्यापायींच घडली, क्लिओपाट्राचें नाक सरळ नसतें तर एक घनघोर युद्ध टळलें असतें, रति पाहूनही उपरति होणारे थोडे.

हा मोहाचा प्याला ओठाला लावण्यापूर्वींच त्याची नशा चढते, तें पाहतांच रासवट मनाचीं कवाडें उघडलीं जातात आणि विचार पांगळून जातात; सावधपण चरावयास जातें आणि विवेक म्हणून कांहीं चीज आहे ती खुटीला टांगली जाते, कामिनीचें पकड-वारंट सुटलें कीं मोठमोठे हरतात व शरण जातात, तरुण सुंदरी ही सर्वांत बडी लांच अवश्यमेव काम करणारी.

स्थिर : : अचल, अडग, डळमळीत नाहीं, चलबिचलहीन, न हालणारें-फिरणारें, बदलहीन, एकटक, चांचल्यहीन, हालचाल नाहीं, एके ठिकाणीं बूड, जागच्या जागीं चिकटलेला, पुढें मागें न होणारा, दुसरीकडे आकृष्ट न होणारा, आपल्या जागीं घट्ट.

स्नेह : : मैत्री, रहस्य, सख्य, भारी तोंडांत तोंड घालीत असतात ! दाट परिचय, संगदिल, दुःखाचा वांटा उचलील असा मित्र, नाकांतला बाल झाला, तेव्हां डोळे पुसायला तोच यईल ही खात्री, अरे-तुरेचीच भाषा परस्परांत वापरली जाते, जिवाभावाचा संवगडी, आपुलकी, ते का परके आहेत, तीन पिढ्यांचा ऋणानुबंध, समदुःखी व समसुखी.

स्पर्धा : : चढाओढ, तूं का मी करणें, स्पर्धालु, पुढें जाण्याची इच्छा, शर्यत, दुसऱ्यास मागें टाकण्याची इच्छा.

स्पष्टवक्तेपणा : : तुमच्या तोंडासारखें बोलतों असें समजूं नका, आंतबाहेर कांहीं नाहीं, आम्ही स्पेडला स्पेड म्हणणार, कुत्र्याला कुत्राच म्हणणार, फटकळपणा, ताड्फाड् उत्तरें, भाडभीड नाहींच ! मनांत आलें कीं बोललेंच, कोठची गोष्ट शिल्लक दडवून ठेवणार नाहींत, जीभ खरखरीतच म्हणाना !

स्फूर्ति : : अंतःस्फूर्ति, स्वयंप्रेरणा, उमाळा, आंतला आवाज, सहजप्रेरणा, आपसुख आपोआप आंतून जें प्रकटतें, विनाविचार आंतून वाटणें, मनाचा कौल, मनांत प्रेरणा, मनांत आलें, आंतून स्फुरलें, कल्पना उद्भवली, स्फूर्ति संचरली, उत्स्फूर्त, सहज-प्रेरित, मन सांगूं लागलें, विचार उफाळूं लागले, बुद्धींत चैतन्य आलें, कल्पना उचंबळून येऊं लागल्या, भावनांना पालवी फुटली, मन हुंबरलें, कल्पनाद्रुम पल्लवला ! मानससरोवरांत ऊर्मि उठूं लागल्या, काव्यकामिनी गुलगुल गोष्टी करूं लागली, मनाच्या गोठ्यांत कल्पना हंबरूं लागल्या.

स्फोट : : भडका, उडून जाणें, छिन्नविच्छिन्न होणें, ठिकऱ्या उडणें, धडाका. ठो ठो बार निघणें, फुटून उडणें, परिस्फोट, अचानक आविष्कार, ढम्म् आवाज झाला, धुड्म् होऊन जमीन हादरली.

स्मृति : : आठवण, आठवणीचे कप्पे धुंडाळले, अशा किती तरी आकृति एकमेकांत गुंतून त्यांच्या अंतर्दृष्टीपुढे गरगर फिरल्या, मला पाहून तो प्रथम घुटमळला, पण त्याच्या स्मृतिचक्रानें गरगर फिरून लौकरच नामरूपाची सांगड घातली.

स्रवणें : : ओघळणें, पाझरणें, ठिबकणें, ठिपकणें, झरणें, वाहणें, पान्हवणें, टप् टप् थेंब पडणें, झिरपणें, छोटे छोटे पाट फुटणें, ओघ येणें, धार लागणें, झिरपा उमटणें, गळ लागणें.

स्वगुण : : समुद्र हा पिता चंद्रमा बंधु रमा भगिनी मेहुणा द्वारकेचा हरि असा शंख दारोदारीं भीक मागे.

स्वच्छ : : लख्ख, नीटनेटका, साफ-सुथरा, नेटका, निर्मळ टापटिपीचा, मळहीन, घाणरहित, अमलिन, धुतला-पुसलेला, डागरहित, निरभ्र, स्फटिकवत्, कुडाकचरा नाहीं, कुठें कुठें धूळ नाहीं, घासली-पुसलेली, आरशाप्रमाणें साफ, धुतल्या तांदळासारखा, खाडाखोड नसलेलें, ओशट नव्हे, परीट-घडी, लॉंड्रींतून काढल्यागत, जंतुरहित, विकल्पहीन, सुबोध, सुस्पष्ट, निःसंदिग्ध, आडपडदा न ठेवतां, बोबडें नव्हे, किल्मिष नसलेलें, चांगल्या संवयीचे.

स्वप्नाळूपणा : : विचार-द्वंद्वांत गुरफटलेला, मनांतले मनोरे, रत्नजडित कवि-कल्पना, मोरपंखी स्वप्नें पीत, सदा काव्य-कौमुदींत स्नान करणारे, मनोरथांच्या वारूवर स्वार होऊन उड्डाण करणारे, पोकळ चिंतनांत मग्न, आळशी स्वप्नांत चूर, वैचारिक गाफीलपणा, गोड आठवणी उजळीत राहतो, मृगजळ शिंपून नंदनवन करण्याची मूर्ख इच्छा, कल्पनांचा स्वैर पिंगा, या कल्पनेंतच तिचें सारें समाधान सांठविलें होतें, तूं आकाशांतल्या चांदण्या मोजत बसला आहेस, दिवा-स्वप्नें, पलायनवादाची कास, जीवित म्हणजे विविध स्वप्नांची मालिकाच ! भरजरी स्वप्नें.

स्वातंत्र्य : : मोकळीक, स्वतंत्रता, वागणुकीस मुभा, बंधनमुक्तता, कोणाचा वरचष्मा-दबाव नाहीं, काय वाटेल तें करायला मुखत्यार, बेड्या तुटल्या, कोणतेंहि जुलमी जोखड मानेवर नाहीं, कुठेंहि जा केव्हांहि जा, गुलामगिरींतून मुक्तता, कोणाचे बांधील नाहीं, दाही दिशा मोकळ्या ! कसलेहि अपमानकारक अडसर नाहींत, वारा ज्याप्रमाणें मोकळा खेळतो त्याप्रमाणें, कोठें प्रतिबंध नाहींत, अशा किंवा तशा आचरणाची सक्ति नाहीं, युक्तायुक्त स्वतःचें स्वतः ठरवितां येतें, कोणी कां म्हणून विचारणार नाहीं, येथें कोणाचा सासूबाईपणा नाहीं, विचार-स्वातंत्र्य, उच्चार-स्वातंत्र्य व कृति-स्वातंत्र्य येथें आहे.

स्वानुभूति : : अनुभूतीचा बिंदु असल्याखेरीज कल्पनेचा सिंधु निर्माण करतां येणार नाहीं, अनुभूतीची खोली कल्पनेची उंची व विचारांची रुंदी भासमान होतात, जीवनांतील विविध अनुभव साक्षेपानें टिपून घेणारी वृत्ति, अंतरींच्या हुरहुरीचें हळुवार प्रकटीकरण, त्यांचें भावविश्व.

स्वार्थत्याग : : स्वार्थ-होम, बलिदान, केवळ पराहितार्थ झिजणें, लाभनिरपेक्ष, लाभाची अभिलाषा न ठेवतां आत्मनिरपेक्ष सेवा, त्यागी जीवन, परार्थांत स्वार्थ पाहणें, निःस्पृह सेवारतता, स्वतःचें म्हणून कांहीं ठेवलेंच नाहीं, कमरेचें सोडून दिलें, सुखावर लाथ मारली, सर्वस्वावर पाणी सोडलें, चीजवस्तु कायमची देऊन टाकली, ऐषआरामाकडे पाठ फिरविली, नोकरीवर लाथ देऊन सतीचें वाण घेतलें, त्यागाची हंडी कांठोकांठ भरली, स्वार्थ-निरपेक्ष सेवा केली.

स्वार्थी : : स्वार्थांध, मतलबी, मतलबसिंधु, स्वार्थशास्त्री, स्वार्थ-साधू, स्वार्थ-परायण, संधि-साधू, पोटार्थी, स्वहितदक्ष, पोटभरू, स्वहितनिष्ठ, स्वार्थ-लोलुप, आत्महितदक्ष, आत्मकेंद्रित, पंक्तिपठाण, आप्पलपोट्या, उपट्या, आपमतलबी, आत्मकामी, आपलें घर भरणारा, स्वार्थानें लड-बडलेला, आपल्या पोळीवर तूप ओढील, आपलें घोडें पुढें दामटील, दुसऱ्याला नाडून स्वतः नटणारा, कापल्या बोटावर पाणी टाकणार नाहीं, आधीं पोटोबा मग विठोबा, उडत्या पांखरांचीं पिसें मोजणारा, स्वतःची तुंबडी भरतो, आम्ही खावें आम्ही प्यावें जमाखर्च तुमचे नांवें, तुम्ही आम्ही भाऊ भाऊ तुमचें आमचें आम्हीच खाऊं, तुमचे पोहे आमचा कोंडा फुंकून फुंकून खाऊं, मी खाईन खोबरें तूं करवंटी कुरतड.

स्वार्थीपणा : : चितेवर भाताचें मडकें शिजवून घेणारे—विडी पेटवून घेणाऱ्यांपैकीं एक, नागडा स्वार्थ, दुसऱ्याच्या तोंडचा घास बिनदिक्कत घेतील, आपला हात नी जगन्नाथ, कोणी निंदा कोणी वंदा यांना स्वहिताचा धंदा, ऊंस गोड पण मुळ्या सोड म्हणण्याची वेळ येते, कामापुरता मामा, ताकापुरती आजी, गरज सरो नी वैद्य मरो, स्वतःच्या कुऱ्हाडीला धार लावून घेण्यांत पटाईत, नवशे हौशे व गिवशेपैकीं तिसरे.

स्वारी : : चढाई, आक्रमण, हल्ला, हमला, अंगावर चालून जाणें—हात टाकणें—घसरणें—तुटून पडणें, शस्त्र उपसणें, फौजेनिशीं धाड घालणें, मुलुखगिरी करणें, वर सैन्य सोडणें, सीमा ओलांडणें.

स्वैर : : स्वच्छंदी, स्वैरवादी, सैराट, निरर्गल, उच्छृंखल, बेछूट, बेफाट, आनियंत्रित, कोणाचा दाब नाहीं, मनचाहे वर्तन, या होडीला

सुकाणूं नाहीं, हा बाजीरावी घोडा ज्या दिशेला निघेल तिकडे त्याची दौड, कोणाचें ऐकणार नाहीं, मनस्वी, याच्या जीवनाला वेळापत्रक नाहीं.

सात्त्विक : : त्यांचा पिंड सात्त्विकतेचा, सरळ पुनीत मार्गानें जाणारे, सौजन्यानें वागणें आणि परोपकारी स्वभाव, सालस, हाडाचे सज्जन, संस्कृतीचा नंदादीप, मूर्तिमंत सभ्यता व शिष्टता, सत्त्वगुणी, शांतदान्त व उदात्त, अभिजात चांगुलपणाचा अर्क.

साधारण : : सुमाराचें, सरासरी, असा तसाच, बेतास बात, कांहीं कांहीं भाग बरा आहे, कनिष्ठ दर्जाचें, पडेल, यथातथा, कम अस्सल, धड गोऱ्यांत जमा नाहीं धड काळ्यांत जमा नाहीं.

सायंकाळ : : सूर्याचे लाल नेत्र—धुगधुगतें बिंब, दिनमणि अस्ताचलाला गेला, रटाळ सूर्यास्त, सूर्य शरमला, आकाश लाजलें, दिशा भडकल्या, शरमाळू दिशा आरक्त झाल्या, आकाशाची चर्या बदलली, उजेड अंग चोरूं लागला, पश्चिमेकडील क्षितिज पेटलें, उद्विग्न दिशा, क्लांत संध्याकाळ हळू पावलांनीं आली, बोटभर उजेडाचा पट्टा, दिवसाचा शेवटचा श्वास, रात्रीचे डोळे लुकलुकूं लागले, काळोख भुईवर अंथरूं लागला.

सारखा : : सही सही तसा, डिट्टो तसा, कित्ता, तदृश, सदृश, एक झाकून—लपवून दुसरा दाखवावा, एकरूप, दोहोंत फरक कसा तो नाहींच, तो नी हा एकच, तिळमात्र फरक नाहीं, घडण वेगळी नाहीं, आवळे-जावळे जुळेच जणूं! रतिमात्र फरक नाहीं, तसलीच, तीच ढब, हें तसेंच तें, मिळता-जुळता, अभिन्न, फरक फार थोडा आहे, त्याच कित्त्यावर घोटलेले, तेंच इकडे पण, जुळणारे, त्याच लक्षणांनीं युक्त, सोळा आणे जमणारे, मुळांत एक, या दोहोंत कांहीं तफावत नाहीं; फक्त बाह्य लक्षणें भिन्न, दगडाचें नांव धोंडा धोंड्याचें नांव दगड! लेबल वेगळें औषध तेंच, सर्व-साधारण स्थिति सर्वत्र एकच, साऱ्यांच्या मधल्या व्यवच्छेदक सीमा-रेषा गळून पडतात, दोन सागरगोट्यांप्रमाणें, फरक ओळखूंहि यावयाचा नाहीं, एका बैठकींत बसतील असे.

सारासारबुद्धि : : विवेक, तारतम्य, सर्व नियमांचे सार असा नियम म्हणजे सारासारबुद्धि, बरेंवाईट ओळखणें, सदसद्विवेकबुद्धि, भल्यावाइटाची

जाणीव, व्यवहारबुद्धि, चार लोक काय करतात व काय करणें पचतें तें ओळखणें.

सावधानता : : शुद्धता कसून पहावी, वरल्या रंगाला भुलूं नये, डोळे उघडे ठेवून वागावें, शत्रु-मित्र पारखावेत, पावलें जपून टाकावींत, काळ-वेळेचें ध्यान ठेवावें, अंध विश्वास ठेवूं नये, मित्राला शत्रु व शत्रूला भावी मित्र समजून चालावें, डोळ्यांत तेल घालून राखण करावी, कुत्र्याच्या झोपेसारखी झोप असावी, विषाची परीक्षा घेऊं नये, शत्रूची हिंमत कमी लेखूं नये.

साहणें : : सहन करणें, कळ काढणें, ओरडा न करणें, चीप रहाणें, तोंडांतून ब्र न काढणें, जणूं कांहीं कांहीं झालेंच नाहीं असें दाखविणें, अपमान गिळणें, तोंडांतून शब्द न काढतां मार खाणें, बिनतक्रार ऐकून घेणें, बिनबोभाट येऊं देणें, विरोध न करणें, दुसऱ्याला पचूं देणें, ध्यानांतहि न आलेंसें दाखविणें, सगळें मनाआड करून टाकणें, ही कोयनेलची गोळी मी डोळे मिटून घेतली, मूग गिळून गप्प.

साहित्य-प्रशंसा : : ही निर्मिति त्यांस भूषणावह होय, निरानिराळ्या दृष्टींनीं चिरस्मरणीय, अव्वलांपैकीं एक, कल्पनेला ताण देऊनहि या वर्णनांत मी अधिक तपशील भरूं शकत नाहीं, गोडवे गाण्यासारखें, सोन्याच्या शाईनें छापण्यासारखें, त्यांत नांव ठेवण्यास कोठें जागाच नव्हती, अजरामर साहित्य, कल्पनातीत यश मिळविलें आहे, त्यांच्या कीर्तींत भर टाकील असेंच.

सुख : : मजा, गंमत, मौज, चैन, अतीव आनंद, स्वर्गसुख, सुखासीनता, आल्हादावस्था, सुखोपभोग, आकंठ सुखपान, सुखलहरी, दृष्ट लागेल असें सुख, सुखाचीं सर्व साधनें हाताशीं, सुखाचें तुडुंब सरोवर, सुखाचा हंडा, अपार–अखंड–चिरंतन–असीम–अवीट–अतुल–स्वर्गीय सुख, सुखित जाहला, सुखावला, बरें वाटलें, यांचें आपलें सुखं च मे शयनं च मे, ताटावरून पाटावर, पोटांतलें पाणी हालत नाहीं, आम्हांला काय काय मिळतें ? इंद्रियतृप्ति, वासनाशान्ति, इच्छाभोग, भोगानंद.

सुटका : : मुक्तता, बंधमोक्ष, मुक्ति, पकडींतून निसटला, मान मोकळी झाली, दगडाखालचा हात निघाला, निर्बंध संपले, शृंखला निघाल्या, बंधनें

गेलीं, बंदी हटली, छुटकारा – मोकळीक मिळाली, पिंजरा उघडला, कवाडें खोललीं गेलीं, गळपट्टा उतरला, खुल्या जगाचें दर्शन झालें, या कैदेची अखेर झाली.

सुदैव : : तकदीर थोर, सौभाग्य, सद्दीचा जोर, नशीब काढलें, देव पावला, देव देतो तेव्हां छत फाडून देतो, यदृच्छया मिळालें, पूर्व-संचितानें लाभ झाला, फांसा सोईचा पडला, देवानें हाताला यश दिलें, परमेश्वर-कृपेनें तग धरून राहिलों, देव पाठीराखा आहे, यापरतें अधिक भाग्य तें काय ! माझें विशिष्ट अहोभाग्य असें कीं, अकस्मात् त्याच्या कपाळींची रेषा उघडली, नशीब शिकंदर म्हणावयाचें, त्यांना अनुकूल दैवानें नेहमींच हात दिलेला होता, संधि अचानक चालून आली.

सुधारणा : : नवी घडी बसविणें, जुनें उसवून नवें शिवणें, जुन्याची डागडुजी–दुरुस्ती, कायापालट, पुनरुज्जीवन, त्यांत नवा श्वास ओतला, वेगळ्या दिशेनें वाटचाल, वेगळ्या क्षितिजाकडे कूच, नवनिर्मिति, ठाकठीक करणें, रोगमुक्ति, अधिक निपज–कार्यक्षमता आणणें, नव-तंत्रांचा स्वीकार, सदोष परंपरेचा त्याग, वाढ व विस्तार, नवे पायंडे, वळण बदलून अधिक घाटदार करणें, खाडे–व्यंगें–न्यूनें–कमतरता दूर करणें, क्षितिजें व्यापक करावीं, समाजांतील नीतिनियमांचा टाइप वापरून झिजला आहे; आतां हा वितळवून नवीन टाइप निर्माण केला पाहिजे, समाजाची जुनी घडी मोडून नवें घडवणें.

सुधारली : : ही निवळली आहे आतांशा, तिनें नवें पान उलटलें आहे, मार्गावर आली आहे, गाडी वळणावर आली, तो मनू बदलला, जुना डाग पुसला, वागण्यांत रीत आली, दुरुस्त झाली, माणसांत आली.

सुरळित : : रेघेनें, नीट, नीटपणें, रीतसर, निर्विघ्नपणें, बिनबोभाट, निष्कंटकपणें, योग्य मार्गानें, योग्य वेळीं, सुयोग्यपणें, राजमार्गानें, कोठला अडसर न पडतां, अटकाव न होतां, विनाघर्षण, कांहीं बाधा न निघतां, तंटा-बखेडा न होतां, मध्यें कांहीं उपस्थित न होतां.

सुरक्षित : : केसाला सुद्धां धक्का न लागतां, हातीं-पायीं नीट सुटली, कोठे ओरखडाहि निघाला नाहीं, दिव्य कवच असल्याप्रमाणें, संतरलेला

गंडाच मनगटांत बांधला होता जणूं! पेटींत ठेवल्याप्रमाणें, सेफमध्यें ठेवले काय तेथें ठेवले काय एकच, कांहीं मोडतोड न होतां, वाटेंत कोणी भ्रष्ट किंवा नष्ट करणार नाहीं, कांहीं अपघात न घडतां.

सुव्यवस्था : : टापटीप, कुठें कुठें धूळ नाहीं, सर्व कांहीं झकपक, नियमित झाडझूड, प्रत्येक वस्तु झक्क व लख्ख, गृहिणीचा हात फिरल्यागत, परीटघडी, टीपेंत सर्व कांहीं, सुनियंत्रित, जागच्या जागीं, लष्करी खाक्या, सुरळित शिस्तबद्ध व एका सुतांत बांधल्याप्रमाणें, एकसूत्रीपणा व कांहीं एक पद्धत, प्रमाणबद्ध मांडणी व योग्य गुंफण, परस्परांचे व्यवहार व हालचाली बांधीव व नियंत्रित, रेखीव रचना, सुटसुटीतपणा, प्रत्येकाचें काम निश्चित व नेमलेलें, यंत्रवत् रचना, कोठें घर्षण नाही.

सुसज्ज : : तयारींत, जामानिमा करून, साहित्य–पूर्वतयारीनिशीं, सायुध, आयुधांसह, पंचहत्यारी, सामग्रीनें भरगच्च, जय्यत तयारी करून, केव्हांहि तयार, लंगोट कसून, हत्यारें-पात्यारें जमा करून, सर्व दारू-अन्न-कोठारें भरलीं आहेत, केवळ शब्दांची वाट पाहताहेत, कडेकोट चौरंगी तयारी, बेतांत कांहीं एक उणें नाहीं, पायदळ घोडदळ खडें आहे.

सुंदर : . नयनरम्य, मनोहारी, छान, झक, चांगलें, राजस, लोभस, प्रमाणबद्ध, बांधेसूद, सौष्ठवयुक्त, सुभग, कातीव, घोटीव, सुरम्य, नेत्रदीपक, मनमोहक, आदर्श, स्वर्गीय, कितीहि पाहून समाधान न होईल असें, पहावें पहावें असें वाटेल, दृष्ट लागेल असें.

सुंदर (पुरुष) : : ओतीव काया, असा शोभिवंत पुरुष मी पाहिलाच नव्हता ! गोटीदार शरीर, भरदार छाती, पुरुषी पुरुष, मदनमूर्ति, भक्कम शरीर पण रासवट नव्हे, साक्षात् कामदेव, खादीच्या शरिरावर श्रीमंती कांति, मदनासारखा सुस्वरूप, रूपवान.

सुंदर (मुलगी) : : अगदीं दृष्ट लागण्यासारखी, चटक-चांदणी, तेजःपुंज, ही कांहीं अशी-तशी मुलगी नव्हती, चुणचुणीत, फटाकडी, सुरेख पोर, नीटस, सर्व अवयव जागच्या जागीं, मन जडवील अशी, रतीसारखी.

सुंदरी : : मुग्धा, मुग्धसुंदरी, मदन-पुतळी, राजबिंडी, कोमलांगी, चारुगात्री, स्वरूपसुंदर, रूपाढ्य, सौंदर्यपुतळी, चटक-चांदणी, चंद्रानना, इंदुमुखी, रति, अप्सरा, लावण्यवती, शुभदर्शना, लावण्यलतिका, सौंदर्यखनि, रूपवती, सुरूपा, सुरेखा, शुभांगी, सुरयुवती, किन्नरी, मदनिका, लावण्यसंपन्न, रूपानें उजवी, स्वरूपसुंदर राणी, सुरूपतेची देणगी असलेली, सुडौल ललना, हा मोहाचा प्याला, ही गोड लांच, नाजूक-साजूक, देखणी सुरत, कुणालाहि मोह घालील, चारचौघांत उठून दिसणारी, रेखीव कांति व सौंदर्य, दाहक मादक मुग्ध सौंदर्य, सात्त्विक लावण्य, कोणीहि कौतुकानें मान वळवून दुसऱ्यानदां पहावें असें सौंदर्य.

सूड : : बदला, उट्टें, प्रतिहानीनें परतफेड, वचपा, मोबदला घेणें, दावा साधणें, खून का बदला खून, जुने हिशोब पुरे करणें, राग काढणें, अपमानाचा वचपा, सायंसंगीत उट्टें, आकसानें घेतलेला बदला, जशास तसें, वैयक्तिक भूमिकेवरून न्याय करणें, एकानें गाय मारली तर दुसऱ्यानें वासरूं मारणें, स्वतःचें नाक कापूनहि अपशकुन करणें, सर्वांत आंधळा विकार म्हणजे सूडबुद्धि.

सूर्यप्रकाश : : थंड गुलाबी सूर्यप्रकाशांत दिसणारी हिमवृष्टि विलोभनीय वाटे, सोनेरी किरणें, लाले लाल सूर्यबिंब.

सूर्यास्त : : सूर्याचें आरक्त बिंब, पिवळाजर्द सूर्य, तापलेला तवा, सूर्याचीं उन्हें मऊ मऊ होत पश्चिमेकडच्या माडांच्या शेंड्यांवर चढलीं, क्षितिजावर निळें आकाश वितळत होतें, क्षितिजावर रक्तिमा पसरत चालला होता, जादूची कांडी फिरवावी तसे आकाशाचे रंग बदलले, रुसलेला सूर्य, भगवान् सहस्र-रश्मि अस्ताचलाला गेला.

सृजनक्षमता : : जमिनीचा कसदारपणा, सुपीक मेंदू, सकस कूस, उपजाऊ कर्तृत्व, मेंदूची निपज मोठी, नवनवोन्मेषशालिनी प्रतिभा, हजार बेत पार पाडण्याची कुवत, विविध कार्यक्षमता, वैचारिक संतति खूप, अनेक कार्य-क्षेत्रांत भरीव काम, सटासट माल बाहेर काढतात, कार्योत्पत्तीचा भरीव ओघ, पुस्तकांची वीण मोठी व जलद, आंत गेली कीं गर्भार बाहेर आली कीं बाळंत असें मोटेचें होतें तसेंच यांचें पण.

सोपी (गोष्ट) : : कोणीहि करील, त्यांत अवघड तें काय ? येथें क्लिष्ट गूढ असें कांहीं नाहीं, हा प्रश्न कोणालाहि सुटेल, अगम्य नाहीं, सुबोध, पोरांठोरांनाहि समजेल, या समस्येचा उकल कठीण नाहीं, विनायास मिळणारी, बिकट नव्हे, या गाण्याला कोणीहि ताल-सूर लावावे, याला आडवळणें नाहींत, सहज उगमेल, केव्हांच होईल, जर-तर पण-परंतु यांत नाहींत, तज्ज्ञाकडे जावयाला नको, आपल्या आपण करतां येईल, जोडाक्षर-विरहित धड्याप्रमाणें, कोणाच्या अर्ज-विनंत्या करायला नकोत, टेकू–वशिले नकोत, मागितलें कीं मिळेल, पक्का मूर्खच करावयाला चुकेल.

सौंदर्य (स्त्रीचें) : : देहसौष्ठव, कमनीय देहयष्टि, चुस्तपणा, बघणारानें थक्क होऊन जावें, दृष्टीचा संयम ढळविणारें, पंचप्राण ओवाळून टाकावे असें, लावण्यसंपन्नता, दाहक मादक सौंदर्य, निरुपम सौंदर्य, सौंदर्य वेड लावतें, अशीं कितीक बक्षिसें तिच्यावरून ओवाळून टाकावीं.

सौम्य : : सात्त्विक, शान्त, बिनपीडेचें, मृदु, मृदुल, कोमल, मऊ, मंद, शान्तदान्त, शीतल, थंड–कडक–तीव्र–जालीम–अघोरी नव्हे, रेशमी, हलका, न रागावणारा, न त्रासणारा, कधीं खळबळ नाहीं, सुसह्य.

संकीर्ण : : विविध तऱ्हांचे, संमिश्र, लहान-मोठें, छोटे-मोठे, स्वतःचें दुसऱ्याचें, अठरा-पगड, सत्रा कुळ्यांचें एकत्र पाणी, घेडगुजरी, सरमिसळ, विविध छापांचें, उरलेसुरले, मिसळ, मिश्रित, थोडें थोडें प्रत्येक तऱ्हेचें, नानाविध, पंचमेळ, गंगाजमनी, आंवळ्यांची मोट.

संकुचित (दृष्टिकोन) : : जशी माती तशी मति, तात्कालिकाच्या पलीकडे कधीं गेलेच नाहींत, तळ्यांतला बेडूक तो; त्याची विचारसरणी ती काय असायची ? नाकाच्या पुढें फूटभर तरी पाहतील तर ना ? मी व माझें यापलीकडे विचार जात नाहींत, व्यापकतेचा अभाव, सर्वांना सामावून घ्यायला लागतें तें नाहीं, पोथ्या-पुराणांपलीकडे गेले नाहींत, चिंचोळें मन, थिट्या जगांतली थिटी बुद्धि.

संकोच : : आकुंचन, आटुरणें, घट, खुरटणें, आक्रसणें, घटणें, घाटा, छाटाछाटी, आटणें, बारीक होणें, कमी होणें, बसणें, आवरतें घेणें, पंख मिटते घेणें.

संगत : : चोरापाशीं बसतां तशी बुद्धि होते; चिंधी पाहून मन धावतें, संगतीनें पंगतीचा लाभ होतो, संगतीवरून मनुष्य ओळखतो, अलीकडे त्यांच्यामध्यें सांपडतो, आवतींभोंवतीं हे लोक आहेत, त्याच्या पुठ्यांत हा, ही जोडी जमली आहे, जा–ये यांचेकडेच फार, यांचीं पावलें एकत्र पडत आहेत, एकत्र आढळतात, तो असेल तेथें हा असतो, एका कळपांतले आहेत ते, एका फोटोंत दोघे आहेत.

संगीत (चांगलें) : : जाझचा जल्लोष, नूपुरांचा लयबद्ध आवाज, सप्तसुरांचे झंकार, दर्दभरी गीतें, स्वरकिन्नरींचे आलाप, किन्नरकंठी गायन, मधुर स्वरांचें इंद्रजाल, लयबद्ध छुमछुमाट, स्वरांचे दिलखेचक आरोह व अवरोह, गाण्याची कैफ आणणारी रंगत, श्रोत्यांस स्वरब्रह्मांत तल्लीन करून टाकलें.

संघर्ष : : आरोप प्रत्यारोप, याचा त्याला ससेमिरा, कडकडून निषेध, रोकडा सवाल, शह-काटशह, तिरपागडीं उत्तरें, शाब्दिक खडाजंगी, अडवणूक व उच्छाद, नको जीव करून टाकतात, छळवाद मांडतात.

संत : : गोसावी, सन्यासी, संन्यस्त इसम, साधू, फकीर, बैरागी, भिक्षु, मॉंक, सर्वसंगपरित्यागी, परिव्राजक, जोगी, अवलिया, महंत, द्रष्टा, सेंट, संताळ, अवतारी पुरुष, जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति, निखालस चांगला.

संत (खोटा) : : सर्प उपास करतो; बगळा ध्यान लावतो; उंदीर जागोजाग भटकतो; गाढव राख चोपडतो; कावळा तीन-त्रिकाळ स्नान करतो; उन्मत्त विवस्त्र हिंडतो–म्हणून हे संत ठरत नाहींत! त्यांची आंतली बुद्धि खोटी व पोटांत वाईट असतें, या सर्व गोष्टी करणाऱ्या संतब्रुवांची गोष्ट वेगळी नाहीं.

संतति (विपुल) : : रग्गड पोरें, पोरांचें लेंढार, बाळगोपाळांचें खिल्लार, खंडोगणती पिल्लें, हे आमचे ताजे चिरंजीव, घराला गोकुळाचें स्वरूप प्राप्त झालें आहे, एक अंगाशीं तर एक खांद्याशीं, खायला काळ भुईला भार, एकाचे एकवीस होवोत, वेल मांडवाला जावो; तसेंच झालें, माझ्याहि पदरीं मुलेंबाळें आहेत, शेळीच्या लेंड्यांप्रमाणें पोरें होताहेत, विवाह

मजेसाठीं नसून प्रजेसाठीं आहे हें पक्कें ओळखलेंत, रग्गड मुलें असलेल्या लेकुरवाळ्या स्त्रिया, शोभो तव कुल सत्कुमरें, अष्टपुत्रा जाहली, पोरगी पायगुणाची; घर भरल्याशिवाय सोडायची नाहीं.

संतपणा : : यतींचें जीवन जगतात, ऋषि-मुनि यांसारखा आचार, विशुद्ध जीवनाचा आदर्श, नीतीबाबत कडकपणा, त्यागी भोगी नव्हे, छाटी कफनी धारण केली, विषयापासून अलिप्तता, तपोधन, महामुनि आत्मलोप, यांना सुवर्ण मृत्तिकेसमान, संसारांत गुरफटले नाहींत देहाविषयीं, अनासक्ति, उपवास व नेमधर्म यांत काल व्यतीत करीत, अंतर्बाह्य योगी, विशुद्धात्मा, धर्मपरायण, परार्थ हाच स्वार्थ, सदा परहितरत, ज्यांचा अहंकार विरला आहे, सिद्धत्व पावलेला.

संताप : : रक्त तापले, भडकले, चिडले, रागावले, तडकले, संतप्त झाला, क्रुद्ध झाला, क्रोधातिशयानें त्याच्या तोंडून शब्द फुटेना, त्याचा पारा चढला, डोळ्यांतून आग ओकूं लागला, त्वेष संचरला, खाऊं कीं गिळूं करूं लागला, राघोबाचा संचार झाला, हिरमुसला, माथें भडकलें, डोळे लाल केलेन्, रागारागानें पाहूं लागला, डोकें तापलें, राग अनावर झाला, वाईट चेहरा करून, गरम झाला, तळपायाची आग मस्तकाला गेली.

संतापला : : मनाची शांति ढळली, आग पाखडली, तब्येत गरम झाली, रागाचा पारा चढला, क्रोधाची ऊर्मि आली, अंगांत आग्यावेताळ शिरला, पित्त खवळलें, आज त्याचें डोकें ठिकाणावर नव्हतें, रागानें बेभान झाला, तोंडाला फेस आला, आकाशपाताळ एक केलें, रागानें लालबुंद होऊन जळजळीत दृष्टिक्षेप टाकला, तिची छाती संतापानें धपापत होती, अंगांत भूत संचरलें, शरिरांत मावत नसे इतका राग तिला येई, त्याचें मनच थाऱ्यावर नव्हतें, कीं फेंदारलेंच नाक तिनें! डोकें तापून गेलें, कानशिलें ताडताड उडत, कांहीं विचारलें कीं तो तीनताड उडे, ही कांच केव्हां तापेल नी केव्हां तडकण्याच्या बेतांत येईल तें सांगतां येत नसे.

संतुष्ट : : संसाराचें सुख आकंठ प्यालेली, खूष, सर्व इच्छा पुऱ्या झाल्या, समाधानी, वखवख संपली, पाहिजे तें सर्व मिळालें, प्राप्तव्य उरलें नाहीं.

संध्याकाळ : : सायंकाळ, दिवेलागणीची वेळ, सांजवातीची वेळ, तिन्हीसांजा, गोरज समय, दिवसाचा शेवट, सूर्यास्ताचा समय, दिन-रजनीच्या पुनर्मीलनाची वेळ, दिवस-रात्रीचा संधिकाल, अंधार पडायची वेळ, रात्रीची सुरुवात, गाई घरा आल्याची वेळ, संधिप्रकाश सुरू झाला, सावल्या खालीं आल्या, उन्हें तिरपीं होऊं लागलीं, झाडांचे रस्त्यांवरील छायांचे पट्टे मोठे झाले, आकृति धूसर दिसूं लागल्या, संध्या बुरखा घेऊं लागली, मरता प्रकाश धांपा टाकीत होता, रजनिकांत लवकरच उदयाला येणार असा समय झाला, सूर्यनारायण विश्रांतीला गेला, दिवे मिणमिणूं लागले.

संधि : : अवसर, कार्य करावयास क्षेत्र—वाव, प्रसंगांतून वाट आढळली, प्रगतीचा मार्ग, चान्स्, चंचुप्रवेशाला जागा, दार उघडें मिळालें, दिंडीचा अडसर निघाला, क्षितिजें खुलीं झालीं, दैव उघडलें, फट मिळाली, भुसभुशीत जागा गावली, हीच वेळ आहे, आतां किंवा केव्हांच नाहीं, मार्ग मोकळा झाला, सुवर्ण संधि.

संपत जाणारें : : झिजत—आक्रसत—तुटत—घटत जाणारें, मृत्युपंथाला लागलेलें, क्षयी, आटोपत येत आहे, कमी कमी घेऊं लागलें, त्याचे दिवस भरले आहेत, राजयक्ष्मा झालाय्—लवकरच लोप होईल, ओहोटी लागली, जोर संपला, धार बारीक होऊं लागली, सरूं लागलें, टोक दिसूं लागलें, खलास होऊं घातलें, थोडें उरलें, सांठा घटत चालला, पातळी खालीं जात चालली, तळ लवकरच दिसणार, संख्या घटूं लागली, शेवटच्या दिशेनें कलंडलें, या नाटकाचे दोन अंक उरले, अस्ताचलाकडे झुकूं लागला, मुमूर्ष, मरूं घातलेलें.

संबंध दुरावले : : आई गेली म्हणजे बाप पाहुणा, तेव्हांपासून तें घर तुटलें, आमच्यामध्यें दुरावा निर्माण झाला, जितक्यास तितके संबंध उरले, आतां त्यांना याचें सोयरसुतकहि नव्हतें, या नातेवाइकांशीं त्यांचा कमींत कमी संपर्क यावा असें त्यांस वाटे, आत्मीयतेला पारखे झाले, म्हणाली प्लेगचा उंदीर तुमच्यापेक्षां जवळचा वाटल ! आतां बोटरभर चिठ्ठीहि येईना, बोलणें-चालणें थांबलें, आतां वाटूं लागलें कोणाचें कोण ? तोंड फिरवलें

जणूं कांहीं तोंड ओळखहि नव्हतो, अर्थाअर्थीं संबंध उरला नाहीं, नातें जवळजवळ तुटलें.

संभवनीय : : संभाव्य, शक्य, होईलहि कदाचित्, अशक्य नव्हे, शक्यता आहे, होणार नाहीं असें नाहीं, अपेक्षा करायला हरकत नाहीं, लक्षणें तशीं दिसताहेत, होणारसें वाटत आहे, नव्वद टक्के होणार, हटकून घडेल.

संमति : : होकार, मान्यता, अनुमति, मंजूरी, अविरोध, अनुकूलता, रुकार, मुभा, परवानगी, अनुकूलता, खुला दरवाजा, त्या बाजूस मन झुकलें, सामोरे जाण्यास तयारी झाली, मूक संमति, मौनं संमतिदर्शनम्, हो आला, संमत झालें, होस हो ठोकला, मान डोलावली.

संयम : : मनावर ताबा, विकारदमन, विकार-विजय, वासनांवर नियंत्रण, इच्छांचा लगाम हातांत न ठेवणें, मन मानेल तें करावयाचें असें नव्हे, भावना काबूंत राखणें, लालसा अनिवार होऊं न देणें, विचारानें उच्छृंखल वृत्तींना मुरड घालणें, अश्रूंना आवरणें, चित्तवृत्ति दाबांत ठेवणें, आंतरिक ऊर्मि व बाह्य आविष्कार या दोन्ही गोष्टी कब्जांत ठेवणें, मनोवारूला पायबंद घालणें, स्वैराचारावर मनाचे आपसुख निर्बंध घालणें, चित्ताग्रता बिघडूं न देणें.

संयोग : : संमिश्रण, मिलाफ, संलग्न स्थिति, एकात्मता, एकरूपता, अभिन्नता, एक होणें, एकजीव होणें, जोडी जमणें, सांधा जुळणें, परस्परमीलन, अंतर पार नाहींसें होणें, सर्व आडपडदे बाजूला पडणें, भेदातीत अवस्था, खऱ्या अर्थानें एक झालों, सर्व भेद मिटले, जोड जमला.

संशय : : शंका, किंतु, किल्मिष, मनांतलें काळेंबेरें, विकल्प, मनांतली ही तळमळ, क्षुद्र तर्कट, घाणेरडा विचार, दीर्घ-शंकी मन वळवळलें, मनांत पाल चुकचुकली, जीव शंकाकुशंकांनीं व्याकुळ झाला, मन गढूळ झालें, असा बारीकसा विचार मनाला चिमटा घेई, त्याचें पूर्वग्रह-दूषित मन फणा उभारी, उगाचच एक किडा डोक्यांत आला, ही उफराटी गोष्ट मनानें पक्की घेतली, संशयाच्या भोंवऱ्यांत अधिकाधिक सापडला, असा संशय मनाला चाटून गेला, संशय दुणावला, संशय खट झोटिंग महा, अत्यंत दारुण शंका मनांत घर करी, अतिस्नेहः पापशंकी, बळकट कळकट संशय,

संशयाचें पाणी होतां होतां तुडुंब फुगून अप्रशस्तपणें वाहूं लागलें, मनावर मालिन्य आलें, अविश्वासाचें सावट आलें, असा हा विचार तिच्या मनांत बिळांत हळूच शिरणाऱ्या सापाप्रमाणें डोकावून गेला होता, आधींच कलुषित मन संशयग्रस्त झालें.

संशयवाद : : स्थिर-मूल्यांविषयीं साशंक, भवति वा न भवति या पंथांतले, संशयवादी, ततः किम् ततोपि किम्, नरो वा कुंजरो वा, नाना पंथ नाना मतें जगीं झालीं असंख्यातें; आतां कोठें भाव धरूं देवा चित्त स्थिर करूं म्हणणार, म्हटले तर आहे म्हटलें तर नाहीं, संशयात्मे, शंका-कुशंकांनीं पीडित, कशाचीहि पक्की खात्री नाहीं, प्रत्येक बाबतींत हातचा राखून असतात.

संरक्षण : : राखणें, पाठीशीं घालणें, भोंवतीं कुंपण करणें, बचाव, निवारा व आसरा देणें, बाधा हटविणें, कवच देणें, धोक्यापासून सुरक्षित ठेवणें, बाधा टाळणें, पीडा न होईल अशी तजवीज.

संसार : : प्रपंच, संसाररथ, घरगिरस्ती, संसाराचें रहाटगाडगें, या भूलोकावरील जीवन, हें दिसणारें जग, हा क्षणाचा बुडबुडा, समुद्राच्या लाटेवरील हा फेंस, अनंत निद्रेंतील जागृतावस्थेचा काळ, मृत्यूच्या छायेंत चालणारी जीवांची धडपड, कालाच्या नेत्रांची एकवार केलेली उघडझांप, मोक्षसाधनेसाठीं मिळालेला काळ, ईश्वराची लीला, गारुड्याचा खेळ, अजस्र नाटक, विशाल मायाजाल, एक भयंकर स्वप्न, हेतुविरहित अस्तित्व, इह-लोकींची यात्रा, भवचक्र, संसारसागर, जीवित-यात्रा, संसारचक्र, करून सुख नाहीं न करून भागत नाहीं, जो संपत आला असतां कसा करावा हें कळूं लागतें असा जीवनकाळ, ज्यास आदि नाहीं अंत नाहीं व मध्याचा पत्ता नाहीं अशी वस्तु, अदृश्य चेंडूचा गोळा घेण्यासाठीं क्षेत्ररक्षकांची खटपट, तो ती व तें यांमध्यें सामावणारें विश्व.

संक्षेपिणें : : थोडक्यांत देणें, त्रोटक मांडणें, सारांश सांगणें, दोन शब्दांत, धांवता आराखडा, आवरतें घेणें, कात्री लावणें, संपतें घेणें, आटवणें, संक्षेप देणें, थोडक्यांत गोडी, अंशमात्र विवेचन करणें, ओझरतें स्पर्शणें, गोषवारा देणें, मथितार्थ सांगणें.

हट्टी : : जिद्दी, हेकेखोर, हेकट, आग्रही, दुराग्रही, हटवादी, आपलें तेंच खरें करील ! दुर्योधन, ज्याचें करावें बरें तो म्हणतो माझेंच खरें, अनुभवांत बुचकळूनहि तुकारामाच्या अभंगासारखा कोरडा, स्वभाव दुरतिक्रम, स्वभावाला औषध नाहीं, तिच्यापुढें अनेकांनीं हात टेकले आहेत आणि जोडलेहि आहेत, तुम्ही तरी भारीच बुवा ! तुम्ही तें अमुक अमुक करा आणि कराच म्हणजे तुमचें चांगलें होईल— सांगणारा मी ! एकच ध्यास घेतला.

हतबुद्ध : : शोकानें भांबावून बधिरच झाली, किंकर्तव्यमूढ, विचारांत पडली, मेंदूची क्रियाच एकदम बंद पडली, गांगरलें, सर्व विचारशक्तीच खुंटली, असें म्हणावेंसें वाटतें कालाय तस्मै नमः, गत्यंतर नसल्यानें हात चोळीत बसावें लागलें, षंढवत् प्रतिकार-हीनता अनुभवास आली.

हरघडी : : नेहमीं, नित्याचें, एक दिवसाआड, प्रत्यहीं, प्रतिदिन, आजकाल, हरदिन, रात्रंदिवस, प्रतिदिवस, सारखें सारखें, दर तासाला, दिन–ब–दिन, घटकेघटकेला, दर प्रहराला, सांजसकाळ, मिनिटामिनिटाला, तासातासाला, दिवसांतून दहांदा, पळापळाला, क्षणाक्षणाला, वारंवार, दिनरात, रात्रंदिन, हरघडी नाहीं तरी दर दुपारीं, अहोरात्र, पावलागणिक, श्वासागणिक, नाडीच्या प्रत्येक ठोक्यागणिक, तिन्हीत्रिकाळ, बसल्या उठल्या.

हर्षातिरेक : : हृष्टपुष्ट आनंद, आनंदाची लयलूट, अनोळखी आनंदाचा लाभ, उत्फुल्ल आनंद, आनंद गगनांत मावेना, पराकोटीची मौज वाटली, हर्षनिर्भर, हृदय थयथय किंवा थुइथुई नाचूं लागलें, हर्ष उत्फुल्ल नेत्रांतून पाझरला, हर्षवायूच झाला, मनाला सुखाची झीट आली.

हलकट : : ग्राम्य, दीन, नीच, नाचीज, पाजी, मवाली, झक्की, दुर्वर्तनी, टाकाऊ, बेकार, अनाचारी, असभ्य, छचोर, चंगीभंगी, वाममार्गी, करंटा, दिवटा, बाजारू, बजरबट्टू, क्षुद्र वृत्तीचा, नाटकी, खोटारडा, बेभरंवशाचा, पांचट, दीडदमडीचा, भिकार, क्षुद्र, हीनकुलोत्पन्न, श्रीमंतांच्या पायतळींचीं माणसें.

हलकच : : नाजूकपणें, चोरून, मांजरीच्या पावलानें, आवाज न करतां सुरकुती पडूं न देतां, हलूं न देतां, न आपटतां, पीस फिरवावें तसें.

हल्ला : : चढाई, आक्रमण, अतिक्रमण, घाला, मुकाबला, हमला, आघात केला, वर घसरला, तुटून पडला, घुसून स्वारी केली, हात टाकला, मारा केला, त्याच्यावर उतरले, वर उडी घेतली, घुसारा केला, अंगावर आले, चालून गेले, चाल केली, वर धांवून गेले, मारा केला, घाव घातला, तडाखा दिला.

हळुवार : : भावुक, तरल, नाजूक कातडीचा, भावाकुल, नाजूक साजूक, रेशमी, कोमल-प्रकृति, मऊमऊ, हालकें फुलकें, चटकन् डोळ्यांना पाणी येईल, कांहींही झटकन् झोंबेल यांना, लवंगेनें उष्ण तर वेलदोड्यानें सर्दी होईल यांना, मृदुलांगी, नुसतीं पारिजातकाचीं फुलें.

हळुवारपणें : : अलद, हलक्या हातानें, नाजूकपणें, तरलतेनें पोटांतलें पाणी न डचमळेल असें, कोमलतेनें, मऊपणें, फुलाप्रमाणें झेलून, जराहि न दुखवितां, जराहि भासूं न देतां, रेशमी मऊपणानें, गाजावाजा न करतां, गुपचुप, न खुपूं देतां.

हळू : : आस्ते, आस्ते कदम, सावकाश, जलदी नाहीं, मंद गतीनें, मुंगीच्या पावलानें, कासवगतीनें, थंडथंड, वेग नांवाचाच ! हळूहळू घाई नाहीं, त्वराहीन, रेंगाळत, रमतगमत, सुस्तपणें, दबल्या स्वरांत, रेटा नको, नाजूकपणें.

हास्य : : हंसूं, हंसणें, स्मित, हंशा, दंतपंक्तिदर्शन, बत्तिशीचें प्रदर्शन, दांत दाखविले, खोः खोः खिः खिः करीत राही, घट्टपुष्ट हंसला, चेहरा स्मिताळला, चेहऱ्याच्या रेषा जरा पुसल्या, गालांतल्या गालांत हंसला, मोजकें हंसूं, पुसट स्मित, अमृतमय स्मित, खुसूखुसूं हंसूं, निरागस हास्य, ओठांची घडी जरा उलगडली, हंसणें टप्पेदार गडगडाटासारखें.

छोटीशी हास्य-लकेर ऐकली, जरा कोठें हंसूं फुटलें, चेहऱ्यावरील सुरकुती जरा हालली, एका बाजूचा गाल आंत घेत हंसला, फिसफिसत पुढें गेली, मंजुळ हास्याचा कलरव, तो रुंद हंसत होता, गालफडें फाटेतों प्रशस्त हंसला, खसखस पिकली, सोडावॉटरच्या बाटल्या फसफसून फुटाव्यात

तसा हंसण्याचा आवाज, हंसून लोटपोट झालें, हास्यांच्या धांवावर धांवा निघत होत्या.

हंसण्याची आणखीन एक लाट फुटे, गंमत ऐकून हंसतां हंसतां पुरेवाट झाली, हंशाची रेलचेल उडवीत, हंसतां हंसतां आमची मुरकुंडी वळे, हास्याबरोबर मुखरसही गाळला, अगदींच चमत्कारिक आणि ढेपाळलेलें हास्य, तो मोठ्यानें ऱ्हस्व हंसला, हवालदारापासून इन्स्पेक्टरापर्यंत सर्वांनीं आपापल्या ग्रेडप्रमाणें दांत विचकले.

आबा गालभर हंसले, दांतांच्या खिडी दाखवीत, त्याचें हसणें हें ठाणबंद घोड्याच्या खिंकाळण्यासारखेंच असे, बत्तीशी दाखवली, तोंडाचें क्षेत्रफळ वाढवून हंसलों, तिचे पांढरे शुभ्र दांत लखलन् चमकले, कोणत्याहि टूथपेस्टच्या जाहिरातींतलें स्मित केलें.

हंसणें : : तें गोड हंसणें म्हणजे पारिजातकाच्या फुलांचा सडाच, दांत काढीत म्हणाला, त्यांच्या काळ्याभोर दाढींतून पांढरें शुभ्र हास्य बाहेर पडलें, त्या ढमालीनें घसघशीत हास्य केलें, खुसूंखुसूं हास्य पालवलें.

हिम : : खोबरें पसरलेल्या वांगीभाताप्रमाणें डोंगर दिसत होते, पांखरांच्या पिसांप्रमाणें तरंगणारें हिम, हिमवस्त्राचा साफा बांधणाऱ्या पठाणी पहाडांना, सर्वत्र जणूं पीठ पसरलें होतें !

हिरवळ : : धरित्रीच्या रंध्रांरंध्रांतून हिरवें जीवन उफाळलें होतें, मातींतून हिरवळ डोकावत होती, पोपटी गवत थरथरत होतें, हिरवेंगार मैदान, दवानें भिजलेल्या नाजूक हिरवळीवरून अनवाणी चालत, सारें हिरवेंचार होतें, हिरव्या रंगानें नटलेली भूमि, हें हिरवें स्वप्न, रम्य वनश्री, कोंवळी लुसलुशीत पालवी.

हिसका : : धसका, धक्का, आदळणें, दणकन् आपटणें, टक्कर, टल्ला खाणें, हिंदकळणें, फेरा, ठोसा देणें, धडकणें.

हीन : : असभ्य, नीच, क्षुद्र, वाईट, तुच्छ, हलका, हिणकस, कम-अस्सल, निकामी, दुय्यम, निकस, भकास, चवहीन, दीन, दुबळा, नाकामयाब, निकम्मा, अळणी, अधःपतित, ही समाजाची खरवड, समाजाचें गटार, घाणींतला किडा, शेवटल्या थराचा, खालच्या दर्जाचा.

हुकुमशहा : : तानाशाह, सर्वेसर्वा, अनियंत्रित सत्ताधीश, सर्व-सत्ताधीश, सर्वप्रबल, शहेनशाह, अनभिषिक्त सम्राट्, सत्तेचा हुकमी एक्का, एकमेव शास्ता, कर्ताकरविता एकच, हा एक बाकी शून्य, तो म्हणेल ती पूर्व दिशा, त्याचा हात धरणारा कोणी नाहीं, कोणी कां म्हणून विचारणार नाहीं.

हुकुमशाही : : सत्तेचें एकांत केंद्रीकरण, एका हातीं कर्तुमकर्तुम् अन्यथा कर्तुम् शक्ति, एकसत्ताक राज्य, जेथें एक व्यक्ति सर्व-सत्ताधीश असते, डिक्टेटर बोले दळ हाले, डिक्टेटरशिप, हुकमेहुकम जेथें चालते, दंडेलीचें राज्य, शाही मर्जीवर राज्यकारभार चालतो, एकाच्या मुठींत-हुकमतींत सर्व, वादी व न्यायाधीश जेथें एकच, सत्तेची मिरासदारी, बेलगाम राज्ययंत्र, बेलगाम राजवट.

हुरहूर : : मनांतली बेचैनी, चुकलें चुकलें वाटणें, आंतून कसें तरी वाटलें, मनाला बरें न वाटणें, आस लागणें, सारखें वाटे कसें असेल काय असेल !

हुंडा (निंदा) : : वरदक्षिणा, यांस हुंडा फक्त एक बुक हवा तें म्हणजे ५ हजार भरलेलें बँक-बुक, हा पांच हजार लेबलाचा नवरा मुलगा आहे, नवरीपेक्षां डावरीच हवी, वरदक्षिणा नको, फक्त ‘ हौसे-मौजेला ’ दोन हजार हवेत, यांच्या घराची पायरी चढायला दहा हजार हवे म्हणतात.

हृदयभंग : : भावनांचीं भंगलेलीं शकलें, वचनांचे मनोरे कोसळले, घोर निराशेनें घेरलें, सारे प्राणप्रिय मनसुबे गुंडाळून ठेवले, सुखस्वप्नांचा चोळामोळा झाला, अपेक्षांची उडी चुकली, आशांचे पंख मेणाचे ठरले, आकांक्षांचा दूरचा चांदोबा ठरला, अंतर्मन चपापलें, जड मनानें परतला, निराशेचा पत्थर उरावर बांधून घेऊन ते तेथून परतले, आनंदावर विरजण पडलें, आयुष्याची रेकॉर्ड संपली, आतां घरघर राहिली, हें जीवन म्हणजे श्रीफल जाऊन उरलेली नरोटीच होय, आपलीं स्वप्नें व्यवहाराच्या डोहांत बुडवून टाकलीं, मनांतल्या आशांचें मूळच आज हादरलें.

हेकट : : हल्यासारखा हेकट, अडणीवरचा शंख, नाठाळ व आडदांड, सांगून ऐकणारा नव्हे, अडेलतट्टू, भलता जिद्दी.

हेटाळणी : : टवाळी, टेर, नाचक्की, वेडावणें, भाव खालीं आणणें, छेडणें, वेंगाडून दाखविणें, कमी लेखणें, किंमत पाडणें, तिरक्या उत्तरानें गप्प बसविणें, चांगलेपणा लक्षांत न घेणें, वाईट भाग उघडा पाडणें, विरोध व दुस्वास यांचें प्रदर्शन, दुरुत्तरांनीं स्वागत, अवहेलना, रेवडी उडविणें, भलेपणाची शंका घेणें, छी थू चालविणें, सारखा मर्मावरच हात ठेवणें, कमीपणा तेवढा हेरणें, विडंबन, उत्साहावर विरजण टाकणें, चिडवणें, दुखावणें, छेड काढणें, किंमतीचें अवमूल्यन, बाष्कळ स्वागत, भंबेरी उडविणें, वेंगाडून तुच्छ ठरविणें, दुसऱ्याची हेटाळणी करणारा स्वतःच्या तुच्छतेची तयारी करत असतो.

हेवा : : ईर्षा, असूया, डोळ्यांत सलणें, न पाहवणें, मत्सर, अंगांत, कैकयी संचरणें, दुसऱ्याचें पाहून पोटांत दुखणें – जळफळाट होणें, दुनिये-वेगळा मत्सर, मत्सराग्नि, हेवादावा, डोळ्यांत खुपूं लागलें, पाहून जळताहेत, दुसऱ्याचें बरें न बघणें, मत्सरग्रस्तता, पोटांत गरळ, पायांत पाय घालण्याची वृत्ति, मागें ओढूं इच्छिणें, रोगट चढाओढ.

होकार : : अनुमति दिली, नन्नाचा पाढा नाहीं वाचला, होय म्हणाले, शब्द मानला, विनंती खालीं पडूं दिली नाहीं, म्हणाले ठीक आहे, संमति–मान्यता दिली, पसंति दर्शविली, मंजुरीचें शिक्कामोर्तब केलें, रुकार भरला, सम्मत झालें, बाजूनें मत दिलें, हात वर केला, माननें होय म्हटलें, शब्दानें नाहीं म्हटलें नाहीं इतकेंच, सवाला पुढें पाय आहे, होला हो आलें.

क्षणभंगुर : : अल्पजीवि, चंचल, अस्थिर, अल्पायु, अळवावरचें पाणी, तेरड्याचा रंग तीन दिवस, आज आहे उद्यां नाहीं, पावसाळ्यांत उगवणाऱ्या कुत्र्याच्या मुताप्रमाणें – छत्र्यांप्रमाणें, नश्वर, औट घटकेचा खेळ, आतां इथें तर आतां तिथें, केव्हांच नाहींसें होईल, हें सर्व जाणारें आहे, क्षणाचा विश्वास नाहीं, उद्यांचें कुणीं पाहिलें आहे? पाण्याच्या बुडबुड्याप्रमाणें, मर्त्य, अशाश्वत.

क्षणांत : : एका दृक्पातांत, डोळ्याचें पातें लवतें न लवतें तोंच,

हां हां म्हणतां, केव्हांच, कधींच, निमिषार्धांत, पळभरांत, पाहतां पाहतां, क्षणार्धांत, एखादा सेकंद वा पळ लागलें असल कदाचित्.

क्षणिक : : तात्कालिक, क्षणमात्राचें, तेवढ्यापुरतें, भूछत्रवत्, पळाविपळांत, नष्ट होणारे, समुद्राची लाट आली व गेली त्याप्रमाणें, बारा महिन्यांचा उन्हाळा आणि घटकेचा पावसाळा.

क्षुल्लक : : टीचभर, गुंजभर, चिमूटभर, सूक्ष्म, इवलासा, बिंदुसमान, नखाएवढा, अल्प, लहान, कमी, एवढासाच, उगीच नांवाला, जवळ जवळ नाहींच, एवढातेवढा, तुटके तोटके, अगण्य, क्षुद्र, तुच्छ, नीच, फडतूस, भिकार, ऐरेगैरे, फालतू, यःकश्चित, गण्यागंपू, कोणत्या झाडाचा पाला ! कवडी किंमतीची, एक नया पैसा किंमत होणार नाहीं, फुटकी कवडी कोणी देणार नाहीं, चार चव्वल किंमत नाहीं, दीड दमडीची सस्ती चीज.

ज्ञान : : विद्या, चौफेर माहिती, पांडित्य, विदग्धता, बारकाव्याचा अभ्यास, बहुश्रुतता, विविध विषयांतील पारंगतता, शिक्षण, इल्म, विविध गोष्टींचा सांठा, अवगत झालेलें जें तें सर्व, बौद्धिक मिळकत, ज्ञानसंचय, प्राप्त ज्ञानकण.

ज्ञान (कमी) : : लांडी विद्वत्ता, केवळ व्यर्थ निरर्थक बडबडीस कारण, उथळ पाणी, शिकवलेली बुद्धि आणि बांधलेली शिदोरी, झगमगाट पण खोली नाहीं, तुटपुंजें ज्ञान, सांठवलेलें शहाणपण, टीचभर मन व गुंजभर माहिती.

* * *

: सूची :

	पृष्ठ		पृष्ठ
अकल्पित	१	अनाग्नता	५
अकस्मात	१	अन्याय	५
अखेर	१	अनावड	५
अगतिकता	१	अनिच्छेनें	५
अग्नि	१	अनिश्चय	५
अजाण	१	अनिश्चित	५
अजीबात	२	अनुकरण	६
अजेय	२	अनुकंपा	६
अट	२	अनुताप	६
अडचण	२	अनुनय	६
अडवणूक	२	अनुपास्थिति	६
अडेलतट्टू	२	अनुप्रास	६
अत्यल्प	२	अनुभव	७
अतिशय	३	अनुभव (कट्ट)	७
अतिशयोक्ति	३	अनुभाविक	७
अतुल	३	अनुमान	७
अदूरदृष्टींचा	३	अनैतिक (वाङ्मय)	८
अधर्म	३	अपकर्ष	८
अध्यात्मवादी (विरुद्ध विज्ञानवादी)	३	अपमान	८
अधाशी	४	अपयश	८
अधिकार	४	अपशकुन	८
अधिरेपणा	४	अपहार	८
अधून-मधून	४	अपेक्षाभंग	९
अधोगति	४	अफवा	९
अनपेक्षित	४	अबोल	९

अभाव	९	अस्थिर	१५
अभिव्यक्ति (वाङ्मयीन)	९	अस्वच्छ	१५
अभेद्य	१०	असुरवृत्ति	१५
अभंग	१०	असंतोष	१५
अभ्यास (निंदा)	१०	अहवाल	१५
अभ्यासू	१०	अहिंसा	१५
अमर	१०	अहेतुक	१६
अयोग्य	१०	अज्ञातवास	१६
अर्धवट (बुद्धीनें)	११	अज्ञानी	१६
अलिप्तपणें	११	अंगलट (स्त्रीची)	१६
अवघड	११	अंतर्द्वंद्व	१६
अवर्णनीय	११	अंदाजें	१६
अवर्षण	११	आई	१७
अवज्ञा	११	आकर्षक	१७
अव्यवस्था	१२	आक्रमण	१७
अवाढव्य	१२	आक्रोश	१७
अवास्तव	१२	आकाश	१७
अविचार	१२	आचरट	१८
अशक्त	१२	आजार	१८
अशक्तता (शारीरिक)	१३	आठवण	१८
अशक्य	१३	आठवणी (तापदायक)	१८
अश्लील	१३	आठवणी (सुखकर)	१८
अश्लील (कामुक)	१३	आठवणें	१९
अष्टपैलू	१४	आततताईपणा	१९
असत्य	१४	आत्मचरित्र (गुण)	१९
असह्यता	१४	आत्मपरीक्षण (अभाव)	१९
असहाय	१४	आत्मप्रवणता	१९
असहिष्णु	१४	आत्मानुभव	१९
अस्थानीं	१४	आतां	१९

आतुरता	२०	आळशी	२५
आदर	२०	आंघोळ	२५
आदरणीय	२०	आवरणें	२५
आदर्श	२०	इतराजी	२५
आधार	२०	इच्छा	२५
आधुनिक	२०	इच्छित	२६
आनंद	२०	इंद्रियदमन	२६
आनंदित	२०	ईशकृपा	२६
आनंददायक	२१	उघड	२६
आनंदी	२१	उजाडणें	२६
आपपरभाव	२१	उठाठेव	२६
आप्तवियोग	२१	उडी	२७
आपुलकी	२१	उणीव	२७
आपोआप	२२	उत्कर्ष	२७
आंधळा	२२	उत्क्रांति	२७
आपत्ति	२२	उत्कृष्ट	२७
आभार	२२	उत्तेजित	२८
आभास	२२	उत्पादन	२८
आराम	२३	उत्साह	२८
आवार	२३	उत्साही	२८
आशय	२३	उदय	२८
आश्चर्य	२३	उद्धार (पुरुषांचे)	२८
आश्रित	२३	उद्धार (स्त्रियांचे)	२९
आशा	२४	उद्वेग	२९
आशाभंग	२४	उदार	२९
आशावादी	२४	उदाहरण	२९
आशाळू	२४	उधळपट्टी	२९
आसन्नमरण	२४	उद्धट	३०
आसपास	२५	उद्धार	३०

उद्योगी	३०	ऐट (उसनी)	३६
उन्नति	३०	ऐटदार	३६
उपद्रव	३०	ऐतखाऊ	३६
उपदेश	३१	ओसाड	३६
उपयुक्त	३१	ओळख	३६
उपवर	३१	ओठ (वर्णन)	३६
उपाय	३१	औषध	३६
उपाय (अयोग्य)	३१	अंदाधुंदी (राजकीय)	३७
उपाय (चुकींचे)	३१	कटकट	३७
उपाय (योग्य)	३२	कडा	३७
उर्वरित	३२	कणखर	३७
उलट टोकें	३२	कथा	३७
उलटा-पालट	३२	कथा (वाईट)	३७
उसनवारी (वाङ्मयीन)	३३	कथा (मांडणी)	३७
उंचवटा	३३	कथावस्तू (दोष)	३७
ऊन (दुपारचे)	३३	कपट	३८
ऊन (सकाळचे)	३३	कपटी	३८
ऋण	३३	कपडे	३८
एकछाप	३४	कपडे (बेडौल)	३८
एकत्व	३४	कबजा (महत्त्व)	३९
एकलेपणा	३४	कमजोर (मन)	३९
एकसांची (लेखन)	३४	कमतरता	३९
एकसूत्रीपणा	३४	कमाल	३९
एक्कलकोंडा	३५	कमी (तुलनेनें)	३९
एकान्त	३५	करमणूक करणें	३९
एकी करणें–होणें	३५	कर्तृत्ववान (पुढारी)	३९
ऐकणें	३५	कल	३९
ऐक्य	३५	कल्पकता (वाङ्मयीन)	४०
ऐट	३६	कल्पना	४०

कला ४०
कवि (वाईट) ४१
कविता (चांगली) ४१
कविता (वाईट) ४१
कविमन ४२
कष्टाळू ४२
कसबी ४२
क्रांति ४२
क्रियातंत्र ४३
क्रुद्ध ४३
क्रूर ४३
कान्ति ४३
कान्ति (युवतीची) ४३
काम (खूप) ४४
कामचलाऊ ४४
कामुकता ४४
कायदा ४४
कायदा (वाईट) ४४
कायदेभंग ४५
कायमचे ४५
कारस्थान ४५
कार्यमग्न ४५
कालापव्यय ४६
काळजी ४६
काळा बाजार ४६
काळोख ४६
कॉलेजकन्यका ४७
किरकोळ ४७
किळस ४७
कीर्तिमान ४७
कुटाळकी ४७
कुटुंब-नियोजन ४८
कुत्सित ४८
कुप्रसिद्ध ४८
कुमारी ४८
कुरूप (पुरुष) ४९
कुरूप (स्त्री) ४९
कुलीना ५०
कुविचार ५०
कृतघ्न ५०
कृतिशील ५०
कृतिशून्य ५०
कृतिहीनता ५१
केव्हां तरी ५१
केंद्रभूत ५१
केस (युवतीचे) ५१
कैद ५१
कोट्या, श्लेष व अनुप्रास ५१
कोडगेपणा ५२
कोता ५२
कोतेपणा ५२
कोमल ५२
कोरडा ५२
कोंडणें ५२
कंजूष ५३
कंटाळा ५३
खचणें ५३
खरडपट्टी ५३

खराब	५३	गुरु (खोटा)	६०
खल-पुरुष	५४	गुलामवृत्ति	६०
खात्री वाटणें	५४	गुंड	६०
खाद्यें (चांगली)	५४	गुंतागुंतीचा	६०
खादाड	५४	गेला	६०
खुळा	५४	गैरमार्गानें	६१
खूप	५५	गैरमुद्याचें	६१
खोटें	५५	गोंगाट	६१
खोललें	५५	गोंधळ	६१
गमन (वर्णन)	५५	गौप्यस्फोट	६१
गमावणें	५६	गंभीर	६२
गरम	५६	घटस्फोट	६२
गर्दी	५६	घड्याळ	६२
गर्भश्रीमंती	५७	घडामोडी	६२
गर्भारपण	५७	घर	६३
गर्व	५७	घाई	६३
गर्विष्ठ	५७	घाऊक	६३
गरिबी (पराकाष्ठेची)	५८	घाण	६३
ग्रंथ (टाकाऊ)	५८	घाणेरडा	६४
गाणें (चांगलें)	५८	घाबरत	६४
गाणें (वाईट)	५८	चढाओढ	६४
गायन (चांगलें)	५८	चप्प	६४
गायन (निंदा)	५९	चर	६४
गायन शिक्षक (निंदा)	५९	चर्चा (वाईट)	६५
गांवढळ	५९	चवचाल	६५
गिऱ्हाईक (वाईट)	५९	चविष्ट	६५
गुणगान (स्तवन)	५९	चहाडी	६५
गुन्हेगार	५९	चाल (युवतीची)	६५
गुपचूप	६०	चालढकल	६६

चालणें ६६
चांगला ६६
चांदणी ६७
चांदणें ६७
चित्रविचित्र ६७
चितारणें ६७
चिन्ह ६७
चुकला ६७
चुकार ६७
चुंबन ६८
चूक ६८
चेहरा (युवतीचा) ६८
चेचणें ६८
चैन ६९
चोरी ६९
चंचलता ६९
चंद्र ६९
छोटे ६९
जन्म ६९
जलदीनें ६९
जवळचा ७०
जाणूनबुजून ७०
जादू ७०
जालीम ७१
जाहिरात (करणें) ७१
जाहिरातबाजी ७१
जिद्दी ७१
जिव्हालौल्य ७१
जिव्हाळा ७२
झुळणारा ७२
जुलूम ७२
जेवण ७२
जेवलों ७२
जोडणें ७३
जोडपें (विजोड) ७३
जोम ७३
जोराचा (प्रयत्न) ७३
झाड ७३
झांटिपी ७३
झिडकारलें ७४
झिंगणें ७४
झोपड-पट्टी भाग ७४
झोप (जड) ७४
टणक ७५
टाकणें ७५
टाकाऊ (ग्रंथ) ७५
टापटीप ७५
टाळाटाळ ७६
टिकाऊ ७६
टीका ७६
टीका (कडक) ७६
टीका (कुत्सित) ७६
टीका (चांगली) ७७
टीका (जहाल) ७७
टीका (ढोंगी) ७७
टीका (दोषदृक्) ७८
टीका (वाईट) ७८
टीकाकार (वाईट) ७८

ढुमणें . ७८
ठार ७८
डाग ७८
डोळे (युवतीचे) ७८
डोंगर ७९
ढग ७९
ढोंग ७९
ढोंगी ७९
तडजोड ८०
तडाखा ८०
तफावत ८०
तयारी ८०
तरुण (छटेल) ८०
तरुणी (छटेल) ८१
तुरुणी (वर्णन) ८१
तर्क ८२
तर्कदुष्टता ८२
तऱ्हा ८२
तलास ८२
तळ ८२
तज्ञ ८२
त्याग ८३
त्रास ८३
ताठ ८३
तात्पर्य ८३
तापट ८३
तारतम्य ८४
तारुण्य ८४
तिरसट ८४
तीव्र ८४
तुकडा ८४
तुटक ८५
तुरळक ८५
तृप्ति ८५
तेजस्वी ८५
तेजहीन ८५
तोचतोचपणा (वाङ्मयीन) ८६
तोतया ८६
थाप ८६
थेट ८६
थोडें ८६
थोर (व्यक्ति) ८७
थंड ८७
थंडी ८७
दम (देणें) ८७
दमणें ८८
दयावंत ८८
दयास्पद ८८
दर्जेदार ८८
दर्शनीय ८८
दरिद्री ८९
दरी ८९
दाट ८९
दाणगट ८९
दारू ८९
दारिद्य ८९
दारिद्य (दुष्परिणाम) ९०
दारिद्य (लाचारी) ९०

दारिद्र्य (मगरूरी) ९१
दांत (युवतीचे) ९१
दिलजमाई ९१
दिवा (वर्णन) ९१
दिसणें ९१
दुखणाईत ९१
दुटप्पी ९१
दुटप्पीपणा ९२
दुपार ९२
दुबळा ९२
दुर्घटना ९२
दुर्दैव ९२
दुर्दैवी ९३
दुर्मिळ ९३
दुर्बल–दीन ९३
दुर्बोध (ग्रंथ) ९३
दुर्लक्ष ९३
दुष्कृति ९३
दुष्टपणा ९४
दुष्प्राप्य ९४
दुराग्रह ९४
दुरावणें ९४
दुरुस्ती ९४
दुःख ९४
दुःखविह्वल ९५
दूरचा ९६
दूरदृष्टि ९६
देशद्रोही ९६
देह ९६
दैव ९६
दैववाद ९७
दोष (देणें) ९७
दोषयुक्त ९७
धडधाकट ९७
धडपड ९८
धन (महिमा) ९८
धन-संचय ९८
धन-लोभ ९८
धनाढ्यता ९८
धनापहार ९९
धरसोड ९९
धर्मग्लानि ९९
धर्मगुरु ९९
धष्टपुष्ट ९९
ध्यान-धारणा (खोटी) ९९
ध्यास ९९
ध्येय १००
ध्येयप्राप्ति १००
ध्येयवाद १००
ध्येयहीनता १००
ध्वन्यर्थवादी (नांवें) १००
धाडस १०१
धीट १०१
धुकें १०१
धोका १०१
धोक्याची (परिस्थिति) १०१
धारण १०२
धारणीपणा १०२

नकली १०२
नक्कल १०२
नकार १०२
नकार (स्त्रीचा) १०३
नकाशा १०३
नको १०३
नम्रता १०३
नदी १०४
नपुंसक १०४
नरमला १०४
नवरा १०४
नवरा (नालायक) १०४
नवऱ्याचें प्रेम १०४
नवेपण १०४
नष्ट करणें १०५
न्याय १०५
न्यायबुद्धि १०५
न्यून १०५
न्हाणीघर १०५
नाइलाज १०५
नाखुषी १०६
नाजूक १०६
नाटक (चांगलें) १०६
नाटक (वाईट) १०६
नाटकी १०७
नापसंती १०७
नायक (सुंदर) १०७
नायिका (सुंदरी) १०७
नालस्ती १०८
नालायक १०८
नाविन्ययुक्त १०८
नाविन्याभाव (पुस्तकांत) १०८
नाहींसें (झालें) १०८
नित्य १०९
निपुण १०९
निभावणें १०९
नियमितपणें १०९
निरर्थक १०९
निर्भयता १०९
निर्लज्ज ११०
निर्लज्जता ११०
निराशा ११०
निरिच्छ १११
निरुद्योगी १११
निरुपद्रवी १११
निरुपम १११
निरुपयोगी १११
निरोगी ११२
निवडक ११२
निश्चय ११३
निश्चयी ११३
निश्चल ११३
निष्फळ ११३
निसर्ग ११३
निसर्ग-दृश्य ११४
निःस्पृह ११४
निंदक ११४
निंदा ११४

निःशस्त्र	११५
नीतिमान	११५
नीरस	११५
नुकसान	११५
नुकसानी (आर्थिक)	११५
नेभळट	११५
नेहमीं	११६
नोकर	११६
नोकर (निंदा)	११६
नोकर (स्तुति)	११७
नौकरी (निंदा)	११७
नोकरी (स्त्रियांची)	११७
परका	११७
परतंत्र	११८
परदोषदर्शन	११८
परप्रत्ययनेयबुद्धि	११८
परमेश्वर	११८
परमेश्वर (गुणगान)	११८
पर्याय	११९
पराभव	११९
पराभव (करणें)	११९
परिवर्तन	१२०
परिश्रम	१२०
परिस्थिति (वाईट)	१२०
परीक्षा (अपयश)	१२०
परोपदेश	१२०
पवित्र	१२१
पश्चात्ताप-पीडित	१२१
पसंत	१२१

पळविणें	१२२
पळाला	१२२
प्रकाश	१२२
प्रचंड	१२२
प्रणय	१२२
प्रत्यक्षांतील	१२२
प्रत्युत्तर	१२३
प्रतिकार	१२३
प्रतिकार (योग्य)	१२३
प्रतिबंध	१२३
प्रतिष्ठित	१२४
प्रमुख	१२४
प्रयत्न	१२४
प्रयत्नवाद	१२४
प्रवास-शीण	१२५
प्रशंसनीय	१२५
प्रसंग (दुःखद)	१२५
प्रागतिक	१२५
प्रायश्चित्त	१२५
प्रार्थना	१२६
प्रारंभ	१२६
प्रियकर	१२६
प्रिया	१२६
प्रीति (टवाळी)	१२६
प्रेत	१२७
प्रेम	१२७
प्रेम (अंकुरणें)	१२७
प्रेम (निंदा)	१२८
प्रेम (स्तुति)	१२८

प्रेमिक (टवाळी) १२८
प्रोत्साहन १२९
प्रौढा १२९
पाऊस १२९
पाठलाग १३०
पाठिंबा १३०
पादपूरक (वाक्यें) १३०
पान १३१
पान १३१
पाप्याचा पितर १३१
पापिणी १३१
पापी १३१
पायधरणी १३२
पारतंत्र्य १३२
पाल्हाळ १३२
पाशवी १३२
पाहणें १३२
पाहुणचार १३३
पांगणें १३३
पांगापांग १३३
पांढरा १३३
पिछाडी १३३
पिटणें १३३
पिळवणूक १३४
पुढारी १३४
पुढारी (श्रद्धांजलि) १३४
पुत्र १३५
पुनरुक्ति १३५
पुरावा (कच्चा) १३५
पुरावा (बिनतोड) १३५
पुरेसें १३५
पुष्कळ १३५
पुस्तक १३६
पूर्ण १३६
पूर्वग्रह १३७
पूर्व-तयारी १३७
पूर्व-नियोजित १३७
पूर्व-पद १३८
पृथ्वी १३८
पेंच-प्रसंग १३८
पैसा (निंदा) १३९
पैसा (विपुल) १३९
पैसा (सामर्थ्य) १३९
पोकळपणा १३९
पोटार्थी १३९
फटफजिती १४०
फसवणूक १४०
फसविलें १४०
फळें १४१
फाजील १४१
फायदेशीर १४१
फांदी १४१
फुकट पगारी १४१
फुटणें १४१
फूट १४२
बडतर्फी १४२
बढाईखोर १४२
बदचाल (पुरुष) १४२

बदचाल (स्त्री)	१४२	बेशिस्त	१४७
बदनामी	१४२	बोलणें (कृत्रिम)	१४८
बदल	१४३	बोलणें (गोड)	१४८
बदल (वाईट)	१४३	बोलणें (थोडें)	१४८
बलिदान	१४३	बोलणें (बेछूट)	१४८
बलिष्ठ	१४३	बोलणें (रागाचें)	१४९
ब्रह्मचारी	१४४	बोलणें (वायफट)	१४९
ब्रह्मचारी (निंदा)	१४४	बोलभांड	१४९
बाकी	१४४	भपका (खोटा)	१४९
बायको	१४४	भयग्रस्त	१४९
बालंट घेणें	१४४	भरपूर	१५०
बावळट	१४४	भरभराट	१५०
बाळ (राजस)	१४५	भवितव्य	१५०
बाळपण	१४५	भ्याला	१५०
बाळंत झाली	१४५	भ्रमनिरास	१५०
बांक	१४५	भाग	१५१
बांधा (मुलीचा)	१४५	भाग्य	१५१
बिघडविलें	१४५	भागीदारी	१५१
बुद्धि	१४६	भाडोत्री	१५१
बुद्धिप्रामाण्य	१४६	भारली	१५१
बुद्धिमान	१४६	भावनाप्रधान	१५१
बुवाबाजी	१४६	भावनाविष्कार (काव्यांतील)	१५२
बेअक्कल	१४६	भावनाशून्य (विकारहीन)	१५२
बेकार	१४७	भावस्पर्शी (लेखन)	१५२
बेचव	१४७	भांडखोर	१५२
बेजबाबदारपणा	१४७	भांडण	१५२
बेडौल	१४७	भांडण (तोंडी)	१५३
बेलगाम	१४७	भांडण (लावणें)	१५३
बेवारशी	१४७	भांबावला	१५३

भिकारी १५३
भिस्त १५३
भीड १५४
भुताटकी १५४
भूत १५४
भूषविणें १५४
भेकड १५४
भोगवाद १५४
भोळा १५४
भोंदूपणा १५५
मऊ १५५
मठ्ठ १५५
मदत १५६
मदत (कंजूषपणाची) १५६
मदत (निंदा) १५६
मदत (सढळ) १५६
मदतीने १५६
मध्यम (प्रतीचा) १५७
मनमोकळा १५७
मनमोकळेपणा १५७
मनोनिग्रह १५७
मनोराज्य १५७
मनःसंयम १५७
मर्यादा १५८
मर्यादातिक्रम १५८
मर्यादित १५८
महत्त्वाचें १५८
मळणें १५८
म्हातारपण १५८
म्हातारपण (मनाचें) १५९
म्हातारपण (शरिराचें) १५९
माघार १५९
मानी १५९
माफी मागणें १६०
मारणें १६०
मारपीट १६०
मारामारी १६०
मालक १६०
माहीत असणें १६०
मिटणें १६०
मितपणा १६१
मित्र १६१
मित्र (चांगला) १६१
मित्र (वाईट) १६१
मित्रभाव १६१
मिळालें १६२
मुकणें १६२
मुक्त १६२
मुग्धा १६२
मूर्ख १६२
मूल्यवान १६३
मृत्यु १६३
मृत्युहानि १६३
मेणचट १६३
मैत्री १६४
मैत्रीभंग १६४
मोटारी (धावत्या) १६४
मोबदला १६४

मोह १६४
मोहित १६५
मौन १६५
मंजुळ १६५
मंदपणें १६५
यश (मिळविलें) १६६
युक्ति १६६
युद्धखोर १६६
युवती (वर्णन) १६६
योग्य १६७
योगायोगानें १६७
यःकश्चित १६७
रडणें १६७
रडली १६७
रसदार १६७
रस्ता १६७
रसिक १६८
राग १६८
राग (निंदा) १६८
रागीट १६८
रागें भरणें १६८
रात्र १६९
रान १६९
राहणें १६९
राक्षसी १६९
रिकामपण १६९
रीति १६९
रुदन १६९
रुसवा १७०
रूढि (वाईट) १७०
रूपकें १७०
रूपकें (चमत्कृतिजनक) १७०
लग्न १७१
लग्न (निंदा) १७१
लगेच १७१
लघूक्ति (व व्याजोक्ति) १७१
लज्जास्पदता १७१
लज्जित (युवती) १७२
लठ्ठ (पुरुष) १७२
लठ्ठ (स्त्री) १७२
लढा १७३
लबाड १७३
लबाडी १७३
लहान १७३
लाचार १७३
लाचारी १७४
लाजवंती १७४
लाभ १७४
लाभदायक १७४
लाळघोट्या १७४
लांच १७५
लांचलुचपत १७५
लांचलुचपत (सामर्थ्य) १७५
लुडबूड १७५
लुप्त १७५
लेख (वाईट) १७६
लेखक (आदर्शवादी) १७६
लेखक (चांगला) १७६

लेखक (वाईट)	१७६	वागणूक (वाईट)	१८२
लेखन (ओंगळ)	१७७	वाढ	१८२
लेखन (वाईट)	१७७	वाढणारा	१८३
लोकप्रियता	१७७	वाढणें	१८३
लोकभ्रम	१७७	वाढ-विकास (मुलांचा)	१८३
लोकशाही	१७८	वाताहात	१८३
वक्तृत्व (चांगलें)	१७८	वाद (चांगला)	१८३
वक्रोक्ति	१७८	वाद (वृथा)	१८४
वकील	१७८	वामाचार	१८४
वजनदारपणा	१७८	वारा	१८४
वटवट	१७९	वारंवार	१८४
वयांत येणें (स्त्री)	१७९	वावटळ	१८४
वरचढ	१७९	वास्तवता (कथेंतली)	१८४
वरपांगी	१७९	वास्तविक	१८५
वर्गीकरण	१७९	वांकडा	१८५
वल्गना	१७९	वांझ	१८५
वशिला	१७९	विकार	१८५
व्यक्तिमत्त्व-विकास	१८०	विघ्न	१८५
व्यभिचार	१८०	विघ्नसंतोषी	१८५
व्यर्थता	१८०	विचार	१८६
व्यवसाय (गुण)	१८०	विचारप्रवर्तक (लेख)	१८६
व्यवहारी (अति)	१८०	विचारी	१८६
व्यसन	१८०	विजय	१८६
व्यसनी	१८०	विटाळसपण	१८६
व्याख्यान (गप्पीदास)	१८०	विटंबना	१८६
व्याख्यान (चांगलें)	१८१	वितुष्ट	१८७
व्याख्यान (वाईट)	१८१	विद्यार्थी (मंद)	१८७
व्याजोक्तिपूर्ण (लेखन) वाईट	१८१	विद्यार्थी (वाह्यात)	१८७
	१८१	विद्वान्	१८७

विद्वान् (निंदा)	१८८	विस्तृत	१९६
विदुषी (निंदा)	१८८	विस्मरण	१९६
विधवा	१८८	विक्षिप्त	१९६
विनयवृत्ति	१८८	वृत्तपत्र (वाईट)	१९६
विनवणी	१८८	वेडसर	१९७
विनायास	१८८	वेडेपणा	१९७
विनाश	१८९	वेश्या	१९७
विनाश (केला)	१८९	वैतागणें	१९७
विनोद (चांगला)	१९०	वैधव्य	१९७
विनोद (वाईट)	१९०	वैफल्य	१९७
विमनस्कता	१९०	वंश-गुण	१९८
विरस	१९१	शत्रुत्व	१९८
विरह	१९१	शत्रू	१९८
विरळा	१९१	शब्दनाणीं (नवीं)	१९८
विरागी	१९१	शब्दप्रयोग (चांगले)	१९९
विरुद्ध टोकें	१९१	शरणागति	१९९
विरोधून	१९१	श्रद्धा (उदाहरणें)	१९९
विलक्षण	१९२	श्रम (फुकटचे)	१९९
विलासी	१९२	श्रमसाध्यता	२००
विवाह	१९२	श्रीमंत	२००
विविध	१९२	श्रीमंती	२००
विवेचन (चांगलें)	१९३	श्लेष-कोट्या-अनुप्रास	२००
विश्वासघात	१९३	श्लेष-कोट्या (नांवावर)	२०१
विशाल	१९३	शान्त	२०१
विशेषणांचा थारेपालट	१९४	शान्तता	२०१
विषम	१९५	शान्तताप्रिय	२०१
विषमता	१९५	शास्त्रीय दृष्टि	२०१
विस्तार	१९५	शिकविणें	२०२
विस्तारशः	१९५	शिकविणें (निंदा)	२०२

शिकविणें (व्यर्थ)	२०२	सत्यापलाप	२०८
शिकाऊ वय	२०२	सती	२०८
शिव्या	२०२	सनातनी	२०९
शिवीगाळ	२०२	सफाई	२०९
शिस्त	२०३	सभ्यता	२०९
शिळेपणा	२०३	समचित्तता	२०९
शिक्षक	२०३	समन्वय	२०९
शिक्षक (स्तुति)	२०३	समस्या	२१०
शिक्षक (निंदा)	२०३	सम-संयोग	२१०
शिक्षण (फोल)	२०३	समाज	२१०
शिक्षित	२०४	समाधान	२१०
शिंकला	२०४	समाधि (स्थिति)	२१०
शुद्ध	२०४	समान	२१०
शुष्क	२०४	समुद्र	२११
शेवट	२०४	समूह	२११
शैली	२०४	समृद्धि	२११
शैली (तपशील)	२०४	समोर	२१२
शैली (चांगली)	२०५	सरस	२१२
शैली (दोष)	२०५	सर्व	२१२
टीका	२०५	सर्वत्र	२१२
शोक	२०६	सवत	२१३
शंकनीय	२०६	सवलत	२१३
सकाळ	२०६	सहजगत्या	२१३
सच्चरित	२०७	सहजलभ्य	२१३
सच्चा	२०७	सहजीवन	२१३
सज्जन	२०७	सहनशीलता	२१३
समाईक (हितसंबंध)	२०७	स्तन	२१४
सत्तान्तर	२०८	स्तुत्य	२१४
सत्य	२०८	स्तुति	२१४

स्त्रिया २१४
स्त्री (कुचेष्टा) २१५
स्त्री (निंदा) २१५
स्त्री (प्रकार) २१५
स्त्री (प्रकार) २१५
स्त्री (महत्त्व) २१५
स्त्री (लज्जाहरण) २१५
स्त्री (स्तुति) २१६
स्त्रीसौंदर्य (धोके) २१६
स्थिर २१६
स्नेह २१६
स्पर्धा २१७
स्पष्टवक्तेपणा २१७
स्फूर्ति २१७
स्फोट २१७
स्मृति २१७
स्रवणें २१७
स्वगुण २१७
स्वच्छ २१८
स्वभाळूपणा २१८
स्वानुभूति २१८
स्वार्थत्याग २१९
स्वार्थी २१९
स्वार्थीपणा २१९
स्वारी २१९
स्वैर २१९
सात्त्विक २२०
साधारण २२०
सायंकाळ २२०
सारखा २२०
सारासारबुद्धि २२०
सावधानता २२१
साहणें २२१
साहित्य-प्रशंसा २२१
सुख २२१
सुटका २२१
सुदैव २२२
सुधारणा २२२
सुधारली २२२
सुरळित २२२
सुरक्षित २२२
सुव्यवस्था २२३
सुसज्ज २२३
सुंदर २२३
सुंदर (पुरुष) २२३
सुंदर (मुलगी) २२३
सुंदरी २२४
सूड २२४
सूर्यप्रकाश २२४
सूर्यास्त २२४
सृजनक्षमता २२४
सोपी (गोष्ट) २२५
सौंदर्य (स्त्रीचें) २२५
सौम्य २२५
संकीर्ण २२५
संकुचित (दृष्टिकोन) २२५
संकोच २२५
संगत २२६

संगीत (चांगलें) २२६
संघर्ष २२६
संत २२६
संत (खोटा) २२६
संतति (विपुल) २२६
संतपणा २२७
संताप २२७
संतापला २२७
संतुष्ट २२७
संध्याकाळ २२८
संधि २२८
संपत जाणारे २२८
संबंध दुरावले २२८
संभवनीय २२९
संमति २२९
संयम २२९
संयोग २२९
संशय २२९
संशयवाद २३०
संरक्षण २३०
संसार २३०
संक्षेपिणें २३०
हट्टी २३१
हतबुद्ध २३१
हरघडी २३१
हर्षातिरेक २३१
हलकट २३१
हलकेंच २३२
हल्ला २३२
हळुवार २३२
हळुवारपणें २३२
हळू २३२
हास्य २३२
हंसणें २३३
हिम २३३
हिरवळ २३३
हिसका २३३
हीन २३३
हुकुमशहा २३४
हुकुमशाही २३४
हुरहूर २३४
हुंडा (निंदा) २३४
हृदयभंग २३४
हेकट २३४
हेटाळणी २३५
हेवा २३५
होकार २३५
क्षणभंगुर २३५
क्षणांत २३५
क्षणिक २३६
क्षुल्लक २३६
ज्ञान २३६
ज्ञान (कमी) २३६

♣ ♣ ♣

किंमत रु. ७.५०

शब्दांचा संग्रह शब्दकोशांत केलेला असतो. त्यांतूनच सम-शब्द-कोश [Dictionary of Synonyms] तयार केलेला असतो. या धर्तीवरच पण सम विषयांस जमणारे शब्द एकत्रित करून त्यांचा एक कोश करतात. त्याला 'पर्यायी शब्द-कोश' [Thesaurus] अशी संज्ञा दिली जाते. यालाच 'शब्द-कौमुदी' हा शब्द वापरला आहे.

या कोशाची रचना करतांना केवळ सदृश शब्दावरच थांबता संलग्न व जुळणाऱ्या अशा कल्पना व वाक्प्रचार शब्दाबरोबरच घेतले आहेत. मराठी भाषेची जडण-घडण पाहतां तीमधील दोनतीन शब्द गुंफून अथवा एखादी कल्पना घेऊन निर्माण होणारे वाक्प्रचार बाजूला काढले तर राहणारे पर्यायी शब्द तितकेसे उपयोगी ठरणार नाहींत असें वाटल्यावरून अशा तऱ्हेचा संमिश्र स्वरूपाचा हा कोश तयार केला आहे.

योग्य, समर्पक व अर्थवाही शब्दनाणी जमा करून ती कुशलतेनें वापरणे म्हणजेच यशस्वी लेखनकला. मराठीमध्यें लेखन करणाऱ्या अनेकांना या कोशाचा उपयोग होईल असा विश्वास वाटतो.

नी ळ कं ठ प्र का श न : पु णें